# जाणून घेऊ या ....गांधीजींना


लेखन

**वासंती सोर**

संपादन

**प्रेरणा खरे**

**प्रमिला खर्चे**



प्रथम संस्करण : २०२२

**प्रकाशक :**

प्रा. तुषार सोर

फ्लैट नं. ८, नविन पंडित कॉलनी

राजीव गांधी भवन

शरणपूंर रोड, नाशिक (म. रा.) ४२२ ००२

मो. ९७६२६६७०८८

समर्पण

वंदनीय मावशी प्रा. वासंती सोर

यांच्या स्मृतीस ..... ,

- प्रेरणा खरे

- प्रमिला खर्चे

## मनोगत ....

प्रसंगविशेषी गांधीविचारांवरचे लेख लिहन मी विविध नियतकालिंकांकडे पाठवत असे. त्यांना प्रसिध्दीही मिळायची. छापून आलेल्या लेखांची कात्रणे एका फाइलमध्ये लावून ठेवायची. त्यामुळे ते सर्व लेख सुरक्षित राहिले. वृत्तपत्र तर साऱ्या लेखांसह दुसऱ्या दिवशी रद्दीत जाणार ह्याची मला पूर्ण जाणीव होती. त्याची हळहळ वाटायची. पण त्यावर उपाय नव्हताच. माझी एक खूप जुनी वर्ध्याची विद्यार्थिनी प्रमिला खर्चे आणि बदलापूरची मैत्रीण प्रेरणा खरे मधूनमधून माझ्याकडे यायच्या. त्यावेळी माझी कात्रणांची फाइल वाचायच्या. एक दिवस दोघी म्हणाल्या, की या सर्व लेखांचं संपादन करून आपण पुस्तकरूपात ते प्रकाशित करावं. असं आम्हाला वाटतं म्हणजे हे सर्व लेख पुढच्या पिढीपर्यंत पोहोचतील. आणि त्यांना गांधी समजून घेणे सुलभ होईल. तुम्ही परवानगी देत असाल तर आम्ही कामाला लागतो. मला समाधान वाटलं. माझी हळहळ दूर झाली. मी त्यांना कामाचं स्वरूप, त्याला लागणारा प्रदीर्घ कालावधी, अत्यंत मेहनत करून केलेलं संपादन पुस्तकरूपात प्रकाशित होईलच याची शाश्वती नाही वगैरे सगळी कल्पना दिली, संमती घेऊन त्या कामाला लागल्या. संपादन पूर्ण झालं. त्यावर मी समाधान व्यक्त केलं.

**- वासंती सोर**

## संपादकीय...

लहानपणी गांधी विनोबांच्या अंगाखांद्यावर खेळलेल्या वासंतीमावशींनी जवळजवळ चाळीस वर्ष शैक्षणिक चौकटीतील अध्यापन कार्य करताना आणि १९९७ला सेवानिवृत्त झाल्यानंतरही अखंड गांधी विचारांचा प्रचार आणि प्रसार करण्याचा मनस्वी ध्यास घेतलेला होता.

कधी जीवनउत्सवाच्या निमित्ताने तर कधी मावशींच्या पुस्तक प्रकाशनाच्या निमित्ताने अथवा मावशींच्या सहवासात राहायला मिळावे म्हणून दरवर्षी चार-पाच दिवस तरी नाशिकला मावशींकडे आमचा मुक्काम असायचा. त्या त्या वेळी वेगवेगळ्या नियतकालिकात गांधींविषयी प्रसिध्द झालेल्यां लेखांच्या कात्रणांची फाइलच मावशी आम्हाला वाचायला द्यायच्या. मूळ नियतकालिकांमधील हे लेख रद्दीत गेले असणार असं वाटायचं.

हे आशयसमृध्द लेख वाचकांना कायम वाचायला मिळावे म्हणून त्या सर्व लेखांचं संपादन करून एक पुस्तक प्रसिध्द करावं असा आम्ही निश्चय केला. आणि कामाला लागलो. संपादनाचं काम पूर्ण झाल्यावर गांधी विचारांच्या अभ्यासक दमयंतीताई पांढरीपांडे यांनी समर्पक शब्दात अर्थपूर्ण प्रस्तावना लिहून दिली. आम्ही त्यांचे ऋणी आहोत.

गांधी विचारांच्या प्रचारक , प्रसारक, लेखिका असलेल्या मावशींच्या लेखांचे संपादन करण्याची आम्हाला संधी मिळाली त्याबद्दल आम्ही मावशींच्या ऋणी आहोत.

**- प्रेरणा खरे**

**- प्रमिला खर्चे**

## प्रस्तावना...

एक अभ्यासू, निष्ठावंत गांधीवादी विचारवंत या नात्याने प्रा. वासंती सोर महाराष्ट्रात सुपरिचित आहेत. गांधी विचाराने भारलेल्या वातावरणात व गांधीवादी विचारवंतांच्या सहवासात त्यांचे बालपण गेले. गांधी-विनोबांच्या प्रेरणेने स्थापन झालेल्या वर्धेच्या महिलाश्रमात त्यांचे शिक्षण झाले. गांधी-विचार प्रत्यक्ष आचरणात आणणाऱ्या शिक्षण संस्थेत शिक्षण झाल्यामुळे गांधी विचार हा त्यांच्या जीवनाचा एक अविभाज्य भाग बनला. त्यांनी वेळोवेळी दिलेल्या भाषणांमध्ये आणि लिखाणांमध्ये त्यांच्या विचारांचे प्रतिबिंब उमटले. एका आगळ्या वेगळ्या अधिकारवाणीतून ते मुखरित झाले असल्यामुळे ते अत्यंत स्वाभाविक व हृदयस्पर्शी वाटते; यात शंका नाही.

विवाहानंतर त्या नाशिकला आल्या. तिथे एका महाविद्यालयात त्यांनी तीन दशकांपेक्षा जास्त काळ अध्यापन केलं. तारुण्याच्या उंबरठ्यावर उभे असणाच्या तरुण मुलामुलींशी त्यांचा सतत संपर्क होता. उमलत्या वयातल्या भावविश्वाशी त्यांच्या संवेदनशील मनाची जवळीक होती. हीच मुलं सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक वास्तव स्वच्छ मनाने समजून घेऊ शकतात आणि समाजात पसरलेले गांधींविषयीचे गैरसमज जाणून घेऊ शकतात याची त्यांनी मनोमन खूणगाठ बांधली आणि गांधीजींच्या कार्याची ओळख करून देणारी काही पुस्तके त्यांनी प्रकाशित केली 'जाणून घेऊ या मांधीजींना' हे पुस्तकही गांधीजींचे विचार आजही कसे कालोचित आहेत. हे समाजाला समजावून सांगण्यासाठीच सिध्द आहे. या पुस्तकात लेखिका गांधींच्या गुणवैशिष्ट्यांपासून पोशाखांच्या बदलांपर्यंत, त्यांच्या विचारांपासून सत्याग्रहापर्यंत त्यांच्या व्रतविचारांपासून रचनात्मक कार्यक्रमांपर्यंत सर्व पैलूंवर प्रकाश टाकतात. गांधी समजून घेऊन, तो समजावून सांगण्याची क्षमता आणि सिध्दहस्त लेखनकौशल्य यामुळे या पुस्तकातील सारेच लेख रोचक आणि आजही समाजाला मार्गदर्शन करण्यास समर्थ आहेत.

एकविसावं शतक सुरू होऊन दोन दशक संपली. भारतात आणि जगातही संकीर्ण व परस्परविरोधी परिस्थिती निर्माण झालेली आज आपण अनुभवतो आहोत. एका बाजूला तंत्रज्ञान आणि विज्ञानाने आकाशात भरारी घेतली आहे, तर दुसऱ्या बाजूला माणसांच्या झुंडी धर्म, जात, संप्रदाय इत्यादी भ्रामक अस्मितांच्या नावाने हाती शस्त्र घेऊन एकमेकांच्या जीवावर उठली आहेत. माणुसकीचा साधा सरळ अर्थ लोक विसरले आहेत. सत्तांध पक्षोपपक्ष विकासाच्या आणि खोट्या सुखाच्या आशा दाखवीत आहेत. 'सर्वेऽपि सुखिनः सन्तु, सर्वे सन्तु निरामया:। सर्वे भद्राणि पश्यन्तु, मा कश्चित दुःखमाप्नुयात।।' हा जगत्कल्याणाचा शाश्वत मंत्र समाज-मनातून उखडून टाकण्याचा चंगच हिंसक शक्तीने बांधलेला दिसतोय. आत्मकेंद्री आणि सर्वविनाशी अशा आवर्तांमधून बाहेर कसे पडता येईल याचा विचार देशविदेशातील विचारवंत आणि लहानमोठी विधायक कामे करणारे शहाणे लोक करताहेत हा एक आशेचा किरण आहे. या परिस्थितीच्या चक्रव्युहातून बाहेर पडण्याचा मार्ग महात्मा गांधींनी आपल्या कृती-उक्तीतून जगाला दाखवला आहे. त्या मार्गाचा अवलंब केल्याशिवाय गत्यंतर नाही, असे मार्टिन ल्युथर किंग पासून नेल्सन मंडेलापर्यंतचे नेते सांगत आले आहेत. आजही अनेक देशांमधील वस्तुनिष्ठ विचार करणारे आणि धर्म संप्रदायाची झापडे न बांधलेले अनेक विचारवंत 'गांधीमार्ग' हाच जगाला तारणारा मार्ग आहे. असे कळकळीने सांगत आहेत. २ ऑक्टोबर हा गांधीजयंतीचा दिवस 'अहिंसा दिवस' म्हणून २००७ साली युनोने घोषित केला आहे.

असे सर्व असले तरी गांधीविषयी अपप्रचार करणारे आणि समाजाला विशेषत: तरुणांना हिंसेच्या मार्गाने वळवणारे महाभागही समाजात देशभक्तीचा अत्यंत चुकीचा अर्थ पसरवण्याचे काम आपल्या वागण्याबोलण्यातून करीत आहेत.

आशा वेळी केवळ भारतालाच नव्हे तर जगाला 'माझे जीवन हाच माझा संदेश आहे' असे सांगणाऱ्या आणि त्यांची हत्या करणारालादेखील 'हे राम' म्हणून निरोप देणाऱ्या महात्म्याची 'खरी खरी' ओळख करून देण्याची आज नितांत गरज आहे. 'सत्याला मरण नसते' हेच खरे ! हे

'सत्य अहिंसेचे' अविनाशी तत्त्व गांधी विचारांच्या रूपाने आजही जिवंत आहे. त्याची ओळख करून देण्याचे काम वासंतीबाईनी समर्थपणे पार पाडले आहे.

या पुस्तकात गांधींची वैचारिक जडणघडण प्रामुख्याने टॉलस्टॉय, रस्किन, थोरो हे पाश्चात्य विचारवंत आणि अध्यात्मिक गुरु रामचंद्रभाई यांच्यामुळे झाली. हे सांगणारा पहिला लेख आहे. त्यानंतर अन्य लेखांमध्ये मानवी जीवन केंद्रस्थानी ठेवून जीवनाच्या सर्व अंगांचा विचार गांधींनी कसा केला यावर लेखिकेने प्रकाश टाकला आहे. त्यामधून गांधींची जीवनदृष्टी व्यक्त होते. जीवन समग्र असते. त्याचे भाग पाडता येत नाहीत. त्यामुळे आर्थिक, सामाजिक, भावनिक, सांस्कृतिक इत्यादींच्या विचारामागे किंवा तिच्या बुडाशी एकच दृष्टी असते. त्यातून समाजातील शेवटच्या माणसाचे भले होणार असेल तरच ती कृती वा विचार योग्य असू शकतो असे गांधी म्हणतात. 'सत्य, अहिंसा' हाच व्यक्तिगत, सामाजिक किंबहुना पर्यावरणसहित वैश्विक श्रेयसाचा मार्ग आहे. असा संदेश गांधी-विचारातून मिळतो. या पुस्तकातील लेखांमधून लेखिकेने आजच्या संवेदनशील तरुणाईला 'गांधी मार्गा' तील श्रेयस ठसठशीतपणे अधोरेखित करून दाखविले आहे.

वासंतीताई म्हणतात, गांधीची जीवनयात्रा सत्याच्या शोधाची तीर्थयात्रा होती. या यात्रेत आजही कुणीही सामील होऊ शकतो. त्यासाठी गांधी जाणून घेतले तर ते आपण समजूनही घेऊ शकतो आणि सत्याच्या शोधाच्या जीवनयात्रेचे वाटसरू बनू शकतो.

**- डॉ. दमयंती पांडरीपांडे**

## ऋणनिर्देश

गांधी विनोबांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या वर्धा नगरीतील महिलाश्रममध्ये लेखिका प्रा. वासंती सोर यांची जडणघडण झाली. सेवानिवृत्तीनंतर त्यांनी सूतकताई प्रशिक्षण आणि गांधी विचारांचा प्रचार-प्रसार करण्याचा वसा घेतला. अखेरच्या श्वासापर्यंत त्याची जोपासना केली म्हणून त्या गेल्यानंतर त्यांनी नियतकालिके आणि वर्तमानपत्रांमधून लिहिलेल्या लेखांचे पुस्तक गांधीजींच्या प्रेरणने स्थापन झालेल्या वर्धा येथील राष्ट्रभाषा प्रचार समितीद्वारे पूर्णत्वास आले तर किती छान होईल? असा विचार आमच्या मनात आला आणि तो अमलात आणण्याचे आम्ही ठरविले या कामी राष्ट्रभाषा प्रचार समितीचे प्रधानमंत्री डॉ. हेमचन्द्र वैद्य यांनी पुस्तक छापून देण्याचं आनंदानी मान्य केलं.

प्रसिध्द चित्रकार श्री रमाकांत धनोकर यांनी रेखाटलेले गांधीजीचे चित्र मुखपृष्ठासाठी घेण्यास परवानगी दिली तीही मानधन न घेता.

डॉ. उल्हास जाजू यांनी पुस्तकाची पाठराखण (ब्लर्ब) केली.

राष्ट्रभाषा प्रेस चे कम्प्यूटर ऑपरेटर दिलीप पिस्तुलकर यांनी अत्यंत कमी वेळात अचूकपणे लेखांचे कम्प्यूटर सेटिंग करून दिले.

लेखिकेकडून सूतकताईची दीक्षा घेतलेल्या भारती कुटे यांनी हस्तलिखित तयार करण्याकरिता मदत केली.

पुस्तकासाठी मदत करणाऱ्या या सगळ्यांचे आम्ही ऋणी आहोत.

**- प्रेरणा खरे**

**- प्रमिला खर्चे**

## लेखिकेविषयी थोडे...

महिलाश्रम, वर्धा येथील गांधीवादी देशनिष्ठ समर्पित कार्यकर्ते मालतीताई व श्रीधर थत्ते यांच्या वासंतीमावशी (लेखिका) निष्ठावंत कन्या महात्मा गांधींनी केलेल्या आणि विनोबाजी भावे यांच्या मार्गदर्शनाखाली चालणाऱ्या महिलाश्रममध्ये आश्रमीय वातावरणात त्या लहानाच्या मोठ्या झाल्या. गांधींच्या मांडीवर बसण्याचे आणि विनोबांच्या सान्निध्यात शिकण्याचे भाग्य त्यांना लाभले. विनोबांच्या भूदान-यात्रेतही त्या सहभागी झाल्या होत्या.

वर्धा महिलाश्रमध्ये त्यांनी सहा वर्ष अध्यापनाचे कार्य केले. नंतर लग्न झाल्यावर नाशिक येथील बी. एड्. कॉलेजमध्ये प्राध्यापक ते प्राचार्यपदापर्यंतचा ३८ वर्षांच्या शैक्षणिक प्रवासामध्ये अनेक विद्यार्थी व शिक्षकांसाठी त्या आदर्श प्रेरणास्थान होत्या. शिक्षण क्षेत्रात त्यांनी मोलाचे योगदान दिले आहे. सेवानिवृत्तीनंतर गांधी-विचारांचा प्रसार करण्याचा वसा त्यांनी शेवटच्या श्वासापर्यंत जोपासला.

गांधी विचारांची अभ्यासपूर्ण मांडणी ही त्यांच्या लेखनाची आणि व्याख्यानांची वैशिष्ट्ये होती. या विषयावर त्यांची एकूण १२ पुस्तके प्रकाशित झालेली आहेत. एम. ए. साठी 'गांधी विचार आणि राष्ट्रीय एकांत्मता' या विषयाचा अभ्यासक्रम ही त्यांनी तयार केलेला आहे. गांधीजींवर असणाऱ्या तथाकथित आक्षेपांना त्यांनी संपूर्ण पुराव्यानिशी उत्तर देणारे लिखाण केले आहे. नाशिकमधील 'सर्वोदय चळवळ' आणि 'जीवन उत्सव' या प्रेरणादायी उपक्रमांच्या त्या आधारस्तंभ होत्या. खादी व स्वावलंबन हे त्यांच्या जिव्हाळ्याचे विषय होते. 'सूतकताई' मंडळाची स्थापन करून त्याद्वारे त्या कोणालाही शास्त्रशुद्ध पद्धतीनी अत्यंत आवडीनी सूतकताई शिकवीत असत. जीवनप्रवाहात येणाऱ्या समस्यांचा खंबीरपणाने सामना करून सदैव हसतमुख राहून गांधी-विचार, कताई, स्वावलंबन समाजात मुरवत राहिल्या. निवृत्तीनंतरही अविरत समाजकार्य आणि गांधी-विचारांचा प्रसार करणाऱ्या या लेखिकेला

समाजाने अनेक पुरस्कारांनीं सन्मानित केले. ‘लोकमत सखी मंच’ च्या वतीनी तर ‘जीवन गौरव’ पुरस्कार देऊन सेवाव्रतींच्या सेवाकार्याचा गौरव केला.

‘सूततपस्विनी’ आणि गांधीवादी सामाजिक कार्यकर्त्या प्रा. वासंती सोर यांचे १८ जुलै २०२१ रोजी व्याच्या ८५ व्या वर्षी त्यांच्या नाशिकच्या राहत्या घरी निधन झाले. या समाजनिष्ठ लेखिकेने देहदानाने आपले जीवन आणि मरणही सार्थकी लावले.

**- प्रेरणा खरे**

**- प्रमिला खर्चे**

# अनुक्रम

१. व्यक्तिमत्वाची वैशिष्ट्ये

२. वैचारिक जडणघडण

३. जीवनशैली

४. अहिंसक प्रतिकाराचा पहिला प्रयोग

५. अहिंसेचे तत्त्वज्ञान

६. भारतात आगमन

७. चंपारणचा लढा

८. अभूतपूर्व व्याख्यान

९. स्वतंत्र्य चळवळीचं नेतृत्व

१०. सत्याग्रहाचे स्वरूप व तत्वे

११. भारतातील सत्याग्रही लढे

१२. लष्करातील शस्त्रं नकोत शिस्त हवी

१३. एक कुशल संवादक

१४. रचनात्मक कार्यक्रमाची गरज

१५. राष्ट्रीय एकात्मता

१६. व्रतविचार

१७. गांधी विचार : सर्वोदय

१८. धर्मकल्पना

१९. स्त्री विषयक दृष्टिकोन

२०. गांधी आश्रमवासियांनी आपल्या सहचारिणींवर अन्याय केले काय?

२१. पहिल्या स्वातंत्र्यदिनी कुठे होता राष्ट्रपिता?

२२. अश्रुंनी चिंब संध्याकाळ

२३. शेवटचा दिवस

२४. हत्येनंतर

२५. आजची आव्हाने आणि गांधीजींचे आर्थिक विचार

२६. संकट जागतिकीकरणाचं : उत्तर गांधींचं

२७. मानव जातीची किंमत देऊनच गांधीजी विसरता येतील

२८. मार्गदर्शन : आजच्या संकटातून सुटण्याचे

२९. पहिला पर्यावरणीय विचार-आचारवंत

३०. बापूकुटी : एक राष्ट्रीय वैभव

३१. गांधीजींच्या पाठशाळेत आचरणाचे धडे गिरवू या

३२. पोशाखातून विचारदर्शन

३३. मोहन ते महात्मा

३४. अध्यात्माला सामाजिक आशय देणारे वैष्णवजन

३५. हे व्यर्थ न हो बलिदान!

# १. व्यक्तिमत्वाची वैशिष्ट्ये

गांधी जाणून घेतांना सत्याशी असलेलं त्यांचं अतूट नातं प्रथम लक्षात घेतलं पाहिजे. ईश्वर सत्य आहे असं सामान्यपणे म्हटलं जातं. गांधीजी म्हणतात सत्यच ईश्वर आहे. सत्य त्यांच्या जीवनाचं अधिष्ठान होतं. सत्याचा शोध हे जीवनाचं प्रयोजन होतं. या शोधासाठी प्रयोगशाळा होती त्यांचं स्वतःचं जीवन. या प्रयोगशाळेत स्वतःचेच विचार आणि विकार सत्याच्याच परीक्षण नळीमध्ये टाकून त्यांनी सतत तपासले. आयुष्यभर त्यांनी सत्याच्या शोधासाठी प्रयोग केले. त्यांच्या आत्मचरित्राचे नाव आहे 'सत्याचे प्रयोग.' या नावातूनही त्यांचं सत्याशी असलेलं नातं स्पष्ट होतं. त्यांची जीवनयात्रा सत्याच्या शोधाची तीर्थयात्रा होती. या यात्रेत सहभागी होण्याचं आवाहन ते सर्वांना करतात.

२७/५/३९ च्या 'हरिजन' मध्ये ते लिहितात, "मी सत्याचा शोध घेतोय. जर तुमचं मन त्याविषयी आकर्षित झालं तर तुम्ही पण सत्याच्या शोधात सामील होऊ शकता."

गांधीजी कृतिशील विचारक होते. पटलेले विचार जीवनात उतरवणं हे त्यांचं ठळक वैशिष्ट्य. आफ्रिकेत असतांना १९०४ साली त्यांनी जॉन रस्किनचं 'अन्टू धिस लास्ट' हे पुस्तक वाचलं. त्यातील विचारांनी ते भारावून गेले. ते विचार त्यांना मनापासून पटले. त्या विचारांप्रमाणे जीवन जगायचं त्यांनी ठरवलं आणि तसे जीवन जगण्यासाठीच फिनिक्स आश्रमाची स्थापना केली गांधीजींच्या जीवनात विचार आणि आचार एकरूप झालेले दिसतात. म्हणूनच गांधी समजून घेतांना त्यांचं आचरण, त्यांचं जीवन समजून घेणं महत्वाचं ठरतं. ते स्वतःही म्हणतात 'मेरा जीवन ही मेरा संदेश है।'

मानवी जीवन गांधी विचाराच्या केंद्रस्थानी होतं. त्यामुळे मानवी जीवनाशी संबंधित प्रत्येक विषयावर त्यांनी आपले विचार मांडले. मानवाचे आरोग्य आणि आहारापासून त्याचे समाज जीवन, त्याचे आर्थिक जीवन इत्यादि सर्वच विषयावर त्यांनी आपले सखोल चिंतन प्रगट

केले. मानवी जीवनाशी संबंधित सर्वच विषय गांधीजींच्या वैचारिक कक्षेत येतात. काही विचार मानवाच्या धार्मिक अंगाविषयी विचार मांडतात तर काही सामाजिक अंगाविषयी विचार मांडतात. मानवी जीवन हे एकसंध आहे. धार्मिक, सामाजिक असे तुकडे पाडून त्याचा विचार केल्यास ते विचार एकांगी होतात. गांधीजींनी मानवी जीवनाच्या सर्व पैलूंवर विचार मांडल्याने तो एकांगी रहात नाही. तो समग्र विचार होतो.

गांधीजींमचं व्यक्तित्व बहुआयामी आहे. अनेक परस्पर विरोधी मानले गेलेले पैलू त्यांच्या व्यक्तिमत्वात सामावले आहेत. हे विरोधी पैलूंचं एकवटणं खूपच विलोभनीय दिसतं. ते संत होते. त्याच वेळी क्रांतिकारकही होते. ते आदर्शवादी होते. त्यांचा आदर्शवाद स्वप्नाळू नव्हता. आदर्शवादी असूनही ते व्यवहाराचं भान ठेवणारे कृतिशील होते. धार्मिक वृत्तीचे असूनही अर्थशास्त्रीय होते. राजकीय पुढारी होते आणि त्याचवेळी समाज-सुधारकही होते.

चुकांची कबुली हा गांधीजींच्या व्यक्तिमत्वाचा एक ठळक गुण, स्वतःच्या चुका कबूल करायला फार मोठं धैर्य लागतं, साहस लागतं. हे गुण त्यांच्या व्यक्तिमत्पात प्रारंभापासूमच होते. पुढे त्यांनी ते प्रयत्नाने विकसित केले.

वैष्णव कुटुंबात पूर्णपणे निषिद्ध असलेला मांसाहार करायची चूक त्यांनी शालेय जीवनात केली. त्याहीपेक्षा मोठी चूक भावाच्या हातातील सोन्याच्या कड्यातील थोडं सोनं चोरण्याची चूक त्यांच्या हातून घडली. वडिलांना पत्र लिहून झालेल्या चुकांची कबूली त्यांनी दिली.

१९२० च्या बहिष्काराच्या आंदोलनाच्या वेळी आंदोलनकर्त्यांनी आतल्या पोलिसांसकट पोलिस चौकीला आग लावली. पोलिस मरण पावले. ऐन भरातलं आंदोलन गांधीजींनी मागे घेतलं. त्यांच्या लक्षात आलं की सत्याग्रहासाठी आवश्यक असलेली वैचारिक जडणघडण झालेली नसतांनाच त्यांनी सत्याग्रह सुरु केला. ही आपली फार मोठी चूक झाली असं त्यांना

वाटलं. ‘हिमालयाएवढी चूक’ या शीर्षकाचा लेख लिहून त्यांनी आपली चूक जाहीरपणे कबूल केली.

त्या त्या वेळी चुकांची कबूली देऊन ते थांबले नाहीत. पुढे आत्मचरित्रात चुकांची वं त्यांच्या कबूलीची नोंद त्यांनी केली आहे. जे जे आयुष्यात घडलं ते जसंच्या तसं आत्मचरित्रात लिहिण्याच्या प्रांजळपणामुळेच ‘सत्याचे प्रयोग’ हे अतिशय सम्पर्क नाव त्यांच्या आत्मचरित्राचं आहे.

# २. वैचारिक जडणघडण

संवेदनशील मनाचा युवक गांधी विविध तऱ्हेचे अनुभव घेत होता. समाजातील अन्याय, विषमता, धार्मिक शिकवणुकी विरोधी वर्तन त्याला अस्वस्थ करत होतं. समाजाची उभारणी समता, न्याय आणि अहिंसेच्या आधारावर व्हायला हवी अशी जाणीव त्यांच्या मनात सतत असे. ही जाणीवच गांधीजींच्या वैचारिक जडणघडणीचा प्रारंभबिंदू! विविध लेखकांच्या वाचनातून त्यांच्या जाणिवेला पुष्ठी मिळत गेली. आधार मिळत गेला. वैचारिक जडण-घडण होत गेली. त्यांच्या या जडणघडणीत विशेषत्वाने कोणाचा हातभार लागला ते पाहू या.

**रायचंद भाई -**

गांधीजी वैष्णव कुटुबातील तरीही घरी भागवतासारखेच तुलसी रामायणही आदराने वाचले जायचे. वडिलांचे जैन, पारशी आणि मुस्लिम मित्र घरी यायचे. धर्मविषयक बोलणे व्हायचे. त्या काळात गांधीजींचा धर्मविषयक अजिबात अभ्यास नव्हता. घरच्या वातावरणातून लहानपणीच विविध धर्म व संप्रदाय यांच्याविषयीच्या समभावाची पेरणी झाली.

इंग्लंडला असतांना गांधीजींनी विविध धर्मांचा अभ्यास केला. धार्मिक- आध्यात्मिक विचारमंथन सुरू झाले. ईश्वर, आत्मा, मोक्ष, पुनर्जन्म, गीतेची मुख्य शिकवण या विषयी त्यांना अनेक प्रश्न पड़त. असे सारे प्रश्न ते रायचंदभाइंना पत्रातून विचारत. रायचंद भाई सर्व प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहून पाठवत. गांधीजींच्या आध्यात्मिक जडणघडणीचे संपूर्ण श्रेय रायचंदभाईंचे आहे.

**जॉन रस्किन -**

आफ्रिकेत असतांना जॉन रस्किन चे ‘अनटू धिस लास्ट’ हे पुस्तक १९०४ साली ट्रेनच्या प्रवासात रात्रभर जागून वाचले. पुस्तकाच्या प्रभावाने त्यांचे सारे जीवनच बदलून गेले. पुस्तकातील ३ मुद्यांचा विशेष प्रभाव पडला.

१. सर्वांच्या कल्याणातच व्यक्तीचे कल्याण सामावलेले आहे.

२. वकील आणि न्हाव्याच्या श्रमाचे मूल्य सारखेच हवे. कारण आजीविका कमावण्याचा दोघांना सारखाच हक्क आहे.

३. कष्टकऱ्याचे जीवनच खरे जीवन आहे.

गांधीजी म्हणतात. यातील पहिले दोन मुद्दे कायमच माझ्या मनात होते. तिसरा मुद्दा मला सर्वथा नवा होता.

कुठलाही विचार पटला की तो आचरणात आणायची ही अद्भुत ऊर्जा गांधीजींमध्ये होती. रस्किनच्या विचाराप्रमाणे जीवन जगण्यासाठी काही मित्र व नातेवाइकांसमवेत १९०४ सालीच त्यांनी फिनिक्स आश्रमाची स्थापना केली. सर्व आश्रमवासी कष्टकऱ्याचं जीवन जगू लागले. काम कुठलंही असो मोबदला सर्वांना सारखाच मिळे.

गांधीजींच्या मते स्वराज्य म्हणजे आत्मसंयम, नीतिनियमांचे पालन. त्यांच्या ह्या विचारालाही रस्किनच्या लिखाणात त्यांना आधार मिळाला.

**टॉलस्टॉय -**

गांधीजींच्या वैचारिक जडणघडणीवर टॉलस्टॉयच्या विचाराचा खोलवर प्रभाव पडलेला दिसतो. गांधीजींनी, 'हिंद स्वराज' मध्ये पाश्चात्य आधुनिक सभ्यतेचा प्रखर विरोध केला आहे. कारण तिचा आधार हिंसा आहे. टॉलस्टॉयने हाच विचार त्यांच्या ग्रंथातून मांडलेला त्यांनी वाचला आणि आपल्या विचारांना समर्थन लाभल्याचं समाधान त्यांना झालं. त्यांच्या सत्याग्रह आणि कायदेभंगाच्या विचारांना टॉलस्टॉयच्या लेखांमधून समर्थन लाभलं. आपले विचार योग्य आहेत हे आश्वासन त्यांना मिळालं.

गांधीजींनी पारतंत्र्याचं विश्लेषण करतांना म्हटलं आहे. 'आपण इंग्रज शासनकर्त्यांना इथे उभे राहू देतो म्हणून ते इथे राहू शकतात.' भारतीय पारतंत्र्याचं असंच शिक्षण टॉलस्टॉयने केलेलं आहे. टॉलस्टॉयच्या ग्रंथामध्ये गांधीजींना त्याचे स्वतःचे सर्वच विचार वाचायला मिळाले.

**थोरो -**

थोरोच्या रूपाने मला गुरु मिळाला असं गांधीजींनी म्हटलं आहे. कायदेभंग किंवा सत्याग्रह या चळवळीतून गांधी जे करत होते तेच थोरोच्या 'सिव्हिल डिसओबिंडिअन्स' या निबंधात त्यांना वाचायला मिळाले. 'सविनय कायदेभंग' हे नावही गांधीजींना थोरोच्या वाचनातून सुचलं. थोरोने स्वत:ही प्रत्यक्ष कायदेभंग केला, आणि त्याची शिक्षा म्हणून कारावासही भोगला.

आशा तऱ्हेने गांधीजींच्या विचारांना, चळवळींना अनेक विचारकांकडून त्यांना आधार मिळाला आणि त्यांची जडणघडण अधिक परिपक्व झाली.

# ३. जीवनशैली

महात्मा गांधींच्या जीवनशैलीचा विचार करतांना प्रथम त्यांचं जीवनविषयक तत्वज्ञान समजून घेतलं पाहिजे. कारण कोणाचीही जीवनशैली ही त्यांच्या तत्वज्ञानावरून ठरत असते. गांधीजींचं जीवनविषयक तत्वज्ञान पुस्तक वाचून किंवा बौद्धिक चर्चेतून उदयाला आलेलं नाही. संवेदनशील मन घेऊन ते जीवन जगत होते. अनुभव घेत होते. ह्या जीवनानुभवातून त्यांचं तत्वज्ञान सहजगत्या विकसित झालं.

आफ्रिकेत आलेल्या विषम अनुभवातून त्यांच्या तत्वज्ञानाचा उदय झाला. माणूस ह्या तत्वज्ञानाच्या केन्द्रस्थानी आहे. शोषणाविरुद्ध, अन्यायाविरुद्ध पीडितांच्या बाजूनं उभं राहणं हे जीवनाचं व्रत झालं. सर्वांभूती परमेश्वर हा भारतीय वारसा तत्वज्ञानात प्रवाहित झाला. त्यामुळे समतेचं तत्त्व दाखल झालं. वंश, वर्ग आणि जातीचे भेद ह्या तत्त्वज्ञानात बसत नाहीत. अन्यायाचा प्रतिकार करायचाच कसा? अहिंसक सत्याग्रहाच्या मार्गाने, साधन, आत्मबळ, आत्मक्लेश, प्रेमभावना, तत्वज्ञानातून जीवनाचं ध्येय ठरलं.

अहिंसामूलक, शोषणरहित समताधिष्ठित, शाश्वत अर्थव्यवस्थेवर आधारित समाजाची निर्मिती ध्येयाला अनुरूप जीवन पद्धती विकसित होत गेली. जीवन-पद्धतीचा पाया १९०४ मध्ये आफ्रिकेत स्थापन केलेल्या फिनिक्स आश्रमात घातला गेला. कारणीभूत ठरलं रस्किनचं 'अनटू धिस लास्ट' है पुस्तक. पुस्तकातील विचाराप्रमाणे जीवन जगण्याचा त्यांनी निश्चय केला. त्यावेळी ते वकिली करत होते. वकिलीत चांगला जम बसला होता. भरपूर मिळकत होती. सुंदर बंगला होता. उंची फर्निचर होतं. हे ऐषोआरामी जीवन सोडून सर्वथा नवे जीवन जगण्यासाठीच झाली फिनिक्सची स्थापना.

एक ३५ वर्षाचा तरुण केवळ एका पुस्तकाच्या प्रभावाने श्रीमंती जीवन स्वीकारतो हा मला फार मोठा चमत्कार वाटतो. त्यांनी आपल्या जीवनात 'चमत्कार' केले नाहीत तर त्यांच्या

जीवनात असे चमत्कार घडले. पटलेले विचार आचरणात उतरवण्याचं प्रचंड सामर्थ्य गांधीजींजवळ होतं. प्रबळ इच्छाशक्ती होती.

रस्किनच्या पुस्तकातील तीन गोष्टींनी ते खूपच प्रभावित झाले.

१. सर्वांचं कल्याण झालं तरच व्यक्तीचं कल्याण होऊ शकतं.

२. बौद्धिक काम करणाऱ्याचं आणि कष्टाचं काम करणाऱ्याचं पारिश्रमिक सारखंच असायला हवं कारण आजीविका कमावण्याचा दोघांना सारखाच अधिकार आहे.

३. कष्टकऱ्याचं जीवनच खरं जीवन आहे.

ह्या तत्त्वांप्रमाणे सर्वांचं कल्याण करणारी शोषणविरहित जीवनशैली विकसित झाली. सर्वांचं भलं करणाऱ्या अर्थव्यवस्थेला त्यात स्थान मिळाले. स्वेच्छा दारिद्र्याचा स्वीकार केला गेला. कारण सर्व लोक श्रीमंती चैनीचं जीवन जगू शकतील एवढी साधन संपत्ती निसर्गाजवळ नाही. गांधीजी म्हणतात, “निसर्ग प्रत्येकाची गरज भागवू शकतो पण एकाचाही हव्यास भागवू शकत नाही.” त्याच्या जीवनात सामाजिक आणि आर्थिक विषमतेला स्थान नाही. साधेपणा आणि अपरिग्रह जीवनशैलीचे अविभाज्य भाग आहेत. फिनिक्स आश्रमात संपादकापासून श्रमिकापर्यंत सर्वांचं पारिश्रमिक सारखंच होतं. सर्वांना सारखीच प्रतिष्ठा होती. शिक्षित, अशिक्षित, श्रमजीवी, बुध्दिजीवी असा कुठलाच भेद तिथे नव्हता. प्रत्येक व्यक्तीला फक्त एकच लेबल होतं ‘माणूस.’ आश्रमातील सर्वजण शरीरपरिश्रमातून आपला उदर निर्वाह करीत. शेती, सुतारकाम, झोपड्या बांधणं, प्रेसचं काम, स्वयंपाक अशी सर्व कामं आश्रमवासी करीत आणि सामूहिक जीवन जगत. शरीरश्रमाला गांधींच्या जीवनशैलीत इथेच स्थान मिळालं. परिश्रम कधी सुटला नाही. एकादश व्रताच्या कोंदणात गांधीजींची जीवनशैली बसवलेली आहे. फिनिक्सपासून सेवाग्रामपर्यंतची जीवनपद्धती म्हणजे एकादश व्रतांचं कठोर पालन. सत्यपालन, अहिंसा, मर्यदांचं तत्वज्ञान. प्रत्येक वस्तूंचा काटकसरीने अंतिम मर्यादेपर्यंत वापर. स्वावलंबन, समूह जीवन, सामंजस्य, शरीरश्रम ही त्यांच्या जीवनशैलीची वैशिष्ट्ये. त्यांच्या

जीवनातून, त्यांनी उभारलेल्या लढ्यातून, त्यांच्या पत्रव्यवहारातून, विरोधकांशी त्यांनी साधलेल्या संवादातून व्यक्त होतात. त्यांचे सर्वच आश्रम सहजीवनाच्या पाठशाळा होत्या. परस्पर सामंजस्य त्यांचा आत्मा होता.

व्रतविचार जीवनशैलीविषयी सकारात्मक विचार मांडतो. जीवन कसं जगावं हे सांगतो. त्याप्रमाणे त्यांनी सांगितलेली सप्त सामाजिक पातकं नकारात्मक बाजू स्पष्ट करतात. जीवनशैली कशी नसावी हे सांगतात. सप्त सामाजिक पातकं - १. तत्त्वविहीन राजकारण, २. नीतिविहीन व्यापार, ३. श्रमविहीन संपत्ती, ४. चारित्र्यविहीन शिक्षण, ५. विवेकविहीन विलास, ६. मानवताविहीन विज्ञान, ७. त्यागविहीन पूजा.

गांधीजींनी जीवनभर वरील पातकापासून दूर राहण्याच्या निष्ठेने प्रयत्न केला.

गांधीजींच्या जीवनशैलीकडे पुराणातील वांगी पुराणात ह्या दृष्टीने पाहून चालणार नाही. आज भेडसावणाऱ्या अनेक समस्यांना कारणीभूत ठरतेय. आपण स्वीकारलेली चंगळवादी, स्वार्थी, थ्रो अवे, संस्कृतीत स्थान देणारी ऊर्जा-पाण्याचा अपव्यय करणारी प्राकृतिक संसाधनं संपुष्टा आणणारी जीवनशैली. ती बदलल्याशिवाय समस्या सुटणार नाहीत. बदलासाठी गांधीजींच्या जीवनशैलीतून मार्गदर्शन मिळू शकेल. मानवाचं अस्तित्व टिकवून ठेवायचं असेल तर गांधी समजून घेतल्याशिवाय पर्याय नाही.

# ४. अहिंसक प्रतिकाराचा पहिला प्रयोग

अन्याय निवारणासाठी अहिंसक प्रतिकाराचं एक अभिनव शस्त्र गांधीजींनी जगाला दिलं. हे शस्त्र जन्माला आलं १९०६ साली आफ्रिकेत. ते जन्माला घालण्याचं श्रेय गांधीजींकडे जातं. पुढे हे 'सत्याग्रह या नावाने ओळखलं जाऊ लागलं. अन्यायाचा निःशस्त्र प्रतिकार, अहिंसक प्रतिकार, शस्त्रबळाऐवजी आत्मबळाने प्रतिकार असं या प्रतिकाराचं-सत्याग्रहाचं स्वरूप थोडक्यात सांगता येईल.

प्रथम श्रेणीच्या डब्यात बसलेल्या गांधीजींना ते 'काला आदमी' म्हणून डब्यातून प्लॅटफार्मवर ढकलून दिल्याचा तो जीवघेणा अपमान त्यानंतर सारी रात्र ते प्लॅटफार्मवर बसून होते. रात्रभर उलटसुलट विचारांचे वादळ मनात घोंघावत होते. शेवटी भारतीयांवर होणाऱ्या अन्यायाचे निराकरण करण्यासाठी ते आफ्रिकेत राहण्याचा निर्णय घेतात आणि वादळ शमतं. त्या निर्णयाच्या क्षणीच कदाचित अहिंसक प्रतिकाराचं बी नकळत त्यांच्या मनात पडलं असेल. त्यानंतर मनात त्याची नकळत ऊबवणूक होत राहिली असेल. या उबवणूकीच्या कालखंडात स्वतःवरील अन्यायाच्या निराकरणासाठी अहिंसक प्रतिकाराचा पहिला प्रयोग त्यांनी केलेला दिसतो. प्रयोग यशस्वी झाला. हा उबवणूकीचा कालखंड होता. अजून सत्याग्रह या अभिनव शस्त्राचा जन्मही झालेला नव्हता आफ्रिकेत गेल्या गेल्या या शस्त्राच्या जन्मापूर्वी जवळ जवळ १०-१२ वर्ष आधीच त्यांनी स्वतःवरील अन्यायाच्या प्रतिकारासाठी अहिंसक प्रतिकाराचा यशस्वी प्रयोग केला. आज आपण त्याला सत्याग्रह म्हणतो. हा सत्याग्रह पूर्ण वैयक्तिक पातळीवर होता. बहुधा तो अन्यायाचा प्रसंग आणि गांधीजींनी केलेला अहिंसक प्रतिकार.

गाडीचा प्रवास संपल्यानंतर त्यांचा पुढचा प्रवास घोडागाडीतून होता. त्यांनी रीतसर तिकिट काढले होते. तरीही गाडीच्या मालकाने इतर गोऱ्या प्रवाशांबरोबर त्यांना गाडीच्या आत बसू दिले नाही. त्यांना बाहेर कोचवानाच्या शेजारी बसवले. पुढे काही प्रवास झाल्यानंतर

मालकाला बाहेर बसून हवा खायची इच्छा झाली. त्याला कोचवानाच्या शेजारी बसायचे होते. त्याने कोचवानाच्या पायाशी एक कळकट तरटाचा तुकडा टाकला आणि गांधीजींना त्यावर बसायला सांगितले. अपमानाचा कडेलोट झाला. गांधीजी उठून तरटावर बसले नाहीत. मालक संतापला. एक काळा माणूस आपलं ऐकत नाही हे त्याला सहन होणं शक्यचं नव्हतं. गांधीजींनी उठावं म्हणून तो त्यांना खाली ढकलत होता. साऱ्या ताकदीने त्यांना रट्टे मारत होता. तोंडाने शिव्यांची लाखोली वाहत होता. मालकांने जागेवरून ढकलू नये म्हणून गांधीजींनी घोडागाडीची पितळी सळई घट्ट धरून ठेवली होती. तडाख्यावर तडाखे बसत होते. शिव्या चालूच होत्या. गांधींजींनी ना त्याला मारलं, ना अपशब्द उच्चारले. पण आपली जागाही सोडली नाही. सळईवरील त्यांची पकड ढ़िली व्हावी म्हणून मालक मनगटावर प्रहार करत होता. मनगट तुटायची वेळ आली तरीही ते उठले नाहीत. अन्यायापुढे मान तुकवली नाही. हिंसक कृतीने वा हिंसक शब्दाने प्रतिकार केला नाही. त्यांचा प्रतिकार अहिंसकच होता. कुठून आलं एवढं सामर्थ्य! हे सामर्थ्य होतं निर्धाराचं. सत्याग्रहासाठी आवश्यक असलेल्या आत्मबळाचं.

शेवटी घोडागाडीच्या आत बसलेल्या गोऱ्या प्रवाशांवर अहिंसक प्रतिकाराचा इष्ट प्रभाव पडला. त्यांच्या मनातील करुणा जागी झाली. ते मालकाला म्हणाले, “का विनाकारण इतकं मारतो आहेस त्या बिचाऱ्याला? त्याला आत बसू दे. आमची काही हरकत नाही.” मालक चरफडला. गांधीजींना आपली हक्काची जागा मिळाली. अहिंसक प्रतिकाराचा पहिला प्रयोग यशस्वी झाला. हा स्वतः गांधीजींनी केलेला प्रयोग होता. स्वतःवरील अन्यायाच्या निराकरणासाठी केलेला पूर्णपणे वैयक्तिक पातळीवरील प्रयोग होता. सत्याग्रहाचा जन्म झाल्यानंतर आफ्रिकेत सामूहिक पातळीवरील अनेक सत्याग्रह झाले. कारण अन्याय सर्व भारतीय समूहावर होत होते.

सत्याग्रहाच्या स्वरूपाविषयी गांधीजी सातत्याने लिहीत असत. व्याख्यानातूनही सत्याग्रहाचे स्वरूप व तत्वे याविषयी सांगत. सत्याग्रहचे महत्त्व, वैशिष्ट्ये स्पष्ट करतांना ते म्हणाले

होते, 'संघठन नसेल, एकाकी असाल, शस्त्र सामर्थ्य नसेल, आर्थिक पाठबळ नसेल तरीही एकटा माणूसही अन्यायाच्या निराकरणासाठी सत्याग्रह करून यश संपादन करू शकतो. त्यासाठी हवी निर्भयता, स्वतः क्लेश सहन करण्याची तयारी. हातही न उगारण्याचा निर्धार, आत्मबळ त्यांनी स्वतः केलेल्या पहिल्या प्रयोगात वरील वैशिष्ट्ये पूर्णपणे प्रगट झालेली दिसतात.'

# ५. अहिंसेचे तत्वज्ञान

अहिंसेचे तत्त्वज्ञान अतिप्राचीन. गांधीजींच्या मते हिमालयाइतकं प्राचीन. महाभारत म्हणतं अहिंसा हा परम धर्म आहे. बुद्ध, महावीर आणि येशूने अहिंसेचे तत्वज्ञानच अधोरेखित केलं. आपल्या पाच प्राचीन व्रतांमध्ये अहिंसेला स्थान दिलंय. आज मात्र अहिंसेशी गांधीजींच नाव जोडलं गेलेलं दिसतंय. २ ऑक्टोबर हा त्यांचा जन्मदिवस यूनो ने अहिंसा दिवस म्हणून घोषित केलाय. अहिंसेचे प्राचीन तत्वज्ञान का बरं आज गांधींच्या नावाशी जोडलं गेलंय ? कारण त्यांनी प्राचीन तत्वज्ञानाला नवा आयाम दिला.

गांधींच्या पूर्वीची अहिंसा धार्मिक आणि आध्यात्मिक क्षेत्रात सीमित होती. गांधीजींनी ती राजकारण आणि समाजकारणाच्या विशाल प्रांगणात दाखल केली. वैयक्तिक पातळीवरील अहिंसेचं समूहाच्या पातळीवर सहअनुष्ठान ठेवलं. शांतिसाधक अहिंसेला क्रांतिकारक रूप दिलं. अन्याय निवारणासाठी अहिंसक सत्याग्रहाचं एक अभिनव शस्त्र जगाला दिलं. या शस्त्राचा यशस्वी प्रयोग भारतात आणि आफ्रिकेत केला. स्वातंत्र्य प्राप्त करण्यात अहिंसक सत्याग्रहाचा वाटा सिंहाचा आहे. या मार्गामुळेच सत्तांतर शांततेत पार पडलं. इंग्रज मित्र बनून भारतातून गेले.

एखाद्या व्यक्तीवर कोणी अत्याचार करत असेल, त्याला मारत असेल तर दोन प्रतिक्रिया संभवतात. मारणाऱ्या व्यक्तीची ताकद जास्त असेल तर मार खाणारी व्यक्ती पळून जाते. आणि मार खाणाऱ्या व्यक्तीची ताकद जास्त असेल तर ती मारणाऱ्याला मार देते. या दोन्ही प्रतिक्रिया गांधीजींनी त्याज्य ठरवल्या. पळूनही जाऊ नका आणि मारूही नका. आत्मबळाच्या आधारे अत्याचाराचा मुकाबला करा. या तिसऱ्या प्रतिक्रियेचा प्रत्यय प्रत्येक सत्याग्रहाच्या वेळी आला आहे.

गांधीजी म्हणतात, माझ्या अहिंसेत भ्याडपणाला स्थान नाही. भिऊन पळून जाण्यापेक्षा हिंसा मी श्रेयस्कर मानतो. भ्याडपणा अहिंसेच्या आत दडवणं त्यांना अजिबातच मान्य नव्हतें. या संदर्भात आमच्या वर्ध्याच्या महिलाश्रमात घडलेला एक प्रसंग सांगते. आश्रमातील काही

विद्यार्थिनी आमच्या बाहेरील रस्त्यावर फिरायला गेल्या होत्या. एका युवकाने त्यांची छेड काढली. त्या भिऊन धावतच आश्रमात परत आल्या. बापूंना हे कळलं तेव्हा ते मुलींना म्हणाले, “त्या युवकाच्या थोबाडीत का मारली नाही?” मुली म्हणाल्या, “बापू, ती हिंसा होणार नाही का?” बापू हसून म्हणाले, “मला हिंसा अहिंसा शिकवताय? मी सांगत असलेल्या अहिंसेचा अर्थच तुम्हाला नीट कळला नाही. मला शूराची अहिंसा हवी आहे. तुम्ही भिऊन पळून आलात आणि तुमचा भित्रेपणा अहिंसेच्या आत दडवताय. तुमच्यात एवढी आत्मशक्ती हवी की तुमची कोणी छेडच काढू शकणार नाही. ती नाही हे दिसतंच आहे. त्यामुळेच तर युवक छेड काढायला धजावला. अशावेळी भिऊन पळून येण्यापेक्षा थप्पड़ मारणं मी श्रेयस्कर समजतो.” अशी होती गांधीजींची शूराची अहिंसा. वरील प्रसंगातून बापू व विद्यार्थिनी यांच्यात किती मोकळेपणे संवाद होत असे आणि बापू किती सहजगत्या अहिंसेचा अर्थ समजावून सांगत याचंही दर्शन घडतं. अहिंसक प्रतिकारासाठी शस्त्रबळाची गरज नसते. हवं असतं आत्मबळ, शौर्य आणि निर्भयता. किंबहुना अहिंसक प्रतिकारासाठी जास्त शौर्य आणि निर्भयता लागते. शस्त्र हातात न घेता हातही न उगारता प्रतिकार केवळ शुर आणि निर्भय सत्याग्रहीच करू शकतो.

सत्याग्रही सैनिकांचं शौर्य आणि निर्भयता प्रत्येक लढ्याच्या वेळी प्रखर तेजाने तळपतांना दिसते. मग तो मिठाचा सत्याग्रह असो की अंतिम ‘चले जावचा’ लढ़ा असो. सेनानींच्या निर्भयतेचं एक उदाहरण देते. मिठाच्या सत्याग्रहाची सूचना देण्यासाठी गांधीजींनी व्हाइसरायला एक पत्र लिहिलं. त्या पत्रात ते सरकार करीत असलेल्या आर्थिक लुटीचा पाढा वाचतात. खुद्द व्हाइसरायच्या पगाराची अन्यायकारकता ते स्पष्ट करतात. निर्भयता आणि शौर्य या गुणाशिवाय असे पत्र लिहिलेच जाऊ शकत नाही. हे पत्र एका गुलाम राष्ट्रातील नागरिकाने व्हाइसरायसारख्या सर्व सत्ताधीशाला लिहिले आहे हे लक्षात घेतले की सेनानीची निर्भयता अधिकच ठसते.

अशी होती गांधीजींची शूराची अहिंसा.

# ६. भारतात आगमन

गांधीजी इंग्लंडमध्ये जाऊन बॅरिस्टर झाले होते. नंतर पैसे कमाविण्याच्या हेतूने ते आफ्रिकेत गेले. तिथे वकीलीत त्यांचा चांगला जम बसला. भरपूर कमाई होऊ लागली. असा हा नावाजलेला वकील ९ जानेवारी १९१५ ला कायम वास्तव्यासाठी आपली पत्नी कस्तूर हिच्यासह भारतात परतला. तो सूटबूट या पाश्चात्य पोषाखात मुंबई बंदरावर उतरला नव्हता तर पारंपारिक काठेवाडी पोशाख त्यानं घातला होता. हे त्याचं वेगळेपण भारतीयांनी नक्कीच टिपलं असणार.

आफ्रिकेत भारतीयांना मिळणाऱ्या अन्याय्य आणि अपमानास्पद वागणुकीने त्याचं संवेदनशील मन कळवळलं. अपमानाचे चटके त्यांनीही सोसले होते. मारिटस्बर्ग स्टेशनवर अनुभवलेला तो जीवघेणा अपमान. प्रथम श्रेणीचं तिकीट असूनही त्यांना प्रथम श्रेणीच्या डब्यातून धक्के मारून प्लॅटफार्मवर ढकलून दिल होतं. कारण काय? कारण एकेच - ते काळे होते. भारतीय होते. मन लज्जा आणि अपमानाने कडू झालं. गप्प न बसता अन्यायाचा प्रतिकार करायचाच या विचाराची एक छोटीशी ठिणगी मनात प्रज्वलित झाली. इतरांच्या दुःखाविषयी कणव आणि सर्वांना कवेत घेणारा स्वभाव यामुळे सर्वच भारतीयांवर होणाऱ्या अन्यायाविरुद्ध लढा उभारायचा निर्णय हळूहळू आकार घेऊ लागला. त्यातून अहिंसक सत्याग्रहाचा लढा आकाराला आला. अहिंसेचे तत्वज्ञान तसे जुनेच. मुमूक्षूंनी सांगितलेल्या पाच व्रतांमधील अहिंसा है एक व्रत. या जुन्या व्रतामध्ये त्यांनी नवा आशय भरला. आध्यात्मिक क्षेत्रातील शांतीसाधक अहिंसा अन्याय-निवारणाचं क्रांतीकारक साधन झाली. अहिंसक सत्याग्रहाचं एक अभिनव साधन त्यांनी जगासमोर ठेवलं. त्याचा यशस्वी प्रयोग आफ्रिकेत केला. आफ्रिकेतील अनेक भारतीयांनी त्यांच्या मार्गदर्शनाखाली सत्याग्रही लढे दिले. आफ्रिकेतील अहिंसक लढ्याची विजयपताका खांद्यावर घेऊनच ते भारतात आले होते.

गांधीजी भारतात परतले तेव्हा प्रमुख राजकीय क्षेत्रातील लोकांशिवाय त्यांना कोणी ओळखत नव्हतं. सामान्य जनतेसाठी ते अपरिचितच होते आणि त्यांनाही भारत अपरिचित होता. त्यांचे गुरु गोपाळ कृष्ण गोखले यांनी गांधीजींना सांगितले होते की, 'तू वर्षभर भारतभ्रमण करून भारत समजून घे. त्या सल्ल्याप्रमाणे गांधीजींनी भारत भ्रमण केले. भारत समजून घेण्याचा प्रयत्न केला. त्यांना तीन ठळक गोष्टी भारतात फिरत असतांना लक्षात आल्या. भारताचं दारिद्र्य, अज्ञान आणि अस्वच्छता. त्यांचं मन व्यथित झालं. भारतातील मूठभरांची श्रीमंती ही त्यांना दिसली. ही आर्थिक विषमता त्यांना बोचली. श्रीमंताकडून होणारं गरीबाचं शोषण त्यांच्या लक्षात आलं. या शोषणाविरुद्ध काहीतरी करायला हवं असं त्यांच्या मनात आलंच असणार.

भारत भ्रमणाचं एक वर्ष पूर्ण झाल्यानंतर ४ फेब्रुवारी १९१७ ला बनारस हिंदु युनिव्हर्सिटीच्या निमित्त त्यांनी व्याख्यान दिलं. हे त्यांचं भारतातील पहिलं जाहिर व्याख्यान. या व्याख्यानामुळे त्यांचं वेगळेपण भारतीयांच्या लक्षात आलं. ('अभूतपूर्व व्याख्यान' या लेखात त्या व्याख्यानाविषयी विस्तृत माहिती आहे.)

१९२० साली लोकमान्य टिळकांचा मृत्यू झाला. नेतृत्वाची पोकळी निर्माण झाली. ही पोकळी गांधीजींनी भरून काढली. वयाने ज्येष्ठ आणि अनुभवाने श्रेष्ठ असे काँग्रेसचे काही पुढारी असूनही नेतृत्व गांधीजींकडे चालून आलं. त्यांची विविध कारणं लक्षात येतात. जसे आफ्रिकेतील यशस्वी सत्याग्रही लढा, चंपारणच्या शेतकऱ्यावरील अन्याय निवारणासाठी केलेला यशस्वी लढा. अहमदाबादचे गिरणी कामगार आणि मिल मालक यांच्यातील संघर्ष शांततापूर्ण मार्गानी मिटवणं. अभूतपूर्व खेडा सत्याग्रहातील यश. शिवाय त्यांच्या अहिंसक सत्याग्रहाच्या मार्गानेही लोकं प्रभावित झाले होते.

भारतातील स्वातंत्र्य आंदोलनाचं नेतृत्व त्यांच्याकडे आल्यामुळे आंदोलनाला ते अहिंसक सत्याग्रहाची दिशा देऊ शकले. त्यामुळेच सत्तांता शांततेनं झालं. युनियन जॅक खाली आला. तिरंगा डौलाने फडकला. इंग्रज मित्र बनूनच भारतातूम गेले.

नेतृत्व गांधीजीकडे आल्यावर सुशिक्षित उच्चवर्णीयांच्या गोतावळ्यातील काँग्रेसला त्यांनी व्यापक जनाधार मिळवून दिला. शिक्षित-अशिक्षित, श्रीमंत गरीब, शहरी -ग्रामीण, स्त्री-पुरुष सर्वच आंदोलनात सहभागी झाले. स्वातंत्र्याच्या मागणीला बळ आलं.

या द्रष्ट्या महात्म्याने स्वातंत्र्यानंतरच्या भारताचा विचार केला होता. स्वराज्याचं सुराज्यात रूपांतर करण्यासाठी अनेक विधायक कार्यक्रम त्याने देशाला दिले. अनेक अनुयायी त्यांना मिळाले.

भारताशिवाय दुसरा विचारच गांधीजींच्या ध्यानीमनी-स्वप्नी नव्हता. प्रत्येक माणसाला अन्याय अत्याचार आणि शोषणापासून मुक्ति मिळावी हाच त्यांचा ध्यास होता. भारतीयांनी त्यांच्यावर स्तुतिसुमने उधळली तसेच निंदेचे वाक्बाणही मारले. त्यांना महात्मा, सत्याग्रही सैनिकांचा सेनापती, कोट्यवधींच्या दारिद्र्याची जाण ठेवून स्वेच्छा दारिद्र्य स्वीकारणारा संत, भारताचा नम्र सेवक आशा अनेक रूपात भारतीयांनी त्यांचा गौरव केला. त्याचबरोबर काहींनी देशाची फाळणी करणारा, पाकिस्तान ला पंचावन कोटी रुपये द्यांवेत म्हणून उपवास करणारा, अस्पृश्यांना जवळ करा असे शिकवून लोकांना धर्मभ्रष्ट करणारा खलनायक आशा रूपातही काहींनी त्यांना पाहिले. त्यांची हत्या झाल्यावरही स्तुती निंदा होतेच आहे.

त्यांचे विचार हद्दपार करण्याच्या हेतुनेच त्यांची हत्या झाली. त्यांची हत्या करणारे हे विसरले की एखाद्याचे डोके उडवले तरी त्या डोक्यातले विचार मरत नाहीत. कारण ते अनेकांच्या डोक्यात रुजलेले असतात. आजही गांधी विचारांचा सुगंध साऱ्या जगभर दरवळतो आहे. हिंसेच्या उद्रेकाने त्रस्त झालेल्या जगाला अहिंसेचं मोल कळू लागलंय. अहिंसेच्या शीतल जलाचं शिंपणच हिंसेच्या भडकलेल्या ज्वाला विझवू शकेल. गांधीजींची पर्यावरण स्नेही जीवनशेलीच पर्यावरण विनाशाच्या संकटातून मुक्त करू शकेल हा विश्वास वाढतोय. विचार सुगंध अधिक व्यापक क्षेत्र व्यापतो आहे. पण दुर्दैवाने भारतातील विशिष्ट विचारधारेच्या लोकांना तो सुगंध जाणवतच नाही. गांधी हत्येचं समर्थन करणारा हा गट आजही कार्यरत आहे. त्यांचा हिंदु

वर्चस्ववाद आजही कायम आहे. नथुराम गोडसेला ते हुतात्मा मानतात. त्याचा मृत्यूदिन श्रद्धापूर्वक साजरा करतात. गांधीजींच्या भारतातील आगमनाला एक शतक पूर्ण झालं. त्या निमित्ताने विपरीत विचारांची काजळी टिकून स्वच्छ मनाने गांधी समजून घ्यावा. या अपेक्षेने केलाय हा लेखन प्रपंच.

## ७. चंपारणचा लढा

बिहारमधील चंपारणचा लढा म्हणजे भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील एक महत्वाचे पान. त्या काळात जमीनदारांनी आणि ब्रिटिशांनी सर्वसामान्य शेतकऱ्यांवर जो अन्याय, जबरदस्ती केली त्याच्या विरोधातलं हे आंदोलन अनेक अर्थांनी महत्वाचं आहे.

तिथले बहुसंख्य जमीनदार ब्रिटिश होते आणि इंग्लंडमध्ये निळीला प्रचंड प्रमाणात मागणी होती. त्यामुळे शेतकऱ्यांनी त्यांच्या शेतात केवळ निळीचच उत्पादन घेण्याची सक्ती करण्यात आली. ही नीळ इंग्लंडमध्ये पाठवून त्यांनी प्रचंड प्रमाणात नफा कमावला. मात्र त्यासाठी गरीब शेतकऱ्यांना त्यांनी वेठीस धरलं. शेतकऱ्यांनी निळीऐवजी दुसरं कुठलंही पीक घेतलं तर त्यांना मोठा शेतसारा भरावा लागत असे. अनेक शेतकरी त्यामुळे देशोधडीला लागले.

नीळ उत्पादक शेतकऱ्यांच्या हितासाठी महात्मा गांधींनी त्यावेळी ब्रिटिशाविरुद्ध आन्दोलन उभारलं. गांधीजींचं भारतात केलेलं है पहिलंच आंदोलन या आंदोलनात मिळालेल्या यशानंतरच महात्मा गांधीजींच नेतृत्व देशपातळीवर स्थापन झालं. म्हणूनही या आंदोलनाचं महत्व अपार.

एप्रिल १९१७ मध्ये चंपारणमधील नीळ पिकवणाऱ्या शेतकऱ्यांवरील अन्याय निवारणासाठी गांधीजी मुजफ्फरनगरला पोहोचले आणि चंपारणच्या सत्याग्रहाचा प्रारंभ झाला. २०१७ मध्ये त्या लढ्याला शंभर वर्ष पूर्ण झाली. हा सत्याग्रह अनेक दृष्टींनी महत्वाचा आहे.

या लढ्याच्या वेळीच ब्रिटिशांच्या जोखडातून मुक्त होण्याची तीव्र इच्छा गांधीजींच्या मनात निर्माण झाली. तसा उल्लेख गांधीजींनी ब्रिटिश पत्रकार लुई फिशरला दिलेल्या मुलाखतीत केला आहे. या लढ्याच्या वेळीच ब्रिटिश शासनाचा अन्यायी अत्याचारी चेहरा त्यांना दिसला आणि स्वातंत्र्याची ऊर्मी त्यांच्या मनात निर्माण झाली.

चंपारण हा हिमालयाच्या पायथ्याशी असलेला नेपाळच्या सीमेलगतचा मागास प्रदेश. भारताची जाऊ द्या, पण आपल्याच बिहारची इथल्या शेतकऱ्यांना पुरेशी माहिती नव्हती.

या प्रदेशात जवळ जवळ शंभर वर्षापासून निळीची शेती होत होती. शेती ब्रिटिशांच्या मालकीची. शेतकऱ्यांवर त्यांच्याच शेतातील १५ टक्के जमिनीवर निळीची शेती करण्याचे बंधन मालकांनी घातले होते. तसा कायदा ब्रिटिश शासनाकडून करवून घेतला होता. निळीच्या शेतात राबण्यातच शेतकऱ्यांचा सारा दिवस खर्च व्हायचा. स्वतःच्या शेतातून पोटापुरते पिकवण्याचीही त्यांना सवड मिळत नसे. बायका-मुलांनाही मालक राबवून घेत. कामात जर कुचराई केली, मिनिटभराचा जरी विसावा घेतला तरी मालक रक्तबंबाळ होईपर्यंत हंटरने फोडून काढत. शेतकऱ्यांची स्थिती गुलामांसारखीच होती. ब्रिटिश शासनकर्तेही या अनन्वित अत्याचाराकडे कानाडोळा करीत. शेतीच्या ब्रिटिश मालकांना त्यांची साथच होती.

उपासमार आणि दारिद्र्याने पिचलेले, अज्ञानाच्या खोल खड्ड्यात आकंठ बुडालेले हीन-दीन शेतकरी दाद कोणाकडे आणि कशी मागणार ! पिढ्यान् पिढ्या ते हा अन्याय अनन्वित अत्याचार मुकाट सहन करीत होते. ह्याविषयी कळल्यावर गांधीजींनी चंपारणमध्येच तळ ठोकला. अन्यायाला वाचा फोडली. सत्याग्रही लढा उभारला. अन्यायाच्या कथांच्या नोंदी घेतल्या. ब्रिटिश मालकांना भेटले. त्या प्रदेशातल्या शासनाच्या प्रतिनिधीला भेटले. व्हाईसरायशी संपर्क साधला. अन्यायाचे निवारण करूनच ते चंपारणमधून माघारी आले.

या लढ्याच्या निमित्ताने ब्रिटिश शासनाच्या जोखडातून मुक्त होण्याच्या तीव्र इच्छेची जी ठिणगी पड़ली तिने साऱ्या भारतीयांमध्ये स्वातंत्र्याकांक्षा चेतवली. ठिणगीने वणव्याचं रूप घेतलं. अनेक छोटी-मोठी सत्याग्रही आंदोलन झाली. ३० वर्षातच, १९४७ साली भारत स्वतंत्र झाला.

भारतात आल्यावर अन्याय अत्याचाराच्या विरोधातील गांधीजींचा तो पहिला अहिंसक लढा होता.

गांधीजी १९१५ जानेवारी महिन्यात भारतात आले. पहिल्या वर्षी भारतभर फिरून त्यांनी भारत समजून घेतला. त्यानंतर वर्ष सव्वा वर्षात चंपारणचा लढा सुरू झाला. ४-२ पुढारी सोडून

भारतातील सामान्य लोक गांधीजींना ओळखतही नव्हते. अशा परिस्थितीत गांधीजींनी हा पहिला अहिंसक सत्याग्रह यशस्वी केला.

कुठल्याही संघटनेशिवाय, काँग्रेसच्याही मदतीशिवाय पाठिंब्याशिवाय यशस्वी केलेला तो लढा होता.

अशिक्षित शेतकऱ्यांना काँग्रेसचे नावही माहीत नव्हते. काँग्रेसये कार्य माहीत होण्याचा प्रश्नच नव्हता. ब्रिटिश शासक व शेतीचे ब्रिटिश मालक दोघांचाही काँग्रेसविषयी अतिशय प्रतिकूल ग्रह होता. काँग्रेसच्या नावे लढा उभारून फायद्यापेक्षा तोटाच अधिक होईल, असे गांधीजींना वाटले. मदतीला आलेल्या वकिलांशी विचारविनिमय करून काँग्रेसच्या मदतीशिवाय लढा उभारायचा असा निर्णय त्यांनी घेतला. शस्त्रबळ व संघटनेचे सामर्थ्य नसले तरी आत्मबळ आणि सत्य, अहिंसा यावरील अव्यभिचारी निष्ठा यांच्या आधारे अन्यायाचा प्रतिकार करता येतो. याचा वस्तुपाठच या सत्याग्रहाच्या निमित्ताने भारतीयांना मिळाला.

सरकारी आदेशाच्या सविनय अवज्ञेच्या सामर्थ्याचा प्रत्यय याच लढ्याच्या निमित्ताने आला.

सरकारी अधिकाऱ्याने गांधीजींना चंपारण सोडून जाण्याचा लेखी आदेश दिला. गांधीजींनी त्याचे पालन न करता तसे अधिकाऱ्याला कळवले. कोर्टात केस सुरू झाली. गांधीजींनी गुन्हा कबूल केला आणि त्याबद्दलची शिक्षेची मागणी केली. गुन्हा कबूल करण्याचे हे अघटित कोर्टानं कधीच अनुभवलं नव्हतं. ते गोंधळले. काय करावं त्यांना कळेना. शेवटी व्हाईसरायच्या आदेश खटला काढून घेण्यात आला.

सविनय अवज्ञेची ही कृती व्यक्तीगत पातळीवर झाली होती. गांधीजींनी एकट्याने केली होती. पुढे १९३० साली मिठाच्या सत्याग्रहाच्या वेळी कायदेभंगाच्या देशव्यापी आंदोलनाच्या रूपात ती विकसित झाली. या सामर्थ्यापुढे ब्रिटिश शासन हतबल झालं. गांधीजी आणि

व्हाईसराय यांच्यात समपातळीवर बाटाघाटी झाल्या. १९३० साली साम्राज्याचा खचत चाललेला पायाच उध्वस्त झाला आणि १९४७ साली भारत स्वतंत्र झाला.

या सत्याग्रहाला गांधीजींनी सामाजिक आशयाची जोड दिली. 'आधी सामाजिक की आधी राजकीय?' हे टिळक युगातील द्वैत गांधींनी संपवलं. स्वतंत्र भारताची जबाबदारी पेलू शकेल असा भारतीय समाज घडवणं आवश्यक होतं. त्यामुळे स्वातंत्र्य आंदोलन आणि समाजपरिवर्तनाचे प्रयत्न एकाच वेळी व्हायला हवेत, असं त्यांना वाटायचं. भारत समजून घेतांना त्यांना दिसलं होतं इथल्या जातिगत भेदभावाचं स्वरूप, अज्ञान, अंधश्रद्धा, अस्वच्छता, अनारोग्य इत्यादी. चंपारण त्याला अपवाद नव्हता. अन्यायनिवारणासोबतच त्यांनी या बाबतीतही काम सुरू केलं. कामाचा प्रारंभ त्यांनी त्यांच्या मदतीसाठी आलेल्या उच्चविद्याविभूषित वकिलांपासूनच केला. त्या प्रत्येकाबरोबर त्यांचे नोकर-चाकर, स्वयंपाकी असा मोठा लवाजमा होता. प्रत्येकाचा स्वयंपाक वेगळा व्हायचा. रात्री बारा पर्यंत जेवणं चालायची. गांधीजींनी त्यांच्या वागण्यात शिस्त आणली. एकत्र रसोडा सुरू केला. नोकरचाकरांना सोडचिठ्ठी दिली. खेड्यातल्या लोकांच्या शिक्षण, स्वच्छता आणि आरोग्याच्या प्रश्नात लक्ष घातलं. आसपासच्या खेड्यात शाळा सुरू केल्या. स्वच्छता आणि आरोग्याचे धडे दिले.

या सत्याग्रहामुळे शेतकरी अन्याय, अत्याचारापासून मुक्त झाले. वीस टक्के शेतावर निळीची लागवड करण्याचा कायदा रद्द झाला. अन्याय्य पध्दतीने फसवणूक करून शेतकऱ्यांकडून घेतलेले पैसे मालकांकडून परत मिळाले. हे अत्यंत महत्वाचं अनुषंगिक फलित होतं. भयगस्त, दीन-दुबळा शेतकरी त्यामुळे भयमुक्त झाला. ताठ मानेनं जगू लागला. नंतरच्या काळात सर्वसामान्य माणूसही ब्रिटिशांच्या जुलुमाला न भिता त्यांच्यासमोर निधड्या छातीनं उभा राहिला, त्याचं बीज चंपारणच्या या आंदोलनात होतं त्याचंच रूपांतर नंतर स्वातंत्र्य प्राप्तीत झालं.

# ८. अभूतपूर्व व्याख्यान

गांधीजी १९१५ मध्ये आफ्रिकेतून भारतात आले. त्यांचे राजकीय गुरु गोपाळकृष्ण गोखले ह्यांच्या सूचनेप्रमाणे १ वर्षभर भारतभर प्रवास करून त्यांनी भारत समजून घेतला. भारताचे दारिद्र्य व अज्ञान पाहून ते विव्हल झाले. १९१६ मध्ये बनारस हिंदू युनिव्हर्सिटीच्या उद्घाटन सोहळ्यासाठी ते बनारसला गले. तीन दिवस चाललेल्या त्या सोहळ्यात त्यांना दिसला प्रचंड भपका. वेगवेगळ्या संस्थानातील राजेरजवाडे हिऱ्यामोत्याच्या अलंकारांनी नटून थटून आले होते. आपल्या श्रीमंतीच्या प्रदर्शनात धन्यता मानत होते. उद्घाटन व्हाइसरायच्या हस्ते होते. त्यासाठी बनारस शहरात असलेली कडक सुरक्षा व्यवस्था गांधीजींनी अनुभवली. त्याच बरोबर बनारस शहरातील त्या अरुंद गल्ल्याबोळ तेथील अस्ताव्यस्तता व घाणीचे साम्राज्य हेही त्यांनी पाहिले. भारताचे अज्ञान व दारिद्र्य पाहून दुःखाने भरलेल्या त्यांच्या अंतःकरणातील दुःख अधिक गहिरं झालं.

त्या समारंभात गांधीजींनी एक भाषण दिलं. त्या भाषणात त्यांच्या मनातील दुःखाला वाचा फुटली. त्यांच्या विचारांना अभिव्यक्तीची संधी मिळाली. भारतात आल्यानंतरचे हे त्यांचे पहिलेच सार्वजनिक भाषण. भारतीयांना अजून त्वांची पुरती ओळखही नव्हती. स्वातंत्र्यआंदोलनाचे नेतृत्व ही खूप पुढची गोष्ट होती. आंदोलनाचा साधा शिपाई म्हणूनही त्यांना स्थान मिळालं नव्हतं. अशा नवख्या अवस्थेत दिलेलं ते भाषण होतं.

गांधीजींचं ते भाषण ऐतिहासिक ठरलं. त्याचा आशय सभागृहातील श्रोत्यांवर झालेला त्याचा तात्कालिक परिणाम, त्याचा भारतीयांच्या मनावर उमटलेला खोलवर ठसा, सर्वच दृष्टींनी ऐतिहासिक ठरलं.

व्याख्यानाचा आशय खूपच वेगळा होता. सार्वजनिक व्याख्यानातून तसा आशय आजवर कुठल्याही पुढाऱ्याने व्यक्त केला नसेल. लुई फिशर ह्या व्याख्यानाबद्दल म्हणतात, “भारताने

आजपर्यंत कधीही इतके साधे सरळ व अनलंकृत भाषण ऐकले नव्हते... अत्यंत सामर्थ्यवान माणसांसमोर गांधीजींनी आपला नम्रतेचा ध्वज फडकावला." ह्या व्याख्यानाच्या निमित्ताने अन्याय, अत्याचार, शोषण, अस्वच्छता, निष्क्रीयता, वाचाळता, भित्रेपणा ह्या सर्व विषयींची त्यांच्या मनातील नकारात्मक भावना त्यांनी लोकांसमोर मांडली. त्याच बरोबर गांधीजींच्या तत्वज्ञानातील अनेक पैलू ह्या व्याख्यानात प्रगट झाले. गांधीजींनी त्या व्याख्यानातून व्हाइसराय पासून विद्यार्थ्यांपर्यंत सर्वांशी संवाद साधला. कोणालाही त्यांनी सोडलं नाही. सर्वांचा समाचार घेतला. राजेरजवाड्यांच्या दागदागिन्यावर, भरजरी कपड्यांवर त्यांनी बोट ठेवले. ह्याच लोकांनी ह्याच व्यासपीठावरून आदल्या दिवशी भारताच्या दारिद्र्याचे वर्णन केले होते. अर्धनग्न उपाशी भारताचे दारिद्र्य व ह्या सोहळ्यात दिसणारे श्रीमंतीचे प्रदर्शन ह्यांची संगती कशी लावायची असा प्रश्न त्यांनी परखडपणे विचारला. ते पुढे म्हणाले की, "तुम्ही जोपर्यंत ह्या दागदागिन्यांचा त्याग करीत नाही व ही संपत्ती तुमची नसून सर्व देशवासियांची आहे. तुम्ही केवळ त्या संपत्तीचे विश्वस्त आहात हे मान्य करीत नाही. तोपर्यंत भारत मुक्त होणार नाही." अतिशय सहजपणे त्यांच्या आर्थिक विचारातील विश्वस्त कल्पना त्यांनी लोकांसमोर मांडली.

व्हाइसरायच्या संरक्षणासाठी कडक सुरक्षा व्यवस्था होती. बनारस शहरभर गुप्त पोलीस पेरलेले होते. शहराला छावणीचं स्वरूप आलं होतं. सामान्य लोकांना आपले नित्याचे आवश्यक व्यवहार करायलाही घराबाहेर पडणं शक्य नव्हतें. ह्या परिस्थितीसाठी त्यांनी व्हाइसरायवर टीकास्त्र सोडलं. त्याचबरोबर भारतीयांच्या भयग्रस्ततेची ही निर्भत्सना केली.

बनारसच्या गल्ल्या बोळी, देवळे ह्यातील अव्यवस्था, गोंधळ, अस्वच्छता, थुंकण्यासारख्या गलिच्छ सवयी ह्या सर्वांचा त्यांनी उल्लेख केला. आपले पारतंत्र्य ह्या सर्व अस्वच्छतेचे, अव्यवस्थेचे कारण आहे असे म्हणता येईल का? असा प्रश्न त्यांनी विचारला, उपस्थित श्रोत्यांना मात्र कळेना की अस्वच्छता व थुंकण्याची सवय ह्याचा बनारस हिंदु

युनिव्हर्सिटी आणि स्वातंत्र्य ह्याच्याशी काय संबंध आहे. श्रोत्यांमध्ये नापसंती दर्शक प्रतिक्रिया उमटल्या.

सोहळ्यासाठी जमलेले आपण सर्व विद्याविभूषित आहोत. आपण सर्व येथे परकीय भाषेत बोलतोय. भारतियांना परस्परांशी संवाद साधायला इंग्रजीच आश्रय घ्यावा लागतोय ही शरमेचीं बाब आहे. ह्याचा उल्लेख ही त्यांनी भाषणात केला. शिवाय भारतातील शेतकऱ्यांचे शोषण चालू ठेवून स्वातंत्र्य येणार नाही. स्वातंत्र्य डॉक्टर, इंजीनियर, वकील आदि शिक्षित लोक मिळवू शकणार नाही. भारतीय शेतकरी उभा राहिला तरच स्वातंत्र्य मिळविता येईल.

शिक्षित वर्गानंतर त्यांनी आपला मोर्चा विद्यार्थ्यांकडे वळवला. विद्यार्थ्यांना उद्देशून ते म्हणाले की वाणीचे काम आता संपलेले आहे. आपण सर्व खूप बोलून चुकलो आहोत. तुम्ही सर्वांनी वाचीवीर नव्हे तर कृतीवीर व्हायला हवे आहे. केवळ शब्दांनी अर्ज विनंती व भाषणांनी आपनले स्वातंत्र्य जवळ येणार नाहीये. स्वातंत्र्यासाठीची आपली पात्रता ही त्याने सिद्ध होणार नाहीये. त्यासाठी महत्वाचे ठरणार आहे आपले आचरण सतत आत्मशोध करीत राहून आपले दोष व उणीवा दूर करणे गरजेचे आहे. जे स्वातंत्र्य आपण मागतो आहोत ते स्वातंत्र्य पेलण्यासाठी आपले आचरणच महत्वाचे ठरणार आहे.

गांधीजींच्या जीवनात आत्मशोध आणि विचारांना आचाराची जोड ह्या दोन्ही गोष्टींना खूप महत्व आहे. पटलेल्या विचारांप्रमाणे प्रथम आपण स्वतः जीवन जगणे व नंतर तो विचार दुसऱ्यापर्यंत पोहचवणे हा गांधीजीवनाचा क्रम आहे. अहिंसा व सत्याग्रहाचे तत्वज्ञान असो, ट्रस्टीशिपची कल्पना असो किंवा साधेपणा, समता, गरजा कमी करणे, असंग्रह, गरीब शेतकऱ्याप्रमाणे जीवन जगणे हे विचार असोत. सर्व तत्वज्ञान, कल्पना विचार प्रथम गांधीजींच्या आचरणातून अभिव्यक्त झाले. नंतर लेख व व्याख्यानातून त्यांनी ते लोकांपर्यंत पोहचवले. आचरण हा गांधी विचाराचा गाभा आहे. हाच गाभा ह्या पहिल्या व्याख्यानातून त्यांनी उघड केलेला दिसतो.

व्याख्यानाचा सभागृहावरील परिणाम संमिश्र होता. व्याख्यान चालू असतांना क्वचित कोणाच्या संमतीदर्शक माना डोलवल्या गेल्या. नाराजीमुळे काहींनी भुवया उंचावल्या. राजे-महाराजांच्या श्रीमंती प्रदर्शनाच्या आक्षेपावर विद्यार्थ्यांनी हर्षोद्गार काढले तर काही राजांनी सभात्याग केला. सभागृहाची नाराजी एकदा एवढी वाढली की, ‘गांधी, खाली बसा’. असा ओरडा सुरु झाला. त्याच वेळी ‘पुढे बोला’ हे स्वर पण ऐकू येत होते. शांतता प्रस्थापित झाल्यावर गांधीजींनी बोलायला सुरुवात केली. शेवटी गोंधळ एवढा वाढला की गांधीजींना भाषण थांबवावे लागले.

सर्वसामान्य भारतीयांच्या मनावर ह्या ऐतिहासिक भाषणाचा दीर्घकालीन खोलवर ठसा उमटला. रेडिओ जवळ जवळ नव्हतेच. वर्तमानपत्र वाचणारा शिक्षित वर्ग अत्यल्प होता. तरीही अल्प कालावधीत वाऱ्यावर सवार होऊन गांधीजींचे हे भाषण भारतातल्या सामान्य लोकांपर्यंत जाऊन पोहोचले. ते भाषण व भाषण देणारा तो अनोखा वक्ता दोन्हीने सामान्य जनाची पकड घेतली. आपल्या सारख्या गरीबांची बाजू श्रीमंतासमोर निर्भयपणे मांडणारा, आपल्या सारख्याच पोषाखात वावरणारा, अतिशय साधेपणाने आश्रमात राहणारा हा खूप वेगळा आहे हे लोकांना जाणवलं. त्यांना तो महात्माच वाटला. हा महात्मा त्यांना भावला. हाच आपलं भलं करील ही खात्री त्यांना पटली. त्याला त्यांनी आपला मानलं.

वैयक्तिक रीत्या ही काही लोकांवर ह्या व्याख्यानाचा खूप प्रभाव पडला. ते गांधीजींचे निष्ठावंत अनुयायी बनले. विनोबांचं उदाहरण लक्षात घेण्यासारखं आहे. विनोबा भावेंना गांधीजींचे आध्यात्मिक वारस मानतात. १९४० च्या व्यक्तिगत सत्याग्रहाच्या वेळी पहिला सत्याग्रही म्हणून गांधीजींनी विनोबांची निवड केली होती. असे हे विनोबा गांधीजींच्या ह्या व्याख्यानाने विलक्षण प्रभावित झाले. ब्रह्मजिज्ञासा व क्रांतिकारकांचे कार्य ह्या दोन्ही विषयांचे त्यांना आकर्षण होते. ब्रह्म जिज्ञासेने उचल खाल्ली व घरदार आणि इंटरची परीक्षा सोडून त्यांची पावले हिमालयाच्या दिशेने चालू लागली. वाटेत बनारसला गांधीजींच्या व्याख्यानाविषयी त्यांनी

वाचले. त्या व्याख्यानात त्यांना वेगळाच प्रकाश दिसला. 'गांधीजींमध्ये आध्यात्माची शांतता व क्रांतिकारकांची दाहकता दोन्हींचा संयोग' त्यांना दिसला. आपल्या दोन्ही आकांक्षा येथे पूर्ण होतील हे त्यांना जाणवले व हिमालयाकडे वळलेली त्यांची पावले माघारी वळली व गांधीजींच्या साबरमती आश्रमात स्थिरावली.

असे हे गांधीजींचे पहिले अभूतपूर्व विलक्षण व्याख्यान. ह्याच व्याख्यानामुळे सामान्यांच्या मनात त्यांना आदराचे स्थान मिळाले.

# ९. स्वातंत्र्य चळवळीचं नेतृत्व

१९२० साली लोकमान्य टिळकांचा मृत्यू झाल्यानंतर भारतीय स्वातंत्र्यचळवळीचं नेतृत्व गांधीजींकडे आल्याचं आपण पाहतो. टिळकांच्या पिढीतील अनुभवी पुढारी हयात होते. लाल, बाल, पाल ह्या नावाने ओळखल्या जाणाऱ्या ३ पुढ़ाऱ्यांपैकी फक्त 'बाल' काळाच्या पडद्याआड गेले होते. इतर दोघे चळवळीत कार्यरत होते. गांधीजींचा स्वातंत्र्य चळवळीतील प्रवेश ह्या जुन्या, जाणत्या पुढाऱ्यांच्या मानाने खूप अलिकडला. उमेदीचा २० वर्षाचा काळ आफ्रिकेत घालवून ते भारतात आले होते. (१९१५ साली भारतात आल्यानंतर भारताच्या राजकीय, सामाजिक, आर्थिक परिस्थितीचे सम्यक् अवलोकन व आकलन करून घेण्यासाठी त्यांनी १ वर्षाचा काळ भारत भ्रमणात वेचला. त्यानंतर इथल्या राजकीय जीवनात ते हळूहळू प्रवेश करू लागले.) भारतात येऊन जेमतेम ५ वर्ष झाली होती आणि टिकांसारख्या 'लोकमान्य' पुढाऱ्याचा मृत्यु झाला. स्वातंत्र्य चळवळीला मोठा धक्का बसला. नेतृत्वाची पोकळी निर्माण झाली. ती पोकळी महात्मा गांधींनी भरून काढली. अतिशय अल्पावधीत त्यांच्याकडे नेतृत्व आले.

## नेतृत्व गांधीजींकडे येण्याची कारणे

इतक्या अल्पावधीत गांधीजींकडे नेतृत्व कसं आलं? त्याला काय कारणं होती? ह्या प्रश्नांची उत्तरं शोधण्याचा प्रयत्न केल्यास स्पष्टपणे जाणवतं की गांधीजींच्या व्यक्तित्वातील काही वैशिष्ट्येच ह्याला कारणीभूत ठरली. ती पुढीलप्रमाणे-

### १. दीन दुबळ्यांच्या अडचणी समजून घेण्याचा प्रामाणिक प्रयत्न

हा प्रयत्न गांधीजींनी सततच केला. ना. गोखल्यांच्या सूचनेप्रमाणे ह्याचसाठी त्यांनी वर्षभर भारतभ्रमण केले. निळीच्या शेतकऱ्यांवर होणारे अन्याय समजून घेण्यासाठी बिहार राज्यातील चंपारण्यात धावूत गेले.

## २. दीन दुबळ्यातीलच एक होऊन जाण्याची वृत्ती

गांधीजींचे वागणे-बोलणे सर्वच सर्वसामान्यांसारखे होते. ते दरिद्री नारायणाशी, शोषितांशी लगेच एकरूप होऊन जात. त्यांच्या वृत्तीत कुठलीच आढ्यता, सर्वसामान्यापेक्षा निदान चार अंगुळे तरी वर राहून आपली श्रेष्ठता दाखवणे हे नाहीच. त्यांचा पोषाख ह्याची साक्ष देतो. संपूर्ण राहणीच कमालीची साधी होती.

## ३. व्रताचरणामुळे व्यक्तिमत्वाला आलेला कणखरपणा

गांधीजी व्रतस्थ जीवन जगले. संन्यस्त वृत्तीने संसारात राहिले. सत्य, अहिंसा, निर्भयता आदि एकादश व्रतं त्यांनी जीवनात उतरवली होती. सत्याचा आग्रह धरणाऱ्या व्यक्तीत निर्भयता असावी लागते. निर्भयता हे त्यांचे जणु व्रतच होते. आश्रमवासियांसाठी सांगितलेल्या एकादश व्रतात 'सर्वत्र भयवर्जन' हे एक व्रत आहे. भारतात आल्या आल्याच त्यांच्या निर्भयतेचे दर्शन घडते. बनारस हिंदु युनिव्हर्सिटीच्या उद्घाटन प्रसंगी त्यांनी केलेल्या भाषणात- भारतातले बहुसंख्य लोक दारिद्र्यात कसे तरी जीवन जगत असतांना उद्घाटनाला आलेले राजेरजवाडे भरजरी कपडे व हिऱ्यामोत्याचे दागीने घालून आले होते. ही गोष्ट गांधींना दुःसह वाटली. त्याप्रसंगी केलेल्या भाषणात त्यांनी राजेरजवाड्यांना अतिशय निर्भयपणे स्पष्ट शब्दात फटकारले आहे. त्याच भाषणाने पू. विनोबाजी प्रभावित झाले होते. गांधी हे वेगळेच रसायन आहे असे त्यांना जाणवले. हिमालयाच्या दिशेने वळलेली त्यांची पावले गांधींच्या साबरमती आश्रमाकडे वळली. चंपारणच्या त्यांच्या कार्याच्या वेळीही त्यांची सत्यनिष्ठा आणि अहिंसेकरीता श्रद्धा व निर्भयता प्रकर्षाने सर्वसामान्य जनतेने पाहिली.

## ४. संतत्व

भारतीय संत परंपरेत सहजगत्या सामावून जाईल असं त्यांचं व्यक्तित्व होतं. भारतीयांमध्ये संताबद्दल सततच आकर्षण आणि आदराची भावना राहिलेली आहे. हीच

आदराची भावना हेच आकर्षण जन सामान्यांना भारतातील अशिक्षित, दरिद्री जनतेला गांधीजीबद्दल वाटलं. जनतेने त्यांना आपलं पुढारी मानलं. (संतांप्रमाणे अखिल मानव जातीच्या कल्याणाचा विचार गांधीजींनी सतत कला.) रंजल्या गांजल्यांना त्यांनी सतत आपले मानले. (म्हणून तर रंजल्या गांजल्यांचे दुःख दूर करण्यासाठी ते चंपारण्यात धावून गेले. केवळ भारताचे स्वातंत्र्य राजकीय स्वातंत्र्य त्यांना कधीच पुरेसे वाटले नाही. अखिल मानव समूह शोषणातून गुलामगिरीतून मुक्त व्हावा असं त्यांना वाटत होतं. साम्राज्यवादी प्रवृत्ती जगातून नष्ट व्हावी ही त्यांची प्रामाणिक इच्छा होती. इतरांनी गुलागिरीत रहावे किंवा आपण स्वतंत्र होऊन इतरांना गुलाम करावे अशा विचारांचा स्पर्श ही ह्या संतप्रवृत्तीच्या माणसाच्या मनाला कधी झाला नाही. आपण झेंडावंदनाच्या वेळी झेंडागीत म्हणतो. त्यात एक कडवं आहे-

**शान न इसकी जाने पाये। चाहे जान भले ही जाये।**

**विश्वविजय करके दिखलाये। तब होवे प्रण पूर्ण हमारा।।**

ह्या कडव्यातील दुसऱ्या ओळीतील . विचार गांधींना अजिबात मंजूर नव्हता, आमच्या आश्रमात (गांधीजींचा वर्धा येथील आश्रम) ही ओळ आम्ही अशी कधीच म्हणत नाही. (अजूनही म्हणत नाही. आम्ही त्याऐवजी म्हणतो)

**एकसाथ सब मिलकर गाये, प्यारा भारत देश हमारा।।**

### ५. स्वातंत्र्यानंतरच्या भारताच्या स्वरूपाचे चिंतन

स्वातंत्र्यानंतरच्या भारताचे स्वरूप कसे असावे ह्याचा आंदोलनाच्या वेळेपासूनच समग्र विचार करणारा हा एक आगळा वेगळा माणूस होता. आणि हा माणूसच नेता म्हणून सर्वांना मान्य झाला. स्वातंत्र्य आंदोलनाशी प्रत्यक्ष संबंध येण्यापूर्वीच स्वातंत्र्यानंतरच्या भारताचे चित्र १९०८ साली लिहिलेल्या 'हिंद स्वराज' मध्ये त्यांनी रेखाटले आहे. १९२० मध्ये स्वातंत्र्य चळवळीचे नेतृत्व त्यांच्याकडे चालत आल्यानंतरही ह्या चित्रात विविध रंग भरण्याचाच त्यांनी

सातत्याने प्रयत्न केला. त्यांनी ह्यासाठीच तर विविध रचनात्मक, संस्थांची  स्थापना केली. विधायक कार्यासाठी कार्यकर्त्यांची फौज तयार केली. विधायक दृष्टिकोनातून त्यांगी भारतीयांना शिकवलं की हात उगारण्यासाठी नसतात उभारण्यासाठी असतात.

## ६. समन्वयवादी दृष्टीकोन

शांततापूर्ण सहअस्तित्व हा गांधी विचारांचा एक मौलिक पैलू. त्यामुळेच विग्रह, कलह ह्यापेक्षा समन्वयावर त्यांचा भर. ह्या समन्वयवादी दृष्टिकोनामुळेच त्यांनी भारतातील बरीच द्वैतं संपवली. ह्या द्वैतांमुळे स्वातंत्र्य आंदोलनाची गती कुंठित होत होती. शक्ती लयाला जात होती.

गांधीजींपूर्वी सर्वात मोठं द्वैत होतं. आधी सामाजिक की आधी राजकीय. टिळक व आगरकरांसारखे पुढारी ह्या द्वैतामुळे परस्पर विरोधात गेले. दोघांची एकत्र शक्ती ब्रिटिशसत्ता उलथून टाकायला उपयोगात येऊ शकली नाही.

शिक्षित x अशिक्षित, श्रीमंत x गरीब, उच्चवर्णीय x निम्नवर्णीय, बुद्धीजीवी x श्रमजीवी ही सर्वच द्वैतं गांधीजींनी संपवली व सर्वांना एकत्र केलं. सर्वांचा अभिक्रम जागवला. त्यामुळे परकीय सत्ता उलथून टाकायला एक बलाढ्य सामर्थ्य उभं राहिलं.

## ७. भारतीयांना समजेल अशी भाषा

भारतातल्या अशिक्षित खेडवळालाही समजेल आशा त्यांच्याच भाषेत गांधीजी बोलत. ती भाषा सर्वांना समजत होती व सर्वांच्या हृदयाचा ठाव घेत होती. इथल्या आध्यात्मिक वारशामुळे प्राचीन परंपरेतून काही शब्द इथल्या भाषेत आले होते. त्या शब्दात नवा आशय ओतून गांधीजींनी ते शब्द भाषणात, लेखनात वापरले. शब्द पूर्वपरिचित असल्याने लोकांना त्यांचं बोलणं भावलं. लोक त्यांना आपला नेता मानू लागले.

## ८. लोकमान्य टिळकांचे गांधीजींविषयी मत

लोकमान्य टिळकांकडून गांधींकडे नेतृत्व आलं होतं. टिळकांना गांधीविषयी त्यांनी चालू केलेल्या चळवळींविषयी काय वाटत होतं? हे पाहणंही इथे अप्रस्तुत ठरणार नाही.

१९१८ साली अवंतिकाबाई गोखलेंनी गांधीजींचे चरित्र लिहिले आहे. त्याला टिळकांनी प्रस्तावना लिहिली आहे. त्यात टिळकांनी गांधीजींच्या आफ्रिकेतील कार्याचा गौरव करून त्यांच्या व्यक्तित्वातील गुणांचा गौरवपूर्ण उल्लेख केला आहे.

रौलट कायद्याच्या विरोधात गांधीजींनी सत्याग्रह सुरू केला तेव्हा टिळक इंग्लंडमध्ये होते. त्यांनी तिथून होमरूल लीगचे मुंबईचे सेक्रेटरी व 'केसरी' आणि 'मराठाचे' संपादक ह्यांना असा निरोप पाठवला होता की गांधींच्या सत्याग्रहाला पूर्ण पाठिंबा द्यावा. इंग्लंडहून परत आल्यावर त्यांच्या स्वागतासाठीच्या जाहीर सभेत लोकमान्य असं म्हणाले होते की "गांधींनी रौलट कायद्याविरुद्ध सत्याग्रह केला तेव्हा मी त्यात सामील व्हायला भारतात नव्हतो. ह्याचा मला खेद वाटतो."

टिळकांच्या मृत्युपूर्वी १५ दिवस टिळक व गांधी ह्यांची बोलणी झाली होती. त्यावेळी गांधींच्या असहकार आंदोलनाविषयी टिळक म्हणाले होते, "तुमच्या चळवळीची तत्त्वे मला पूर्णपणे मान्य असून या चळवळीने हिंदुस्थानचे खरेखुरे कल्याण जरूर होईल हे मला कबूल आहे. पण लोकांकडून या तत्त्वांचे आचरण होणे अवघड असल्यामुळे आपण जर तसे करू शकलात तरच यशाचे वाटेकरी व्हाल." ह्या उद्गारावरून स्पष्ट होते की गांधीजींच्या नेतृत्वाखालील असहकारितेची चळवळ त्यांना पूर्णपणे मान्य होती. फक्त लोकांच्या सामर्थ्याविषयी त्यांनी साशंकता प्रकट केली आहे.

## ९. गांधीजींच्या नेतृत्वाचे परिणाम

एक अतिशय क्रांतिकारी मार्ग, अहिंसक प्रतिकाराचा सत्याग्रहाचा अभिनव मार्ग गांधीजींच्या नेतृत्वाने भारतीयांना नव्हे साऱ्या जगाला दाखवला. आध्यात्मिक क्षेत्रातले अहिंसेचे तत्वज्ञान त्यांनी राजकीय अन्याय, सामाजिक समस्या सोडविण्याचे साधन बनवले. (जगात आतापर्यंत कोणीच हे साधन वापरल नव्हते.) शस्त्र सज्ज साम्राज्यवादी राष्ट्रांशी निःशस्त्र गुलाम राष्ट्रांनी लढा देण्याचा तो एक अभिनव मार्ग होता. गांधीजी व त्यांचा अहिंसक सत्याग्रह ह्या विषयीच्या जिज्ञासेने व प्रचंड कुतुहलाने आणि खूपच शंकित मनाने आचार्य काका कालेलकर व आचार्य कृपलानी गांधींना भेटायला गेले होते. कृपलानी म्हणाले, “तुम्ही सांगता त्या अहिंसेच्या मार्गाने अन्यायाचा प्रतिकार करून कोणी स्वातंत्र्य मिळवले असा एकही दाखला इतिहासात सापडत नाही. मग तुमचा मार्ग यशस्वी होईल हे कसे मानायचे ?”

गांधीजींनी उत्तर दिले होते, “तुम इतिहास की किताबें पढ़ते हों। किताबों में लिखा इतिहास विद्यार्थियों को पढ़ाते हों। मैं नये इतिहास का निर्माण करने जा रहा हूँ।” केवढा हा प्रचंड आत्मविश्वास!

अत्याचारापुळे असहाय झालेल्या माणसाला गांधीजी म्हणाले - “संघटना नसेल, हत्यारांचा ही अभाव असेल, पण तरी देखील तुमच्याजवळ अशी एक शक्ती आहे की जिच्यायोगे तुम्ही दडपशाही आणि अन्याय यांचा प्रतिकार करू शकता. संकटे आणि यातना यांना धैर्याने तोंड देऊ शकता.” ती माणसामधील आत्मशक्ती गांधीजींनी जागवली.

डॉ. राम मनोहर लोहियांच्या शब्दात कोणाच्याही मदतीशिवाय स्वतः अत्याचाराचा प्रतिकार करण्याची क्षमता माणसाला प्राप्त करून देणे हे महात्मा गांधींच्या जीवनाचे व कृतीचे सर्वश्रेष्ठ रहस्य आहे.

गांधीजींनी दाखवलेल्या अभिनव मार्गाचा फार मोठा क्रांतिकारी परिणाम भारतात झाला. शस्त्रहीन भारतीय शस्त्रसज्ज इंग्रजांपुढे निर्भयतेने उभा राहिला. गांधीजींनी केलेला हा सर्वात मोठा चमत्कार !

# १०. सत्याग्रहाचे स्वरूप व तत्वे

सत्याग्रहाच्या जन्मापासून भारताला स्वातंत्र्य मिळेपर्यंत विविध सत्याग्रह लढ्याच्या वेळी सत्याग्रहाचे स्वरूप व तत्त्वे याविषयी गांधीजी सातत्याने मार्गदर्शनपर लिहीत होते. त्यांच्या लिखाणातून लक्षात येणारी सत्याग्रहाची तत्त्वे व स्वरूप थोडक्यात पाहू.

१) जीवनाच्या कुठल्याही क्षेत्रात आणि कसल्याही प्रकारच्या अन्यायाच्या निवारणासाठी सत्याग्रहाचा उपयोग करता येतो.

२) न्याय्य कारणासाठीच सत्याग्रह होऊ शकतो.

३) सत्याग्रहात हार ही वस्तूच नाही. उद्देश्य साध्य झाला नाही तर तो सत्याग्रही व्यक्तीचा उणेपणा आहे. सत्याग्रहाच्या सिद्धांतात उणेपणा नाही.

४) सत्याग्रहाचे शस्त्र उपयोगात आणणाऱ्याची आणि ज्याच्याविरोधात ते उपयोगात आणले जाते त्याचीही शुद्धी करते.

५) सत्याग्रहासाठी गरज आहे प्रेमबळाची, आत्मबळाची.

६) सत्याग्रहात हिंसेला स्थान नाही. तो अहिंसकच हवा. सत्याची साधना हिंसेने होऊ शकत नाही. अहिंसा ही सत्याचीच अभावात्मक बाजू आहे. सत्याग्रह आणि अहिंसा ही तत्त्व अभिन्न आहेत.

गांधीजींनी पुकारलेले सर्व लढे अहिंसकच होते. प्रतिपक्षावर हातही न उगारणे हे त्याचे वैशिष्ट्य होते. या तत्वाला जेव्हा बाधा पोहचली तेव्हा गांधीजींनी लढे स्थगित केलेले आपण पाहतो. १९१९ च्या रौलट कायद्याच्या विरोधातील सत्याग्रहात भारतीयांकडून अहिंसेचे पालन नं झाल्याने त्यांनी सत्याग्रह स्थगित केला होता.

७) सत्याग्रहात प्रतिशोधाला बदला घेण्याच्या वृत्तीला स्थान नाही. विरोधकाला क्लेश देणे सत्याग्रहात बसत नाही. आत्मक्लेश हा सत्याग्रहाचा आधार आहे.

१९२० च्या असहयोग आंदोलनाच्या वेळी बदला घेण्यासाठी चौरीचौऱ्यात लोकांनी पोलीस स्टेशनला आग लावली. आतील पोलीस जळून भस्मसात झाले. अहिंसेचे ही पालन झाले नाही. गांधीजींनी सत्याग्रह स्थगित केला. प्रायश्चित्त म्हणून गांधीजींनी २१ दिवसांचा उपवास केला.

८) प्रतिपक्षावर प्रेम करणं हे सत्याग्रहाचं महत्वाचं तत्त्व त्यामुळे प्रतिपक्षाच्या अडचणींचा फायदा घेणं सत्याग्रहात बसत नाही.

व्यक्तिगत सत्याग्रहाच्या वेळी या तत्त्वाचं स्पष्ट दर्शन घडतं. युध्दाला भारतीयांचा विरोध दर्शवणं हा सत्याग्रहाचा हेतु होता. त्यावेळी इंग्लंड दुसऱ्या महायुध्दाच्या अडचणीच्या काळात होता. सार्वत्रिक सत्याग्रह पुकारून त्यांच्या अडचणीत भर न घालता गांधीजींनी व्यक्तिगत सत्याग्रहाची हाक दिली.

९) सत्याग्रहापूर्वी वाटाघाटीतून योग्य मार्ग काढण्याचा पुरेपूर प्रयत्न झाला पाहिजे. अखेरचा उपाय म्हणून सत्याग्रहाचं स्थान असतं.

गांधीजींनी पुकारलेल्या प्रत्येक सत्याग्रहात हे तत्व दिसतं. आफ्रिकेतील सत्याग्रहाच्या वेळी इंग्लंडला शिष्टमंडळ पाठवून वाटाघाटीचे पुरेपूर प्रयत्न केले गेले. ते अपयशी ठरल्यानंतरच सत्याग्रह पुकारला गेला.

१०) सत्याग्रहात गुप्ततेला स्थान नाही. प्रतिपक्षाला गाफील ठेवून वार करायचा नसतो. कोण, कुठे, केव्हा, कशासाठी सत्याग्रह करणार याची स्पष्ट कल्पना प्रतिपक्षाला दिली जाते. अशी कल्पना प्रत्येक सत्याग्रह सुरू करण्यापूर्वी इंग्रज सरकारला गांधीजी देत होते.

११) कमीत कमी मागणी काय हे सत्याग्रहापूर्वी स्पष्ट असावे. प्राण गेला तरी त्यापासून माघार घेऊ नये. इतर बाबतीत वाटाघाटी होऊ शकतात.

विभक्त मतदार संघाला गींधीजींनी शेवटपर्यंत विरोध केला. आंबेडकरांशी वाटाघाटी केल्या आणि फलत: आंबेडकरांनी विभक्त मतदार संघाचा आग्रह सोडला.

१२) शत्रुशी/प्रतिपक्षाशी मित्रत्वाचं नातं प्रस्थापित करणं हे सत्याग्रहाचं महत्वाचं तत्त्व.

या तत्त्वाचं अनोखं दर्शन भारतीय स्वातंत्र्याच्या वेळी जगाने घेतलं. भारताला स्वातंत्र्य देताना इंग्रजांच्या मनात शत्रुत्वाची भावना नव्हती ते मित्र बनून इथून गेले. सत्तेचं हस्तांतरण अतिशय शांततेनं झालं.

सत्याग्रहाची तत्त्व व्यवस्थित सांभाळली गेली, सत्याग्रही शिस्तीचं काटेकोर पालन केलं तर कोणीही केलेला सत्याग्रह यशस्वीच होणार. तो गांधीजींनी केलेला चमत्कार नाही.

# ११. भारतातील सत्याग्रही लढे

आफ्रिकेतील सत्याग्रह यशस्वी करून विजयपताका खांद्यावर घेऊनच १९१५ च्या जानेवारीत महात्मा गांधी भारतात आले. आफ्रिकेतील अनुभव गाठी होताच. भारतात आल्या आल्या विविध क्षेत्रातील अन्याय निवारणासाठी गांधीजींनी सत्याग्रही लढे सुरू केले. ते लढे आणि त्यांचा परिणाम याविषयी माहिती घेऊ.

१. भारतात आल्या आल्या १९१५ सालीच त्यांनी जकातीच्या विरोधात वीरमगावला (गुजरात) सत्याग्रह केला.

**परिणाम** - जकात रद्द झाली.

२. निळीचा सत्याग्रह - चंपारणमधील नीळ पिकवणाऱ्या शेतकऱ्यांवरील अन्यायाच्या विरोधातील सत्याग्रह. चंपारण (बिहार) १९१७

**परिणाम** - यश. शेतकऱ्यांवरील अन्याय दूर झाला.

३. करारावर भारतीय मजुरांना आफ्रिकेत पाठवण्याच्या विरोधातील सत्याग्रह, मुंबई १९१७

**परिणाम** - यश. करारावर मजूर पाठवणं बंद झालं.

४. मिलमजुरांच्या मागण्यांसाठी केलेला सत्याग्रह. अहमदाबाद १९१७

**परिणाम** - यश. मालक व मजूर दोघांचंही समाधान करणारा समेट.

५. दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांवर लावण्यात आलेल्या वाढीव कराच्या विरोधातील सत्याग्रह. खेडा (गुजरात) १९१८

**परिणाम** - यश. करवाढ रद्द झाली.

६. रौलट कायद्याच्या विरोधातील देशव्यापी सत्याग्रह. १९१९

**परिणाम** - सत्याग्रह स्थगित. कारण लोकांनी हिंसा केली.

७. खिलाफतीच्या संदर्भातील अन्याय आणि जालियनवाला बागेतील हत्याकांड याच्या विरोधातील देशव्यापी सत्याग्रह. असहयोग आंदोलन १९२०

८. हरिजनांना मंदिर प्रवेश मिळावा यासाठी केलेला सत्याग्रह. वैयकम (केरळ) १९२४

**परिणाम** - यश. हरिजनांना प्रवेश मिळाला.

९. अत्याचारी गव्हर्नर नील याचा फोटो काढून टाकण्यासाठी केलेला सत्याग्रह. चेन्नई १९२७

**परिणाम** - यश. फोटो काढला गेला.

१०. करवाढीच्या विरोधात शेतकऱ्यांनी केलेला सत्याग्रह. बारडोली (गुजरात)

**परिणाम** - यश. करवाढ रद्द झाली.

११. मिठावरील कर आणि मिठावरील मक्तेदारी याच्या विरोधातील देशव्यापी मिठाचा सत्याग्रह. १९३०

**परिणाम** - आंशिक यश

व्हाइसराय आयर्विन आणि गांधीजी या दोघांमध्ये बरोबरीच्या नात्याने चर्चा झाली. हे यश. दोघांमध्ये जो करार झाला त्यात भारताच्या स्वातंत्र्याविषयी उल्लेख नसणे हे अपयश.

१२. ब्रिटिश शासनाने विभक्त मतदार संघाचा निर्णय घेतल्यावर गांधीजींनी आमरण उपवासाच्या स्वरूपातील सत्याग्रह सुरू केला. येरवडा जेल १९३२

**परिणाम** - यश. ब्रिटिश शासनाने विभक्त मतदासंघाचा निर्णय रद्द केला.

विभक्त मतदार संघाची मागणी आंबेडकरांची होती. त्यांनी आग्रह सोडला तरच ब्रिटिश शासन निर्णय रद्द करणार हे लक्षात घेऊन गांधीजींनी आंबेडकरांशी जेलमध्येच प्रदीर्घ

चर्चा केली. ब्रिटिश शासनाने दलितांना देऊ केलेल्या जागांपेक्षा जास्त जागा देऊ केल्या. आणि आंबेडकरांनीही आपला आग्रह सोडला. दोघांच्या चर्चेला यश मिळालं.

१३. शेतकऱ्यांवर लावलेल्या कराच्या विरोधातील सत्याग्रह सिरसी, सिद्धपूर (कर्नाटक) १९३५

**परिणाम** - यश. कर रद्द झाला.

१४. तिरंगी झंडा लावण्याला मनाई करणाऱ्या आदेशाच्या विरोधातील झेंडा सत्याग्रह. नागपूर १९२३

**परिणाम** - यश. मनाई मागे घेण्यात आली.

१५. महायुध्दाला भारताचा विरोध नोंदविण्यासाठी केलेला व्यक्तिगत सत्याग्रह १९४०

**परिणाम** - हा सत्याग्रह विशिष्ट मागणीसाठी नव्हता. दुसऱ्या महायुद्धाला विरोध नोंदवणं एवढाच सत्याग्रहाचा उद्देश्य होता. या सत्याग्रहाने विरोध व्यवस्थित नोंदवला गेला.

उद्दिष्टसिद्धी झाली. सत्याग्रह यशस्वी झाला.

१६. भारत छोडोचा देशव्यापी अंतिम सत्याग्रह १९४२

**परिणाम** - अभूतपूर्व यश. संपूर्ण स्वराज्य दृष्टिपथात आलं. १९४७ साली भारत स्वतंत्र झाला. अहिंसक सत्याग्रहामुळेच सत्तांतर शांततेत झालं. इंग्रजांनी मित्र बनूनच सत्ता सोडली.

# १२. लष्करातीलं शस्त्रं नकोत, शिस्त हवी

अहिंसक सत्याग्रही सैनिकाच्या हातात शस्त्र नकोत पण लष्करातील शिस्त हवी. हा विचार गांधीजींच्या मनात कायम असायचा. त्यांचे आश्रम विधायक संस्था असे अंहिंसक सैनिक घडवणाऱ्या पाठशाळाच होत्या. अशा पाठशाळातून गांधीजींना अभिप्रेत असणारे शूर, निर्भय, शिस्तीचे पालन करणारे अहिंसक सैनिक घडत होते. गांधीजी सांगत असलेली अहिंसा ही शूरांची अहिंसा होती. भित्रेपणाला तिथे थारा नव्हता. भित्रेपणा अहिंसेच्या आत दडवणं त्यांना कधीच मान्य नव्हतं. शौर्य, निर्भयता, काटकपणा, कणखरपणा, शिस्तपालन हे सत्याग्रही सैनिकाचे अनिवार्य गुण होते. या गुणांचे दर्शन प्रत्येक लढ्याच्या वेळी घडत होते. त्याचा उच्च कोटीचा प्रत्यय मिठाच्या सत्याग्रहाच्या वेळी धारासणा येथे आला. सत्याग्रही किनाऱ्यापासून समुद्राकडे निघाले होते. ब्रिटिश सैनिक वाटेत त्यांच्या डोक्यांवर लाठ्यांचा वर्षाव करत होते. ब्रिटिश सैनिकांच्या हातात शस्त्रे होती. हिंसक सैनिकांच्या रोमारोमात शिस्त भिनली होती. एवढ्यात फुटून पहिल्या तुकडीतील सत्याग्रही कोसळले की नियोजनाप्रमाणे दुसऱ्या तुकडीतील सत्याग्रह त्यांची जागा घेत होते. महिलांची तुकडी जखमी सत्याग्रहींना उचलून नेत होती. सगळे शिस्तीत चालू होते.

लष्करातील सैनिकांच्या हातात बंदुक असते. माझ्या सैनिकांच्या हातात चरखा असेल. हातात चरखा घेऊन शिस्तीत पावलं टाकणारी सत्याग्रहींची पलटण त्यांना बघायची होती. ते त्यांचं स्वप्न होतं. हे स्वप्न महिलाश्रमच्या विद्यार्थिनी साकार करतील असा त्यांचा विश्वास होता. महिलाश्रम हे गांधी-विनोबांचं मार्गदर्शन लाभलेली वर्ध्याची एक स्त्री शिक्षणसंस्था. सत्याग्रही घडवणारी एक पाठशाळा. शस्त्र नकोत पण शिस्त हवी या त्यांच्या विचाराप्रमाणे महिलाश्रमच्या विद्यार्थिनींची पलटण तयार व्हावी अशी त्यांची इच्छा होती. अशा विद्यार्थिनी घडवण्याची जबाबदारी त्यांनी माझ्या मातोश्री मालतीताई थत्ते यांच्यावर सोपवली. आश्चर्य म्हणजे या अहिंसेच्या पुजाऱ्याने मालतीताईंना पुण्याच्या महाराष्ट्र व्यायाम मंडळात शिकायला पाठवलं. तिथे

त्या डंबेल्स, लेझिम, लाठीकाठी हे तर शिकल्याच त्या बरोबरच भाला, जंबिया नेमबाजी याचेही शिक्षण घेतले. नियमबध्द पद्धतीने झेंडावंदनाचे संचालन आदेश देणे याचे धडेही गिरवले. आत्मबळाबरोबरच शारीरिक कणखरपणा, चपळता, शिस्त असे सारे गुण अहिंसक सैनिकांसाठीही आवश्यक आहेत असं त्यांच मत होतं. शिकून परत आल्यावर इतर जबाबदाऱ्यांबरोबरच व्यायाम शिक्षिकेची जबाबदारीही मालतीताईंना सोपवली गेली. ती त्यांनी यशस्वीपणे, पार पाडली. आश्रमच्या झेंडावंदनाचं संचालन तर त्या करतच होत्या. वर्धा शहरातील गांधी चौकातील झेंडावंदनाचे त्यांनी यशस्वीपणे संचालन केलं. माइकशिवाय साऱ्या गांधी चौकात त्यांचे आदेश स्पष्टपणे ऐकू येत. त्यांचे ते बुलंद आवाजातील आदेश वर्धा वासियांच्या कानात आजही घुमत असतात.

गांधीजींनी मालतीताईंविषयी बाळगलेला विश्वास सार्थ ठरला. महिलाश्रमच्या विद्यार्थिनी महिलाश्रमापासून गांधी चौकापर्यंत (अंतर अंदाजे २ किमी) ३-३ च्या ओळीत शिस्तीत पावलं टाकत जायच्या. कधी-कधी विद्यार्थिनी सामूहिक कताईसाठी गांधी चौकात जायच्या. त्यावेळी गांधीजींचं स्वप्न साकार झालेलं पहायला मिळे. रस्त्यावर सर्वांची शिस्तबध्द पावलं पडायची. सर्वांचे चरखे एकाच हातात असायचे. काही अंतर चालून गेल्यावर मालतीताई 'हात बदल' असा आदेश द्यायच्या. आणि शिटी वाजली की सर्वांचे एका हातातील चरखे दुसऱ्या हातात जायचे. शस्त्राशिवायची शिस्त पाहून गांधीजी आनंदित झाले. स्वप्न साकार झालेलं पाहून त्यांना पराकोटीचं समाधान झालं. मालतीताईंना आणि विद्यार्थिनींना त्यांनी शाबासकी दिली.

एकदा आझाद हिंद सेनेचे कॅप्टन शाहनवाज वर्ध्याला आले होते. चरखे हातात घेऊन शिस्तीत पावलं टाकणारी विद्यार्थिनींची पलटण त्यांनी पाहिली. लष्करी शिस्तीत घडलेले शाहनवाज थक्क झाले. हे कोण शिकवतं त्यांनी चौकशी केली. मालतीताईंना बोलावून घेतलं. त्यांच्या पाठीवर कौतुकाची थाप मारली. ही थाप आणि गांधीजींची शाबासकी त्यांच्यासाठी लाख

मोलाचा पुरस्कार होता. गांधीजींचं स्वप्न आपण साकार केलं हे समाधान त्यापेक्षा ही जास्त मूल्यवान होतं.

# १३. एक कुशल संवादक

लोकांचं नेतृत्व करणाऱ्याला आपले विचार, आपलं उद्दिषट, ते गाठण्यासाठी वापरायची साधनं आणि मार्ग हे सर्व लोकांपर्यंत पोचवणं गरजेचं असतं. गांधीजींचं उद्दिष्ट होतं अन्यायाचा प्रतिकार. साधन होतं अहिंसक सत्याग्रह. पारतंत्र्य हा गुलाम राष्ट्रांवर लादलेला फार मोठा अन्याय. त्यामुळे भारतात आल्यावर स्वात्र्यप्राप्ती हे त्यांचं उद्दिष्ट झालं. आपल्या अभिनव साधनाचा प्रयोग करूनच त्यांनी आफ्रिकेत आणि भारतात यश मिळवलं. अहिंसक सत्याग्रहाच्या मार्गाने अन्यायाचा प्रतिकार शक्य आहे. अशी कल्पनाही कोणी केली नव्हती. गांधीजींनी कल्पनाही केली आणि ती प्रत्यक्षात साकारही केली. लोकसहभागाशिवाय उद्दिष्टप्राप्ती अशक्यच होती. सहभाग मिळवण्यासाठी आपलं अभिनव साधन लोकांना समजावून सांगणं गरजेचं होतं. लोक या साधनाविषयी पूर्णपणे अनभिज्ञ होते. लोकांना ते समजावून सांगणं. त्याचं तात्विक विवेचन विश्लेषण लोकांपर्यंत पोचवणं गरजेचं होतं. त्यासाठी जनतेशी संवाद आवश्यक होता. संवादाची सर्वविदित साधने आहेत कथन आणि लेखन. ही साधने तर गांधीजींनी वापरलीच त्याच बरोबर कल्पनाही करता येणार नाही अशा विविध साधनांनी लोकांशी संवाद साधला आणि एक उत्कृष्ट संवादक झाले.

बोलून संवाद साधणे हे संवादाचं सर्वात सुलभ साधन. पण गांधीजींसाठी ते सुलभ नव्हतं. मुळात गांधीजी अत्यंत मुखदुर्बळ. वकील म्हणून कोर्टात बाजू मांडतांना ते गर्भगळित होत. पण पुढे जाता आपले विचार लोकांपर्यंत पोचवण्यासाठी अहिंसक सत्याग्रहाविषयी लोकांन कळावं यासाठी ते  बोलू लागले. ते सभा गाजवणारे वक्ता कधीच झाले नाहीत. पण प्रभावी वक्ता नक्कीच झाले. अन्याय, अत्याचार पीडित दुर्बलांच्या कळकळी पोटी त्यांचं भलं करण्याच्या तळमळीपोटी त्यांच्या मुखातून बाहेर पडणारे शब्द त्यांच्या हृदयातून उमटलेले असत. त्यात मोठमोठ्या शब्दांची पेरणी नसे. विद्वत्तेचं प्रदर्शन नसे. आवाजही अत्यंत प्रभावहीन. वक्तृत्वाचा

प्रभाव पडेल असं काहीच त्यात नसायचं. तरीही हृदयातून उमटलेले ते शब्द लोकांच्या हृदयाला भिडत आणि लोकांवर प्रभाव पडे.

काँग्रेसच्या बैठकांमध्ये केलेली मांडणी, भेटायला आलेल्यांशी बोलणं, प्रसार माध्यमांच्या प्रतिनिधींना दिलेल्या मुलाखती वेगवेगळ्या प्रसंगी दिलेली व्याख्याने, प्रार्थनेनंतरची प्रवचने या सगळ्यातून त्यांनी लोकांशी संवाद साधला. प्रार्थनेनंतरची प्रवचने ऐकायला मोठा जनसमूह उपस्थित असायचा.

लिखित संवादासाठी आफ्रिकेत इंडियन ओपिनियन आणि भारतात 'यंग इंडिया', 'नवजीवन' आणि 'हरिजन' यातील लेखातून त्यांनी संवाद साधला. आफ्रिकेतील स्थिती भारतातील लोकांना कळावी यासाठी 'हिरवं पत्रक' प्रकाशित केलं. हिंद स्वराज, आत्मकथा, मंगल प्रभात, स्चनात्मक कार्यक्रम या पुस्तकांद्वारे ही त्यांनी संवाद साधला. त्यांना पत्रे येत. त्यांना आलेलं एकही पत्र अनुत्तरित राहात नसे. पत्रलेखन हेही संवादाचं माध्यम त्यांनी प्रभावीपणे हाताळलं.

गांधीजींचं बोलणं आणि लिहिणं अतिशय संयमित असे. शब्दांचा वापर विचारपूर्वक करत. या संदर्भात गांधीजी स्वतः म्हणतात, "मैं अपने आपको यह प्रमाणपत्र दे सकता हूँ कि मेरी कलम से या जबान से बिना सोचे समझे या तौले शायद ही कोई शब्द कभी निकला हो। मुझे याद नहीं पड़ता कि अपने भाषण या लेख के किसी अंश के लिए मुझे कभी लज्जित होना पड़ा हो या पछताना पड़ा हो।"

या परंपरागत संवाद साधनांशिवाय विविध प्रसंगी त्यांनी केलेल्या यात्राही संवादाचं उत्कृष्ट माध्यम ठरल्या. विशेषतः मिठाच्या सत्याग्रहाच्या वेळची साबरमती ते दांडीपर्यंतची पदयात्रा. त्यांची व्याख्यानं, त्यांचे लेख यांच्यापेक्षाही या यात्रेने सामान्य अशिक्षित लोकांपर्यंत योग्य संदेश पोचवला. नोआखालीच्या यात्रेने ही त्यांनी संवाद साधला.

वेळीवेळी त्यांनी केलेल्या उपवासांनी ही संवाद साधण्याचं काम केलं. हिंदु-मुस्लिम दंगे शांत करण्यासाठी केलेले उपवास उदाहरणार्थ १९२४ चा दिल्लीला केलेला उपवास, १९४७ चा कलकत्याचा उपवास. विभक्त मतदारसंघाच्या विरोधात ६९३२ साली केलेला उपवास. या उपवासाच्या वेळो ते येरवड्याच्या कारागृहात होते. भाषण व लेखन यापेक्षा ही चांगला संवाद या उपवासाने साधला.

त्यांचा पोशाख न बोलता संवाद साधत असे. ‘मी तुमच्या सारखाच एक अतिसामान्य भारतीय आहे.' या बोललेल्या वाक्यापेक्षाही त्यांचा पोशाक हा आशय लोकांपर्यंत प्रभावीपणे पोचवत असे.

आशा तऱ्हेने परंपरागत आणि अभिनव संवाद साधने वापरून गांधीजींनी आपले विचार केवळ देशातच नव्हे तर जगात पोचवले.

# १४. रचनात्मक कार्यक्रमाची गरज

स्वातंत्र्योत्तर सात दशकांच्या वाटचाली नंतरचं देशाचं वास्तव चित्र खूप खूप दाहक आहे. खिन्न करणारं आहे. ह्या दाहक वास्तवाचे चटके ज्यांना बसताहेत त्यांनी हे वास्तव बदलायला हवं असं प्रकर्षानं वाटतंय. काही लोकांना मात्र ह्या वास्तवाचे चटके न बसता ऊब मिळतेय. राजकीय, आर्थिक व सामाजिक दृष्ट्या उच्चपदी विराजमान असलेले लोक आजच्या व्यवस्थेतून लाभ उठवताहेत. पण गंमत अशी की त्या मूठभर लोकांनाही आजचं वास्तव बदलायला हवं असंच वाटतंय. कारण त्यांना मिळणारी ऊब ही आभासी आहे. ऊबेचं चटक्यात रूपांतर व्हायला वेळ लागणारं नाही ह्याचं भान त्यांनाही येतंय. (ह्या व्यवस्थेनं सर्वांचच जीवन असुरक्षित केलं आहे. दहशतीचं ओझं शिरावर घेऊनच हा वरचा थरही जगतोय.)

स्वातंत्र्यानंतरच्या ७० वर्षात भारताने खूप प्रगती केली ती नाकारता येणार नाही. तरीही भारताचं आजचं चित्र भूषणावह नाही. आजचा भारत म्हणजे गुन्हेगारीकरणाच्या चक्रव्युहात सापडलेला, भ्रष्टाचारानं पोखरलेला, राष्ट्रीय अस्मिता गमावून बसलेला, धर्मांधतेच्या विळख्यात अडकलेला. चंगळवादाच्या भोवऱ्यात अडकलेला, दारिद्र्याने गांजलेला देश! एका बाजूला पंचतारांकीत हॉटेल तर दुसऱ्या बाजूला कुपोषणाचे बळी. एका बाजूला आलिशान बंगले व फार्महाउसेस तर दुसऱ्या बाजूला फुटपाथवर आपला संसार थाटणारी कुटुंबे. स्वातंत्र्यानंतर भौतिक प्रगती खूप झाली पण विषमतेची दरी रुंदावतच गेली. कारण माणूस आपलं माणूसपण विसरला. नैतिक मूल्य खुंटीवर टांगूनच आज सारे व्यवहार होतांना दिसताहेत. राजकारणालाही नैतिक अधिष्ठान देणाऱ्या महात्मा गांधींच्या देशातील हे नैतिक अध:पतन दुर्दैवी आहे.

आजचं सर्वांना नकोसं झालेलं वास्तव बदलायचं असेल तर झालेल्या चुका शोधून नवी रचना उभारावी लागेल. सुवर्ण महोत्सवी वर्षातील गांधीजयंतीचं निमित्त साधून गांधीविचारांचा मागोवा घेतल्यास चुकांचा शोध घेऊन पुनर्रचना करण्यासाठी मार्गदर्शन मिळू शकेल.

महात्मा गांधींचं स्वप्न होतं समाजातल्या अगदी शेवटच्या स्थानावर असलेल्यांचे अश्रू पुसण्याचं. मृत्युच्या आदल्या रात्री त्यांनी आपले विचार व्यक्त करणारा एक लेख लिहिला होता. त्यात ते म्हणतात की १५ ऑगस्ट ला मिळालेलं स्वातंत्र्य फक्त राजकीय आहे. भारतातील सात लाख खेड्यांच्या संदर्भात सामाजिक, नैतिक व आर्थिक स्वातंत्र्य आपल्याला अजून मिळवायचं आहे. इहलोकीची यात्रा संपविण्यापूर्वीच त्यांनी दिलेला इशारा आपण पूर्णपणे विसरलो. गांधीजींच्या दृष्टीने राजकीय स्वातंत्र्य हे अंतिम ध्येय कधीच नव्हते. त्यांच्या दृष्टीने स्वातंत्र्य साधन होतं, साध्य नव्हतं. समतेवर आधारलेला, बंधुभावाने पुष्ट झालेला देश त्यांना उभारायचा होता. ह्या देशातील प्रत्येक व्यक्ती सन्मानाने जीवन जगू शकेल, प्रत्येकाच्या हातांना काम देता येईल असा देश त्यांना उभारायचा होता. शोषणविहीन समाजरचना त्यांचे ध्येय होते. श्रीमंताच्या उच्यवर्णियांच्या तोंडाकडे आशाळभूतपणे पाहणारा ग्रामवासी त्यांना नको होता. स्वयंपूर्ण आत्मनिर्भर खेड्यांमध्ये ताठ मानेने जगणारा ग्रामवासी त्यांना हवा होता. त्यासांठी त्यांना घडवायचा होता आत्मनिर्भर खेड्यांचा आत्मनिर्भर देश. हे सर्व साध्य करण्याची पहिली पायरी होती स्वातंत्र्य. त्यांच्या दृष्टीने स्वातंत्र्य हे साधन होतं. आपण भरून पावलो. ह्या देशाच्या प्रगतीसाठी अंतिम उद्दिष्टापर्यंत पोहोचण्यासाठी अजून खूप काही करायचं बाकी आहे. हे विसरूनच गेलो.

गांधीजी म्हणाले होते की स्वातंत्र्य मिळाल्यानंतर जर शोषण चालूच राहिलं तर मला ह्या देशातील जमीनदार आणि अभिजनवर्गाच्या शोषणाविरुद्ध लढा उभारावा लागेल, दुर्दैवाने ह्या लढ्याचं नेतृत्व करायला गांधीजी आपल्यात राहिले नाहीत. परंतु त्यांचा विचारधनाचा वारसा आपल्यापाशी आहे. डोकं उडवल्यानं डोक्यातील विचार संपतील आशा भ्रामक समजुतीत काही लोकं असतात. परंतु माणूस संपवल्याने विचार संपत नाहीत ते पुढील पिढ्यांना मार्गदर्शन करतच राहतात. हे ऐतिहासिक सत्य आहे. गांधीजी आज नाहीत. तरीही त्यांच्या विचारांचा

वारसा आहे. तो कोणी हिरावून घेऊ शकत नाही. त्या विचारधनाचा आपण डोळसपणे उपयोग करायला हवा.

देशाच्या स्वातंत्र्यासाठी तन, मन, धन अर्पण करणं जितकं महत्वाचं आहे तितकंच देश उभारणीसाठी रचनात्मक कार्यामध्ये स्वतःला झोकून देणंही महत्वाचं आहे ह्याचं गांधीजींना भान होतं. गांधीजींनी स्वातंत्र्यासाठी अनेक लढे उभारले. दोन लढ्यांच्या मधल्या काळात त्यांचे अनुयायी रचनात्मक कार्यात आपली सर्व शक्ती खर्च करीत. महात्मा गांधीकडे ह्या देशाच्या स्वातंत्र्य लढ्याचं नेतृत्व येण्यापूर्वी आधी सामाजिक की आधी राजकीय असे वाद इथे होते. पण त्यानंतर हे वादच संपले. राजकीय, सामाजिक, आर्थिक सर्व लढे एकाच वेळी लढायला हवेत ही दूरदृष्टी गांधीजीपाशी होती. आणि म्हणूनच त्यांनी रचनात्मक (विधायक) कार्यक्रमाची जोड स्वातंत्र्य चळवळीला दिली. १९४१ मध्ये 'रचनात्मक कार्यक्रम : उनका रहस्य और स्थान' ह्या नावाने एक पुस्तिका लिहून रचनात्मक कार्यक्रमाचं त्यांनी विवरण केलं आहे. ह्या पुस्तिकेत चौदा कार्यक्रम सुचविले होते. पुढे १९४५ मधील दुसऱ्या आवृत्तीत आणखी चार कार्यक्रमांची भर त्यांनी घातली. गांधीजींनी पुढील रचनात्मक कार्यक्रम सुचविले आहेत. कौमी एकता, अस्पृश्यता निवारण, दारूबंदी, खादी, इतर ग्रामोद्योग, गावाची स्वच्छता, मूलोद्योगी शिक्षण, प्रौढ शिक्षण, स्त्रियांचे शिक्षण व प्रश्न, आरोग्यशिक्षण, प्रांतीय भाषा, राष्ट्रभाषा, आर्थिक समानता, शेतकरी, मजूर, आदिवासी, कुष्टरुग्ण, विद्यार्थी ह्या कार्यक्रमांच्या यादीवरून आपण नजर फिरविली तर देश उभारणीसाठी ज्या-ज्या क्षेत्रात काम करण्याची गरज आहे त्या सर्व क्षेत्रांचा समावेश ह्या कार्यक्रमांमध्ये केलेला आढळेल. सामाजिक, आर्थिक, राजकीय, शैक्षणिक आरोग्यविषयक इत्यादि क्षेत्रत आज भारताला भेडसावणाऱ्या प्रश्नांचा त्यांत समावेश आहे. स्वातंत्र्योत्तर ७० वर्षाच्या वाटचालीनंतर ही ह्या यादीतील एकही कार्यक्रम पूर्ण झालेला दिसत नाही. प्रौढ शिक्षणाचा कार्यक्रम तर ५० वर्षानंतर ह्या यादीतून वगळला जायला हवा होता पण आजही प्रौढ शिक्षण, साक्षरता अभियान असे कार्यक्रम राबविण्याची गरज आहेच.

गांधीजींच्या रचनात्मक कार्यक्रमाकडे दुर्लक्ष झाले. विकेंद्रित अर्थव्यवस्था, विकेंद्रित राजसत्ता ह्या मूलभूत विचारांकडे दुर्लक्ष झाले. नियोजनबद्ध विकासातून आपण भांडवल प्रधान मोठे उद्योग उभारले. सर्वच बाबतीत केंद्रीकरणाची कास धरली. विकासाचा संबोध पाश्चात्यांकडून आयात केला. त्यातून चंगळवाद बोकाळाला. नैतिकता लयाला गेली. पैशाला देव्हाऱ्यात बसवून त्याची पूजा बांधण्यात सर्व मग्न झाले. माणुसकी बापुडवाणी झाली. ह्या सर्व परिस्थितीमुळे गांधीजींनी दिलेल्या रचनात्मक कार्यक्रमाच्या यादीतून कार्यक्रम वगळण्याऐवजी अनेक कार्यक्रमाची आज भरच घालावी लागणार आहे. उदा. पर्यावरण रक्षण अंधश्रध्दा निर्मूलन, पाण्याचे योग्य नियोजन, झोपडपट्ट्यांचे निर्मूलन इत्यादी. काही कार्यक्रमांची व्याप्ती वाढवायला हवी. जसे दारूबंदी. आज केवळ दारूबंदी म्हणणे पुरेसे नाही. दारुपेक्षाही भयंकर मादक पदार्थांच्या आहारी आज सपाट्याने भारतीय समाज जातोय. सर्वच मादक पदार्थांवर बंदी असे त्याचे स्वरूप आज ठेवावे लागेल. गांधीरजींनी दिलेली यादी परिपूर्ण आहे असे ते स्वतःही मानत नाहीत.

(१९४५ सालातील आवृत्तीच्या प्रस्तावनेत गांधीजी म्हणतात, “मी सुचविलेली यादी पूर्ण आहे असा माझा दावा नाही. वाचकांना स्वराज्याच्या रचनेसाठी इतर काही कार्यक्रम महत्वाचे वाटत असतील तर ते ह्या यादीत भर घालू शकतात.” गांधीजी म्हणतात की सर्व अर्थ सामावलेल्या संपूर्ण स्वातंत्र्याची प्राप्ती रचनात्मक कार्यक्रमातूनव होऊ शकते. सर्व अर्थ सामावलेले संपूर्ण स्वातंत्र्य हे शब्द इथे महत्वाचे आहेत. ७ लाख खेड्यांच्या संदर्भातील आर्थिक, राजकीय, सामाजिक, नैतिक स्वातंत्र्य व शोषणविरहित समाजव्यवस्था ह्या शब्दांमधून गांधीजी सुचवतात.)

सर्वांना नकोशी झालेली आजची व्यवस्था बदलून सर्वांना समानतेने वागवणारी शांततापूर्ण, ,सहअस्तित्वाची संधी देणारी नवी रचना निर्माण करण्यासाठी गांधीरजींचे विचार समजून त्यांनी सांगितलेले रचनात्मक कार्यक्रम राबवणं आज गरजेचं आहे. अन्यथा देशाची

घसरण थांबणं कठिण आहे. आपण गांधीजींचे देव्हारे माजवतो व विचारांबद्दल उसादीन राहतो. आज पाश्चात्य राष्ट्रात गांधीविचारांबद्दल आस्था वाढते आहे. ते विचार तिकडून आयात झाले तर इम्पोर्टेड असल्याने आपण ते कवटाळू, तशी दुर्दैवी वेळ येऊ नये.

देश उभारणीसाठी रचनात्मक कार्यक्रमाचं महत्व समजून घ्यायला हवं. सर्व बाबतीत सरकारवर अवलंबून राहणं योग्य नाही. गांधीजींनी सामान्य माणसांचा अभिक्रम जागवून स्वातंत्र्य आंदोलन यशस्वी केलं. स्वराज्याचं सुराज्य करण्यासाठीही जनतेनं कृतिशील व्हायला हवं. प्रत्येकाने विविध रचनात्मक कार्यक्रमापैकी आवडीचं क्षेत्र निवडावं आणि सुवर्णजयंती वर्षातील गांधीजयंतीचं औचित्य साधून देश व समाजाशी बांधील राहून कार्यारंभ करावा हेच राष्ट्रपित्याला खरे अभिवादन ठरेल.

# १५. राष्ट्रीय एकात्मता

गांधीजींनी ना राष्ट्रीय एकात्मतेवर मोठमोठे लेख लिहिले ना व्याख्यानं दिली. राष्ट्रीय एकात्मता त्यांनी जीवनाच्या प्रत्येक कृतीतून साधली. त्यांनी कायम संपूर्ण भारत कवेत घेतला. ते १९१५ साली आफ्रिकेतून भारतात आले. १९१७ साली त्यांनी नीळ पिकवणाऱ्या शेतकऱ्यांवरील अन्यायाच्या विरोधात सत्याग्रह केला. चंपारणचा सत्याग्रह या नावाने तो ओळखला जातो.

१९१७ सालीच अहमदाबादच्या मिल मजुरांच्या मागण्यांसाठी त्यांनी सत्याग्रह केला. १९२० साली देशव्यापी असहयोग आंदोलनाचं नेतृत्व केलं. १९३४ साली हरिजनांना मंदिर प्रवेश मिळावा यासाठी केलेला वैयकमचा सत्याग्रह. या प्रारंभीच्या काही सत्याग्रही लढ्यातून गांधीजींच्या कार्यातील राष्ट्रीय एकात्मता ठळकपणे प्रकट होते. चंपारण आहे हिमालयाच्या पायथ्याशी. अहमदाबाद आहे भारताच्या मध्यावर, पश्चिमेकडे, तर वैयकम आहे केरळ राज्यात, दक्षिण भारतात. शिवाय देशव्यापी असहयोग आंदोलन.

राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या दृष्टीने, राष्ट्रीचा विकास साधण्यासाठी एकात्मता अत्यंत महत्वाची आहे. स्वातंत्र्य मिळून सत्तर वर्ष उलटून गेली तरी आपण एकात्मता साधू शकलो नाही. विघटनवादी प्रवृत्ती दिवसेंदिवस बळावताहेत. जातीजातीचे भेद, भाषाभेद, प्रांतभेद अधिक तीव्र होताहेत. अशा विघटनशील परिस्थितीत देश प्रगती करू शकत नाही. एकात्मतेच्या दृष्टीने गांधीजींचे कार्य मार्गदर्शक ठरू शकेल.

माझा गुजरात, माझी गुजराती भाषा असा विचार त्यांनी कधीच केला नाही. एकात्मता साधण्यासाठी भाषा महत्वपूर्ण भूमिका बजावते ह्याची त्यांना जाणीव होती. भारतात अनेक प्रगत भाषा आहेत. बोलीभाषा तर मोजदाद करण्याच्या पलिकडच्या आहेत. ही विविधता असतांनाही सर्व भारताची जर एक राष्ट्रभाषा असेल तर राष्ट्रीय एकात्मतेला ते मदतरूप ठरेल. गांधीजींनी

राष्ट्रभाषेच्या रूपात हिंदी प्रचाराचे कायम काम केले. त्यांच्याच प्रेरणेने वर्ध्याला ४ जुलै १९३६ साली राष्ट्रभाषा प्रचार समितीची स्थापना झाली. दक्षिणेत हिंदी भाषा प्रचार सभा स्थापन झाली. हिंदीच्या प्रचारासाठी स्वतःच्या धाकट्या मुलाला तिथे पाठवलं.

गांधीजींच्या पूर्वी काँग्रेसचं कामकाज इंग्रजीत चालत असे. गांधी म्हणत स्वराज्याची आकांक्षा जर कोट्यावधी भारतीयांच्या मनात निर्माण करायची असेल तर कामकाज हिंदीतच व्हायला हवे.

हिंदु-मुस्लिम तेढ ही एकात्मतेतील फार मोठा अडसर होती. या दोन धर्मांमध्ये ऐक्य साधण्याचा गांधीजींनी कायमच प्रयत्न केला. असे ऐक्य साधल्याशिवाय स्वातंत्र्य आंदोलन बलशाली होणार नाही. स्वातंत्र्य मिळणे अवघड होईल आणि भारताची प्रगती ही होणार नाही. ही गोष्ट इथल्या सगळ्याच जाणत्या पुढाऱ्यांनी ओळखली होती. गांधीजींच्या पूर्वी टिळकांच्या नेतृत्वाखाली मुस्लिमांना संख्येपेक्षा जास्त प्रतिनिधी देणारा करारही झाला होता. गांधीजींनी करार-मदार, नियम, कायदे यावर कधीच भर दिला नाही. त्यांन भावनिक ऐक्य महत्वाचे वाटत होते. म्हणून हिंदु मुस्लिमातील बंधुत्व आणि आपलेपणा वाटण्याचा त्यांनी सातत्याने प्रयत्न केला. त्यांनी सांगितलेल्या एकादशव्रतांमध्ये 'सर्व धर्मी समानत्व' हे व्रत दाखल केलं.

दोन धर्मातील ऐक्य टिकवण्यासाठी त्यांनी आपले प्राणही पणाला लावले आहेत. गांधीजींनी आपल्या जीवनात बरेचदा उपवास केले आहेत. त्यातील बरेच उपवास राष्ट्रीय एकात्मतेसाठीच होते. जातीधर्मात सलोखा टिकवण्यासाठीच होते. १९२४ चा उपवास आणि मृत्युपूर्वीचा उपवास धार्मिक सलोख्यासाठीच होता.

जातिभेद हाही राष्ट्रीय एकात्मतेच्या दृष्टीने मोठा अडसर होता. हरिजनांचा  स्पर्श ही निषिध्द मानला जायचा. अस्पृश्यांना मुख्य प्रवाहात आणणे गांधीजींना खूपर गरजेचे वाटत होते. त्यासाठी त्यांनी कार्य सुरू केलं. संडास सफाईसारखी अस्पृश्यांच्या माथी मारलेली कामे

सवर्णींनी करावी असा आग्रह धरला. आश्रमातील उच्चवर्णियांनी त्याला योग्य प्रतिसाद दिला. विनोबा, त्यांचे भाऊ बाळकोबा, अप्पासाहेब पटवर्धन अशा अनेकांनी ती कामे करायला सुरुवात केली. अस्पृश्यांना वेगळं पाडणाऱ्या विभक्त मतदार संघाच्या विरोधात त्यांनी आमरण उपोषण केलं. संयुक्त मतदारसंघ मान्य व्हावा यासाठी अस्पृश्यांना जास्त जागा देऊ केल्या. हरिजनाच्या प्रश्नावर जनजागृती करण्यासाठी ते १ वर्ष साऱ्या भारतात फिरले. हरिजन कार्यासाठी फंड गोळा केला. त्यांचे आश्रम म्हणजे राष्ट्रीय एकात्मतेचा वस्तुपाठच. जातीभेद, धर्मभेद, भाषाभेद, आर्थिक भेद, प्रांतभेद सर्व विसरून आश्रमात सर्व एका कुटुंबाप्रमाणे प्रेमाने राहात.

गांधीजींचे जीवन आणि कार्य यातून त्यांचे राष्ट्रीय एकात्मतेचे प्रयत्न याचे स्पष्ट दर्शन घडते.

# १६. व्रतविचार

एखादी व्यवस्था जेव्हा भ्रष्ट होते तेव्हा अन्याय, अत्याचार, शोषणाचं थैमान सुरू होतं. व्यवस्था परिवर्तनाचे प्रयत्न सुरू होतात. व्यवस्था बदलली की शोषणमुक्ती होईल. हा आशावाद त्यामागे असतो. परंतु व्यवस्था परिवर्तन अपुरं ठरतं. त्याबरोबरच माणूस बदलण्याकडे व्यक्तिपरिवर्तनाकडे लक्ष दिलं तरच शोषण मुक्ती होऊ शकते. गांधीजींचा भर माणूस बदलण्यावर होता. समतेचे विचार, शोषणमुक्त समाज निर्माण करण्याची गरज माणसाच्या मनात रुजवूनच शोषणमुक्ती शक्य आहे. व्यवस्थापरिवर्तनासाठी ते रचनात्मक कार्यक्रम देतात आणि व्यक्तिपरिवर्तनसाठी ते व्रतविचार सांगतात.

व्रतविचार आपल्याला नवा नाही. आपल्या परंपरेने आध्यात्मिक जीवनासाठी, मुमुक्षूंसाठी व्रतपालन सांगितलं आहे. गांधीजींनी संसारी जीवन जगणाऱ्यांसाठीही व्रतपालन आवश्यक मानलं आहे. गांधीजींनी दिलेला हा सर्वथा मौलिक विचार आहे. परंपरेने दिलेल्या ५ व्रतांमध्ये ६ व्रतांची भर घालून त्यांनी ११ व्रते सांगितली. ही एकादश व्रतं या नावाने ओळखली जातात. ही ११ व्रतं आचार्य विनोबांनी एका श्लोकात गुंफली आहेत. तो श्लोक असा -

**अहिंसा सत्य अस्तेय ब्रह्मचर्य असंग्रह**
**शरीरश्रम अस्वाद सर्वत्र भयवर्जन।**
**सर्वधर्मी समानत्व स्वदेशी स्पर्शभावना।**
**ही एकादश सेवावी नम्रत्वे व्रतनिश्चये।।**

या श्लोकाचा आश्रमातील सकाळ संध्याकाळच्या प्रार्थनेत नित्य पाठ होतो. आश्रमवासी शोषणरहित, समताधिष्ठित अहिंसक समाजनिर्मितीचे अग्रदूत व्हावेत अशी त्यांची इच्छा होती. त्यासाठी व्रतपालन गरजेचं आहे असं गांधीजी म्हणत. वरील श्लोकातील पहिली ५ व्रतं आपल्या परंपरेने सांगितलेलीच आहेत. गांधीजींनी कायमच परंपरेच्या पायावर परिवर्तनाची इमारत उभी

केली आहे. गांधीजींनी एकूण ११ व्रतं सांगितली आहेत. वाढलेल्या व्रतांमध्ये काही व्रतं माणसाच्या आर्थिक जीवनाशी संबंधित आहेत तर काही सामाजिक जीवनाशी संबंधित आहे. जुन्या ५ व्रतांमध्येही त्यांनी नवीन आशय भरला. ही सर्व व्रतं परस्परावलंबी आहेत.

## आधारभूत व्रतं

अहिंसा, सत्य आणि भयवर्जन (निर्भयता) ही तीन व्रतं इतर सर्व व्रतांचा आधार आहेत. सत्य व अहिंसा परस्पर पूरक आहेत. अहिंसेशिवाय सत्य टिकू शकत नाही. आणि सत्य व अहिंसेच्या पालनासाठी निर्भयता आवश्यक आहे. गांधीजींच्या 'मंगल प्रभात' या पुस्तकाच्या आधारे एकादशव्रतांचा त्यांना अभिप्रेत असलेला अर्थ पाहू.

## सत्य

सत्य हा शब्द सत् या शब्दापासून तयार झाला आहे. सत् म्हणजे असणे, अस्तित्व. सत्याशिवाय इतर कशालाच अस्तित्व नाही. सत्य म्हणजेच ईश्वर. खरे बोलणे, खोटे न बोलणे एवढा संकुचित अर्थ सत्य ह्या व्रताचा नाही. गांधीजींनी ते व्रत अधिक व्यापक केलं. विचार, आचार आणि उच्चार या तीनही बाबतीत सत्याचे पालन आवश्यक आहे. जीवनात कुठेच असत्य नसावं. संपूर्ण जीवनभर सत्याची आराधना व्हावी. सेवाग्रामच्या बापू कुटीमध्ये सूक्ष्म असत्य या शीर्षकाची एक फ्रेम लावलेली आहे. त्यात जॉन रस्किन म्हणतो "असत्य केवळ वाणीनेच व्यक्त होत नाही, चेहऱ्यावरील हावभावाने नजरेच्या कटाक्षानेही ते व्यक्त होतं. सत्य व्रताचं पालन म्हणजे या सर्व असत्यापासून दूर राहणे."

## अहिंसा

गांधीजींनी अहिंसा व्रतात नवा आशय भरला. पूर्वीच्या व्रतातील अहिंसा मोक्ष प्राप्तीचं साधन होतं. गांधीजींनी पूर्वीची शांतीसाधक अहिंसा क्रांतीसाधक बनवली. ते म्हणतात, अहिंसा अन्याय, अत्याचार यांचा प्रतिकार करण्याचं साधन आहे. गांधीजी कधीच विचाराच्या पातळीवर

जगले नाहीत. विचाराप्रमाणे आचार हे त्यांचं ठळक वैशिष्ट्य. त्यांनी आपल्या जीवनात सामूहिक पातळीवर त्या साधनाचा यशस्वी प्रयोग केला. त्यांच्या मते वाईट विचार, असत्य भाषण, इतरांच्या गरजेच्या वस्तूंचा आपल्याजवळ संग्रह करणे ही सर्व हिंसेचीच रूपे आहेत. हा सर्व व्यापक अर्थ लक्षात घेऊन अहिंसा व्रताचं पालन व्हावं.

**सर्वत्र भयवर्जन (निर्भयता)**

इथे सर्वत्र हा शब्द लक्षणीय आहे. कधीही, कुठेही, कोणत्याही परिस्थितीत, कुठल्याही व्यक्तिमुळे भयभीत न होणे. एकादश व्रतातील कुठल्याही व्रताचं पालन निर्भयतेशिवाय होऊ शकत नाही. निर्भयता मनाची अवस्था आहे. ती अवस्था प्राप्त करणं महत्वाचं. गांधीजी म्हणतात हातात बंदुक घेऊन माणूस निर्भय होत नाही. हाती शस्त्र घेणं हे भित्र्या माणसाचं लक्षण आहे. गोळ्यांच्या माऱ्यासमोर हाती शस्त्र न घेता उभं राहणं ही खरी निर्भयता. अहिंसा हे शूरांचं लक्षण आहे. भारतीय स्वातंत्र्य लढ्यासाठी निर्भय सैनिकांची फौजच गांधीजींनी तयार केली होती.

चंगळवादाला प्रोत्साहन देणाऱ्या आजच्या भांडवलशाही अर्थव्यवस्थेचा मूलमंत्र आहे अधिक नफा कमावणे, त्यासाठी अधिक उत्पादन आणि अधिक उपभोग. परिणामतः पृथ्वीचे कंगालीकरण, पर्यावरणाचा विनाश, प्रदूषण इत्यार्दीची एक संकटमालिका. अस्तेय, अस्वाद आणि असंग्रह ही ३ व्रतं उपभोगावर मर्यादा घालण्याची शिकवण देतात. त्यामुळे उत्पादनावरही मर्यादा येणार आणि संकटापासून मुक्ती मिळणार.

**अस्तेय**

अस्तेय म्हणजे चोरी न करणं. एकादश व्रतातील अस्तेय व्रत गांधीजींनी खूप व्यापक केलंय. ते म्हणतात गरज नसतांना संग्रह करून ठेवणं म्हणजे चोरीच. कारण त्यामुळे गरजवंतांची गरजेची वस्तु चोरली जाते. श्रम न करता अर्जित केलेली संपत्ती म्हणजे चोरीच. येथे श्रमिकांचे श्रम चोरले जातात. समाजात विषमता असली की शोषण आणि चोरीची शक्यता

वाढते. विषमतेतच हिंसेची बीजं असतात. अस्तेय व्रत समताधिष्ठित, शोषण रहित अहिंसक समाज निर्माण करायला मदतरूप ठरतं.

**असंग्रह**

असंग्रह म्हणजे संग्रह न करणे, गरजेनुसारच वस्तू घ्याव्यात. हव्यासापोटी अधिक खरेदी आणि घरात वस्तूंचा संग्रह करणं असंग्रह व्रतात बसतच नाही. गरज नसतांना वस्तूंचा संग्रह केला की गरजवंत वंचित राहतो. विषमता वाढते.

**अस्वाद**

अस्वाद व्रत म्हणजे स्वादाचे चवीचे चोचले न पुरवणे. गांधीजींनी दिलेल्या व्यापक अर्थाप्रमाणे केवळ जिभेने घ्यावयाच्या अस्वादापुरते हे व्रत सीमित नाही. कुठल्याही इंद्रियाने घेतलेल्या अस्वादाशी ह्याचा संबंध आहे. इंद्रियजन्य सुखाची लालसा न ठेवणे हा सूक्ष्म अर्थ गांधीजींनी या व्रतात भरला.

**शरीरश्रम**

शरीरश्रमाचं व्रत म्हणजे प्रत्येकाने रोज काहीतरी उत्पादक परिश्रम करणं. श्रमाबद्दलचा तिरस्कार आणि श्रमिकाला हीन लेखणं हा आपल्या परंपरेने दिलेला अनिष्ट वारसा. त्यातून निर्माण झाली बुध्दीजीवी आणि श्रमजीवी विषमता. प्रत्येक माणूस श्रम करू लागला की श्रमाचा तिरस्कार आणि श्रमिकाला हीन लेखणं हा विकृत वारसा पुसला जाईल. विषमता राहणार नाही.

**स्वदेशी**

स्वदेशी व्रत म्हणजे आपल्या देशात तयार झालेल्या वस्तू वापरणे. गांधींच्या मते पहिलं स्थान असेल आपल्या पंचक्रोशीत तयार झालेल्या वस्तूंचं. सेवाग्रामची बापू कुटी बांधतांना या व्रताचं काटेकोर पालन झालेलं दिसतं. पंचक्रोशीत तयार झालेल्या वस्तूंचाच वापर बापूकुटीत

केलेला आहे. आणि कारागीरही पंचक्रोशीतलेच होते. स्वदेशी व्रत म्हणजे स्वावलंबी अर्थव्यवस्था. आर्थिक स्वावलंबातूनच खरं स्वातंत्र्य येतं.

ब्रह्मचर्य, सर्वधर्मी समानत्व आणि स्पर्शभावना ही ३ व्रतं सामाजिक अंगाशी संबंधित आहेत.

**ब्रह्मचर्य**

स्त्री-पुरुष संबंध वर्ज्य करणं हा या व्रताचा अर्थ मानला जातो. इतर सर्वच व्रतांप्रमाणे या व्रतातही गांधीजींनी व्यापक आशय भरला. ब्रह्मचर्याचा संबंध केवळ जननेंद्रियाशी नसून सर्वच इंद्रियांचा संयम येथे अभिप्रेत आहे.

मी या व्रताचा संबंध सामाजिक अंगाशी जोडला आहे. या व्रतामुळे समाजजीवन वासना विरहित राहील. निरामय राहील. गांधीयुगात स्त्रियांनी  घराचा उंबरा ओलांडला. त्या स्वातंत्र्य चळवळी व विधायक कार्यात सहभागी झाल्या. या व्रतामुळेच असा सहभाग शक्य झाला. आज सर्वच क्षेत्रात स्त्रीपुरुष एकत्र काम करतांना दिसतात. या व्रतामुळे कामाच्या ठिकाणी स्त्री सहजपणे निर्धोकपणे वावरू शकते.

**सर्वधर्मी समानत्व**

सर्वधर्मी समानत्व म्हणजे सर्व धर्मांना समान दृष्टीने पाहणे. आपला धर्म इतर धर्मांपेक्षा श्रेष्ठ अशी भावना नसावी. जगात अनेक धर्म आहेत. सर्व धर्मांमध्ये सतत कलह, मारामाऱ्या, हिंसाचार होत असतात. समाजजीवन अशांत होतं. गांधीजींच्या मते सर्व धर्म मानवाने निर्माण केलेले आहेत. मानव अपूर्ण आहे त्याममुळे त्याने निर्माण केलेले धर्मही अपूर्णच असणार. हे मान्य केलं की सर्व धर्मांकडे समान दृष्टीने पाहणं शक्य होईल. निरामय  शांततापूर्ण सहअस्तित्वासाठी या व्रताचं पालन महत्त्वाचं आहे.

**स्पर्शभावना**

स्पर्शभावना म्हणजे उच्च जातीच्या माणसाला ज्या आपलेपणाच्या भावनेने आपण स्पर्श करतो त्याच भावनेने निम्नजातीच्या माणसाला स्पर्श करणे, अस्पृश्यता न पाळणे. अस्पृश्यांना तुच्छ लेखलं जातं. त्यांना अत्यंत क्रूर वागणूक दिली जाते. समताधिष्ठित समाज निर्माण करण्यासाठी स्पृश्य-अस्पृश्य विषमता नष्ट व्हायला हवी.

आपण गांधीजींचा व्रत विचार अत्यंत संक्षेपात समजून घेतला. अधिक तपशीलात समजून घ्यायची जिज्ञासा असल्यास त्यांचं मंगल प्रभात हे पुस्तक वाचावं. व्रतविचार केवळ समजून घेणं पुरेसं नाही. या व्रतांचं अधिकाधिक पालन करण्याचा जीवनात सातत्याने प्रयत्न व्हायला हवा. तरच गांधीजींना अभिप्रेत असणारा समाज निर्माण होऊ शकेल.

# १७. गांधी विचार : सर्वोदय

गांधी विचार सर्वोदय नावाने ओळखला जातो. आफ्रिकेत असतांना १९०४ साली गांधीजींनी जॉन रस्किनचे 'अनटू थिस लास्ट' हे पुस्तक ट्रेनच्या प्रवासात वाचले. झपाटल्यासारखे त्यांनी रात्रभर जागून पुस्तक वाचून पूर्ण केले. पुस्तकातील विचारांनी ते खूपच प्रभावित झाले. त्यातील काही विचार त्यांच्यासाठी सर्वथा नवे होते. रस्किनने आपल्या पुस्तकात नफ्यावर आधारित अर्थशास्त्राची निंदा केली आहे. माणूस आणि माणुसकी विसरून केवळ धनसंचयाचा विचार करणारे अर्थशास्त्र समाजाचे कल्याण करू शकत नाही. धनिकांचा धनसंचय श्रमिकांच्या शोषणातूनच निर्माण होतो. खऱ्या गरजा लक्षात घेऊन त्याचीच पूर्ती करायचे ठरवले तर धनसंचयाची गरजच राहणार नाही. पुस्तकातील अशा सगळ्याच विचारांनी गांधीजींच्या मनाची पकड घेतली. इतर भारतीयांना हे विचार कळावे या हेतुने त्यांनी पुस्तकाचा अनुवाद करून इंडियन ओपिनियनमध्ये क्रमशः प्रसिद्ध केला.

वस्तुकः रस्किनच्या 'अनटू थिस लास्ट' या शब्दाचा सही सही अर्थ अंत्योदय या शब्दाने प्रगट झाला असता. पण गांधीजींनी आपल्या अनुवादचे नाव सर्वोदय ठेवले. हा शब्द बहुधा त्यांनी प्रथमच वापरला असावा. सर्वोदय शब्द अंत्योदयापेक्षा निश्चितच अधिक अर्थवाही आहे. नाही रे चं भलं करतांना त्यांना आहे रे चं अकल्याण करायचं नव्हतं. त्यांना सर्वांचंच कल्याण करायचं होतं म्हणून सर्वोदय. स्वतःचे अनुभव प्रयोग, चिंतन या आधारे त्यांनी रस्किनचा अंत्योदयाचा विचार सर्वोदय नावाने अधिक विकसित केला. आज सर्वोदय शब्द गांधीविचारांचं प्रतिनिधित्व करतो.

## सर्वोदयाचा अर्थ

सर्वोदय म्हणजे सर्वांचं कल्याण. आहे रे आणि नाही रे वर्गाची समाप्ती. शोषण रहित सहअस्तित्व. एकात्मता सर्वोदयाचे सारतत्व आहे. आधार आहे मानव. गांधींजींनी विकसित केलेला सर्वोदय विचार भारतीय तत्वज्ञानाने अनुप्रणित आहे.

**सर्वांना सुख लाभावे तशी आरोग्य संपदा**
**कल्याण व्हावे सर्वांचे कोणी दुःखी असू नये।**

या श्लोकात प्रगट झालेला विचार सर्वोदयाचा आधार आहे. ईशावास्य उपनिषदाचे विनोबांनी मराठीत भाषांतर केले आहे. त्यातील पहिला श्लोक आहे. 'जगात जे काही जीवन आहे ते हे सर्व ईश्वराने वसविलेले आहे। म्हणून त्याच्या नावाने त्यागून तू यथाप्राप्त भोगीत जा।' या श्लोकात सर्वोदयाचे सारे तत्त्वज्ञान सामावलेले आहे. सर्व सजीव सृष्टी ईश्वराने वसविली आहे. त्यामुळे सर्व सजीवांमध्ये ईश्वराचे अस्तित्व आहे. माझ्यात जो ईश्वर आहे तोच दुसऱ्या व्यक्तीतही आहे. त्यामुळे शोषणाला आणि विषमतेला स्थानच उरत नाही. सर्व माणसांना समदृष्टीने, मित्रत्वाच्या नात्याने पाहण्याची शिकवण सर्वोदय देतो. केवळ माणसांशीच नव्हे तर पशुपक्षी, वृक्षवल्ली यांच्याशीही मैत्र प्रस्थापित करण्याची शिकवण सर्वोदय देतो. स्वार्थासाठी निसर्ग ओरबाडण्याची वासना सर्वोदय त्याज्य समजतो.

सत्य आणि अहिंसा या दोन गांधीजींच्या जीवन निष्ठा. सत्याचा शोध हे त्यांच्या जीवनाचं प्रयोजन. समाजात शोषण असेल तर अनीती असते. असत्याचाच बोलबाला असतो. त्यामुळे अनीती आणि शोषणाच्या विरोधात आवाज उठवणणं हे सत्याच्या उपासकाचं कर्तव्यच आहे. हिंसा व असत्य याला कारणीभूत ठरणाऱ्या गोष्टी समाजात राहणारच नाहीत अशा वेगळ्या मूल्यांवर समाजाची उभारणी सर्वोदय करू इच्छितो.

शोषणरहित, समताधिष्ठित, अहिंसामूलक शाश्वत अर्थव्यवस्था व समाजव्यवस्था यावर आधारलेला समाज निर्माण करणे सर्वोदयाचे ध्येय आहे.

हा समाज समतेवर आधारलेला असल्याने शोषणाचा प्रश्नच राहणार नाही. शोषण आणि विषमततेतून हिंसेचा जन्म होतो. या समाजात हिंसेचा जन्मच होणार नाही. अशी समाजव्यवस्था

शाश्वत असेल. उत्पादन विकेंद्रित आणि निसर्गस्नेही असेल त्यामुळे अर्थव्यवस्था ही शाश्वत असेल.

सर्वोदयाचे चार वैचारिक आधारस्तंभ आहेत—

१. विकेंद्रीकरण, २. ट्रस्टीशिप (विश्वस्तवृत्ती) ३. यंत्र संस्कृतीला विरोध ४. साधनशुचिता

**१. विकेंद्रीकरण**

सत्ता आणि संपत्ती एकाठिकाणी केंद्रित झाली की ना समता प्रस्थापित होते ना शोषणापासून मुक्ती मिळते. सर्वोदयाचं ध्येयच साकार होऊ शकत नाही म्हणूनच सर्वोदय विकेंद्रीकरणाचा आग्रह धरतं. विकेंद्रीकरण सर्वोदयाचं आधारभूत तत्त्व मानलं जातं. केंद्रीकरणातून व्यक्तीव्यक्तीमधील विषमतेची दूरी रुंदावते. भांडवलदार, मालक मालामाल होतो. मजूर गरीबच राहतो. मजुराच्या शोषणातूनच मालकाची श्रीमंती निर्माण होते. क्षेत्रीय विषमताही निर्माण होते जिथे उत्पादन निर्माण होते तो प्रदेश समृध्द होतो. बाकीचे प्रदेश वंचितच राहतात.

गांधीजी राजसत्ता आणि अर्थसत्ता दोन्हीच्या विकेंद्रीकरणाचा आग्रह धरतात. सारी सत्ता दिल्लीच्या हातात एकवटणे त्यांना मान्य नव्हते. खेड्याच्या हातात आपल्या गरजानुसार निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य नसणे म्हणजे खेडी परतंत्रच राहणार. असे स्वातंत्र्य त्यांना अभिप्रेत नव्हते.

राजसत्तेच्या विकेंद्रीकरणासाठी ते ग्रामस्वराज्याचा विचार देतात आणि अर्थसत्तेच्या विकेंद्रीकरणासाठी ते खादी ग्रामोद्योगाचा मार्ग सांगतात.

**२. विश्वस्तवृत्ती (ट्रस्टीशिप)**

विश्वस्तवृत्ती सर्वोदयाचा दुसरा आधारस्तंभ आहे. कायद्याच्या पुस्तकात गांधीजींनी ट्रस्टीशिपची संकल्पना वाचली. ती त्यांना भावली. समतेच्या प्रस्थापनेसाठी ती त्यांनी सर्वोदयात

दाखल केली. भारतात आल्या आल्या १९१६ साली बनारस हिंदु विद्यापीठाच्या स्थापनेच्या वेळी दिलेल्या व्याख्यानात त्यांनी या कल्पनेचा प्रथम उल्लेख केला.

विश्वस्तवृत्ती म्हणजे धनिकांजवळ जी संपत्ती एकवटली आहे ती सामाजीची आहे. धनिक केवळ त्यांचे विश्वस्त (ट्रस्टी) आहेत. संपत्ती सांभाळणारे आहेत असे धनिकांनी मानावे.

विश्वस्तवृत्तीत तीन बाबी येतात.

१. आपली संपत्ती समाजाची आहे असा दृष्टिकोन श्रीमंतात रुजवणे.

२. केवळ आपल्या अत्यावश्यक गरजा भागवण्यासाठीच श्रीमंतांनी ती संपत्ती वापरवी.

३. त्या संपत्तीचे संवर्धन आणि संरक्षण करणे हे विश्वस्ताचे काम राहील आणि समाजाचा वाटा त्याने कायम समाजाला दिला पाहिजे.

विश्वस्तवृत्ती भांडवलशाही अर्थव्यवस्थेत इष्ट परिवर्तन करून समताधारित मराज निर्माण करणारा नवा विचार आहे.

**३. यंत्रसंस्कृतीला विरोध**

गांधीजी यंत्रविरोधी आहेत असं मानलं जातं. परंतु हा अपसमज आहे. गांधीजी यंत्रविरोधी नाहीत. यंत्रविवेकी आहेत. श्रमिकांचे काबाडकष्ट कमी करणाऱ्या यंत्रांचं ते स्वागतच करतात. परंतु माणसाची कृतिशीलता हिरावून, त्यांची सृजनक्षमता बोथट करून त्यालाच हद्दपार करून त्यांची रोजीरोटी काढून घेणाऱ्या यंत्रांना त्यांचा विरोध आहे.

आणखी एक मुद्दा लक्षात घेणे खूप गरजेचे आहे. सर्वोदय यंत्राचा नव्हे तर यंत्रसंस्कृतीचा विरोध करतो. उत्पादन व्यवस्थेत अतिरेकी यंत्रवापरामुळे विकसित झाली एक अपसंस्कृती यंत्र संस्कृती. १९०८ साली लिहिलेल्या हिंद स्वराज या पुस्तकात गांधीजींचा यंत्रसंस्कृतीचा विरोध खूप प्रखरतेने प्रगट झालाय ते या संस्कृतीला सैतानी सभ्यता म्हणतात. या सभ्यतेने अनेक

देशांना पारतंत्र्यात लोटलंय. ही सभ्यता माणसाला चंगळवादी बनवते. या सभ्यतेत स्वार्थ, विषमता आणि हिंसा ही सर्वोदयाला विरोधी तत्व आहेत. ही संस्कृती सर्वांचे कल्याण करू शकत नाही. म्हणून सर्वोदय त्या संस्कृतीचा विरोध करतो.

**४. साधनशुचिता**

सर्वोदयाचा चौथा आधारस्तंभ आहे साधनशुचिता. यालाच साध्यसाधन विवेक असंही म्हणतात. हा नवा विचार देऊन गांधीजींनी तो राजकारणात दाखल केला. त्याप्रमाणे आचरण करायला शिकवलं. साधनशुचिता म्हणजे उच्च ध्येयाच्या सिद्धीसाठी जी साधन वापरायची तीही उच्च आणि पवित्र हवीत. साध्यसाधन विवेक न ठेवल्यास साध्याचीही हानी होते. ते चिरस्थायी राहत नाही. समताधिष्ठित शोषणमुक्त समाज निर्माण करण्याची आकांक्षा गांधीजींनी उरी बाळगली होती. त्यासाठी हृदय परिवर्तन, अहिंसक सत्याग्रह अशी पवित्र साधन वापरायची शिकवण त्यांनी दिली.

अपवित्र साधनांच्या वापराने साध्याची हानी आपण रशियन क्रांतीत पाहू शकतो. रशियन क्रांतीचं ध्येय शोषणमुक्त समाजाची निर्मिती हेच होतं. पण साधनं होती हिंसा, रक्तपात, जुलुम जबरदस्ती. त्यामुळे साध्य गाठल्याचा आभास निर्माण झाला. पण साध्य चिरस्थायी राहू शकलं नाही. रशियाचं विघटन झालं.

असे हे सर्वोदयाचे चार आधारस्तंभ सर्वोदय विचाराला बळकटी देतात.

# १८. धर्मकल्पना

गांधीजी म्हणतात ‘मी पूर्णतः धार्मिक माणूस आहे.’ ते असंही म्हणतात ‘मी सनातनी हिंदू आहे.’

या दोन्ही विधानांमध्ये धर्म हा शब्द आलेला आहे. धर्म या संकल्पनेचा गांधीजींना अभिप्रेत असलेला अर्थ समजून घेणे महत्वाचं आहे. अन्यथा काही गैरसमज होऊ शकतात. गांधीजींची धर्मविषयक संकल्पना अतिशय व्यापक आणि खोल आहे. ते म्हणतात, ‘मी जो धर्म मानतो तो संकुचित नाही. तो विकासक्षम आहे. तो धर्म स्वतःमध्ये झरतुष्ट, मोझेस, ख्रिस्त, महम्मद, नानक आणि असे इतर अवतारी पुरुष यांचे उपदेश समाविष्ट करतो.

यातील विकासक्षम शब्द महत्त्वाचा आहे. ते म्हणतात सर्व धर्म माणसाने निर्माण केले आहेत. माणूस अपूर्ण आहे. त्यामुळे त्याने निर्माण केलेल्या धर्मात अपूर्णता असणारच. म्हणूनच त्यात सुधारणा करून सतत त्याचा विकास करत रहायला हवा. धार्मिक वचने, धर्माची शिकवण अपरिवर्तनीय आहे. असे कट्टरपंथी मानतात. तसे मानले तर ते धार्मिक विचाराचे एक डबके होईल. त्याचं प्रवाहीपण संपेल. डबक्यात साचलेले पाणी जसे काही दिवसांनी अशुद्ध होते. तद्वतच प्रवाहीपण गमावून बसलेल्या धर्मातही अशुद्धता येईल. प्रवाही पाणी शुद्ध असते. तसेच परिवर्तन क्षमतेमुळे कार्य ही नित्य शुद्ध होत राहील. कालबाह्य अंश त्यांतून निघून जाईल. कालानुरूप नित्य परिवर्तन होत राहील. वरील अवतरणातील विधानावरून आणखी एक गोष्ट आपल्या लक्षात येते. इतर धर्मोतील चांगल्या शिकवणुकीबद्दल गांधीजी स्वागतशील आहेत. सर्व धर्मांबद्दल त्यांच्या मनात समभाव आहे. कट्टर पंथियांप्रमाणे आपल्या धर्माबद्दल वृथा अभिमान नाही. गर्व नाही. त्यांच्या आश्रमात सर्व धर्मांचे लोक रहात असत. आश्रमातील प्रार्थनेत इतर धर्माच्या निवडक वचनांचा समावेश असायचा. नित्व पठनींय आणि नित्य आचरणीय

एकादश व्रतांचे पालन ते सर्वांसाठी अनिवार्य मानतात. त्या व्रतांमध्ये १ व्रत आहे. सर्वधर्मी समानत्व.

हिंदु धर्माच्या अद्वैती तत्वज्ञानाप्रमाणे गांधीजी सर्वाभूती परमेश्वर मानत. त्यामुळे अस्पृश्यांना पाणवठ्यावर, मंदिरात प्रवेश नाकारण्याची संकुचितता त्यांच्या धर्मात नव्हती. अद्वैती तत्वज्ञान मानणाऱ्या हिंद धर्मात अस्पृश्यता कशी ? त्यामुळेच ते म्हणत की अस्पृश्यता हा धर्माचा भाग असूच शकत नाही. वर उल्लेख केलेल्या एकादश व्रतांमध्ये स्पर्शभावना असेही एक व्रत आहे. स्पर्श भावना म्हणजे कोणाचाही स्पर्श निशिद्ध न मानणे. हे व्रत अस्पृश्यतेच्या भावनेवर आधात करते. गांधीजींच्या धर्मात जातीच्या श्रेष्ठ कनिष्ठतेला स्थान नव्हतं.

'अस्पृश्यता हिंदू धर्मावरील कलंक आहे' हे त्यांचे विधान सर्वश्रुत आहे. ते असंही म्हणतात की 'जाती हिंदू धर्मावरील बांडगुळे आहेत.

गांधीजींच्या धर्मात तर्कदुष्ट धर्मविचारांना, अंधश्रध्देला, कर्मकांडांना स्थान नव्हते. सत्य व अहिंसा यांच्या विरोधी धर्मवचने त्यांनी कधीच ग्राह्या मानली नाहीत.

धर्माधिष्ठित राज्याची कल्पना त्यांनी पूर्णतः त्याज्य ठरवली. धर्माचे अस्तित्व व्यक्तीच्या पातळीवर असेल. राज्याचा कुठलाच धर्म नसेल. त्यांच्या या भूमिकेवर ते ठाम होते. म्हणूनच सोमनाथ मंदिराच्या जीर्णोद्धारासाठी लागणारा खर्च त्या धर्माच्या अनुयायांनी करावा. असं त्यांचं मत होतं. या संदर्भातली १ गोष्ट सहज आठवली म्हणून लिहिते. स्वतःला धार्मिक मनुष्य म्हणणाऱ्या गांधीजींनी धर्मनिरपेक्ष राज्याचा पुरस्कार केला. आणि ज्यांच्या जीवनात धर्माला स्थान नव्हते, त्या जीनांनी पाकिस्तान मुस्लिम धर्मी राज्य घोषित केले.

भारतात हिंदुंची संख्या जास्त आहे म्हणून ते हिंदू राज्य व्हावे असा प्रयत्न हिंदुत्ववादी सातत्याने करत असतात. इतर धर्मियांना दुय्यम दर्जा राहिल असं ते म्हणतात. इतर धर्मियांना भारतात रहायचं असेल तर ते आमच्या कृपेवर राहतील असंही हिंदुत्ववादी बोलतात. ते एक

वास्तव विसरतात. जगातील विविध देशावर नजर टाकल्यास लक्षात येतं की कुठलंही धर्माधिष्ठित राज्य प्रगती करू शकलेलं नाही. भारताला धर्माधिष्ठित राज्य करण्याच्या प्रयत्नात असलेल्यांना भारताची प्रगती कुंठित करायची आहे का?

# १९. स्त्री विषयक दृष्टिकोन

महात्मा गांधींनी जीवनाच्या समग्रतेचा विचार केला. मानवी जीवन एकसंधच आहे. तुकड्या-तुकड्यांनी त्याचा विचार केल्यास त्या विचारात अपुरेपणा राहतो. तसा अपुरेपर्णा गीधीजींच्या विचारात आपल्याला आढळत नाही. मानवी जीवनाशी संबंधित एकही विषय असा नाही. ज्यावर गांधीजींनी आपले विचार मांडले नाहीत. माणूस समाजशील प्राणी असल्याने मानवी जीवनाचा विचार करतांना ज्या समाजात तो राहतो त्याचा विचार अपरिहार्यपणे येतोच ! समाजातील दलित, शोषित वर्गाबद्दल गांधीजींच्या मनात कणव होती. ते समतेचे पुरस्कर्ते होते. सर्वोदयाचे, अंत्योदयाचे तत्वज्ञान त्यांनी मांडले होते. आणि त्यातूनच शोषित वर्गाच्या शोषणमुक्तिचा विचार अपरिहार्यपणे त्यांच्या चिंतनाचा विषय झाला. समाजातील दीन-दुर्बल घटक, हरिजन ह्यांच्यासाठी ते झटले. त्याच न्यायाने स्त्री त्यांच्या चिंतनाचा विषय बनली. स्त्री समाजातील सर्वात शोषित व दुर्बल घटक. शूद्रातिशूद्राच्या घरातही स्त्रीला खालचाच दर्जा मिळतो. स्त्री वर्गावर अनेक तऱ्हेचे अन्याय होतात हे गांधीजींच्या संवेदनशील मनाला जाणवले व स्त्रीला बरोबरीचा दर्जा मिळायला हवा ह्या साठी त्यांनी प्रयत्न केला.

गांधीजी स्त्री स्वातंत्र्याचे खंदे पुरस्कर्ते होते. स्त्री-पुरुष तत्वतः समान आहेत. स्त्रीला स्वतःचे असे स्वतंत्र व्यक्तिमत्व आहे. निसर्गाकडून दोघांनाही समान मानसिक क्षमता मिळाल्या आहेत. असे त्यांचे विचार होते. आणि त्यामुळे तिलाही पुरुषाप्रमाणेच अधिकार हवेत. ती पुरुषाच्या मालकीची भोग्य वस्तू नाही. असे ते मानत.

आज स्त्री मुक्तीची चळवळ फोफावली आहे. कोय आहे ह्या चळवळीची मागणी ? आपण हीच मागणी करतो आहोत की आम्ही वस्तू नाही व्यक्ती आहोत. इच्छा आकांक्षासह सर्व मानवीय क्षमतांनी युक्त आहोत. आम्हाला व्यक्ती म्हणून, माणूस म्हणून जगू द्या. हेच विचार

गांधीजींनी ६०-७० वर्षापूर्वी सांगितले आहेत हे लक्षात ठेवले की त्यांच्या विचारातील क्रांतिकारकता जाणवल्याशिवाय राहत नाही.

स्त्रीयांमधील न्यूनगंडाची भावना गांधीजींना दिसत होती. परंपरा आणि रूढीच्या आरशातच त्या स्वतःचे चित्र पाहत होत्या. स्वत:ला दुय्यम व हीन लेखत होत्या. ज्याला बरोबरीचा दर्जा द्यायचा आहे त्याला मनापासून हे पटायला हवे ना की आपण पुरुषांच्या बरोबरीच्या आहोत. आणि त्यासाठी त्यांनी स्त्रीयांना सतत मार्गदर्शन केले. आपण पुरुषांचे एक खेळणे आहोत असे समजणे ही स्त्रीयांची फार मोठी चूक आहे. त्या स्वतःच स्वतःला व्यक्ती न मानता वस्तू मानतात. केवळ शारीरिक पातळीवरून स्वत:कडे बघतात. पुरुषाला रिझवण्यासाठी देह सजवण्याला अवास्तव महत्त्व देतात. हे सर्वस्वी चूक आहे. कुटंबात व समाजात त्यांना त्यांचे स्वाभाविक बरोबरीचे स्थान मिळवायचे असेल तर स्त्रीयांनी न्यूनगंडाची भावना सोडून सर्व क्षेत्रात पुढे आले पाहिजे. त्यांच्या शिकवणुकीचा सारांश आहे.

स्त्री व पुरुषाला सर्व मानसिक क्षमता सारख्याच मिळाल्या आहेत. असं सांगणारे गांधीजी जेव्हा असं म्हणतात की त्याग, सहनशीलता, सेवापरायणता हे गुण स्त्रीयांमध्ये, पुरुषांपेक्षा जास्त आहेत. तेव्हा मात्र माझ्यासारखी आजची स्त्रीमुक्तीवादी थोडीशी बिचकते. कारण हे गुण पुरुषप्रधान संस्कृतीने तिच्यावर लादले आहेत. आणि ह्या गुणांचा गौरव करून तिला त्यागमूर्ती, सेवामूर्ती, जगज्जननी, देवी अशी विशेषणे, बहाल केली आहेत. प्रत्यक्षात मात्र तिला दासीच बनवले आहे. हे कटुसत्य आज तिला उमगलेले आहे. गांधीजींचे एकूण सर्व विचार, सर्वोदयाचे तत्त्वज्ञान लक्षात घेतले की स्त्रीला 'गौरवून' तिला दासी करण्याचा पुरुषी संस्कृतीचा हा धूर्त डाव गांधीजी खेळत असतील असा विचारही आपण करू शकत नाही. आणि म्हणूनच स्त्री चे गुण हेरून तिला गौरविण्यामागे त्यांची वेगळी भूमिका काय? हे समजून घेणे गरजे होऊन बसते.

त्याग, सेवा, सहिष्णुता इत्यादि गुण निसर्गाने स्त्रीला अधिक प्रमाणात बहाल केले आहेत असे म्हणण्याला शास्त्रीय आधार नाही. बीजरूपाने हे गुण प्रत्येक मानवात आहेत. परंतु पिढ्यानपिढ्याच्या संस्कारामुळे, घरात स्त्रीला मिळणाऱ्या दुय्यम दर्जामुळे बीजरूपाने असलेले हे गुण स्त्रीमध्ये अधिक प्रमाणात विकसित झाले. ही वस्तुस्थिती नाकारता येणार नाही. गांधीजींना अंत्योदयाची कल्पना प्रत्यक्षात आणायची होती. प्रेमावर आधारलेली, शोषण विरहित अहिंसक समाजव्यवस्था त्यांना निर्माण करायची होती. ह्या समाजव्यवस्थेच्या शाश्वततेसाठी प्रेम, सेवा, त्याग, सहिष्णुता हे गुण महत्वाचे आहेत. हे गुण प्रत्येकात असणं त्यांना आवश्यक वाटत होतं. स्त्रीमध्ये हे गुण त्यांना दिसत होते. म्हणूनच ह्या गुणांचा आवर्जून उल्लेख करून त्यांनी स्त्रीला ह्या गुणांच्या बाबतीत श्रेष्ठ मानलं. पुरुषांमध्येही हे गुण विकसित व्हायला हवेत असे त्यांना वाटत होते. गांधीजींचे जीवन पाहिल्यास ह्या सर्व गुणांचा अत्युच्च विकास त्यांच्यामध्ये झालेला आपल्याला दिसतो.

गांधीजींना भारतीय संस्कृती व हिंदुधर्म ह्याबद्दल नितांत आदर आहे. तरीही ज्या ज्या ठिकाणी संस्कृती व शास्त्रवचने, रूढी आणि परंपरा स्त्रीस्वातंत्र्याच्या आड येतात त्या प्रत्येक ठिकाणी शास्त्रवचने व रुढी परंपरांना झुगारून देऊन त्यांनी स्त्री स्वातंत्र्याचाच पुरस्कार केला.

स्त्री चंचल आहे. पापाभिमुख आहे. तिला पुरुषापेक्षा संरक्षणाची अधिक गरज हे गांधीजींना अजिबात मान्य नाही. स्त्री पुरुषांसाठी बनवलेले नीतिनियम वेगवेगळे आहेत. त्या संबंधात गांधीजी म्हणतात, 'कायदा आतापर्यंत पुरुषांनी घडवलेला आहे व तो करताना पुरुष अतिशय पक्षपाती राहिलेला आहे. त्याने न्यायबुध्दी दाखविलेली नाही. स्त्रीयांच्या बाबतीत अनेक अंगभूत दोष आहेत असे दाखवून त्यांच्यावर शास्त्रकारांनी अनेक निर्बंध घातले आणि त्यांच्या सहज प्रेरणा दडपून टाकल्या. असले निर्बंध नाहीसे व्हायला हवेत. ते आपले काम आहे.'

धर्मशास्त्राने विवाह स्त्रीजीवनाचा आवश्यक संस्कार मानला. त्याशिवाय तिला मुक्ती नाही. ब्रह्मचर्य हा पुरुषत्वाचा श्रेष्ठ आविष्कार. ब्रह्मचारी पुरुषाला आदाराचे स्थान. परंतु स्त्रीला

ब्रह्मचारी राहण्याचा अधिकारच नाही. विवाहाशिवाय तिला गती नाही. गांधीजींनी हे धर्मशास्त्र धुडकावून लावले व सांगितले की पुरुषाप्रमाणेच स्त्रीयांनाही आजन्म अविवाहित राहण्याची मोकळीक असली पाहिजे. ब्रह्मचर्याची वाट तिच्यासाठीही मोकळी हवी. गांधीयुगातील अनेक स्त्रिया आजन्म अविवाहित राहिल्या. देश व समाजाला देव मानून त्यांनी सेवा केली. स्त्रीच्या संदर्भात ब्रह्मचर्याचा अधिकार प्रस्थापित करून स्त्री स्वातंत्र्याच्या कार्यात गांधीजींनी फार मोलाची भर घातली आहे.

स्वातंत्र्य आंदोलनाचा इतिहास आपण बघितला तर आपल्या लक्षात येते की गांधीजींच्या प्रेरणेने गांधीयुगातच स्त्री घराचा उंबरा ओलांडून स्वातंत्र्य चळवळीत हिरीरीने भाग घेऊ लागली. चार भिंतीच्या आत बंदिस्त स्त्रीला घराबाहेर पडून मुक्त श्वास घेण्याची संधी गांधीजींमुळेच मिळू शकली हे आपण स्त्रीयांनी तरी विसरता कामा नये. पडदाप्रथेला त्यांचा प्रखर विरोध होता. त्यांच्या शिकवणीमुळेच पडद्यात वावरणाऱ्या उच्चभ्रू स्त्रियाही चळवळीत पडल्या.

बालविवाह, जरठकुमारी विवाह, सती प्रथा, विधवेवर लादलेले निर्बंध, देवदासी प्रथा, हुंडा प्रथा अशा अनेक रूढी परंपरा आपल्या समाजात तेव्हा होत्या व आजही आहेत. त्यांना धर्मशास्त्राचा आधार आहे अशी आपली आजही समजूत आहे. गांधीजींनी ह्यापैकी प्रत्येक रूढीवर कडाडून हल्ला चढवला. पतिरूपी खुंटाला एकदा स्त्री बांधली गेली की मृत्युशिवाय तिची सुटका नाही. 'जहाँ डोली सजके आती है वहीं से अर्थी उठती है।' अशा समजुती आजही आहेत. ह्या परंपरा गांधीजींना मान्य नाहीत. अतिशय क्रांतिकारी विचार ते मांडतात. ते म्हणतात, 'पती पत्नीच्या आध्यात्मिक उन्नतीच्या आड येत असेल तर त्याच्यापासून फारकत घेऊन आपले जीवन स्वतंत्रपणे जगण्यास तिला हरकत नाही.'

स्त्री मुक्तीच्या दिशेने आणखी एक पुढचे पाऊल गांधीयुगात गांधीजींच्या प्रयत्नाने पडलेले दिसते. स्त्री-पुरुषामधील निरामय मोकळेपणा गांधीयुगात दिसतो. स्वातंत्र्य आंदोलनात, गांधीप्रणीत विधायक कार्यात स्त्रिया आणि पुरुष परस्पर सहकार्याने काम करतांना दिसतात.

एक सहकारी मित्र ह्या नात्याने त्यांचे परस्परांशी संबंध आहेत. येथे गांधीजींची ब्रह्मचर्याची शिकवण महत्वाची ठरली आहे. प्रथमच घराबाहेर पडणाऱ्या स्त्रीला त्यामुळेच सुरक्षितपणे बाहेरचा मोकळा श्वास घेता आला. स्त्रीकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलला. स्त्रीपुरुषांनी एकत्र येण्याने केवळ लैंगिक वासनाच निर्माण होते. ही समजूत गांधीजींनी खोडून काढली. त्यामुळे एक व्यक्ती म्हणून स्वतःला सिद्ध करण्याची स्त्री ला संधी मिळाली. निखळ मैत्रीच्या पातळीवर स्त्री-पुरुष एकत्र येऊ शकतात हा वस्तूपाठ गांधीयुगात मिळाला. आज तर हा वस्तुपाठ फारच मोलाचा आहे. शिक्षण, नोकरी-व्यवसाय, सामाजिक कार्य अशा अनेक कारणांनी आज स्त्रीपुरुष एकत्र येतात. निखळ मैत्रीच्या भूमिकेतून परस्परांकडे पाहण्याची शुद्ध दृष्टि विकसित होणे आज खूपच गरजेचे झालेले आहे. तसे झाले तरच स्त्रीला सुरक्षित वाटेल. ती निर्भय बनेल. आणि तिच्या व्यक्तिमत्व विकासाच्या संधी विस्तारतील.

हरिजन कार्यासाठी स्त्रियांना गांधीजी दागिने मागत असत. त्यातून स्त्रीमुक्तीच्या दिशेने फार पुढचे पाऊल टाकले गेले आहे. त्याकाळी भारतातील स्रीजवळ स्वतःचा पैसा नसायचा. दागिने तिचे असले तरी पतीच्या परवानगीशिवाय ती त्याचा विनियोग करू शकत नव्हती. कोणाला देऊ शकत तव्हती. तेवढे धैर्य तिला नव्हते. परंतु गांधीजींच्या मागणीला स्त्रीयांनी प्रतिसाद दिलेला दिसतो. त्यांनी स्वतःचे दागिने हरिजनकार्याला दिले आहेत. स्वतःच्या मालकीच्या संपत्तीचा स्वेच्छेने वापर करण्याचे सामर्थ्य गांधीजींनी स्त्रीयांना मिळवून दिले. आपल्या हक्काची त्यांना जाणीव करून दिली.

स्वातंत्र्यानंतर आपल्या संविधानाने स्त्री व पुरुषाला समान दर्जा दिला. त्यानंतर स्त्रीपुरुष समतेच्या दृष्टीने अनेक कायदे झाले. परंतु केवळ कायदे करून स्त्रीचे समाजातील व कुटबातील स्थान बदलत नाही. समता प्रस्थापित होत नाही. कायद्याने दिलिले अधिकार कागदावरच राहतात. सतीबंदीचा कायदा तर स्वातंत्र्यापूर्वीचा. तरीही देवरालाला रूपकुँवर सती जाते व

समाज तिची पूजा बांधतो. कायद्याला उभे रहायला स्वतःचे पाय नसतात. समाजमनाने बदल स्वीकारले तरच कायदा उभा राहू शकतो.

केवळ कायद्याने स्त्रीचे समाजातील व कुटुंबातील स्थान बदलू शकत नाही. समता प्रस्थापित होऊ शकत नाही हे गांधीजींनी अचूक हेरले होते. कायद्याने पुरुषाप्रमाणेच सर्व हक्क स्त्री ला ही मिळायला हवेत हे तर ते आवर्जून सांगतातच त्याच बरोबर माणसाची मने बदलणे, समाजाची मानसिकता बदलणे त्यांना अधिक महत्वाचे वाटते. मतांनी कायदे बनतात पण मने घडत नाहीत. मने घडवण्यासाठी प्रबोधन हवे. वैचारिक जागृतीसाठी सातत्याने प्रयत्न हवेत. स्त्रीविषयक दृष्टिकोण बदलण्यासाठी तसा प्रयत्न गांधीजींनी सतत केला आहे आपल्या लिखाणातून, व्याख्यानातून, कार्यकर्त्यांना केलेल्या मार्गदर्शनातून.

## २०. गांधी आश्रमवासियांनी आपल्या सहचारिणींवर अन्याय केले काय?

काही दिवसांपूर्वी एक लेखिका आमच्या घरी आल्या होत्या, त्या काकासाहेब कालेलकरांवर लिहित होत्या. त्या संदर्भात माझ्या आईला भेटायला त्या आल्या होत्या. काकासाहेबांबद्दल बरीच माहिती त्यांनी आईकडून घेतली. मी ही त्या सर्व गप्पांमध्ये सहभागी होते. काकासाहेब व त्यांच्या पत्नी एकत्र राहत नव्हत्या. त्यासंबंधीही आईकडून काही माहिती त्यांनी घेतली. त्या चर्चेच्या ओघात त्या असं म्हणाल्या की, गांधीजींच्या प्रभावळीत आलेल्या त्यांचे अनुयायित्व पत्करून आश्रम जीवन स्वीकारलेल्या पुरुषांनी आपल्या बायकांवर अन्यायच केले आहेत. ते एकत्र सहजीवन जगलेच नाहीत. मी लगेचच विरोध केला व म्हणाले की, काकासाहेब व त्यांच्या पत्नी एकत्र राहत नव्हत्या. ह्या किंवा ह्यासारख्या आणखी चार-दोन उदाहरणांच्या आधारे तुम्ही असे विधान कसे करू शकता? आमच्या आश्रमात एकत्र राहत असलेली कितीतरी जोडपी मी पाहिली आहेत. पहिले उदाहरण मी माझ्या आईवडिलांचेच देईन. थोड्या गप्पा झाल्या व त्या गेल्या. माझे मन मात्र त्यांनी केलेल्या विधानाभोवती फिरत राहिले. आश्रमात दांपत्यजीवन जगणाऱ्या जोडप्यांचा शोध घेऊ लागले. अखेरपर्यंत एकत्र राहिलेली अनेक जोडपी मनासमोर साकार व्हायला लागली. लेखिकेने केलेले विधान सार्वत्रिक मनाचे प्रतिनिधित्व करत असेल तर माझ्या मनासमोर साकार होत असलेले चित्रही लोकांसमोर यायला हवे, असे प्रकर्षाने वाटायला लागले. लिहिण्याची प्रेरणा जागी झाली. ती उर्मी स्वस्थ बसू देईना. एक अस्वस्थता मनात घर करून बसली.

आईकडून मीही बरीच माहिती मिळवली. काकासाहेबांसारखे विभक्त राहणारे आणखी कोण कोण आश्रमात होते? हा प्रश्न मी तिला विचारला, तेव्हा २ -३ नावापलिकडे ती जाऊ शकली नाही. सहजीवन जगणारे कोण-कोण होते? हा प्रश्न विचारल्यावर तिने कितीतरी नावे सांगितली.

लेखिकेने सहजगत्या जे विधान केले होते, तसा लोकांचा समज का व्हावा हे मला कळू शकत नव्हते. गांधीजी त्यांची आश्रमीय जीवनपध्दती, आश्रमात राहणारे लोक या सर्वांविषयी अपुरी व काहीशी विकृत माहिती हेच त्याचे कारण असावे असे वाटू लागले. मंन गांधीजींच्या सहजीवनाचा विचार करू लागले.

कसे होते गांधीजी कस्तुरबांचे सहजीवन? बापूंनी बा वर अन्याय केला का? ह्या प्रश्नासरशी माझ्या डोळ्यांसमोर उभा राहिला. 'सत्याचे प्रयोग' मध्ये वाचलेला आफ्रिकेतील प्रसंग. हाच प्रसंग ऑटनबरोने आपल्या चित्रपटात प्रभावीपणे रंगवला आहे. घरी राहणाऱ्या सर्वांची रात्री खोलीत ठेवलेली लघवीची भांडी सकाळी घरच्या यजमानाने (होस्ट) स्वच्छ करावी असे बापूंचे सांगणे होते. ते स्वत:ही हे काम करत असत. बांना हे काम आवडत नसे. तरीही ते त्यांनी केरावे व हसतमुखाने करावे असा बापूंचा आग्रह होता. शक्य तितक्या शांतपणे बा ते काम करीत. परंतु एक दिवस कहर झाला. घरी राहणाऱ्या कनिष्ठ जातीच्या कारकुनाचे भांडे स्वच्छ करण्याची पाळी बां वर आली. जुन्या परंपरेत वाढलेल्या बां ना ते असह्य झाले. बां चे धुसफुसत काम करणे बापूंना सहन झाले नाही आणि आफ्रिकेसारख्या परमुलुखात बांना घराबाहेर काढायला ते सज्ज झाले. हा गांधीजींनी अन्यायच केला होता बांवर, परंतु ह्या घटनेपर्यंत गांधीजींच्या जीवनाला ठोस वैचारिक अधिष्ठान लाभले होते असे आपण म्हणू शकत नाही. आज आपण ज्या विचारांना गांधीविंचार ह्या नावाने ओळखतो, ते विचार विकसित होण्याचा हा प्रारंभकाळ होता. गांधीजींच्या उर्ध्वगामी प्रवासाची ही सुस्वात होती. त्यांच्या मध्येही आपल्या पुरुषप्रधान संस्कृतीने घडवलेला 'नवरा' होताच, त्याचा विलय झालेला नव्हता. हा अन्याय त्या नवऱ्याने केला होता. गांधीजी मिस्टर गांधी होते. महात्मा गांधी झालेले नव्हते. जीवनाला वैचारिक अधिष्टान नव्हते. असे अधिष्ठान लाभल्यानंतरचे त्यांचे सहजीवन आपण तपासायला हवे.

पत्नीची पर्वा न करता, तिला विश्वासात न घेता, घरसंसार सोडून संन्यासाकडे वळलेल्या बुद्धाची परंपरा आजही बऱ्याचदा दिसते. संसारात मन रमत नाही म्हणून पत्नीचा व मुलांचा त्याग

करून एखाद्या साधुसंन्याशाबरोबर निघून गेलेले पुरुष आजही दिसतात. ह्या पार्श्वभूमीवर वयाच्या ४० व्या वर्षी कस्तुरबांना विश्वासात घेऊन त्यांच्या संमतीने गांधीरजींनी ब्रह्मचर्याचे व्रत घेतले हे लक्षात घेण्यासारखे आहे. येथे प्रारंभ काळातल्या नवऱ्याचा विलय झालेला दिसतो.

बा व बापूंचे सहजीवन अतिशय मधुर होते. त्यांच्या सहजीवनाला परस्परांविषयीच्या आदराचे, प्रेमाचे, जिव्हाळ्याचे, विश्वासाचे, तत्पर सेवाभावाचे, त्यागाचे असे अनेक सुंदर पदर होते. असे हे सहजीवन परस्परांना समजून घेत अखेरपर्यंत फुलतच राहिले. हे समृध्द सहजीवन बां च्या मृत्यूनंतरच संपले. गांधीजींच्या मुलांनीही विवाह करून व्यवस्थित संसार केला. मुलांपैकी कोणी पत्नीवर अन्याय केला किंवा ते विभक्त राहत होते असे नाही. त्यांचे सहजीवन आश्रमी वातावरणातच फुलले व अखेरपर्यंत सर्वार्थाने परस्परांना साथ देत राहिले.

नंतर मी विचार करू लागले, गांधीजींच्या निकटवर्तियांच्या सहजीवनाचा, गांधीजींचे मानसपुत्र जमनालाल बजाज व जानकीदेवी ह्यांचे सहजीवन परस्परांना साथ देणारेच होते. जमनालालजींच्या अकाली मृत्युनंतरही जुन्या वळणाच्या मारवाडी परंपरेत वाढलेली सती (विधवा स्त्री) गांधीजींच्या कार्यात सक्रीय राहिली. ह्यावरून पतीने घडवलेले व गांधीजींचा सहवास लाभल्याने घडून आलेले वैचारिक परिवर्तनच ठळकपणे दिसते.

श्रीकृष्णदास जाजू व त्यांच्या पत्नी बाई ह्यांचे सहजीवन थोडे वेगळ्या वळणाचे. पतीचे वैचारिक परिवर्तन फारसे समजून न घेताही त्याने स्वीकारलेल्या खूप वेगळ्या जीवनशैलीशी एकरूप होऊन घराच्या चार भिंतीत राहून बाई समाधानाने जगल्या. थोडी वेगळ्या प्रकारची पत्नीची भूमिका त्यांच्या वाट्याला आली. ती त्यांनी हसतमुखाने बजावली. बाई कथधी बाहेरच्या कार्यात सक्रीय नव्हत्या. पतीने पत्नीच्या मर्यादा ओळखल्या, यामुळे त्यांचे सहजीवन अखेरपर्यंत मधुरच राहिले.

किशोरीलाल मश्रूवाला व त्यांच्या पत्नी गोमतीबेन ह्यांच्या सहजीवनाचे स्वरूप खूपच वेगळे. कल्पनाही केली जाणार नाही असे दोघांनीही विवाहानंतर परस्पर संमतीने ब्रह्मचर्याची शपथ घेतली. प्रारंभी संयुक्त कुटुंबात पडणाऱ्या जबाबदाऱ्या सांभाळत दोघे एकत्र राहिली. आपण घेतलेल्या शपथेच्या साक्षीने खूप वेगळे; पण अतिशय मधुर, सौहार्दपूर्ण, परस्परांना साथ देणारे सहजीवन दोघे अखेरपर्यंत जगली.

ब्रह्मचर्याच्या शपथेच्या उल्लेखानिशी माझ्या मनात चमकून गेले एक खूप वेगळे दांपत्य जीवन. प्रभावतीबेन व जयप्रकाश नारायण दोघेही गांधीविचाराने प्रभावित झालेले. किती वेगळे होते त्यांचे सहजीवन. त्या दोघांना सतत एकत्रच पाहिल्याचे मला आठवतेय. गांधीजींच्या साक्षीने प्रभावतीबेननी घेतलेल्या ब्रह्मचर्याच्या शपथेविषयी तर मला खूप उशीरा कळले. जे. पी. व प्रभावतीबेन दोघांचीही गांधीजीवर अपार श्रद्धा ! त्यामुळे प्रभावतीबेन ब्रह्मचर्याच्या शपथेशी एकनिष्ठ राहिल्या व जे. पी.नीही त्यांना पूरेपूर साथ दिली. ब्रह्मचर्याची शपथ घ्यायची प्रभावतीबेनची उत्कट इच्छा होती. हे खरे असले तरी जयप्रकाशजी परदेशात असताना अशा शपथेपासून गांधीजींनी त्यांना परावृत्तच करायला हवे होते, असे मला वाटते.

प्रभावतीबेनकडून जे. पी. वर (पत्नीकडून पतीवर) अन्याय झाला असेही वाटते. हे वाटणे बाजूला सारून त्यांच्या सहजीवनाचा विचार केला तर काय दिसते ? पती-पत्नीला परस्परांकडून मिळणारे शारीरिक सुख हा सहजीवनाचा प्रमुख आधार मानला जातो. तो आधारच इथे निखळून पडला आहे. पण सहजीवनाचा तो एकमेव आधार नाही. हेही दोघांच्या सहजीवनाकडे पाहिले की प्रकर्षाने जाणवते. त्या आधाराशिवायही दोघांचे सहजीवन अखेरपर्यंत मधुरच राहिले. त्याचे आधार होते परस्परांविषयी प्रेम, विश्वास, परस्परांत्च्या सुखदुखाची व कष्टाची जाण, परस्परांविषयीची सेवापरायणता.

वर उल्लेख केलेल्या सर्वांना प्रसिद्धीचे वलय होते. ते सर्व गांधीजींचे निकटवर्ती होते. प्रसिद्धीचे वलय नसणारे, गांधीविचाराकडे आकृष्ट होऊन आश्रमातच दाखल झालेले कितीतरी सामान्य लोक होते. आश्रमातच ते सहजीवन जगत होते. अशा लोकांनी माझ्या मनात दाटी केली.

६०-६५ वर्षापूर्वीचा तो काळ. स्त्री-पुरुष समतेची दृष्टी समाजात नव्हतीच. पत्नीवर अन्याय झाला ह्यासारखे विचार अलीकडचे. पतीला परमेश्वर मानून त्याच्याबरोबर प्रसंगी मन मारूनही मूकपणे संसार करणे हाच संस्कार. ह्याशिवाय वेगळा पर्याय नव्हताच. ह्या पार्श्वभूमीवर आश्रमातील जोडप्याचे सहजीवन मन बारकाईने बघू लागले. त्यामध्ये तीन प्रकार माझ्या लक्षात आले.

एक म्हणजे पतीच्या वैचारिक प्रवासात त्याच्याबरोबर फरफ़टत जाणाऱ्या, सतत असमाधानी व धुसफुसत संसार करणाऱ्या बायका, प्रवाहाविरुद्ध पोहणाऱ्यांच्या बायकांची बऱ्याचदा फरफटच झालेली आपल्याला दिसते. हे प्रवाहाविरुद्ध पोहणे गांधीविचारांना धरूनच असेल असे नाही. कुठलाही विचार स्वीकारून तुम्ही प्रवाहाविरुद्ध गेलात की, संसारात ताणतणाव येतातच. पतीचे ध्येय कितीही उदात्त असले तरी पत्नीचा जीवनप्रवास खडतर वाटेवरूनच चालत राहतो. पत्नीवरील अन्याय ह्या रूपातही आपण त्याची मांडणी करू शकू.

समर्थ रामदासांचे ध्येय कितीही उदात्त असले तरी बोहल्यावरून पळून गेलेल्या नवऱ्याची वधू, ह्या रूपात त्या लहानग्या मुलीला जीवनभर दुःख व अवहेलनाच सोसावी लागली असणार. एक असमाधान सारे जीवन व्यापून उरले असणार. टिळक व सावरकरांच्या पत्नींचा जीवनप्रवास खडतर वाटेवरूनच गेला ना !

पत्नीचा खडतर जीवनप्रवास व असमाधान ह्याचे कारण पतीने गांधीविचार स्वीकारला असे कसे मानता येईल ? कालसापेक्षता व व्यक्तिसापेक्षता ही कारणे नाकारता येणारच नाहीत. पत्नीच्या सुखदुःखाचा भावभावनांचा स्वतंत्रपणे विचार करायचा असतो, ह्याचे फारसे भानच त्या

काळात नव्हते. पत्नीला गृहीत धरणे हीच वृत्ती होती व आजही आहे. ही कालसापेक्षताच पहिल्या प्रकारच्या दांपत्यज़ीवनातील असमाधानाला कारणीभूत ठरते. त्याचबरोबर पत्नीला गांधीविचार समजावून सांगण्याची पतीची क्षमता व नवे विचार आत्मसात करण्याची पत्नीची क्षमता हे व्यक्तिसापेक्ष घटकही येथे कारणीभूत ठरतात.

दुसऱ्या प्रकारचे संसार असे दिसतात, जेथे पतीचा वैचारिक प्रवास समजून न घेताही किंवा त्या फंदात न पडताही अतिशय सुखासमाधानाने श्रद्धेने संसार करणाऱ्या बायका. आशा जोडप्यांचे सहजीवन समाधानी व मधुरच राहिले. ह्या समाधानामागे कालसापेक्षता हा घटक आहेच. श्रीकृष्णदास जाजू व बाई ह्यांचे सहजीवन ह्या प्रकारात मोडते.

तिसऱ्या प्रकारचे संसार असे दिसतात, जेथे पत्नीचे वैचारिक परिवर्तन करण्याचा सतत डोळस प्रयत्न करणारे नवरे व त्या विचाराविषयी स्वागतशील राहून, नव्या मुशीत घालून स्वतःला घडवणाऱ्या बायका.

आश्रमात सहजीवन जगणाऱ्या ह्या तीन प्रकारच्या दाटीत ठळकपणे प्रतिमा साकार होतेय आई-काकांची. म्हणजेच माझे आईवडील मालती व श्रीधर हरी थत्ते ह्यांची. प्रथम आईकाकांविषयीच जरा विस्ताराने लिहिते. त्या उदाहरणावरून गांधीजींच्या विचारावर श्रद्धा ठेवून त्यांच्या आश्रमात दाखल झालेले पुरुष पत्नीशी कसे समत्व भावनेने वागत होते व हळूहळू आपल्या पत्नीचे प्रबोधन करून तिचे मन तिच्याही नकळत गांधीविचाराकडे कसे वळवत होते हे लक्षात येईल.

वयाच्या सतराव्या वर्षी काका गांधीजींच्या चळवळीत ओढले गेले. वयाच्या एकविसाव्या वर्षी १९२३ मध्ये त्यांचे लग्न झाले. तेव्हापासून एकमेकांना शारीरिक, भावनिक, बौद्धिक आधार देत फार समृध्द व प्रसन्न सहजीवन दोघे जगले.

गांधीजींच्या हाकेला ओ देऊन काकांनी मुंबईच्या कॉलेजला रामराम ठोकला व ते गुजरात विद्यापीठाचे पदवीधर झाले. आपला नवरा बी. ए. झाला असला तरी चारचौघांसारखी लट्ठ पगाराची नोकरी तो करणार नाहीय, तो गांधीजींच्या चळवळीत पडलाय, असे काहीसे अर्धवट इतरांच्या बोलण्यातून आईला कळले होते. पण निजाम इस्टेटमध्ये वाढलेल्या जेमतेम चौथी इयत्ता शिकलेल्या त्या तेरा वर्षाच्या मुलीला त्याचा फारसा अर्थबोध झालाच नसणार. अनुभवातून तिला हे जाणवायला लागले की आपला संसार आपल्या मैत्रिणींसारखा नाही.

लग्ननंतरचे पहिले बिऱ्हाड त्यांनी बागणी नावाच्या एका खेड्यातील घरात. घर कसले ते, तो होता एक गोठा. तिचे मन उदास झालेच असणार, पण आईची चाणाक्ष नजर काकांमधील वेगळेपणही टिपत होती. काकांचा पिंडच मुळी शिक्षकाचा आणि आईला खूप नवे नवे शिकण्याची हौस ! ही हौस नव्या पाककृती, नवी कलाकुसर शिकणे इथपर्यंतच सीमित होती. काकांनी तिची शिकण्याची हौस व्यापक केली. सहज बोलताना ते आईला स्वातंत्र्यासाठी झालेले व होत असलेले प्रयत्न, गांधीजी, त्यांचे विचार ह्याविषयी काही ना काही सांगत असत. तीव्र ग्रहणशक्तीच्या आईला सर्व गोष्टी हळूहळू कळू लागल्या. संसार थाटल्यानंतरच्या छोट्या छोट्या प्रसंगातून तिला आपल्या नवऱ्याचे वेगळेपण, मोठेपण प्रकर्षाने कळले.

एका प्रसंगाचा आवर्जून उल्लेख करावासा वाटतो कारण त्याला एक वैचारिक बाजू आहे गांधीविचाराची व स्त्रीपुरुष समतेची. काकांनी सत्याग्रहाचा पहिला प्रयोग घरातच केला. उरलेले शिळे दोघांनी खायचे, तू एकटीने नाही असे त्यांनी बऱ्याचदा आईला सांगितले, पण नवऱ्याला शिळे वाढायला आईचे जुन्या संस्कारात घडलेले मनन तयारच होईना. ती एकटीच शिळे खायची. काकांनी सत्याग्रहच केला. 'मला रात्रीचे उरलेले वाढले नाही तर मी आज जेवणार नाही.' असे म्हणून पानावर नुसते बसून राहिले. आई धर्मसंकटात पडली. नवऱ्याला उपाशी राहू द्यायचे की शिळे वाढायचे ? शेवटी नाइलाजाने तिने काकांना रात्रीची भाकरी वाढली. शिळे उरलेले दोघांनी वाटून घ्यायचे हा त्यानंतर नित्यक्रमच बनला.

प्रारंभीच्या काळात घडलेल्या अशा छोट्यामोठ्या घटनांनी नंतर आईकाकांचे नाते केवळ पतीपत्नीचे राहिले नाही. गुरुशिष्याचे नवे नातेही उदयाला आले. काका जे सांगत ते मनापासून समजून घेण्याचा प्रयत्न आई करू लागली. तिची जिज्ञासा जागी झाली. नवी माहिती सांगण्याचा काकांचा उत्साह ही वाढला.

लग्नानंतर नवरा जी लुगडी आणील, ते नेसायची व तो सांगेल तसे करायचे हेच त्या काळातील बायकांना माहित होते. लग्नानंतर जाडीभरडी खादीची लुगडी काकांनी आणली. आई निमूटपणे नेसू लागली. काका बागणील प्रामुख्याने खादी उत्पादन व कताई शिक्षणाचे काम करीत. कताईसाठी आवश्यक पेळू काका स्वत: घरी करायचे. काका पिंजणावर कापूस पिंजायचे. त्याचे पेळू तयार करण्याचे काम आईकडे असायचे. नवरा सांगतो म्हणून ती हे काम करायची. पण हळूहळू बदल होत गेला. काकांनी मधून मधून सांगितलेले खादीचे अर्थशास्त्र तिला कळू लागले. नवरा सांगतो म्हणून नव्हे, तर तिचे पेळू करण्याचे काम व्यापक स्वातंत्र्यचळवळीशी जोडलेले आहे, हे कळल्यामुळे ती ते काम मनापासून करू लागली. ती स्वतःही सूत कातायला शिकली. ‘खादी वस्त्र नहीं, विचार है।’ ह्या गांधीजींच्या वाक्यातील विचाराशी तिची ओळख झाली आणि नवरा खादीची लुगडी आणतो म्हणून नव्हे, तर विचार पटून ती खादी वापरू लागली.

खेड्यामध्ये दोन वर्ष काम केल्यावर आपल्या एक वर्षापेक्षाही छोट्याशा लहानग्याला घेऊन हे दांपत्य गांधीजींच्या आश्रमात दाखलं झाले. आश्रमाच्या वातावरणात आईचा भराभर विकास झाला. १९३० च्या सत्याग्रहाच्या वेळे एका महिलांच्या सभेत आईने उत्स्फूर्तपणे फॉर्म भरला. घरी आल्यानंतर तिने तसे काकांना सांगितले. काकांचा फॉर्म भरून व्हायचा होता. आपली शिष्या आपल्याही पुढे आहे ह्या जाणीवने काकांना मनापासून समाधान झाले असणार. फॉर्म भरण्यापूर्वी काकांची परवानगी घेणे आवश्यक आहे असे आईला वाटले नाही, आणि माझ्या परवानगीशिवाय कसा फॉर्म भरला असा विचारही काकांच्या मनात आला नाही. असे हे

समतेच्या पायावर व परस्पर विश्वासाच्या आधारावर विकसित झालेले सहजीवन होते. गांधीजींनी सुरू केलेल्या प्रत्येक चळवळीत दोघे खांद्याला खांदा लावून अग्रभागी राहिले. दोघांनीही जेलयात्रा केल्या. चळवळ ओसरली की दोघेही आश्रमातील शैक्षणिक कार्यात बरोबरीने वाटा उचलत. असे हे सत्तर वर्षाचे समृद्ध सहजीवन १९९२ मध्ये काकांना अपघाती मृत्यू आल्यानंतरच संपले.

आईकाकांच्यानंतर मला आठवतात आश्रमाच्या विद्यालयातील माझ्या शिक्षिका कमलाताई व त्यांचे पती भाऊ लेले. (द्वारकानाथ लेले). कमलाताई लग्नापूर्वीच महिला महाविद्यालयाच्या पदवीधर होत्या. ज्ञानाच्या कक्षा रुंदावलेल्या होत्या. माहेरी गांधीविचारांचा प्रभाव नव्हता. लग्नानंतर पतीबरोबर आश्रमात दाखल झाल्या व विद्यालयात शिकवू लागल्या. वातावरणातून गांधीविचार मनात रुजत गेला. विधायक कार्यातील दोन वेगळी क्षेत्रे दोघांनी निवडली. कमलाताई शिक्षणक्षेत्रात कार्यरत राहिल्या. भाऊ चरखासंघाशी संबंधित राहिले. कमलाताई आमच्या आश्रमातच राहायच्या. भाऊ कामानिमित्त सतत परगावी असायचे. मधून मधून घरी यायचे. पत्नी व मुले नेहमी उत्कंठतेनें येण्याची वाट बघत असायचे. भाऊ घरी आले की घर आनंदाच्या डोही डुंबत असायचे. दोघांनीही स्वातंत्र्य चळवळीत व विधायक कार्यात बरोबरीने वाटा उचलला. भाऊ बाहेर राहून काम करत होते. कमलाताईंना जेलयात्राही घडली. वेगवेगळ्या कार्यक्षेत्रात असूनही त्यांचे सहजीवन गांधी विचारांच्या आश्रमी वातावरणात फुलत राहिले. अखेरपर्यंत दोघे परस्परांना साथ देत राहिले.

आश्रमातले आणखी एक जोडपे आठवतेय. वाळुंजकरजी ब्राम्हण असूनही आश्रमातील चर्मोद्योग विभाग सांभाळत. मेलेली गुरे फाडत. कातडी कमावत, अहिंसक पादत्राणे तयार करत. ब्राम्हण कुटुंबातच लहानाच्या मोठ्या झालेल्या गंगूताईंना हे सर्व अब्रह्मण्यच वाटले असणार. नवऱ्याच्या कामाविषयी नाराजीही असणार. आश्रमी वातावरणामुळे हळूहळू त्यांच्यात बदल होत गेला. आश्रमात जातीभेद तर नाहीत, कोणीही कोणतीही कामे करतात, भंगीकामही ब्राम्हण

करतात हे त्यांनी पाहिले. शिवाय परंपरेने स्त्री पुरुषांच्या कामाची झालेली वाटणीही त्यांना आश्रमात दिसली नाही. आश्रमातील पुरुष रसोड्यात पोळ्याभाकरीसह संपूर्ण स्वयंपाक करत असतात. त्यावेळी स्त्रिया विद्यालयात शिकत असतात हे त्यांनी पाहिले. परिवर्तनाचा प्रारंभ झाला. थोड्याच दिवसात परिवर्तनाने उंची गाठली. त्या स्वतः वाळुंजकरजींच्या बरोबरीने चर्मालयातील सर्व कामे - मेलेली गुरे फाडणे सुद्धा करू लागल्या. गुरे फाडता फाडताच दोघांच्या सहजीवनाचा विकास झाला.

आमच्याच आश्रमात आईकाकांच्या समोर विवाहबद्ध झालेले आणखी एक जोडपे रघुनाथराव धोत्रे व शरयूताई. शर्यूताई माहेराहूनच गांधी विचारांचा वारसा घेऊन आल्या होत्या. धोत्रेजी विद्यार्थी दशेपासूनच विनोबांचे मित्र, विशिष्ट वैचारिक पायावर त्यांचे सहजीवन सुरू झाले. त्यात कधीही व्यत्यय आला नाही. दोघांनी बरोबरीने चळवळीत भाग घेतला व बरोबरीने विधायक कार्यातील वाटा उचलला.

नई तालीम (बेसिक एज्युकेशन) च्या कामाला वाहून घेतलेले सेवाग्रामला राहणारे एक जोडपे डोळ्यासमोर येते. आर्यनायकमजी व आशादीदी. हा आंतरदेशीय विवाह होता. आशादीदी बंगाली तर आर्यनायकमजी श्रीलंकेतील. हा देशभेद, भाषाभेद त्यांच्या सहजीवनाच्या आड आला नाही. बेसिक एज्युकेशनविषयी वैचारिक मंथन व प्रयोग करतच त्यांचे सहजीवन फुलत गेले.

माझ्या आईवडिलांच्या पिढीतील आणखी कितीतरी जोडपी मला आठवतात. सर्वांचा नामनिर्देश करणेही अशक्य आहे. त्या सर्वांचे सहजीवन परस्परांना साथ देणारे होते. नवऱ्याची अरेरावी किंवा कुठल्याही प्रकारची बळजबरी येथे नाही. गांधीजींच्या तत्त्वज्ञानात बळजबरी, पुरुषांची श्रेष्ठता हे बसतच नाही ना ! त्यामुळे बऱ्याच ठिकाणी दिसतो पत्नीच्या प्रबोधनाचा प्रयत्न, सर्वांनी पत्नीला बरोबरीने कार्यप्रवृत्त केले. त्यांच्या पत्नीही मनापासून साथ देत्या झाल्या. हाच वारसा नंतरच्या पिढ्यांकडेही चालत आलेला आपल्याला दिसतो.

माझ्या आईवडिलांच्या नंतरच्या पिढीतही गांधी विचारांकडे वळलेली, आश्रमी वातावरणात राहणारी, विधायक कार्यात कार्यरत असलेली कितीतरी जोडपी परस्परांना साथ देणारे सहजीवन जंगली, जगत आहेत. त्यांचा केवळ नामोल्लेख करते.

ठाकुरदासजी बंग ब सुमनताई, सिद्धराजजी ढढ्ढा व उमाबहन, नारायणदास जाजू व यमुनाताई, नारायण देसाई व उत्तराबहन, दामोदर वेले व विजयाताई, रघुनाथ कुलकर्णी व सुलभाताई आणि आणखी कितीतरी.

ह्या पिढीच्या नंतरची पिढी, आईकाकांच्या दृष्टीने नातवंडांची पिढी. ह्या पिढीतही गांधीविचारांचा वारसा जपून प्रत्यक्ष विधायक कार्यात कार्यरत असलेली कितीतरी जोडपी मला दिसतात. बाहेरच्या कार्यात व घरच्या आधाडीवर दोन्ही ठिकाणी पतीपत्नी बरोबरीच्या भूमिकेवरून, मित्रत्वाच्या भूमिकेवरून वावरताना दिसतात. मागच्या पिढीतली पुरुष मंडळी प्रयत्नपूर्वक घरकामातील वाटा उचलत होती. नंतरच्या पिढीत थोडी सहजता आली. बरोबरीच्या भूमिकेवरून घरकाम करताना तिसऱ्या पिढीतील तरुणांमध्ये विशेष सहजता आढळते. तो स्वभावधर्मच झालेला आहे. 'पडिले वळण' अशी त्यांची वागणूक दिसते. ही सहजता सहजीवनाला खूप पोषक आहे. त्यामुळे बाहेरच्या कार्यात पत्नी अधिक कार्यक्षमतेने काम करू शकते असे दिसते. अशी कितीतरी जोडपी वेगवेगळ्या कार्यक्षेत्रात्या वेगवेगळ्या ठिकाणी कार्य करत आहेत. किती नावे सांगू ? वानगीदाखल ही काही थोडी - डॉ. उल्हास जाजू व किरण, डॉ. अभय बंग व राणी, अशोक बंग व पद्मजा (पद्मजाचे अलीकडेच निधन झाले.) अतुल शर्मा व सुषमा, श्रीकांत नावरेकर व संध्या, वसंत फुटाणे व करुणा.

माझा जन्मच आश्रमातला. आश्रमी जीवन मी जबळून पाहिले. अनुभवले व ऐकले. माझ्या मनासमोर साकार झालेले आश्रमवासियांचे सहजीवन इतरांनाही कळावे, ह्या उर्मीतून लेखनाची प्रेरणा झाली. डोळ्यासमोर उभ्या राहिलेल्या अनेक जोडप्यांच्या सहजीवनाचा हा सर्व पट कागदावर उतरवल्यावर उर्मी शांत झाली. मनातील अस्वस्थता कमी झाली. सारा चित्रपट

मनासमोरून सरकत असतांना आणि लेखणीतून उतरत असताना वाटले की 'आश्रमी जीवन जगणाऱ्यांनी आपल्या बायकांवर अन्याय केला.' हे विधानच गांधीजींवर व त्यांच्या प्रेरणेने आश्रमात दाखल झालेल्या अनुयायांवर अन्याय करणारे आहे.

# २१. पहिल्या स्वातंत्र्यदिनी कुठे होता राष्ट्रपिता ?

दिल्ली स्वातंत्र्याच्या स्वागतासाठी उत्सुक होती. स्वातंत्र्याच्या उत्सवाची भव्य दिव्य तयारी दिल्लीत धूमधडाक्यात सुरू होती. पण दिल्लीच्या त्या आलिशान सोहळ्यासाठी राष्ट्रपिता दिल्लीला आलाच नाही. स्वातंत्र्याचा शिल्पकार त्या दिवशी कलकत्याला होता. तो कलकत्याच्या स्वातंत्र्य सोहळ्यात उपस्थित राहण्यासाठी कलकत्याला गेला होता का ? नाही, ह्या मानवतेच्या पुजाऱ्याचं मन दुःखी होतं. धार्मिक विद्वेषाच्या आगीत होरपळणाऱ्या पीडितांच्या दुःखाने तो व्याकुळ होता. तो निघाला होता दंगलग्रस्तच नोआखालीकडे. नोव्हेंबर ४६ ते फेब्रुवारी ४७ संपूर्ण चार महिने स्वतःचा जीव धोक्यात घालून तो अनवाणी पायाने फिरत होता. मुसलमानांच्या अत्याचाराने घरेदारे उध्वस्त झालेल्या हिंदुना आधार देण्यासाठी, त्यांचे अश्रु पुसण्यासाठी तो फिरत होता. मुसलमानांना प्रेमाची धार्मिक सलोख्याची शिकवण देत तो फिरत होता.

महात्म्याच्या प्रयत्नाने नोआखाली हळूहळू शांत होऊ लागलं. खरं तर गांधीरजींना संपूर्ण शांतता आणि प्रेमभाव निर्माण होईपर्यंत, हिंदू निर्भय होईपर्यंत नोआखालीतच थांबायचं होतं. पण... ! धार्मिक विद्वेषाच्या आगीने फक्त नोआखालीनेच पेट घेतला नव्हता. बिहार, दिल्ली, पंजाब, काश्मीर सगळीकडे भडका उडाला होता. महात्म्याला उसंत नव्हतीच. शांततेसाठी लोकांच्या मनात प्रेमाची ज्योत पेटवण्यासाठी तो इकडून तिकडे धावाधाव करीत होता. इकडे नोआखाली त्यांना साद घालतच होतं. नोआखालीला जाण्यासाठी दिल्लीला न जाता ते लाहोरहून सरळ कलकत्त्याला आले आणि कलकत्त्यालाच अडकून पडले. कारण कलकत्ता पेटलं होतं, भोसका-भोसकी, मारकाट, घरे जाळणे सर्व अमानुष प्रकार चालू होते. कलकत्ता शांत होईपर्यंत राष्ट्रपिता कसा पुढे जाणार?

१३ ऑगस्ट ! युनियन जॅक खाली उतरून तिरंगा फडकण्याचा दिवस २ दिवसांवर येऊन ठेपला होता. महात्म्याने कलकत्याच्या दंगलग्रस्त भागातील एका मोडक्या घरात मुक्काम ठोकला. दुपारी २ वाजता ते तिथे पोहचले. रात्री उशीरापर्यंत निवासस्थानासमोर दंगेखोर 'गांधी परत जा' ह्यासारख्या घोषणा देत होते. जमाव अत्यंत प्रक्षुब्ध होता. गांधींना बाहेर काढण्यासाठी घरात घुसण्याचा प्रयत्न करीत होता. घरावर दगडफेक सुरू होती. खिडक्या-दरवाज्याचा काचा फुटल्या. दगड-काचांचा खच घरात पडला. अनेक काचा गांधीजींच्या डोक्यावर पडल्या. जमावाच्या प्रतिनिधींना गांधीजी परोपरीने समजावून सांगत होते. जमाव ऐकण्याच्या मनःस्थितीत नव्हता. नेहमीप्रमाणे प्रार्थना ही घेता आली नाही. शेवटी गांधीजींच्या समाजवण्याचा परिणाम झाला. प्रतिनिरधींनी बाहेर जाऊन जमावाला समजावलं. हळू हळू जमाव पांगला, बरीच रात्र झाली होती. बाहेर सामूहिक प्रार्थथा होऊ शकली नाही. घरातच प्रार्थना घेण्यात आली. जेवणाची वेळ केव्हाच टळून गेली होती. बापू उपाशीच झोपले.

ता. १४ ला ही दंगे चालूच होते. पण आटोक्यात होते. सायंकाळपर्यंत लोक बरेच शांत झाले. सायंकालीन प्रार्थना मैदानात झाली. मोठा जनसमूह उपस्थित होता.

ता. १५ चा स्वातंत्र्यदिन सूर्य उगवण्याच्या कितीतरी आधी बापू उठले. प्रार्थनेनंतर गीतापाठ करण्यात आला. गांधीजी फिरायला बाहेर पडले. शहराचं चित्रच पालटलं होतं. जागोजाग हिंदु मुस्लिम ऐक्याचं आणि राष्ट्रपित्या विषयीच्या आदराचं दर्शन होत होतं. 'गांधी परत जा' ह्या घोषणेऐवजी 'महात्मा गांधी की जय' ही घोषणा गगनाला भिडत होती. पश्चिम बंगालचे मंत्री राष्ट्रपित्याच्या दर्शनाला आणि आशीर्वाद घ्यायला आले. गांधीजींनी अतिशय मोलाचं मार्गदर्शन केलं. ते म्हणाले, 'आजपासून तुम्ही काटेरी मुकुट डोक्यावर ठेवला आहे. नम्र व्हा, सहनशील व्हा. ब्रिटिशांनी तुमची कसोटी पाहिली, त्यापेक्षा आता कठिण कसोटी आहे. सत्तेपासून सावध रहा. सत्तेच्या थाटामाटात, मोहात पडू नका. भारतातील गरीबांची सेवा करण्यासाठी तुम्हाला अधिकार मिळाला आहे. ह्याची जाणीव ठेवा. ईश्वर तुम्हाला मदत करो.'

दुपारी प. बंगालचे राज्यपाल राजगोपालाचारी भेटायला आले. दोघांनी गप्पा, हास्यविनोद आणि विचारविनिमयात १ तास घालवला. आजच्या सायंकालीन प्रार्थना सभेला जवळ जवळ ३० हजार लोकं उपस्थित होते. प्रवचनात गांधीजी म्हणाले, ‘तुम्ही दाखवलेल्या ऐक्याबद्दल तुमचं कौतुकच करायला हवं. लाहोरमध्ये मात्र अजूनही वेडाचं वादळ शमलेलं नाही. तुमचं हे ऐक्य मनापासून असेल तर त्याचा परिणाम पंजाब आणि साऱ्या भारतात निश्चितच होईल.’

सुऱ्हावर्दींच्या गाडीतून रात्री गांधीजींनी शहरात फेरी मारली. सर्वदूर हिंदुमुस्लिम ऐक्य, उत्साह आणि आनंदाचं वातावरण होतं. गांधीजींच्या चेहऱ्यावरही समाधान आणि प्रसन्नतेचं हास्य पसरलं होतं.

कुठलाही महत्वाचा दिवस साजरा करण्याची गांधीजींची आगळी वेगळी पद्धत होती. त्याच पद्धतीने त्यांनी स्वातंत्र्यदिन साजरा केला. हा दिवस दाखवल्याबद्दल त्यांनी प्रार्थना करून परमेश्वराचे आभार मानले. अंतःकरण शुद्ध रहावं म्हणून दिवसभर निराहार राहिले. गरीबांशी, श्रमजीवींशी एकरूप होण्यासाठी ते रोज सूत कातत. स्वातंत्र्यदिनी रोजची नियोजित कामं शिवाय भेटीगाठी हे सर्व व्याप सांभाळून त्यांनी रोजच्यापेक्षा अधिक सूत काटलं.

लाहोर जळत होतं परंतु कलकत्त्याची आग विझली होती. तिथे हिंदु-मुस्लिम ऐक्याचं सुरेख दर्शन घडलं. हा परिणाम होता गांधीजींच्या प्रामाणिक प्रयत्नांचा. त्यांच्या माणुसकीचा, मानवतेची उपासना करणाऱ्या वृध्द संतत्वाचा हा परिणाम होता स्वतःचा जीव धोक्यात घालून महिनोंमहिने त्यांनी सद्भावनेच्या शिंपणाचा.

# २२. अश्रुंनी चिंब संध्याकाळ

स्वातंत्र्य आंदोलनाचा सेनानी. तो महात्मा. आमचे बापू स्वातंत्र्यानंतर प्रथमच सेवाग्रामला येणार होते. त्यांच्या दर्शनासाठी, त्यांना भेटण्यासाठी सेवाग्रामचे लोकं, आमचा सारा आश्रम उत्सुक होता. नव्हे सारी वर्धा नगरीच उत्सुक होती. बापू दिल्लीहून विमानाने नागपूरला येणार होते आणि तिथून कारने सेवाग्रामला जाणार होते. ती वाट वर्धा नगरीतूनच जात होती. वाटेत वर्धावासी त्यांचं स्वागत करणार होते. सर्व शाळांमधील विद्यार्थ्यांनी रस्त्याच्या दुतर्फा उभं राहून त्यांना गार्ड ऑफ ऑनर द्यायचं नियोजन होतं. बापू स्वतः खाली उतरून गार्ड ऑफ ऑनरचा स्वीकार करणार होते. आमच्या महिलाश्रम विद्यालयाच्या विद्यार्थिनी अग्रभागी राहणार होत्या. सर्व नियोजनाची जबाबदारी माझ्या आईकडे होती. ती आमच्या विद्यालयातील व्यायाम-शिक्षिका होती. दोन दिवसांपासून आम्ही सर्व गार्ड ऑफ ऑनरचा सराव करत तिथून नुकतेच आम्ही सर्व परत आलो होतो आणि ती जीवघेणी बातमी येऊन धडकली.

वर्धा शहरात बजाज यांच्या घरी फोनवरून बापूंच्या हत्येची बातमी आली. ती बातमी सेवाग्रामला द्यायला एक युवक वेगाने सायकलवरून निघाला. 'बापूची गोळ्या घालून हत्या' असे ओरडतच तो चालला होता. सेवाग्रामला जाताना वाटेतच आमचा महिलाश्रम आहे. आमचं घर रस्त्याच्या बाजूलाच आहे. आईने थोडं ऐकलं पण. उलगडा झाला नाही. ती धावतच अंगणात आली. युवकाने क्षणभर वेग कमी केला. तेच वाक्य आईला सांगितले आणि वेगाने पुढे निघून गेला.

आईला तर रडूच कोसळले. क्षणभर तिला काही सुचलेच नाही. क्षणातच ती भानावर आली. ते भयंकर वृत्त लगेच सर्वांना कळवायला हवं होतं. विद्यालयाचं स्नेहसंमेलन चार दिवसावर आलं होतं. काका (माझे वडील) विद्यालयाचे प्रमुख होते. ते विद्यालयात अहवाल लिहीत बसले होते. आईने माझ्या ताईला (माझ्या मोठ्या बहिणीला) विद्यालयात पिटाळले आणि

स्वतः ३-३ ची घंटी वाजवायला धावतच घंटीकडे निघाली. अशी विशिष्ट प्रकारे घंटी वाजली, की आबालवृद्ध सर्व आश्रमवासीयांनी लगेचच घंटीपाशी किंवा जिथे सूचना मिळेल तिथे जमायचं असा संकेत होता.

इकडे ताई विद्यालयात जाऊन पोहोचली आणि तिकडे घंटी वाजू लागली. ऑफिसच्यां दारात उभं राहून ताईने काकांना हाक मारली. तिच्याकडे न बघताच काका म्हणाले, 'मी कामात आहे नतंर बोलू.' काकांचं वाक्य पूर्ण होण्यापूर्वीच ताईला हुंदका फुटला. रडतच ती म्हणाली, 'आपल्या बापूंना गोळ्या घालून मारलं.' काकांना क्षणभर काही कळलंच नाही. ते उठून ताईजवळ आले आणि म्हणाले, 'कोणी? कुठे? केव्हा? सगळं नीट सांग.'

ती आणखीनच रडू लागली. तिकडे घंटी वाजतच होती. काकांनी क्षणात दरवाजा बंद केला आणि ते रेडिओच्या हॉलकडे धावले. सर्व आश्रमवासी तिथे गोळा होत होते. आश्रमात एकच रेडिओ होता. काकांनी लगेच रेडिओ लावला. दुःखी ट्यून वाजत होती. काही क्षणातच हत्येची बातमी आली. सर्व हॉल सुन्न झाला. स्वागताला उत्सुक सर्वांवर जणू वज्राघातच झाला. काकांच्या डोळ्यातून ओघळलेले दोन अश्रू गालावर स्थिरावले.

आईला जोरात रडू कोसळले. संपूर्ण हॉलमध्ये केवळ हुंदक्याचा स्वर आणि अश्रूंचा पूर. थोड्या थोड्या वेळाने आकाशवाणीवरून तीच बातमी पुन्हा-पुन्हा सांगण्यात येत होती. बातमी आली की हुंदक्यांचा स्वर तीव्र व्हायचा. अश्रूंना वेग यायचा. बजाजवाडीत (जमनालाल बजाजांचं निवासस्थान) प्रार्थना होणार आहे असा निरोप आला. शोकावेग आवरता घेऊन सर्व बजाजवाडीकडे निघालो.

बापू सेवाग्रामला येणार म्हणून डॉ. राजेंद्र प्रसाद (भारताचे तत्कालीन राष्ट्रपती) वर्ध्याला आले होते. त्यांचा मुक्काम बजाजवाडीत होता. त्यांच्या उपस्थितीत प्रार्थना झाली. वर्ध्यच्या इतर

संस्थांमधील लोकंही प्रार्थनेसाठी आले होते. प्रार्थनेचा स्वरही रडवेलाच होता. हुंदके थांबले होते. अश्रू मात्र ओघळतच होते. शोकाकुल वातावरणात प्रार्थना संपली.

प्रार्थनेनंतर आम्ही सर्व जड अंतःकरणाने मूकपणे आश्रमात परतलो. रात्री आश्रमात कोणीही जेवले नाही. त्या दिवसापासून दर ३० जानेवारीला आमच्या घरातील सर्व लोक दिवसभर फक्त पाण्यावर राहतात. उपवास करून गांधी विचारांच्या सान्निध्यात राहतो. घरी आलो आणि सुन्नपणे बसून राहिलो. रात्री कोणीही झोपू शकले नाही. बापूंच्या विविध आठवणी आई, काका सांगत होते आणि आम्ही अश्रूंना मोकळी वाट करून देत होतो.

## २३. शेवटचा दिवस

सन १९४८ च्या जानेवारी महिन्याची ३० तारीख! हा दिवस गांधीजींच्या आयुष्यातील शेवटचा दिवस. या शेवटच्या दिवशी गांधीजींनी काय काम केलं, पाहू या.

शेवटचे काही दिवस गांधीजींचा मुक्काम दिल्लीच्या बिर्ला हाऊसमध्ये होता. १३ जानेवारी ते १८ जानेवारीचा त्यांचा शेवटचा मुक्काम बिर्ला हाऊसमध्ये असतांनाच झाला. ३० जानेवारीला नित्याच्या सवयीने प्रातः कालीन प्रार्थनेसाठी ते पहाटे ३.३० वाजता जागे झाले. त्यांनी मनुलाही उठवलं. प्रार्थनेसाठी सर्व व्हरांड्यात एकत्र जमले. प्रार्थनेनंतर गांधीजी खोलीत आले. आदल्या रात्री त्यांनी कॉँग्रेसच्या नव्या संविधानाबद्दल लिहायला घेतलेले टिपण पूर्ण करायला घेतले. ७ दिवसांचा उपवास सुटून फक्त १२ दिवसच झाले होते. अजूनही थकवा जाणवत होता. तरीही हा ७८ वर्षाचा महात्मा प्रार्थनेनंतर लगेच कामाला लागला.

सकाळी ४.३० ला त्यांनी नित्याप्रमाणे मध घातलेलं गरम लिंबू पाणी घेतलं. थकव्यामुळे ते बाहेर फिरायला जात नसतं. खोलीतच त्यांनी थोड्या फेऱ्या मारल्या. ५.३० ला त्यांनी १६ औंस संतऱ्याचा रस घेतला. त्यानंतर पत्रव्यवहार पहायला सुरुवात केली. काही पत्रांना उत्तर लिहिली. थकव्यामुळे ते मधून मधून निवांत पडून राहत.

८ वाजता गांधीजी मालिश आणि स्नानासाठी उठले. प्यारेलालजींच्या खोलीसमोरून जात असतांना ते त्यांना म्हणाले, 'हरिजनला पाठवण्यासाठी मी कॉँग्रेसच्या नव्या संविधानाबद्दल जो लेख लिहिला आहे तो काळजीपूर्वक पाहून आवश्यक सुधारणा करून पाठवून दे. तो लेख मी अत्यंत थकवा आणि मानसिक ताणाच्या परिस्थितीत लिहिला आहे.

मालिशच्या वेळात त्यांनी वर्तमानपत्रावरून नजर फिरवली. बंगालीचा अभ्यास केला. नोआखालीत असतांना त्यांनी बंगाली शिकायला सुरुवात केली होती. तेव्हापासून न चुकता रोज अभ्यास करीत. वार्धक्यातील त्यांची अध्ययनशीलता थक्क करते.

स्नानापूर्वी त्यांनी प्यारेलालजींशी मद्रासच्या अन्न समस्येवर चर्चा केली. त्याच्या मते लोकांनी आपल्या साधनांचा योग्य व काटकसरीने वापर केल्यास या समस्येवर सहज मात करता येईल.

स्नानानंतर ते अतिशय ताज़ेतवाने दिसत होते. चेहऱ्यावर थकव्याचा मागमूसही नव्हता. प्यारेलालजींच्या शब्दात त्यांचा चेहरा सूर्यप्रकाशाच्या प्रसन्नतेने परिपूर्ण होता.

९.३० वाजता ते जेवले. जेवणात उकडलेली भाजी. १२ औंस बकरीचे दूध, चार पिकलेले टोमॅटो, चार संत्री आणि गाजर यांचा रस आलं आणि लिंबू घालून घेतला.

जेवणानंतर कॉंग्रेसच्या संविधान आराखड्यात प्यारेलालजींनी केलेले बदल आणि घातलेली भर त्यांनी वाचली. हिंदुमहासभेचा एक कार्यकर्ता कॉंग्रेसच्या काही नेत्यांना मारण्याची चिथावणी देत होता. हे निदर्शनास आणून श्यामाप्रसाद मुखर्जी त्याला परावृत्त करू शकणार नाहीत का? असा निरोप घेऊन त्यांनी प्यारेलालजींना मुखर्जींकडे पाठवले होते. त्याविषयी विचारल्यानंतर प्यारेलालजींनी सांगितलं की मुखर्जींनी अत्यंत अस्पष्ट आणि असमाधानकारक उत्तर दिलं. हे ऐकल्यावर गांधीजींच्या कपाळावर आठ्यांचं जाळं उमटलं. देशाची चिंता वाहणाऱ्या महात्म्याला तणावरहित, निश्चिंतपणे, प्रसन्नतेने जेवणंही शक्य होत नव्हतं.

१०.३० वाजता त्यांनी पोटावर ओल्या मातीची पट्टी ठेवली आणि ते झोपले. त्यावेळी चांगली विश्रांती झाली. झोपून उठल्यावर वेगवेगळ्या लोकांच्या मुलाखती सुरू झाल्या.

४ वाजता ते सूत कातायला बसले. चरखा हातात आल्यापासून ते रोज नियमाने सूत कातत. त्यात काहीही खंड पडला नाही. कातत असतांना ते सरदार पटेलांशी बोलत होते. विषय अतिशय गंभीर होता. अलिकडे सरदार पटेल व पंडित नेहरू या दोघांमधले मतभेद वाढत चालले होते. त्याविषयीच बोलणे चालू होते. मतभेद असेच कायम राहिले तर देशाचं भवितव्य धोक्यात येईल. ही चिंता गांधीजींना लागली होती. मतभेद विसरून दोघांनी एकदिलाने काम करावं आणि

देशाला प्रगती पथावर न्यावं यासाठी गांधीजी पटेलांशी बोलत होते. गांधीजी १ फेब्रुवारीला स्वातंत्र्यानंतर प्रथमच सेवाग्रामला जाणार होते. मतभेद मिटले नाहीत तर मी सेवाग्रामला जाणं पुढे ढकलीन या चर्चेच्या दरम्यान ४.३० ला त्यांनी सायंकाळचं जेवण घेतलं. ते दुपारच्या जेवणासारखंच होतं. प्रार्थनेला जाण्याची वेळ टळून चालली होती. आभा आणि मनु अस्वस्थ झाल्या होत्या. पण त्या गंभीर चर्चेत हस्तक्षेप करण्याची त्यांची हिंमत होत नव्हती. शेवटी १० मिनिटे झाल्यावर काही न बोलता त्यांनी गांधीजींपुढे घड्याळ धरलं. गांधीजी लगेचच उठले. पटेलांना म्हणाले उशीर झालाय. मला प्रार्थनेसाठी पळायला हवं. मनु आणि आभाच्या खांद्यावर हात ठेवून प्रार्थनेच्या जागी जाण्यासाठी ते झपाझप चालू लागले. लोकांनी त्यांना वाट करून दिली. अभिवादनासाठी त्यांनी हात जोडले. गर्दीतून एक युवक पुढे आला. नमस्कारासाठी किंचित वाकल्यासारखे करून त्यांनी आपल्या पिस्तुलातून गांधीवर ३ गोळ्या झाडल्या. दिवसभर देशाची चिंता करणारा महात्मा कधीही न उठण्यासाठी धरणीवर कोसळला. त्याच्या मुखी शेवटचे शब्द होते 'हे राम !'

## २४. हत्येनंतर

शुक्रवार ता. ३० जानेवारी १९४८ ला सायंकाळच्या सामूहिक प्रार्थनेसाठी बिर्ला हाउसमधील आपल्या खोलीतून गांधीजी निघाले. थोडा उशीर झाल्याने ते झपाझप पावले टाकीत चालले होते आणि अचानक नथुराम गोडसेने त्यांच्यावर पिस्तुलातून ३ गोळ्या झाडल्या आणि महात्मा धरतीवर कोसळला. 'हे राम !' हे शब्द त्यांच्या मुखातून ओघळले. गांधीजींचे विचार न पटलेल्या लोकांपैकी नथुराम एक. त्याला वाटत असावे की गांधीजींचे जीवन संपवले की त्यांचे विचार संपतील. हा त्याचा फार मोठा भ्रम होता. माणूस संपला तरी त्याचे विचार संपत नाहीत. हे वास्तवच त्याने लक्षात घेतलं नाही.

गांधीजींच्या निधनाची धक्कादायक बातमी कळल्यावर वल्लभभाई लगेचच आले. ते नुकतेच गांधीजींशी बोलून गेले होते. पाठोपाठ जवाहरलालजी आले. रक्ताने डागाळलेल्या गांधीजींच्या उपरण्यात तोंड खुपसून ते स्फूंदून स्फूंदून रडू लागले. लगेच त्यांना कर्तव्याची जाणीव झाली. शोकावेग आवरून त्यांनी तडक रेडिओ स्टेशन गाठलं. अवरुद्ध कंठाने ही दुःखद धक्कादायक वार्ता त्यांनी आकाशवाणी वरून देशवासियांना सांगितली. सारा भारत शोकसागरात बुडून गेला. अनेक मंत्री, वरिष्ठ अधिकारी, विविध देशाचे राजदूत बिर्ला हाउसमध्ये दाखल झाले. सर्व नागरिकांचे पाय अंत्य दर्शनासाठी बिर्ला हाउस कडे वळले. लोकांना अंत्यदर्शन घेता यावे यासाठी गांधीजींचे पार्थिव छतावर ठेवण्यात आले. ज्यांना शक्य होते ते सर्व भारतीय अंत्ययात्रेसाठी दिल्लीला रवाना झाले.

जगभर ही दुःखद वार्ता कळली आणि साऱ्या जगातच दुःखाचे स्वर उमटले. सारे जग शोकसागरात बुडून गेले. जगभरातून भारत सरकारकडे ३४४१ शोकसंदेश आले. इतके शोकसंदेश आजपर्यंत कोणाच्याही मृत्यूनंतर आलेले नाहीत. भविष्यातही तशी शक्यता नाही. यूनोची सुरक्षा परिषदेची मीटिंग चालू होती. वार्ता कळल्यानंतर मीटिंगचे शोकसभेत रूपांतर

झाले. सर्व देशातल्या सदस्यांनी गांधीजींचं मोठेपण सागून आदरांजली वाहिली. यूनो ने आपला झेंडा अर्ध्यावर आणला. वस्तुत यूनोचा झेंडा सदस्य राष्ट्रांच्या राष्ट्रप्रमुखांच्या मृत्युनंतरच अर्ध्यावर उतरवण्याचा प्रघात आहे. प्रघात डावलून झेंडा अर्ध्यावर उतरवला गेला. ते भारताचे ना राष्ट्रप्रमुख होते ना सरकारी उच्च पदावर होते. ते होते साऱ्या जगासाठी महात्मा. साऱ्या जगाच्या नैतिकतेचे जिवंत उदाहरण. माणुसकीचाच जणु मृत्यू झाला होता.

सर्व देशांमधील राष्ट्रप्रमुख, लष्कर प्रमुख, विविध पक्षांचे प्रतिनिधी, वृत्तपत्राचे संपादक अशा सर्व थरातील प्रमुख व्यक्तींनी गांधीजींचे मोठेपण वेगवेगळ्या शब्दात व्यक्त केले. आपल्या संवेदना प्रगट केल्या सर्वांनीच गांधीजींची नैतिकता, त्यांचे शांततेचे प्रयत्न, त्यांचा अहिंसक सत्याग्रह वाखाणला.

लिआन ब्लूम हा फ्रांसमधील एक समाजवादी. त्यांनी आपल्या भावना पुढील शब्दात व्यक्त केल्या, 'मी कधीही गांधीजींना पाहिलं नाही. त्यांची भाषाही मला माहित नाही. त्यांच्या देशात मी कधी पाउल ही ठेवले नाही. तरीही माझ्या आप्त स्वकीयांच्या मृत्युनंतर मला जसं दुःख झालं असतं तसंच दुःख गांधींच्या जाण्याने मी आज अनुभवतो आहे.' ब्लूमच्या शब्दात अनेकांच्या भावना व्यक्त झाल्या आहेत.

प्रख्यात शास्त्रज्ञ 'आलबर्ट आइनस्टाइन म्हंणतात की "नैतिकतेच्या ऱ्हासाच्या आजच्या काळात गांधीजींनी आपल्या समोर नैतिक आचरणाचं उदाहरण ठेवलं."

सर स्टेफर्ड क्रिप्स लिहितात, 'आत्म्याच्या सामर्थ्यापेक्षा भौतिकता वरचढ ठरत असलेल्या काळात आत्म्याचे सामर्थ्य प्रगट करणारा गांधीजींसारखा माणूस मी पाहिला नाही. स्वातंत्र्याच्या अत्यंत कठिण लढ्यात, विरोधक अत्यंत सामर्थ्यवान असतांनाही त्यांनी सत्य, अहिंसा, नम्रता आणि सेवा यांची साथ कधी सोडली नाही.'

गांधीजींच्या निधनाचे वृत्त कळल्यानंतर जगातल्या काही छोट्यांनीही अश्रू ढाळले हे विशेषच म्हणावे लागेल. त्यांना ना गांधीजींच्या कार्याची माहिती असेल ना त्यांचे गुण. एक मोठा माणूस आज जग सोडून गेलां एवढंच त्यांना कळलं असेल. एक १२ वर्षाची मुलगी ब्रेकफास्टसाठी किचनमध्ये आली. रेडिओवर गांधीजींच्या निधनाचे वृत्त तिने ऐकलं. ती रडली. तिथेच तिने मोलकरीण आणि माळ्याबरोबर प्रार्थना केली. एक १३ वर्षाची मुलगी लिहिते 'गांधीजींच्या निधनाचे वृत्त कळल्यावर मी अतीव दुःखी झाले. त्यांच्याबद्दल माझ्या मनात प्रेमादराची भावना आहे हे मला कधी लक्षातच आले नव्हते.'

# २५. आजची आव्हाने आणि गांधीजींचे आर्थिक विचार

स्वातंत्र्यपूर्व काळात साऱ्या देशाने गांधीजींचे नेतृत्व स्वीकारले. परंतु ते नेतृत्व केवळ स्वातंत्र्य आंदोलनापुरतेच स्वीकारले गेले. गांधीजींचा जीवनविषयक समग्र दृष्टिकोन बराचसा दुर्लक्षितच राहिला. त्यांच्या आर्थिक विचारावर तर स्वातंत्र्यपूर्व काळात ही सर्वांनी, त्यांच्या निष्ठावंत अनुयायांनी ही प्रखर विरोधच नोंदवला. परिणामत: स्वातंत्र्यानंतर एकूणच गांधीविचार बासनात गुंडाळून ठेवले गेले. त्यांच्या आर्थिक विचारांना कालबाह्य ठरवून तिलांजली दिली गेली.

त्या महात्म्याने जीवनाचा समग्रतेने विचार करून जीवन जगण्याचा व त्यातून सर्वांचे सुख साधण्याचा एक मार्ग आपल्याला दाखवला होता. सर्वोदयाचा विचार आपल्या समोर मांडला होता. आंपण तो समजूनही घेण्याचा प्रयत्न न करता त्याकडे पाठ फिरवून वाटचाल केली. गांधी विचारांची पूर्णपणे उपेक्षा केली.

स्वातंत्र्यानंतरच्या ७० वर्षांच्या वाटचालीनंतर आपल्या देशातील विचारवंत, कार्यकर्ते, पुढारी सर्वांनाच आपण निवडलेल्या मार्गाबद्दल भ्रमनिरास होऊ लागला आहे. ७० वर्षांच्या वाटचाली नंतर आपण ज्या स्थानावर येऊन पोहचलो आहोत तिथे आहे विषमता, बेकारी, उपासमार, सत्तांधता, भ्रष्टाचार व गुन्हेगारी. माणुसकी संपली आहे. देशप्रेम आटले आहे. अशा समाजाचे चित्र आपल्याला अभिप्रेत नव्हते. मग असे का झाले? चुकले कुठे? गांधी विचारांना तिलांजली देण्याचा तर हा परिणाम नाही ?

उत्पादन वाढ म्हणजे विकास. ही विकासाची भ्रामक कल्पना, त्यातून फोफावणारा चंगळवाद, चंगळवादामुळे वाढलेले प्रदुषण, आणि पर्यावरणाचा ऱ्हास, अधिकाधिक उपभोग हेच जीवनाचे ध्येय झाल्याने मोठ्या प्रमाणावरील उत्पादन, त्यातून निर्माण होणारी बेकारी, गुन्हेगारी , स्वार्थ, मूल्यांचा ऱ्हास, भ्रष्टाचार, विषमता, माणुसकीचा लोप. ही सर्व आपण

स्वीकारलेल्या अर्थव्यवस्थेची अपत्ये आहेत. एका दुष्टचक्रात आपला देश अडकला आहे. केवळ आपलाच देश नव्हे तर सारे जग अडकलेय. हे चक्रव्यूह भेदायला गांधीविचार अभिमन्युचे काम करू शकेल? ह्या प्रश्नाचे उत्तर शोधायला गांधीविचार समजून घ्यायला हवा. पूर्वग्रह दूर सारून स्वच्छ मनाने व शुद्ध बुद्धीने समजून घ्यायला हवा. गांधी विचारावर अनेक भ्रामक समजुतीची कोठीष्टके जमली आहेत. ती प्रथम झटकायला हवीत.

आज आपण सर्व अशा मुक्कामावर आहोत जेथे आध्यात्मिक उन्नती हे जीवनाचे प्रयोजन आपण पूर्णपणे नाकारले आहे. त्याग-तपस्या ही मूल्ये आजच्या मुक्कामवरून हद्दपार झाली आहेत. सुखी जीवन व त्यासाठी शांततापूर्ण समाज हे आपल्याला सर्वांना हवे आहे. त्यासाठी हवा आहे भौतिक विकास. आध्यात्मिक विकास थोडा बाजूला सारुया. सुखी व शांततापूर्ण भौतिक जीवनाचाच विचार करू या. त्या संदर्भात गांधी विचार मार्गदर्शक ठरतील का? ते पाहू या. त्यासाठी विशेषतः गांधीजींचे आर्थिक विचार समजून घेऊ या. आजच्या प्रश्नांची उत्तरे त्यात सापडतात का? पाहू या.

बहुतेकांच्या मनात एक प्रश्न असतो की गांधीजींनी आर्थिक विचार केला होता का? वर वर पाहता गांधी विचारावर अनेक आक्षेप घेता येतील. गांधीजी आर्थिक विकासाच्या दिशेने निघालेल्या जगाला रोखू पाहात होते. प्रगतीचा मार्ग रोखून जगाला अठराव्या शतकात नेऊ इच्छित होते. उपभोग कमी करायचा उपदेश देऊन संन्यासी व्हायला सांगत होते. इत्यादि. हे सर्व आक्षेप बरोबर आहेत? खरंच गांधीजी भौतिक स्तर उंचावण्याची उपेक्षा करत होते? त्यांना भौतिक प्रगतीत रस नव्हता? त्यांनी आर्थिक विचार मांडलेच नन्हते ?

गांधीजी रुढार्थाने अर्थशास्त्रज्ञ नाहीतच. पण माणसाच्या भौतिक गरजा आणि त्या भागवण्यासाठीचे प्रयत्न हा जर अर्थशास्त्रीय विचारांचा केंद्रबिंदू असेल तर गांधीजींनी आर्थिक विचार मांडले नाहींत हे म्हणणे अज्ञानाचेच द्योतक ठरेल.

मनुष्यमात्राच्या गरजा भागणे हा विचार तर गांधीविचाराचा गाभा आहे. अगदी खालच्या स्थानावरच्या उपेक्षित, पीडित, दलित माणसाच्या प्राथमिक गरजा भागल्याच पाहिजेत हा तर त्यांचा आग्रह होता. 'सर्वत्र सुखिनो संतु, सर्वे संतु निरामय' हेच तर त्यांच्या जीवनाचे प्रयोजन होते. प्रत्येक भुकेल्याच्या मुखी अन्नाचा घास जावा ह्यासाठीच त्यांनी ग्रामोद्योगाचा विचार मांडला. अर्थशास्त्र मांडून खादीचा आग्रह धरला.

काहींनी गादीवर लोळत पडून मिठाई व सुकेमेवे खावेत व काहींनी उपाशी पोटी काबाडकष्ट करावेत हे त्यांना मान्य नव्हते. आपल्याला सर्वांना सुख व शांतता हवी आहे ना? भुकेले लोक आपल्या भोवती बसलेले आहेत त्या सर्वांच्या बुभुक्षित नजरा आपल्यावर रोखलेल्या आहेत. अशा परिस्थितीत पंचपक्वांनाचे जेवण जेवून आपल्याला सुख मिळेल? आपल्याला फक्त शरीर नाही, मनही आहे. भावना आहेत. म्हणूनच आशा परिस्थितीत संवेदनशील माणूस जेवूच शकणार नाही. मग सुखी होणे कसे शक्य आहे? हा परिस्थितीत शांतता टिकणे तरी शक्य आहे का? बुभुक्षित लोक शांतता टिकू देतील? आपण आज ज्या भौतिक सुखाचा ध्यास घेतला आहे त्यासाठी सुध्दा समता, सामाजिक न्याय ह्या मूल्यांची जपणूक आवश्यक ठरते. सर्वांच्या सुखाचा विचार गरजेचा ठरतो.

अन्त गरजा, सीमित साधने, मागणीपुरवठ्यानुसार वस्तूची किंमत ठरणे, किंमत देऊन वस्तू विकत घेण्याची कुवत ज्याच्यापाशी आहे अशांच्याच गरजा भागणे. ह्या अर्थशास्त्रीय तत्त्वज्ञानात गांधीजी अडकत नाहीत. एवढेच नव्हे तर आशा अर्थशास्त्राला ते अनर्थशास्त्र म्हणतात. एखाद्या वस्तूची उदा. गव्हाची किंमत देण्याची कुवत असणाऱ्याची गरज प्रथम भागली जाणे हे माणुसकीचे लक्षण नही. तर गव्हाची सर्वाधिक गरज ज्याला आहे त्याची गरज प्रथम भागली जाणे ही माणुसकी आहे. हे माणूसपणाचे तत्वज्ञानच गांधीजींच्या आर्थिक विचाराचा पाया आहे. सामर्थ्य असेल तर भुकेल्याची पोळी हिसकावून घेण्याच्या विकृतीवर पाश्चात्य

अर्थशास्त्राचे इमले उभारलेले आहेत. आपली पोळी भुकेल्याला देण्याच्या मानवीय संस्कृतीवर गांधीजींचे अर्थशास्त्र आधारलेले आहे.

गांधीजींचे अर्थशास्त्र विकेंद्रीकरण, ग्रामोद्योग, लघुउद्योगांना स्थान देते. विश्वस्तवृत्तीचा विचार सांगते. माणसाचे सुख विषम परिस्थितीत शक्य नाही. म्हणूनच गांधीजींच्या अर्थशास्त्राला समतेची उज्ज्वल किनार आहे. प्रत्येकाने शरीरश्रम केले पाहिजेत असा त्यांचा आग्रह आहे. त्याचबरोबर त्यांनी जीवन वेतनाची कल्पना मांडली. जीवन जगण्यासाठी आवश्यक असे जीवन वेतन प्रत्येकाला मिळालेच पाहिजे. हाही आग्रह त्यांनी धरला. वरील दोन गोष्टींच्या आग्रहातून ते 'आहे रे' व 'नाही रे' ह्यांच्यामधील दरी बुजवू पाहत होते. त्यांनी सांगितलेल्या एकादश व्रतात त्यांच्या अर्थशास्त्रीय विचाराशीं सुसंगत आशी पाच व्रते आहेत - अस्तेय, असंग्रह, अस्वाद, शरीरश्रम आणि स्वदेशी उपभोगावर मर्यादा आहेत. गांधीजींच्या अर्थशास्त्राचे महत्वाचे सूत्र आहि. हे सूत्र अंमलात आणले नाही तर चंगळवादामुळे अमर्याद उपभोगामुळे होत असलेला पर्यावरणाचा विनाश कसा रोखता येईल? शिवाय हे सूत्र भौतिक प्रगती नाकारणारे नाही. तर भौतिक प्रगतीला सर्वत्र सुखिनो संतु ही दिशा देणारे आहे. अधिकाधिक वस्तूंच्या उपभोगाने सुख मिळतेच असे नाही. सुख ही एक मानसिक अवस्था आहे. सर्व भौतिक सुखे हात जोडून उभी असतांना गौतम बुद्ध दुःखी का? सुख उपभोग्य वस्तूंच्या संख्येवर नव्हे तर मनाच्या प्रसन्नतेवर अवलंबून असते.

चंगळबादाच्या जाळ्यात अडकलेला आजचा माणूस अधासारखा निसर्ग ओरबाडतोय. पर्यावरणाचा नाश करून माणसाचीच कबर खोदतोय. अमर्याद उपभोगाच्या मागे लागलेला मानव केवळ निसर्गावरच घाला घालतोय असे नाही तर माणुसकीवर माणसाच्या सुरक्षित जीवनावरही घाला घालतोय. सुख-शांतता मिळवण्याचा त्याचा मार्ग चुकतोय, माणसाच्या अमर्याद उपभोगाला निसर्ग कधी पुरा पडू शकत नाही. गांधीजींचे एक प्रसिद्ध वाक्य आहे.

‘प्रत्येकाची गरज भागविण्याची क्षमता निसर्गात आहे पण एकाचाही हव्यास निसर्ग पुरा करू शकत नाही.’

गांधीजींचे अर्थशास्त्रीय विचार डोळसपणे समजून घेऊन जीवनाला नवी दिशा देणे आवश्यक आहे. मुख्यतः गरज व हव्यास ह्यातील सीमारेषा ओळखून उपभोगावर मर्यादा घालण्याचे तत्वज्ञान जीवनात उतरवल्यास आजची आव्हाने आव्हानेच राहणार नाहीत व सुख आंणि शांततापूर्ण समाज हे ध्येय जवळ येईल.

## २६. संकट जागतिकीकरणाचं : उत्तर गांधींचं

मुक्त अर्थव्यवस्था स्वीकारून दोन तपं उलटून गेले तरीही 'उद्याच्या' भरभराटीचे सुरुवातीला केलेले वायदे पूर्ण झालेच नाहीत. ज्या उद्याची आपण वाट पाहतोय तो उगवण्याची शक्यताही दृष्टीपथात नाहीये. ह्या १७ वर्षात जागतिकीकरणाचा झंझावात प्रबळ झाला. त्यात अनेकांची जीवने पाचोळ्यासारखी उडून जाताहेत. जीवन कमालीचं अस्थिर आणि असुरक्षित झालं आहे. प्रारंभी दुर्बल घटक अर्थव्यवस्थेच्या परिघाबाहेर फेकले गेले. जागतिकीकरणाच्या नावाखाली केलेल्या नियोजनात त्यांच्या जीवनाचा, त्यांच्या जगण्याचा विचारच केलेला नसतो. निम्न मध्यमवर्ग परिघाबाहेर फेकला जाण्याची प्रक्रिया वेग घेतेय, मध्यमवर्गही परिघाच्या दिशेने सरकतो आहे आणि उच्च मध्यमवर्गाचा प्रवास मात्र उलट्या दिशेने, केंद्राच्या दिशेने वेगाने सुरू आहे. शासकीय व निमशासकीय क्षेत्रातील आणि कार्पोरेट जगतातील गलेलठ्ठ पगार घेणारे उच्चपदस्थ आणि पाचव्या वेतन आयोगाचा लाभ पदरात पडल्याने उच्चवर्गाच्या जवळ सरकलेले सर्व ह्या वर्गात मोडतात. ह्याच वर्गात महाविद्यालयातील अध्यापक आहेत. खरे तर ह्या बुद्धिजीवी वर्गाने विविध समस्यांचा अभ्यास करून समतेच्या निकषावर इष्टानिष्ठता तपासून समाजाला मार्गदर्शन करायला हवं'. पण हा वर्ग अतिशय आत्मकेंद्री झाला आहे. उच्चवर्गाला बिलगून बसण्यातच धन्यता मानतोय. १५ ते २० टक्के उच्च व मध्यमवर्गाची चंगळ आणि इतरांचं अमंगळ असं आजचं चित्र आहे. जागतिकीकरण आलं आणि समस्या अधिकाधिक उग्र झाल्या. समस्यांची सोडवणूक करून घ्यायची असेल तर समस्येचं मूळ शोधलं पाहिजे. मूळ आहे औद्योगिकीकरणानंतर बदललेल्या उत्पादन पद्धतीत.

औद्योगिक क्रांतीनंतर उत्पादनाचं प्रमाण खूप वाढलं. कच्च्या मालाची आणि मोठ्या बाजारपेठेची गरज वाढली. त्यातून तिसऱ्या जगातील राष्ट्राची गुलामगिरी सुरू झाली. हा औद्योगिकरणाचा राजकीय परिणाम.

आर्थिक क्षेत्रातही प्रचंड उलथापालथ झाली. उत्पादन प्रक्रिया पूर्णपणे बदलली. अधिक भांडवल, गुंतवणूक, मोठमोठे कारखाने, मोठाली यंत्रे व त्यातून होणारे प्रचंड उत्पादन असं त्यांचं स्वरूप झालं. शोषण व विषमता वाढली.

हे शोषण, ही विषमता याविरुद्ध मार्क्सने आवाज उठवला. सम्तेबर आधारलेल्या शोषणविरहित जगाचं स्वप्न त्याने पाहिलं. मार्क्सच्या विचारांचा धागा पकडून रशियात क्रांती झाली. नंतर इतरही काही देश कम्युनिस्ट झेंडयाखाली आले. मोकाट सुटलेल्या भांडवलशाहीला थोडं नियंत्रणात ठेवण्याचं काम कम्युनिस्ट क्रांतीनं केलं. पण कम्युनिझमही कष्टकऱ्यांचं भलं करू शकला नाही. पुढ़े रशियाचंही पतन झालं. आपला विजय झाला आहे. भांडवलशाही हा एकमेव पर्याय आता शिल्लक आहे असं भांडवलशाही राष्ट्रांना वाटलं. ती अधिक मुजोर झाली. पण एकच पर्याय शिल्लक आहे हा त्यांचा भ्रम आहे.

साम्राज्यवादी राष्ट्रांच्या टाचेखाली दडपलेल्या गुलाम देशात स्वातंत्र्याची आंदोलनं सुरू झाली. १९४७ मध्ये भारत स्वतंत्र झाला. पाठोपाठ आनेक देश स्वतंत्र झाले. ह्या नव्याने स्वतंत्र झालेल्या देशांनी आपल्या विकासाच्या दृष्टीने आर्थिक क्षेत्रात बरेच बदल केले. नवे कायदे केले. त्यामुळे भांडवलशाही देशांच्या नफ्यावर आच येऊ लागली. दुसऱ्या महायुद्धानंतर राजकीय गुलामगिरीचे युग संपलं. पण साम्राज्यवादी राष्ट्रांची इतरांवर सत्ता गाजवण्याची प्रवृत्ती संपली नव्हती. मोठ्या बाजारपेठेची गरजही कायम होती. ह्या गरजा भागवण्यासाठी श्रीमंत राष्ट्रांनी वेगवेगळे सापळे रचायला सुरुवात केली. अनेक वेगवेगळी रूपं घेऊन हे सापळे पुढे आले. पहिला सापळा होता विकास ह्या संबोधाचा. अधिक भांडवल गुंतवणूक करणे, मोठमोठे कारखाने उभे करणे, त्यात महाकाय यंत्रे बसवणे आणि प्रचंड प्रमाणावर उत्पादन करणे म्हणजेच विकास. हा विकासाचा नवा अर्थ प्रथम त्यांनी गळी उतरवला. सर्वसामान्य माणसाच्या प्राथमिक गरजा भागताहेत की नाही हा विचारच ह्या विकास कल्पनेत नव्हता. विकासासाठी मदत हा परोपकाराचा बुरखा पांघरून विश्व बँक व आंतरराष्ट्रीय नाणेनिधीचा सापळा पुढे आला;

आणि नवस्वतंत्र राष्ट्रे कर्जाच्या जाळ्यात अडकत गेली. बहुराष्ट्रीय कंपन्या हाही तिसऱ्या जगाला व्यापून टाकणारा एक प्रचंड सापळाच ! साऱ्या जगाच्या अर्थकारणावर भांडवलशाही राष्ट्रींची, विशेषतः अमेरिकेची सत्ता राहावी ह्या हेतूने रचला गेला, गॅट करार नावाचा सापळा. विश्व व्यापार संघटन नावाचा नवा सापळा तर फारच भयंकर आहे. अतिशय सामर्थ्यशाली आहे. जागतिकीकरण मुक्त अर्थव्यवस्था, मुक्त देवाण-घेवाण ही गोंडस रूपं घेऊन आलेले हे सर्व सापळे जगावर श्रीमंत राष्ट्रींची, विशेषतः अमेरिकेची सत्ता प्रस्थापित करताहेत. राजकीय गुलामगिरी संपली. आपल्या देशात तिरंगा फडकतो आहे. पण आपण स्वतंत्र नाही. आपली निर्णय प्रक्रिया वर सांगीतलेल्या सर्व सापळ्यांच्या दावणीला बांधली गेली आहे. ही आहे आर्थिक गुलामगिरी व त्याच्या हातात हात घालून आली आहे सांस्कृतिक गुलामगिरी.

आजच्या सर्व समस्यांचे मूळ औद्योगिक क्रांतीनंतर विकसित झालेल्या केंद्रित उत्पादन पद्धतीत आहे, हे आपण समजून घेतलं पाहिजे. ह्या उत्पादन पद्धतीला पर्याय शोधूनच जागतिकीकरणाचं आव्हान पेलता येणार आहे. असा पर्याय गांधींनी देऊन ठेवला आहे.

भांडवल, सधन मोठाल्या यंत्रांनी सुसज्जीत महाकाय कारखाने हे केंद्रित उत्पादन प्रणालीचे स्वरूप आहे. भरपूर उत्पादन व त्यातून प्रचंड नफा कमावणे हा त्याचा मूलमंत्र ! ही उत्पादन प्रणाली शोषणाशिवाय जगणे अशक्यच असते. श्रमिकांचे व इतर दुर्बल घटकांचे शोषण होत राहते. ह्या पद्धतीत गंगा उलटीच वाहते. आधी प्रचंड उत्पादन, ग्राहकांच्या गरजेचा विचार न करता उत्पादन आणि मग जाहिरातींचा मारा करून वेगवेगळी प्रलोभने दाखवून उत्पादित माल ग्राहकांच्या माथी मारला जातो. जाहिरातीतून वस्तू खरेदीची गरज निर्माण करणारी कितीतरी उदाहरणे सांगता येतील. व्हेक्यूम क्लीनर, वाशिंग मशीन, कूलर यासारख्या वस्तू आज गरज बनल्या आहेत. सौंदर्य प्रसाधनापासून बाटलीबंद शीतपेयं, मेंगी, नूडल्स, पिझ्झा इत्यादी वस्तूंपर्यंत सर्वच वस्तूंच्या जाहिरातींचा प्रचंड मारा चालू असतो. त्यामुळे खरेदी होत राहते. अशा पद्धतीने ग्राहकांचेही शोषण होत राहते. शिवाय चंगळवाद वाढतो. भ्रष्टाचार बोकाळतो.

शोषणातून फक्त षिमताच जन्म घेते. गरीबांच्या वाट्याला बेकारी, उपासमार आणि दारिद्र्यच येते. अधिक उत्पादन आणि अधिक नफ्यासाठी नैसर्गिक साधन संपत्तीची प्रचंड लूट सुरू होते. त्यातून निर्माण होणारे पर्यावरणाचे प्रश्न मानवाच्या अस्तित्वावरच घाला घालताहेत. नफ्याच्या लालसेने जीवघेणी स्पर्धा सुरू होते.त्यातून जन्म घेतो हिंसाचार आणि दहशतवाद. कच्च्या व पक्कया मालाच्या ने-आणिसाठी रस्त्यांचं जाळं व मोठी वाहतूक यंत्रणा इथे गरजेची असते. त्यातून वाढत जातं प्रदूषण, जागतिकीकरणातून निर्माण होणाऱ्या सर्व प्रश्नांचे मूळ त्यांनी स्वीकारलेल्या उत्पादन प्रणालीत आहे.

गांधीजींच्या आर्थिक विचारातून पुढे आलेली उत्पादन प्रणाली खूप वेगळी आहे. गांधीजी विकेंद्रीकरणावर भर देतात. ग्रामोद्योगांना अर्थव्यवस्थेच्या केंद्रस्थानी मानतात. आणि उत्पादनाच्या केंद्रस्थानी असते ग्राहकांची गरज. त्यामुळे ते खपवण्यासाठी जाहिरातींच्या माऱ्याची गरज नसते. खेड्याच्या स्वयंपूर्ततेवर ते भर देतात. उत्पादनाचं प्रमाण कमीच राहील, त्यामुळे निसर्ग संपत्तीची लूट थांबेल. चंगळवादाला आळा बसेल. प्रदूषण पर्यावरणाचे प्रश्न भेडसावणार नाहीत. ग्रामोद्योग हे श्रमप्रधान असल्याने सर्वांना रोजगार मिळेल. खेड्यातच काम मिळाल्याने खेडी ओस पडणे आणि शहरात झोपडपट्ट्यांची वाढ होणे ही समस्याही सुटेल. जागतिकीकरणातून निर्माण होणाऱ्या प्रत्येक समस्येला येथे उत्तर सापडेल.

गांधी प्रणित विकेंद्रित, ग्रामोद्योग प्रधान उत्पादन प्रणाली राबवणे म्हणजे पूर्वीची अवजारे व पूर्वापार चालत आलेले तंत्रज्ञान वापरणे नव्हे. समताधिष्ठित शोषणविरहित अहिंसक शाश्वत समाजनिर्मिती हे गांधीजींचे ध्येय होते. ते सतत नजरेंसमोर ठेवून आधुनिक विज्ञान तंत्रज्ञानाची जोड ग्रामोद्योगांना द्यावी लागेल. ग्रामोपयोगी विज्ञान व सुयोग्य तंत्रज्ञान विकसित करावे लागेल. म्हणजे श्रमिकांचे कष्ट हलके होतील. व मालाचा दर्जाही सुधारेल.

जागतिकीकरणाचे आव्हान पेलणे अशक्य आहे. अशी हतबलता बऱ्याचदा व्यक्त होत असते. गांधींनी सांगितलेला पर्याय हेच खरे बलस्थान आहे. त्या दिशेने पावले उचलण्यासाठी

हवी इच्छाशक्ती व प्रामाणिक आणि डोळस प्रयत्न. गांधीविचार हा पुस्तकात बद्ध असणारा विचार नव्हे. उपभोगावर नियंत्रण ठेवणारी ती एक संयमित जीवनशैली आहे. निष्ठापूर्वक त्या दिशेने वाटचाल ही काळाची गरज आहे. अन्यथा समस्या अधिकाधिक उग्र होतील. कवि दिनकरांच्या ओळी हेच सांगताहेत -

**लो गांधी की शरण, बदल डालो संसार**

**अथवा कल्की के हाथों मरने को हो तैयार**

**आ पहुँची है घडी, फैसला अब करना होगा**

**दो में से किसी एक राह पर पगले, पग धरना होगा।**

# २७. मानव जातीची किंमत देऊनच गांधीजी विसरता येतील

विसावे शतक संपून आपण सर्व उत्साहाने एकविसाव्या शतकात झेपावतो आहोत. अनेक प्रकारांनी विसाव्या शतकाचं सिंहावलोकन केलं जातंय. विसाव्या शतकातील सर्वश्रेष्ठ व्यक्तीचा शोध ही सिंहावलोकनाची एक दिशा. अनेक वृत्तसंस्था, इतर संस्था, प्रसार माध्यमं इत्यादींनी जनमत चाचण्यांच्या आधारे असा शोध जगभर घेतला. बऱ्याच चाचण्यांमध्ये विसाव्या शतकातील सर्वश्रेष्ठ व्यक्ती म्हणून जगभरच्या लोकांनी महात्मा गांधींची निवड केली. परंतु एकविसाव्या शतकाला सामोरे जात असतांना गांधी विचार उपयुक्त ठरतील का? ज्या विसाव्या शतकात गांधीजी कार्यरत होते, तेव्हा अनेकांना ते विचार कालबाह्य वाटले. गांधीजी प्रगतीची चाके उलटी फिरवून जगाला अठराव्या शतकात नेताहेत अशी टीका अनेकांनी केली. ते विचार एकविसाव्या शतकाला सुसंगत ठरतील का? ह्या प्रश्नाचा शोध घेण्याचा येथे प्रयत्न केला आहे.

विसाव्या शतकात ज्या बदलांची वाटचाल सुरू झाली त्या बदलांनी शतक संपता संपता खूपच गती घेतली. एकविसाव्या शतकात बदल आणि त्यांची गती खूपच वाढणार आहे. माणसाला ती पेलवेल का असा प्रश्न पडतो आहे. सर्व दिशांनी वेगांने बदलणाऱ्या जगात अपरिवर्तनीय अशी काही शाश्वत तत्वेही आहेत. ही तत्वेच गांधी विचारांना अनुप्रणित करीत आली आहेत. आणि म्हणूनच गांधी विचार जुना किंवा कालबाह्य होईल असे वाटत नाही. त्यांची उपयुक्तता स्थलकालातीत आहे.

गांधी विचारांची उपयुक्तता आपल्याला तीन पातळ्यांवर बघता येईल. (१) व्यक्तीच्या संदर्भात (२) भारताच्या संदर्भात (३) जागतिक संदर्भात

**व्यक्तीच्या संदर्भात गांधी विचारांची उपयुक्तता**

पूर्णत्वाच्या दिशेने प्रवास करू पाहणाऱ्या प्रत्येक मानवाच्या दृष्टीने गांधीजींची जीवन-कथा खूप महत्वाची आहे. प्रेरक आहे. आज आहे त्यापेक्षा वरच्या पातळीवर जाण्याची

महत्वाकांक्षा प्रत्येक मानवात कमी -अधिक प्रमाणात असतेच. आशा प्रत्येक व्यक्तीला गांधीजींची जीवनकथा एक मोलाचा विचार सांगते. माणूस अनेक मानसिक दुर्बलतांनी वेढलेला आहे. साऱ्यांमध्ये अनेक उणीवा आहेत: त्याच बरोबर ह्या उणीवा व दुर्बलतांवर मात करून उर्ध्वगामी प्रवासाची महत्वाकांक्षा मानवाच्या मनात असते. माणसांमधील उणीवा सतत मागण्या करणारे त्याचे मन आणि त्याची उर्ध्वगामी प्रवासाची महत्वाकांक्षा ह्यात सतत संघर्ष चालू असतो. ह्या संघर्षात विजय संपादन करण्यासाठी व्यक्तीला प्रेरक हवे असते. सामर्थ्य हवे असते आणि व्यावहारिक पातळीवरील मार्गदर्शनही हवे असते. गांधीजींच्या जीवनातून ही प्रेरणा व व्यावहारिक मार्गदर्शन निश्चितच मिळते व सामर्थ्य मिळवण्याचा मार्ग सापडतो.

गांधीजींना माणसाच्या शारीरिक पातळीवरील गरजांचे भान होते. दुर्बलतांचेही भान होते. हे भान स्वानुभवातून आले होते. गांधीजी संन्यस्त जीवन जगले पण संन्याशाचे जीवन जगले नाहीत. ते तुमच्या आमच्यासारखेच कुटुंबवत्सल होते. मुले, सुना, नातवंडे ह्यांच्या संदर्भातील सर्व जबाबदाऱ्या त्यांनी कुटुंबप्रमुखाप्रमाणे सतत पार पाडल्या आहेत. त्याचवेळी ते देशाच्या राजकारणाचे नेतृत्व करत होते. समाजकारणाला दिशा देत होते. ह्या विविध क्षेत्रातील सर्व जबाबदाऱ्या ते अतिशय समर्थपणे पार पाडीत होते. हे करीत असतांना त्यांच्या चुकाही झाल्या. आपल्या सर्वच चुका त्यांनी अतिशय प्रांजलपणे मान्य केल्या आहेत. लहानपणी आपल्या चुका बढिलांना पत्र लिहन कबूल केल्या. तर मोठेपणी आपल्याचुका, आपल्या दुर्बलता हरिजन किंवा यंग इंडिया सारख्या वृत्तपत्रातून त्यांनी जनतेसमोर मांडल्या. गांधीजींचा सर्व जीवन-प्रवास हा आपल्या दुर्बलतांवर मात करून श्रेष्ठ नैतिक जीवन जगण्याच्या प्रयत्नांची कथा आहे. गांधी असामान्य बुद्धीमत्तेचे नव्हते. दिसायला ही चारचौघांसारखेच होते. त्यांच्यामध्ये अनेक दुर्बलता होत्या. त्यांनीही जीवनात अनेक चुका केल्या आहेत. तेही कुटुंबवत्सल होते. हे सर्व त्यांच्या चरित्रातून आपल्याला जाणवते की ते आपल्यासारखेच एक होते ही भावना निर्माण होते. दुरावा संपतो. गांधीजी आपल्यासारखेच असूनही देवमाणूस झाले. असामान्य ठरले. महात्मा झाले. हे

वास्तव प्रत्येकाला उर्ध्वगामी प्रवासाची प्रेरणा देणारे ठरते. ते प्रत्येकासाठीच एक मार्गदर्शक ठरतात.

सामान्यातून असामान्य व्यक्तित्व साकारणं, स्खलनशील माणूस देवमाणूस बनणं, सतत चुका करणारा महात्मा बनणं हे सर्व गांधीजींच्या जीवनातून आपल्याला दिसतं. अतिशय नितळ पारदर्शी व्यक्तित्वाचे संपूर्ण जीवन आपल्यासमोर एखाद्या पुस्तकासारखे उघडे आहे. ते वाचणार की डोळे मिटून घेणार ? डोळसपणे वाचल्यास उर्ध्वगामी प्रवासासाठी निश्चितच मार्गदर्शन लाभेल.

असामान्यत्वाच्या दिशेने गांधीजींची प्रगती ही अचानक एकाएकी झालेले परिवर्तन नाही. तो दैवी चमत्कारही नाही. एखाद्या संतपुरुषाच्या आशीर्वादाचाही तो परिणाम नाही. सत्याला स्मरून आत्मसंयमाच्या मार्गाने केलेल्या सततच्या प्रयत्नांचा तो परिणाम आहे. चुकत, अडखळत, संघर्ष करत युवक गांधी महात्मा गांधी झाला आहे. ही वस्तुस्थिती आपल्या सारख्यांना दिलासा देणारी, प्रेरणा देणारी ठरते. गांधीजींनी असे म्हटले आहे की मी जे केले आणि करतो आहे ते करण्याचे माझ्याइतकेच सामर्थ्य प्रत्येकामध्ये आहे. अगदी लहान बालकामध्येही आहे. गरज आहे प्रामाणिक प्रयत्नांची.

पूर्णत्वाच्या प्रवासाची प्रेरणा घेऊन आलेल्या प्रत्येक व्यक्तीसाठी गांधीजींच्या पेक्षा अधिक उपयुक्त अधिक उचित जीवन कोणाचे असेल ?

**भारताच्या संदर्भात गांधी विचारांची उपयुक्तता**

आजचे भारताचे चित्र सुखावह नाही. अनेक भेडसावणाऱ्या समस्यांच्या काळोख्या रात्रीतून आपला प्रवास चालू आहे. खरं तर प्रकाश आपल्या जवळच आहे. त्यावर साचलेली किंवा आपल्या करंटेपणाने साचू दिलेली राख झटकण्याची गरज आहे.

आपण आपल्या प्रजातंत्राचा सुवर्ण महोत्सव साजरा करतो. आपले संविधान स्वातंत्र्य, समता, बंधुता व सामाजिक न्यायाची हमी देते. पण प्रत्यक्षात कुठे आहे समता ? सामाजिक न्याय तर विसरलाच गेला आहे. जागतिकीकरणामुळे तळागाळातले लोक अधिक दुर्बल होताहेत. परिघाबाहेर फेकले जाताहेत. बळी तो कान पिळी हा जंगलचा न्याय सामाजिक न्यायाची जागा घेतोय. गांधीजींचे विचार विसरून पाश्चात्यांचं विकासाचं मॉडेल आपण स्वीकारलं. कागदोपत्री विकासाची नोंद झाली. पण प्रत्यक्षात अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण आणि आरोग्य ह्या प्राथमिक गरजाही प्रत्येकाच्या भागवता आल्या नाहीत. प्रत्येक तहानेल्याला स्वच्छ पिण्याचं पाणी देण्याची व्यवस्थाही आपण करू शकलो नाही. विकासाच्या नावाखाली विपन्नतेच्या वाळबंटात संपन्नतेची ४-२ हिरवी बेटे फक्त निर्माण झाली. ह्या विकासप्रक्रियेचा आधार आहे. भांडवलशाही तत्वज्ञान आहे वसाहतवादी. उपभोगवाद, चंगळवाद हा ह्या प्रक्रियेवा अपरिहार्य परिणाम आहे. कारण अधिक उत्पादन व अधिक उपभोग हे ह्या विकासाचे गमक आहे. शोषणाशिवाय ही उत्पादनप्रक्रिया जिवंत राहू शकत नाही. शोषण आले की विषमता व दारिद्र्य येणारच आणि ह्या सर्वांचं बोट धरून येतो भ्रष्टाचार.

ह्या सर्व पार्श्वभूमिवर मानवी जीवनाचा समग्रपणे विचार करणारी गांधीजींची जीवनदृष्ठी फार मोलाची ठरते. माणूस गांधीविचाराच्या सतत केन्द्रस्थानी राहिला आहे. माणसाकडे पाठ फिरवून केवळ अधिकाधिक वस्तूच्या निर्मितीला अभिमुख झालेली व्यवस्था गांधीजी स्पष्टपणे नाकारतात. सर्वात खालच्या पातळीवरील माणसाचे सुख ज्यातून साध्य होईल अशी व्यवस्था ते आपल्या समोर ठेवतात. अंत्योदयाचा विचार मांडतात. स्वयंपूर्ण खेडी आणि ग्रामस्वराज्याचा विचार सांगतात. निसर्गावर अधिराज्य गाजवण्याची मूर्ख महत्वाकांक्षा बाळगणाऱ्या मानवाला निसर्गाशी सहकार्य करायला सांगतात. विज्ञानाला अध्यात्माची जोड देतात. शोषणविरहित अहिंसक समाज-व्यवस्थेचा आराखडा समोर ठेवतात. उपभोगावर मर्यादा घालण्याची शिकवण

देतात. प्रगतीचा प्रारंभ खेड्यातून व्हायला हवा असे सांगतात. विकेंद्रित अर्थव्यवस्था व राज्यव्यवस्थेचा आग्रह धरतात.

विषमतेच्या निराकरणाची, त्यातून अंत्योदय साध्य करण्याची ही प्रक्रिया सामूहिक नैतिक आरोहणाची सुरुवात ठरायला हवी. हे आरोहण जनसामान्यांच्या पराक्रमातून उदयाला यायला हवे. ही सर्व प्रक्रिया सत्तानिरपेक्ष व पक्षनिरपेक्ष हवी. असे क्रांतिकारी मार्गदर्शन गांधीजींनी केले आहे. भारताच्या आजच्या भेडसावणाऱ्या समस्यांची आव्हाने गांधीविचारच समर्थपणे पेलू शकतो. त्या मार्गाने जाऊनच जनसामान्यांचे भले करणाऱ्या प्रगतीचा मार्ग उजळेल.

**जागतिक संदर्भात गांधीविचाराची उपयुक्तता**

उपयुक्ततेचां सम्यक विचार करण्यासाठी प्रथम आजच्या जागतिक परिस्थितीचे आकलन करून घेणे आवश्यक आहे.

उदार मतवादी लोकशाही आणि एकाधिकारशाही ह्या दोन्हीं व्यवस्थांच्या पराभवाच्या काळात आजचे जग जगत आहे. रशियातील घडामोडी एकाधिकारशाहीचा पराभव अधोरेखित करीत आहेत. उदारमतवादी लोकशाहीही जनसामान्यांचे भले करू शकलेली नाही. आजची लोकशाही व्यवस्था खरी लोकशाही नाहीच. भांडवलदांनी ती आपल्या दावणीला बांधली आहे. सत्ताधीश, धनाधीश व समाज कंटक ह्यांच्या युतीखेरीज ही व्यवस्था टिकू शकत नाही. एकच वैचारिक पृष्ठभूमी दोन्ही प्रणालींचा आधार आहे. दोन्हींचा उगम यूरोपमधल्या वैचारिक प्रबोधनात सापडतो. दोनहीं प्रणालींना औद्योगिक क्रांतीची पार्श्वभूमी आहे. त्यामुळे फरक वरवरचा आहे. गुणात्मक फरक फारसा नाहीच. उत्पादन वृध्दी म्हणजे विकास हाच संबोध दोन्ही प्रणालींनी स्वीकारला आहे. केंद्रीकरण, मोठे उद्योगधंदे उभारणे, तंत्रज्ञान ह्यावर दोन्हीं प्रणाली भर देतात. दोन्हींच्या अपयशानंतर तिसऱ्या प्रणालीचा शोध आवश्यक ठरतो. असा शोध

घेतां नवीन जीवनदर्शन देणारी नव वैचारिक पृष्ठभूमि विचारात घ्यावी लागेल. अनुकूल जीवनशैली विकसित करावी लागेल. नवे जीवनदर्शन गांधीविचारात आपल्याला गवसते. तिसऱ्या प्रणालीच्या शोधाचा प्रवास गांधी विचारांचा मागोवा घेऊनच सुकरतेने करता येणार आहे.

आज माणूस तंत्रज्ञानाच्या मागे लागला आहे. उच्च तंत्रज्ञानाच्या वापरातून अधिक वस्तूंच्या उत्पादनाचा हव्यास त्याला लागला आहे. जीवघेण्या भ्रामक प्रगतीच्या दिशेने तो स्वतःची दमछाक झाली तरी उर फुटेपर्यंत धावत सुटलाय. त्यातून पर्यावरणाचे, ऊर्जेचे प्रश्न निर्माण झाले आहेत. सत्ता व संपत्तीच्या हव्यासापोटी तो अधाशासारखा निसर्ग ओरबाडत सुटलाय. माणसाच्या गरजा भागवण्याची निसर्गाची क्षमता अमर्याद नाही हे तो विसरतोय. एकविसाव्या शतकात प्रवेश करणाऱ्या प्रत्येक माणसाने गांधीजींचे वाक्य लक्षात ठेवायला हवे की निसर्ग प्रत्येकाची गरज भागवू शकतो पण एकाचाही हव्यास पूरा करण्याची क्षमता निसर्गात नाही. गांधीजींचे सीमित उपभोगाचे तत्त्व, संयमाची शिकवण, मर्यादांचे तत्त्वज्ञान पूर्णपणे विसरून जगाची वाटचाल चालली आहे. प्रगतीच्या नावाखाली माणूस स्वतःनच्याच मृत्युचा सापळा तयार करतो आहे.

१९७२ मध्ये जगभरच्या शास्त्रज्ञांनी विकासातील हे धोके ओळखले व 'लिमिट्स टू ग्रोथ' ह्या पुस्तकात ते विस्ताराने स्पष्ट केले. गांधीजींनी तर १९०८ मध्येच आपल्या 'हिंद स्वराज' ह्या पुस्तकात औद्योगिककरणानंतर आलेल्या संस्कृतीचे धोके आपल्या समोर मांडले आहेत.

आज एकविसाव्या शतकात प्रवेश करतांना सर्वसामान्य माणसांना कदाचित गांधीजींचे विचार कालबाह्य वाटत असतील. पण संपूर्ण जगातील वेगवेगळ्या क्षेत्रातील विचारवंत, वेगवेगळ्या ज्ञानशाखातील अभ्यासक, परिवर्तनवादी चळवळीतील विचारवंत व कार्यकर्ते. कधी गांधींचे नाव घेऊन आणि कधी नाव न घेताही गांधीजींचा विचार बोलून दाखवतांना दिसतात. जगातील अग्रगण्य विचारवंताना गांधी जीवन दर्शनाच्या स्थापनेची गरज भासते आहे.

हे लक्षणीय आहे. तिसऱ्या महायुद्धाचे भय व गांधीजींच्या अहिंसेची शिकवण एवढ्यापुरतीच ही गरज सीमित नाही. माणसाच्या समग्र जीवनाचा विचार करणारा गांधीजींचा विचारच आज माणसाचे अस्तित्व सुरक्षित ठेवू शकतो. हे पटल्यामुळेच गांधीजींचे जीवनदर्शन आज गरजेचे वाटते आहे.

आज शुभाखर सारखा अर्थशास्त्रज्ञ गांधीविचारांचे महत्व पटवून देताना दिसतो. पर्यावरण क्षेत्रातील विचारवंत गांधी विचारांशी आपले नाते सांगतात. फ्रीजाफ कापरा सारखा समाजशास्त्रज्ञ स्वतःच्या चिंतनातून गांधीविचारच बोलून दाखवतांना दिसतो. आल्विन टाफलरसारखा पत्रकार गाँधीविचारासंबंधी स्वागतशील दृष्टी ठेवतो. आजच्या प्रचलित अर्थव्यवस्थेचे आत्मघातकी स्वरूप विषद करून शुभाखर प्रश्न उपस्थित करतो की 'ह्यावर उत्तर कोणते?' आणि स्वतःच उत्तरही देतो. तो म्हणतो, 'मला वाटते ह्या प्रश्नाचे उत्तर गांरधीनी दिले आहे.'

प्रचलित जीवनपद्धतीपेक्षा पूर्णपणे वेगळ्या अशा जीवनपद्धतीचा स्वीकार केल्या खेरीज एकविसाव्या शतकातील वाटचाल सुखकर व सुकर होणार नाही ह्याची जाणीव जगभरच्या विचारकांना झालेली आहे. नवी जीवनपद्धती गांधींच्या दिशेने जाणारी असेल ह्या बदलही सर्वांची खात्री झालेली दिसते.

व्यक्तिच्या संदर्भात भारताच्या संदर्भात व जागतिक संदर्भात गांधी विसरून चालणार नाही. १९५९ मध्ये मार्टिन किंग लूथर भारतात आले होते तेव्हा ते म्हणाले होते की गांधी विचारापासून आपली सुटका करून घेतल्यास मानवाची प्रगती खुंटेल. अखिल मानव जातीची किंमत देऊनच तुम्हाला गांधी विसरता येईल.

## २८. मार्गदर्शन : आजच्या संकटातून सुटण्याचे

'हिंद स्वराज' हे १९०९ साली लिहिलेलं गांधीजींचं अत्यंत महत्वाचं पुस्तक. पुढे विकसित झालेल्या गांधी-विचारांची सारी बीजं या पुस्तकात सापडतात. त्याला गांधी विचाराचा मॅनिफेस्टो म्हटलं जातं. २००९ हे वर्ष हिंद स्वराजचं शताब्दी वर्ष. एकविसाव्या शतकाच्या पहिल्या दशकात त्याची शताब्दी साजरी करण्याचं औचित्य काय ? अखिल मानव जातीच्या कल्याणाचा विचार त्यात आहे. आजही तो मोलाचा आहे. आजच्या संकटातून मुक्त होण्याचा मार्ग त्यात सापडतो.

आज सारं जग संकटग्रस्त आहे ही संकट दोन प्रकारची आहेत. एक म्हणजे वाढता हिंसाचार, खून, मारामाऱ्या दहशतवादी हल्ले, युद्ध; त्यामुळे शांत सुरक्षित जीवन हरवलंय. सारं जग हिंसेला विटलं आहे. शांततेची तहान लागलीय म्हणून २ ऑक्टोंबर हा 'अहिंसा दिवस' घोषित करायला एकमुखी पाठिंबा मिळाला. दुसरं संकट आहे औद्योगिक क्रांतीनंतर विकसित झालेल्या पाश्चात्य सभ्यतेचं. हिंसावादी संप्रदायाला अहिंसक मार्गाचं मार्गदर्शन करणं आणि पाश्चात्य सभ्यतेचं खंडन करून खरी सभ्यता कोणती हे सांगणं हे हिंद-स्वराज या पुस्तकातील गाभ्याचे विचार आहेत.

पुस्तक केवळ शंभर पानांचं. शैली अतिशय साधी बाळबोध, भाषा शैली तरीही पुस्तक समजायला अवधघड वाटतं. पाश्चात्य सभ्यतेच्या झगमगाटाने दिपलेल्या डोळ्यांना शब्दांपलीकडचं समजणं कठीणच. पुस्तकाचं खऱ्या अर्थाने आकलन करून घ्यायचं असेल तर प्रारंभीच गांधीजींच्या शब्दातील 'हिंद स्वराज : संपूर्ण जीवन विचार' हे प्रास्ताविक पूर्वग्रह दूर सारून काळजीपूर्वक वाचलं पाहिजे.

प्रास्ताविकात गांधीजी म्हणतात. हे पुस्तक द्वेषाऐवजी प्रेममावाची शिकवण देतं. हिंसेऐवजी आत्मबलिदानाची प्रेरणा देतं. पाशवी बळाचा सामना करण्यासाठी आत्मबळ उभं

करतं. हे एक वाक्य जरी लक्षात ठेवलं आणि आचरणात उतरवलं तरी आजच्या हिंसाचारातून मुक्ती मिळेल.

आजची वाढती सत्ता स्पर्धा त्यातून निर्माण होणारे हेवेदावे आणि द्वेष-मत्सर याला गांधींनी नेमून केलेला प्रेमधर्मच उत्तर ठरू शकतो. हिंसेऐवजी गांधीजींची आत्मबलिदानाची प्रेरणाच आज जगाला तारणार आहे. पाशवी बळाचा मुकाबला आत्मबळाने करण्याची त्याची शिकवणच आज जगाचं अस्तित्व टिकवून ठेवणार आहे. १९०९ साली हे पुस्तक लिहिलं गेलं. १९०६ साली आफ्रिकेतील अहिंसक सत्याग्रहाचा प्रारंभ झाला होता. तीन वर्षाचा समृध्द अनुभव गांधीजींच्या गाठी होता. म्हणूनच त्याविषयी त्यांनी आत्मविश्वासाने मांडणी केली आहे.

पाश्चात्य सभ्यतेचा विरोध हा पुस्तकातील दुसरा महत्वाचा विचार. इंग्लंडमध्ये शिकत असतांना त्यांनी या सभ्यतेचं जवळून दर्शन घेतलं होतं. त्याचं ओंगळवाणं स्वरूप त्यांच्या लक्षात आल होतं. त्या सभ्यतेचे दोष दाखवणाऱ्या अनेक पाश्चात्य लेखकांची पुस्तकं त्यांनी वाचली होती. या पुस्तकाला एक परिपक्व विचारी माणसाच्या अभ्यास चिंतन व अनुभवाचा आधार आहे.

औद्योगिक क्रांतीनंतर विकसित झालेली पाश्चात्य सभ्यता भांडवलप्रधान केंद्रित उत्पादनाला महत्व देते. नफ्याची लालसा, स्वार्थ भ्रष्टाचार, चंगळवाद ही त्याची अपत्ये. या सभ्यतेने विकासाचा एक नवा संबोध गळी उतरवला. त्यातूनच निर्माण झाली एक संकटमालिका - दारिद्र्य, बेरोजगारी, उपासमार, प्रदूषण, पर्यावरण विनाश, निसर्गसंपत्ती संपुष्टात येण्याचा धोका, ग्लोबल वार्मिंग आणि हवामान बदल.

गांधीजी म्हणतात, पाश्चात्य सभ्यता सुखोपभोगावर आधारलेली आहे. बाह्य वस्तूच्या शोधाला आणि शरीर-सुखाला ती पुरुषार्थ मानते. हात-पाय न हलवता सर्व मिळणे याला विकास म्हणते. त्यात नीतिधर्म नाहीच. ती नीतिमान लोकांपेक्षा सत्ता व मत्ता असणाऱ्यांना मुजरा करते.

प्राचीन भारतीय सभ्यतेचा पर्याय गांधीजी पुढे करतात. गांधीजी पुनरुज्जीवनवादी होते. असा त्याचा अर्थ होत नाही. ते स्वतःच म्हणतात की, तथाकथित अंधारयुगात परत जाण्याचा हा प्रयत्न नाही. गांधीजी जुन्या भारतीय संस्कृतीची मुळं कायम ठेवून त्यावर नव्या विचारांचे कलम करू इच्छित होते. नवीन आणि प्राचीन परंपरा आणि परिवर्तन याचा अनोखा संगम गांधी विचारात आहे.

गांधीजी म्हणतात, प्राचीन भारतीय सभ्यता नैतिकतेवर उभारलेली आहे. उच्च मानवीय गुणांना त्यात स्थान आहे. संयम, इंद्रिय निग्रह, अपरिग्रह, त्याग, सहकार्य, कर्तव्यपालन ही या सभ्यतेची ठळक वैशिष्ट्ये. येथील न्यायदानाची पद्धत, भांडण मिटवण्यावर भर देत होती. ही सभ्यता सत्ता आणि संपत्तीपेक्षा राजे-महाराजांपेक्षा नीतिमान ऋषिमुनींना मान देते. भारतीयांनी पाश्चात्य उपभोगवादी सभ्यतेने भुलून जाऊ नये. भारतीयांच्या संयमावर आधारलेल्या नैतिक सभ्यतेची कास धरावी. असे आवाहन ते या पुस्तकात करतात.

गांधीजी एक धोक्याचा इशाराही देतात. जर आपण वेळीच सावध झालो नाही तर या पाश्चात्य सभ्यतेच्या स्वतःच लावलेल्या आगीत माणूस जळून भस्मसात होईल आणि जग बेचिराख होईल.

गांधी विचाराची कास धरू या किंवा हाराकिरीला तयार होऊ या. दोनच पर्याय आज जगासमोर आहेत.

## २९. पहिला पर्यावरणीय विचार-आचारवंत

पर्यावरणाचा ऱ्हास हा आज साऱ्या जगाच्या चिंतेचा विषय झाला आहे. कारण पर्यावरणाच्या ऱ्हासाने अखिल मानवजातीचे जीवन समस्याग्रस्त झाले आहे. त्याचे अस्तित्वच धोक्यात आले आहे. सर्व समस्या कमी-अधिक प्रमाणात साऱ्या जगाला त्रस्त करताहेत. समस्यांची यादी खूप मोठी आहे. वैयक्तिक पातळीवरील दारिद्र्य व बेरोजगारी, भ्रष्टाचार, खून, मारामाऱ्या, असुरक्षितता, प्रदूषण, उर्जा आणि पाण्याचे प्रश्न, शारीरिक आणि मानसिक अनारोग्य इत्यादी. निसर्गाच्या पातळीवर भूगर्भातील पाण्याची पातळी खाली जाणे, जमीन नापिक होणे. जमीन पाणथळ होणे किंवा तिचे वाळवंटीकरण होणे, जंगल नष्ट होणे नैसर्गिक संसाधने संपणे इत्यादी. जागतिक पातळीवर वाढता हिंसाचार, दहशतवाद, हवामान बदल आणि ग्लोबल वार्मिंग इत्यादी या यादीत आणखीही भर घालता येईल. अनेक भेडसावणाऱ्या समस्यांमुळे पर्यावरणाचा विचार आज सर्व पातळ्यांवर होतांना दिसतो. तो विषय इतका महत्वाचा मानला जातोय की शालेय अभ्यासक्रमातही तो दाखल झाला आहे. पण केवळ विचार, चिंता करून किंवा त्या विषयाचा शालेय अभ्यासक्रमात समावेश करून पर्यावरणाचा ऱ्हास थोपवून धरता येणार नाही. त्यापुढे जाऊन ऱ्हासांच्या मूळ कारणांचा शोध घ्यायला हवा. दुर्दैवाने तसे होतांना दिसत नाही. त्यामुळे समस्या अधिकच उग्र होताहेत. पर्यावरण ऱ्हासाच्या मूळ कारणांकडे लक्ष न दिल्याने आजचे पर्यावरण रक्षणाचे प्रयत्न वरवच्या मलमपट्टीसारखे होताहेत. उदाहरणार्थ पाण्याचा प्रश्न. तो जागतिक पातळीवर उग्र होताना दिसतोय. ती समस्या सोडवण्यासाठी पाणी वाचवण्याचा, घरावर पडणारे पावसाचे पाणी साठवण्याचा संदेश दिला जातोय. त्या दृष्टीने लोक प्रयत्न करताहेत. भरपूर पाणी लागणाऱ्या बांधकामांना प्रतिबंध करण्याचा विचारही होताना दिसत नाही. भरपूर पाणी लागणाऱ्या उसाच्या शेतीवर नियंत्रण आणण्याचा प्रयत्न होत नाही. जंगले नष्ट होताहेत त्यामुळे वृक्षयोपणासारख्या मोहिमा राबवल्या जाताहेत. त्याबरोबर फर्निचरसाठी, कागदासाठी, टिश्यूपेपरसाठी वृक्षतोड चालूच असते. त्याचा विचार होत नाही.

आज वरवरचे जे प्रयत्न होताहेत, ते व्यक्तिला जाणीव करून देण्याच्या दृष्टीने महत्वाचे आहेतच, पण त्याने पर्यावरण रक्षणाच्या दृष्टीने फारसे काही होणार नाही. ऱ्हासाच्या मूळ कारणांचा शोध घेऊन त्यांचे निराकरण आवश्यक आहे.

**औद्योगिक क्रांतीनंतर**

पर्यावरण ऱ्हासाचं मूळ कारण आहे. औद्योगिक क्रांतीनंतर विकसित झालेली भांडवलप्रधान अर्थव्यवस्था आणि येंत्र-तंत्र प्रधानतेला गांधींनी आपला विरोध नोंदविला आहे. भांडवल प्रधान अर्थव्यवस्था आणि यांत्रिक प्रगती यामुळे होणारे प्रचंड प्रमाणावर उत्पादन, उपभोगासाठी विपुल साधनांची उपलब्धता, या गोष्टींना माणसं वरदान मानत होती. अधिकाधिक प्रगती व्हावी, त्या काळात गांधीजींनी त्या विरोधात आवाज उठवण्याचे साहस दाखवले. १९०९ साली लिहिलेल्या 'हिंद स्वराज' या पुस्तकात त्या अर्थव्यवस्थेची काळी बाजू दाखवली. त्या काळी ते पुस्तक दुर्लक्षितच राहिले. त्यातील विचार हास्यास्पदच वाटले कारण तथाकथित प्रगतीने दिपलेल्या डोळ्यांना शब्दापलिकडचा आशय दिसलाच नाही. आज मात्र पर्यावरण विनाशाची समस्या अधिकाधिक उग्र होत असताना, जग त्या पुस्तकांकडे आकृष्ट होते आहे. अमेरिकेतील एका विद्यापीठात अभ्यासासाठी ते पुस्तक नेमले आहे. गांधीजींच्या लिखाणात पर्यावरण, त्याचा ऱ्हास, त्याचे रक्षण असे शब्द नसूनही त्यांना पहिला पर्यावरणीय विचारक मानले जात आहे. कारण पर्यावरण ऱ्हासाच्या मूळ कारणांवर त्यांनी शतकापूर्वीच कुठाराघात केला आहे. पर्यावरणाच्या ऱ्हासाला कारणीभूत ठरणारी ही अर्थव्यवस्था भांडवल प्रधान आहे. या अर्थव्यवस्थेचा परवलीचा शब्द आहे 'अधिक.' अधिक उत्पादनाचा हव्यास, उत्पादित माल खपवण्यासाठी अधिक उपभोगाची चटक लावणे मग सुरू होते. अधिक खरेदी, वाढत जातो अधिक संग्रह. अधिकच्या हव्यासापोटी निसर्ग संपत्ती ओरबाडली जात आहे. पृथ्वी पोकळ आणि उजाड होत आहे. ही अर्थव्यवस्था गांधीजींनी नाकारली. ग्रामोद्योगप्रधान विकेंद्रित अर्थव्यवस्थेचा

पर्याय दिला. माझ्या गरजेपुरते मिळावे अशीच इच्छा प्रत्येकाने धरावी आणि त्यातच समाधान मानावे, हा विचार गांधींनी दिला.

या भांडवलप्रधान अर्थव्यवस्थेने विकासाचा एक नवा संबोध जगाच्या गळी उतरवला कारण हा संबोध मान्य झाला तरच अधिक उत्पादन करणाऱ्या यंत्रांची चाके फिरत राहतील, अन्यथा अर्थव्यवस्था कोलमडून पडेल. काय आहे हा विकासाचा संबोध ? विकास म्हणजे अधिक उत्पादन आणि अधिक उपभोग. महाकाय कारखाने, मोठाली यंत्र, गगनचुंबी इमारती, पंचतारांकित हॉटेल्स, मोठाले मॉल्स, चौपदरी रस्ते, त्यावर धावणाऱ्या अनेकानेक चारचाकी गाड्या, उड्डाण पूल, बुलेट ट्रेन्स असे बरेच काही. या विकासाच्या संबोधात माणूस हरवलाच आहे. सामान्य माणसाच्या अन्न, वस्त्र, निवारा, आरोग्य, शिक्षण या प्राथमिक गरजांकडे बघायलाही या अर्थव्यवस्थेला वेळ नाही. 'सर्वत्र सुखिनो संतु सर्वे संतु निरामया:' हे तत्वज्ञान स्वीकारणाऱ्या गांधींना हा संबोध कसा मान्य व्हावा?

शिवाय या अर्थव्यवस्थेने एक नवी जीवनदृष्टी, एक नवी संस्कृती, एक नवी मूल्यव्यवस्था विकसित केली. या मूल्यव्यवस्थेत मानवी गुणांनी युक्त व्यक्ती मोठी मानली जात नाही. अधिक वस्तूंचा स्वामी आज मोठा मानला जातो. मग मोठा ठरण्यासाठी अधिकाधिक वस्तूंची खरेदी होत राहते. चंगळवाद बोकाळतो. विविध वस्तूंचा पुरवठा करण्यासाठी यंत्रांची चाके फिरत राहतात. त्यासाठीच तर ही मूल्यव्यवस्था विकसित केली गेली. या अर्थव्यवस्थेने माणसाचे माणूसपण संपवून त्याला उपभोक्त्याच्या, ग्राहकाच्या पातळीवर आणून ठेवले आहे. जाहिरातींना भुलणारा निर्बुद्ध ग्राहक. माणसाचे माणूसपण हिरावून घेणाऱ्या या संस्कृतीला गांधीजी सैतानी सभ्यता म्हणतात.

गांधीजींनी शब्दांचे बुडबुडे कधीच उडवले नाहीत. विचार-आचार आणि उच्चार असा त्यांचा क्रम होता. ते म्हणतात, 'मेरा जीवन ही मेरा संदेश है।' हे त्यांचे विचार समजून घेण्यासाठी त्यांच्या जीवनाकडेच नजर टाकावी लागेल. त्यांचे जीवन, त्यांचे आचरण, त्यांची जीवनशैली

लक्षात घ्यावी लागेल. ती लक्षात घेतली की त्यांची जीवनशैली पर्यावरणस्नेही होती हे जाणवते. त्यांचे एक प्रसिद्ध वाक्य आहे. 'निसर्ग प्रत्येकाची गरज भागवू शकत नाही.' हे सुभाषितवजा वाक्य निश्चितच पर्यावरणाचा विनाश थोपवण्याचा व त्याचे रक्षण करण्याचा संदेश देते. या पृथ्वीवर जेवढी माणसं आहेत त्या प्रत्येकाची गरज भागवण्याचे सामर्थ्य निसर्गात आहे. एकाही माणसाने उपभोगाची हाव, अधिक उपभोगाचा हव्यास धरला तर त्याचा हव्यास पूर्ण करायला निसर्ग कधीही पुरा पडू शकत नाही. कारण निसर्गाची संसाधने मर्यादित आहेत. हव्यासाला कधीच मर्यादा नसते. मर्यादित साधने आणि अमर्याद हव्यास यांचा मेळ घालण्याचा प्रयत्न करणे म्हणजे मृगजळामागे धावण्यासारखे आहे. हव्यासाच्या जागी गरज या शब्दाला प्राधान्य दिले, तसच साधने आणि गरज यांचा मेळ बसेल.

**जीवनशैली**

गांधीजींच्या जीवनशैलीत अधिक उपभोगाचा हव्यास, निसर्गाची साधने आणि ती वापरून तयार केलेल्या वस्तूंची उधळमाधळ, एकाने गरज भागत असूनही अधिक वस्तूंची खरेदी अशा प्रकारांना थाराच नाही. त्यांनी सांगितलेल्या एकादश व्रतामधील काही व्रते निश्चितच पर्यावरण रक्षणाचा संदेश देताहेत. पहिले व्रत आहे सत्य. पर्यावरण रक्षणासाठी जी अर्थव्यवस्था नाकारणे गरजेचे आहे, त्या व्यवस्थेत अधिक नफा कमावण्यासाठी सत्य पायदळीच तुडवले जात आहे.

सत्याचे पालन करणारा ही अर्थव्यवस्था नाकारणारच. दुसरे व्रत आहे अहिंसा. ही अर्थव्यवस्था शोषणाशिवाय टिकूच शकत नाही. शोषण हे हिंसेचंच रूप आहे. अहिंसा व्रताचे पालन करणारा या अर्थव्यवस्थेला नकार देणारच.

या अर्थव्यवस्थेने रुजवलीय चंगळवादी जीवनशैली. परिणामी पर्यावरणाचा ऱ्हास होतो आहे. अपरियग्रह (असंग्रह) आणि अस्तेय (चोरी न करणे) ही दोन व्रते चंगळवादाला फाटाच

देतात. गांधीजींच्या मते गरजेपेक्षा अधिक वस्तूंचा संग्रह करणे चोरीच आहे. कारण संग्रहामुळे गरजवंतांची वस्तू चोरली जाते. पुढचं व्रत आहे शरीरश्रम. आत्यंतिक यंत्रतंत्र प्रधानतेमुळे जीवनात शरीरश्रमाला स्थानच राहिल नाही. यंत्र तंत्र प्रधानतेमुळे उत्पादन आणि उपभोगाचं प्रमाण वाढतं. उत्पादन प्रक्रियेत शरीरश्रमाला स्थान दिल्याने भरमसाठ उत्पादन होऊ शकणार नाही. आणि उपभोगावरही मर्यादा येईल.

एकूणच गांधीजींच्या जीवनात सातत्याने पर्यावरणाचा विचार आणि त्याच्या रक्षणाचा आचार दिसतो. गांधीजींची जीवनशैली वर उद्धृत केलेल्या सुभाषितवजा वाक्याप्रमाणे होती. पर्यावरण स्नेहीच होती. त्यांच्या जीवनातील असंख्य छोट्या-छोट्या प्रसंगातून याची साक्ष पटते. त्या प्रसंगामधून इतरांनाही ते सहजगत्या शिकवून जातात. काही उदाहरणे पाहू -

एकदा एक युवक गांधीजींना भेटायला आला होता. खेड्यात जाऊन काम करण्याची त्याची इच्छा होती. आर्थिक मदतीच्या अपेक्षेने तो आला होता. इतर अभ्यागतांबरोबर, तोही बापूकुटीमध्ये जाऊन बसला. गांधींजी आलेल्यांशी संवाद साधत होते. चर्चा करत होते आणि त्याचवेळी आलेल्या पत्रांचे लिफाफे सुरीने व्यवस्थित कापून उलटे करून एकावर एक नीट ठेवत होते. नीटनेटकेपणा, सौंदर्यदृष्टी हे त्यांच्या व्यक्तिमत्वाचे अविभाज्य घटक होते. त्याने शेजारच्या माणसाला कापून ठेवलेल्या लिफाफ्याविषयी हळूच विचारले. त्या माणसाने सांगितले की गांधीजींना असंख्य पत्रे येतात. एकही पत्र अनुत्तरित राहत नाही. कापून ठेवलेल्या लिफाफ्यांच्या कोऱ्या भागावर ते उत्तर लिहीत. कागदाचा पुनर्वापर पाहून युवक चकित झाला. आपला क्रम येण्याची वाट पाहत तो बसला होता. त्याला तहान लागली. व्हरांड्यात त्याला पाण्याचा माठ ठेवलेला दिसला. तो हळूच उठला. त्याने डवल्याने ग्लासमध्ये पाणी घेतले. तो पाणी प्यायला. उरलेलं अर्धा ग्लास पाणी त्याने जवळच्या झाडाला टाकले. आवाज न करता तो जागेवर येऊन बसला. थोड्या वेळाने त्याचा क्रम आला. त्याने येण्याचे प्रयोजन सांगितले. गांधीजींनी विचारले 'खेड्यात किती दिवस राहिला आहेस?' युवक उत्तरला, 'अजून कधीच

खेड्यात गेलो नाही. थोडे पैसे मिळाले की खेड्यात जाऊन कामं सुरू करीन.' गांधीजींनी विचारले, 'तू किती वर्षापासून पाणी पितो आहेस !' मध्येच असा प्रश्न गांधीजी का विचारताहेत त्याला कळेना. त्यांने भांबावून उत्तर दिले. 'मी जन्मापासून पाणी पितो आहे.' गांधीजी म्हणाले, 'तू जन्मापासून पाणी पितो आहेस तरीही एका तहानेला तुला किती पाण्याची गरज असते हे तुला कळत नाही. ग्लासभर पाणी तू घेतलंस. त्यातील अर्धाच ग्लास पाणी तू प्यायलास. उरलेलं अर्धा ग्लास पाणी तू झाडाला घातलंस. पिण्यासाठी भरून घेतलेलं पाणी तू झाडाला घालून वाया दवडलंस. एका तहानेला किती पाण्याची गरज आहे हे तुला कळत नाही. मग खेड्यात न जाता तिथे कुठल्या कामाची गरज आहे हे तुला कसं कळणार ? आधी खेड्यात जाऊन राहा. तिथल्या परिस्थितीचा अभ्यास कर. तिथे कुठल्या कामाची गरज आहे, याचा शोध घे. त्याशिवाय नुसते पैसे घेऊन तू काहीही करू शकणार नाहीस.' युवक खजील झाला आणि शांतपणे निघून गेला.

कुठल्याही वस्तूचा योग्य आणि गरजेपुरताच वापर करणे, निष्कारण उधळमाधळ न करणे या विषयी गांधीजी अतिशय दक्ष होते. आणखी एक छोटासा प्रसंग पाह. एकदा गांधीजी एक छोटीसी पेन्सिल शोधत होते. बरोबरच्या कार्यकर्त्यांनी आपल्या जवळच्या पेन्सिली देऊ केल्या. गांधीजींनी त्या नाकारल्या. म्हणाले 'निष्काळजीपणे मी पेन्सिल हरवली आहे, तर ती मला शोधलीच पाहिजे. ती हरवून दुसरी वापरणे म्हणजे त्या पेन्सिलीसाठी जे निसर्गधन लागले जे श्रम लागले ते वाया घालवणं, शिवाय आपल्यासारख्या गरीब देशाला हे परवडणार नाही.' असं ते म्हणाले. प्रत्येक वस्तुमध्ये आपल्या उपयोगी पडणाऱ्याची क्षमता असते. क्षमतेच्या अंतिम मर्यादेपर्यंत तिचा वापर झाला पाहिजे. माझ्या हरवलेल्या पेन्सिलीमध्ये लेखनासाठी मला उपयोगी पडण्याची कितीतरी क्षमता आहे. ती पूर्ण न वापरता दुसरी पेन्सिल घेणं योग्य नाही.

त्यांचे निवासस्थान, त्यांचा पोशाख यातून त्यांच्या पर्यावरणस्नेही जीवनशैलीचे ठळकपणे दर्शन होते. गुडघ्यापर्यंतचा आखूड पंचा आणि गरज असेल तेव्हाच वर उपरणे असा त्यांचा पोशाख होता. कपाटात त्या पोषाखाच्या थप्प्या लावून संग्रहाच्या आहारी ते कधीच गेले

नाहीत. त्यांच्या डोक्यावरचा रूमाल फाटक्या पंचाचाच शिवलेला असे. आज पर्यावरणाचा विचार करताना रिड्यूस रिफ्यूज, रियूज, रिसायकल हे चार शब्द (फोर आर) महत्वाचे ठरले आहेत. अधिक कपडा लागणारा काठेवाडी पोशाख त्यांनी नाकारला (रिफ्यूज). ते कमीतकमी कपडा लागणाऱ्या पंचा उपरण्याच्या पोशाखापर्यंत आले (रिड्यूस) . त्यांचे डोक्यावरचे रूमाल रियूजचे उदाहरण आहे. त्यांचे सर्व कपडे खादीचे असत. यंत्रतंत्र प्रधान विपुल उत्पादन करणाऱ्या केंद्रित अर्थव्यवस्थेच्या ते न विरोधी होते. खादी उद्योग विकेंद्रित आणि मर्यादित उत्पादन करणारा उद्योग आहे. खादीचा कपडा पर्यावरणस्नेही आहे.

त्यांचे निवासस्थान सेवाग्रामची बापू कुटी म्हणजे मातीने सारवलेल्या कुडाच्या भिंतीची आणि वर नळीच्या कौलाचं छप्पर असणारी एक छोटीशी झोपडी. एवढेच लक्षात घेतले तरी ती कमीतकमी संसाधने वापरून बांधलेली आहे हे जाणवते. पण या झोपडीच्या बाबतीत जाणून घेण्यासारखे बरेच काही आहे. ही झोपडी बांधतांना गांधीजींनी तीन अटी घातल्या होत्या.

१. आसपासच्या पंचक्रोशीत उपलब्ध असलेली साधनेच वापरायची.

२. पंचक्रोशीतील कारागिरांनीच कुटी बांधायची.

३. कुटी बांधण्याचा खर्च रु. ५०० पेक्षा जास्त नसावा.

आज बंगले बांधताना राजस्थानहून आणलेले मार्बल हवे असते. फर्निचरसाठी जवळपासचा सुतार चालत नाही. तोही राजस्थानमधला हवा असतो. या असल्या हव्यासाच्या मागे लागल्याने वाहतूक व्यवस्थेवर किती ताण पडतो? रस्ते व वाहतुकीसाठी किती संसाधने खर्ची पडतात. ह्याचा विचारच होत नाही. मोठेपणाचे निकष. बदलल्याने आज माणसे हव्यासाच्या मागे लागली आहेत. प्रचलित अर्थव्यवस्थेला तेच हवे आहे. ही अर्थव्यवस्था नाकारून विकेंद्रित अर्थव्यवस्था स्वीकारल्या शिवाय पर्यावरण ऱ्हास आणि त्याने निर्माण केलेल्या समस्या सुटणार नाहीत.

आज पर्यावरण, पर्यावरण रक्षण या विषयी बोलताना लिहितांना, एनर्जी फूटप्रिंट, वाटर फूटप्रिंट हे शब्द वापरलेले आढळतात. आपल्या सारख्यांना त्याचा अर्थबोध होत नाही. त्या शब्दांमध्ये जो आशय आहे जबळजवळ तसाच आशय गांधीजींनी अतिशय साध्या-सोप्या भाषेत व्यक्त केला आहे. इंग्लंडमध्ये एका पत्रकाराने त्यांना विचारले की, 'आज तुम्ही साधी राहणी, स्वेच्छा दारिद्र्य गोष्टींचा आग्रह धरता. उद्या स्वातंत्र्य मिळाल्यावर आमच्या सारखे श्रीमंती जीवन तुमच्या देशातल्या लोकांना मिळावे असाच तुमचा प्रयत्न राहील ना?' गांधीजी म्हणाले, 'चुकताहात तुम्ही. श्रीमंत जीवन जगण्यासाठी तुम्हाला तुमच्या देशातील संसाधनं पुरी पडत नाहीत. तुम्ही गुलाम केलेल्या देशातल्या संपत्तीच्या लुटीवर, चैनीचं श्रीमंती जीवन तुम्ही जगू शकताय. आगम्ही तुमच्यासारखं जीवन जगायचं ठरवलं तर आम्हाला एक पृथ्वी अपुरी पडेल. मग मी पाच पृथ्वी कुठून आणू?' ७५ पेक्षा अधिक वर्षापूर्वी गांधींनी हे उत्तर दिले आहे. एकूणच गांधीजींच्या विचार, आचार आणि उच्चारात पर्यावरणाचा ऱ्हास आणि त्याच्या रक्षणाचा विचार शतकापूर्वीपासून आणि सातत्याने दिसतो.

# ३०. बापूकुटी : एक राष्ट्रीय वैभव

काही दिवसापूर्वी राजस्थानचा प्रवास करून आले. राजस्थान हा छोट्या छोट्या संस्थानांचा प्रदेश ! प्रत्येक संस्थानाची राजधानी अभिमानानं आपलं प्राचीन वैभव मिरवत होती. मोठमोठे किल्ले, भव्य राजवाडे, राजवाड्यातील विशाल महाल ह्या सर्वांतून वैभवाचं प्रदर्शन मांडलं होतं. त्यानंतर काही दिवसांनी सेवाग्रामला जाण्याचा योगआला. तिथे बापूकुटीचं दर्शन घेतलं, राजस्थानच्या पार्श्वभूमीवर कुटीचं वेगळंच आकलन झालं.

तसं तर मी बापूकुटीचं दर्शन लहानपणापासूनच, नव्हे जन्मापासून घेत आले आहे. माझे आईवडील महात्मा गांधींनी सुरू केलेल्या महिलाश्रम ह्या शिक्षणसंस्थेत कार्य करीत होते. माझा जन्म तिथलाच. शिक्षणही तिथेच झालं. आम्ही सर्व बऱ्याचदा बापूकुटीच्या दर्शनाला जात असू. वडीलधारी माणसं तिथे नतमस्तक होत होती. त्यामुळे मीही नकळत्या वयापासून तिथे माथा झुकवत होते. मोठी झाल्यावर मात्र कुटी खऱ्या अर्थाने माझं श्रद्धास्थान झाली. वर्धा सोडून नाशिकला आले वर्ध्याला गेल्यावर मात्र कुटीचं दर्शन घेतल्याशिवाय कधी परत आले नाही. वर्धा सुटल्यामुळे विचारांवर मधून मधून धूळ साचते. आचरणात मरगळ येते. कुटीच्या दर्शनाने धूळ झटकली जाते. आचरणातील मरगळ दूर होते. विचार-आचारांची बॅटरी चार्ज होते.

ह्यावेळी राजस्थान दर्शनानंतर कुटीचं दर्शन घेत होते. राजस्थानप्रमाणे इथेही वैभव होतं, साधेपणाचं. ह्या वैभवाने डोळे दिपत नव्हते. शांत होत होते. इथेही प्रदर्शन होतं, वैभवाचं नव्हे विचारांच्या श्रीमंतींचं. दोन्हीही ठिकाणी पर्यटक जे वघायला येतात त्याचा आकृतीबंध सारखाच, दोन्हीही निवासस्थानेच. एक महाराजाचं, दुसरं महात्म्याचं ! राजेरजवाड्यांच्या प्रासादांमध्ये राजेराण्यांच्या वापरातील विविध तऱ्हेच्या असंख्य वस्तू प्रदर्शनार्थ ठेवलेल्या. बापूकुटीत मोजक्याच वस्तू प्रदर्शनार्थ ठेवलेल्या. बापूंचा अपरिग्रह मनावर अधिक ठसला. प्रासादामध्ये राजांना मिळालेल्या फ्रेम्स होत्या. इथेही फ्रेम्स होत्या, पण मानपत्रांच्या नव्हे. मौलिक

विचारधनाच्या. बापूंना काय कमी मानपत्र मिळाली असतील ! पण इथे त्याचं प्रदर्शन नव्हतं. कारण इथे अहंकार नव्हता, नम्रता होती.

राजवाडे अभिमानानं मिरवत होते. संपूर्ण वास्तूची भव्यता आणि वैभव, अनेक मजले, त्यातील अनेक दालनं, संगमरवरी स्तंभावरील सोन्याचं नक्षीकाम, सुरेख मीनाकाम, कोरीव काम, सुंदर शिल्प, मौल्यवान फर्निचर, हंड्या आणि झुंबरं.

आणि कुटीत मी पाहत होते. पांढऱ्या मातीने सारवलेल्या कुडाच्या भिंती, मातीने सारवलेली जमीन, दारेखिडक्या बांबूच्या, वर पंचक्रोशीतील कारागिरांनी बनवलेल्या पन्हाळी कौलांचं छत. अटच होती बापूंची तशी. ६०-७० किलोमीटरच्या परिसरात उपलब्ध होणाऱ्या आणि स्थानिक कारागिरांनी बनवलेल्या वस्तूंचाच कुटीसाठी वापर करायचा. दुसरी अट होतीं खर्चाची. एकूण खर्च ५०० रुपयांपेक्षा जास्त नको. हा होता भारतातल्या दीनदुबळ्या गरीब जनतेशी एकरूप होण्याचा प्रामाणिक प्रयत्न.

वरील अटी सांभाळून तयार होणाऱ्या कुटीत आवश्यक सोयी-सुविधा असल्या पाहिजेत हाही कटाक्ष होताच. कुडांच्या भिंती असलेल्या ह्या कुटीत व्हरांडा, बाहेरची खोली, बापूंच्या वैयक्तिक वापरासाठी १ आणि पाहुण्यांसाठी १ अशा दोन खोल्या. शिवाय बाथरूम-संडास, बाहेरची खोली (विविध उपयोगी खोली) आजचे शब्द वापरायचे झाल्यास तीच म्हणजे दिवाणखाना, अभ्यासाची खोली तीच, भोजनकक्षही तीच आणि कार्यालयही तेच. देशातल्या आणि परदेशातल्याही अनेक नामवंत व्यक्तींनी ह्याच खोलीत बापूंची भेट घेतली. इथेच चर्चा झाल्या भारताच्या भवितव्याच्या, आणि निर्णयही इथेच घेतले गेले. ह्याच खोलीत झाला शेवटच्या चलेजाव लढ्याचा निर्णय. कुटीत स्वयंपाकघर नाहीच. कारण बापूंसह सर्व आश्रमवासियांचा स्वयंपाक सामूहिक स्वयंपाकघरातच होई.

फर्निचर म्हणता येईल असे कुटीत काही नाहीच. बापूंना बसण्यासाठी एका कोपऱ्यात जमीनीवरच घातलेली एक गादी, अभ्यागतांना बसण्यासाठी भोवताली शिंदीच्या पानाच्या साध्या चटया. ज्यांना खाली बसणे शक्यच नाही अशांसाठी एक बांबूचा मोडा, कुटीतील शोपीसेसही सांगायलाच हवेत ! मातीने सारवलेल्या भिंतीवर मीरा बहननी (बापूची आंग्ल शिष्या मिस् स्लेड) मातीचाच वापर करून किंचित उठाव देऊन काढलेले खजुराचे झाड, मोर, ओम् आणि चरखा.

कुटीत प्रदर्शनार्थ ठेवलेल्या बापूंच्या वापरातील वस्तू पाहतांना आठवल्या राजप्रासादातील असंख्य वस्तू, आणि त्याचवेळी आठवला आपल्या सारख्याच्या घरातील वस्तूंचा संग्रह आणि खरेदीचा हव्यास, राजे राण्यांचे अनेक भरजरी कपडे अनेक शोकेसेस मध्ये प्रदर्शनार्थ ठेवलेले होते. कुटीमध्ये ह्या प्रदर्शनाचा प्रश्नच नव्हता. बापूंच्या वस्त्रांमध्ये ना विविधता ना भरजरी थाट. सतत एकच पोशाख ! कमरेला जाड्याभरड्या खादीचा एक आखूड पंचा आणि आवश्यक असल्यास खांद्यावरून लपेटून घेण्यासाठी खादीचे उपरणे. बंकींगहॅम पॅलेसमध्ये इंग्लंडच्या राजाला भेटायलाही ते याच पोशाखात गेले होते. हे बघताना आपल्यासारख्याच्या घरातील कपड्यांनी भरलेली कपाटेही डोळ्यासमोर आली आणि मी अंतर्मुख झाले.

राजप्रासादात मौल्यवान आभूषणे, टी सेट्स, सोन्याचांदीची भांडी, ह्यांनी शोकेसेस सजल्या होत्या. शस्त्रास्त्रेही रत्नजडित. अशी प्रदर्शने आम्ही अनेक दालने फिरून पाहिली. कुटीत मी काय पहात होते त्यांचे कमरेला लटकवण्याचे घड्याळ. पेपरवेट म्हणून वापरलेले परिसरातील सुंदर दगड, “वाईट ऐकू नका, वाईट बघू नका आणि वाईट बोलू नका.” हा संदेश देणारी त्यांची तीन माकडं आणि अशाच काही मोजक्या वस्तू, हव्यास हा शब्दच ह्या महात्म्याच्या शब्दकोषात नव्हता. अपरिग्रहाचं तत्वज्ञान त्याने रोमारोमात भिनवलं होतं. बापू आधाराला घेत असलेली काठी कुटीत ठेवलेली आहे. ह्याच काठीच्या आधाराने पायी-कधी अनवाणी पायानेही हा म्हातारा साऱ्या भारतात किती आणि कितीदा फिरला असेल.

कुटीत दोन फ्रेमस् लावलेल्या आहेत. एका फ्रेममध्ये जॉन रस्किनचा ‘सूक्ष्म असत्य’ शीर्षकाचा सुविचार व दुसऱ्या फ्रेममध्ये जी. सी. लॉरिमरचा ‘धीरज की आवश्यकता’ शीर्षकाचा सुविचार आहे. कुटीच्या बाहेर एका बोर्डावर बापूंनी सांगितलेली सात महापातकं लिहिलेली आहेत. ती वाचली की वाटतं ह्या महामानवाने मनुष्यजीवनाशी संबंधित सर्व क्षेत्रांचा किती सूक्ष्मपणे विचार केला होता. ती सातही क्षेत्र पवित्र राहावीत ह्यासाठी कोणत्या गोष्टींपासून दूर राहायला हवं हे ही सात महापातकं आपल्याला सांगतात.

बापू कुटी म्हणजे साधेपणा, स्वच्छता, सुव्यवस्थितपणा आणि सौंदर्यत्वाचं संमेलन, घरातील अनावश्यक संग्रह कमी करण्याची प्रेरणा कुटी देत होती. परिसरात तयार होणाऱ्या वस्तू वापराची दृष्टी देत होती. न बोलता खूप काही सांगत होती. त्यांचे तत्वज्ञान, त्यांचे आर्थिक विचार, त्यांचा साधेपणा, त्यांचं सर्वसामान्यांशी एकरूप होणं. त्यांची नम्रता आणि आणखीही बरंच काही. कुटीचा एक सम्मिलित परिणाम जाणीवेत उतरला आणि मनाचा गाभारा आदराच्या गंधाने दरवळला.

# ३१. गांधीजींच्या पाठशाळेत आचरणाचे धडे गिरवू या

आज सर्व जग विकास साधण्यासाठी ऊर फुटेपर्यंत धावताना दिसतंय, विकसनशील देशही ह्या घोडदौडीत सर्वशक्तीनिशी सामील झाले आहेत. या विकास प्रक्रियेतील धोके आज साऱ्या जगालाच प्रकर्षाने जाणवू लागले आहेत. नैसर्गिक संसाधनं संपुष्टात येताहेत. पर्यावरणाचं. असंतुलन धोक्याची पातळी ओलांडून पुढे चालले आहे. विकासाचे धोके टाळून विकास गतिशील कसा ठेवायचा ? हा यक्षप्रश्न विकासात अग्रभागी असलेल्या अमेरिकेसारख्या देशांना पडला आहे. त्यातूनच शाश्वत विकास (सस्टेनेबल डेव्हलपमेंट) हा नवा शब्द पुढे आला. शब्द नवा असेलही पण विचार नवा नाही. महात्मा गांधींनी १९०९ साली लिहिलेल्या 'हिंद स्वराज' या पुस्तकात धोक्याचे इशारे दिले आहेत.

आज जग ज्या विकासाच्या मागे धावतंय तो विकास म्हणजे अधिक उत्पादन, अधिक उपभोग, महाकाय यंत्रे, मोठाले कारखाने उद्योगांचं केंद्रीकरण. ही सारी उत्पादन व्यवस्था भांडवलशाही वर बेतलेली आहे. बाजाराधित आहे. नाविन्य हा तिचा केंद्रबिंदू आहे. त्यासाठी अधिक उत्पादनाचा हव्यास, अधिक उपभोगाला प्रोत्साहन, व्यक्ती येथे माणूस नाही तर केवळ ग्राहक आहे. अधिक हव्यासामुळे सतत खरेदी होत राहते. चंगळवाद बोकाळतो. दूरदृष्टीच्या राष्ट्रपित्याने हव्यास बरा नाही हे सततच सांगितलं. अपरिग्रहाचं महत्व विषद केलं. हव्यासामुळे पृथ्वी कंगाल होईल याचं त्यांना भान होतं. हव्यासच करत राहिलो तर निसर्गसाधनं संपतील, पण हव्यास संपणार नाही. म्हणूनच ते म्हणतात.

निसर्ग एकाचाही हव्यास भागवू शकत नाही. पण प्रत्येकाची गरज भागवू शकतो. गरजेपुरतंच खरेदी करा. गरजेपुरतंच वापरा. 'पुरे' हा शब्द सतत लक्षात ठेवा. असं ते सतत सांगत. त्यांनी दिलेल्या अकरा व्रतांमध्ये त्यांनी असंग्रह व्रताला स्थान दिले. आज 'पुरे' हा शब्द शब्दकोषातून जणू नाहीसाच झाला आहे. आज ज्याच्या त्याच्या मनात ठाण मांडून बसलेला

शब्द आहे. त्या ‘अधिक हवे.’ चीच जपमाळ सगळे ओढत असतात. अशा परिस्थितीत नैसर्गिक संसाधनं संपणारच. गांधीजींनी विकासाच्या रूढ अर्थावर सर्वप्रथम एक भलं मोठं प्रश्नचिन्ह दिलं. हा विकास भ्रामक आहे. मोठे कारखाने, केंद्रित उद्योग हे सर्व औद्योगिक क्रांतीनंतर घडून आलेले बदल आहेत. सारी उत्पादन व्यवस्था बदलली, अर्थशास्त्रही बदलले. ज्या अर्थशास्त्रात आजचा विकास आधारलेला आहे त्याला गांधीजी चक्क अनर्थशास्त्र म्हणतात. ही उत्पादन व्यवस्था हा विकास शोषणाशिवाय जगूच शकत नाही.

औद्योगिक क्रांतीनंतर इंग्लंडमध्ये भौतिक विकासाला प्रचंड गती आली. भौतिक सुखसमृध्दी वाढली. या समृध्दीने साऱ्यांचे डोत्ठे दिपले. पण गांधीजींनी त्याची काळी बाजू जगासमोर मांडली. लोकांना ती दिसली नव्हती आणि गांधीजींनी दाखवण्याचा प्रयत्न केल्यानंतरही दिपलेल्या डोळ्यांना ती दिसू शकली नाही. सारे जण एका भ्रामक विकासाचे गोडवे गात असताना त्याची काळी बाजू दाखवण्याचं गांधींचं साहस थक्क करणारंच आहे. पण इंग्लंडचा हा विकास भारतासारख्या इतर वसाहतीचं शोषण करूनच शक्य झाला. इंग्लंडची समृध्दी भारताच्या शोषणावर आधारित आहे. शोषणाबरोबरच विषमता जन्म घेते. या उत्पादन प्रणालीचे शोषण, विषमता आणि हिंसा हे अविभाज्य भाग आहेत असं गांधीजी स्पष्ट करतात. आणि म्हणूनच ही उत्पादन प्रणाली ते नाकारतात. ग्रामोद्योग प्रधान अर्थव्यवस्था मांडतात. स्वयंपूर्ण खेड्याचं मॉडेल देतात. येथे उत्पादन गरजेप्रमाणे असेल. नफ्यासाठी प्रचंड उत्पादन नसेल.

आजच्या प्रचलित उत्पादन व्यवस्थेत चांगल्या उत्पादन व्यवस्थेचे तीन निकष सांगितले जातात. उत्पादनक्षमता, लाभक्षमता आणि कार्यक्षमता. गांधीजींनी यांच्या जोडीला आणखी दोन निकष सांगितले आहेत. रोजगारक्षमता आणि कल्याणक्षमता. उद्योग तोच चांगला ज्यातून पुरेशी रोजगारनिर्मिती होईल आणि समाजासाठी तो कल्याणप्रद असेल. महात्म्याने सांगितलेल्या या दोन निकषांकडे दुर्लक्ष करूनच भारताची उत्पादन व्यवस्था राबवली जातेय. खूप मोठी

गुंतवणूक करून उद्योग उभारले जातात आणि त्याबरोबर बेरोजगारांची संख्याही वाढत जाते. कारण रोजगार क्षमतेचा विचारच केलेला नसतो. समाजाच्या कल्याणाचाही विचार केला जात नाही. त्यामुळे उद्योग उभारले जात असताना स्थानिकांची विरोधाची आंदोलने होत राहतात. गांधीजींचा प्रत्येक विचार मानवकेंद्री होता. राजकीय, सामाजिक, आर्थिक अशा सर्वच क्षेत्रांना त्यांनी तात्विक अधिष्ठान दिले. सामान्य माणसाच्या कल्याणाचा सतत विचार केला.

**सर्वेपि सुखिनः संतु सर्वे संतु निरामया:।**
**सर्वे भद्राणि पश्यंतु मा कश्चित दुःखमाप्नूयात।।**

हा त्यांच्या तत्वज्ञानाचा पाया होता. आज त्यांच्या विचारांकडे पाठ फिरवूनच राजकारण, समाजकारण, अर्थकारण यांची वाटचाल होताना दिसतेय. आर्थिक विकासाचा आलेख उंचावतोय. विकासाचा वेग वाढतोय. महासत्ता होण्याचं सोनेरी स्वप्न रंगवलं जातंय. पण या सर्व विकासात माणूस हरवला आहे. प्यायचं शुद्ध पाणीही त्याला मिळत नाही. ना त्याला मिळत योग्य आरोग्य सेवा आणि सकस अन्न. अनेक बालकं कुपोषणग्रस्तच आहेत. शाळांची संख्या वाढत गेली पण शिक्षण हरवलं. विकास प्रक्रियेतून निर्माण झालेल्या सर्व सोयी-सुविधा श्रीमंतासाठी, सामान्य माणूस बंचितांचं जिणं जगतोय. शोषणाचा बळी ठरतोय. जर शाश्वत विकास साधायचा असेल तर नैसर्गिक संसाधनांचे जतन आवश्यक आहे. अधाशासारखी ती ओरबाडणं थांबवावं लागेल. जर प्रदूषणमुक्त निरामय जीवन प्रत्येकाला जगता यावं असं वाटत असेल तर विकासाला मानवी चेहरा देणं गरजेचं आहे. गांधी विचाराकडे पाठ फिरवून हे साधणं शक्य नाही. त्यांनी दिलिली अपरिग्रहाची, उपभोगावर मर्यादा घालण्याची, साधेपणाची शिकवण अंगी बाळगावी लागेल. गांधीजी म्हणतात योग्य दिशेने टाकलेलं एक पाऊल ही महत्वाचं असतं. ते टाकणं अत्यंत आवश्यक असतं. ते म्हणतात मेरा जीवन ही मेरा संदेश है। त्यांचं जीवनच अपरिग्रह, उपभोगावर मर्यादा आणि साधेपणाचा संदेश देतं. विचारांना आचाराची जोड मिळाल्याविना ते बौद्धिक शब्दरंजन ठरतील. गांधी म्हणजे आचरणाची पाठशाळा. त्या पाठशाळेत आचरणाचे

धडे गिरवल्या शिवाय ना शाश्वत विकास लाभेल ना विकासाला मानवी चेहरा लाभेल. निरामय, सुखी जीवन स्वप्नवतच राहील.

## ३२. पोशाखातून विचारदर्शन

पंचा आणि उपरणं हा गांधीजींचा पोशाख आपल्याला सर्वांनाच माहीत आहे. बहुतेकांना फोटोतून परिचित झालेला त्यांचा हा पोशाख १९२१ मध्ये वयाच्या पन्नासाव्या वर्षी त्यांच्या अंगावर चढला. त्यानंतर जीवनाच्या अंतापर्यंत त्यांनी हाच पोशाख वापरला. या पोशाखापूर्वी त्यांनी आपल्या पोशाखात बऱ्याचदा बदल केले. हे बदल फॅशन म्हणून केलेले नव्हते. त्यामागे वैचारिक सखोलता होती. कधी हे बदल स्वदेशीच्या अभिमानाने झाले. कधी सहकाऱ्यांशी एकरूप होण्यासाठी झाले, कधी दरिद्रनारायणाशी एकरूप होण्यासाठी झाले. गांधीजींच्या या बदलत्या पोशाखातून त्यांच्या विचारांचे दर्शन होते. बालवयात स्वतःच्या विचारांचा प्रश्नच नसतो आणि कोणते कपडे वापरायचे? हे ठरवण्याचा अधिकारही नसतो. काठेवाडीतील सुस्थित कुटुंबातील मुले जसा पोशाख वापरत, तसाच पोशाख गांधीजीही लहानपणी वापरत. धोतर, लांब कोट, काठेवाडी टोपी किंवा फेटा.

त्यांच्या पोशाखात आमूलाग्र बदल झाला. ते इंग्लंडमध्ये शिकायला गेले तेव्हा. तिथे ते पूर्णपणे पाश्चात्य पोशाख वापरत होते. श्रीमंती थाट, छानछोकी, फॅशन, पाश्चात्यांचं अनुकरण या विचारांचा त्यांच्यावर प्रभाव होता. पोशाखही तसाच होता. त्यातून त्यांच्या विचारांचे दर्शन घडते. आफ्रिकेत वकील म्हणून कामाला गेले असतानाही ते पूर्णपणे पीश्चात्य पोशाख वापरत. इंग्लंडमध्ये शिकत असतानाच त्यांनी गीतेचे वाचन केले. शाकाहार व एकूणच आहारावरील पुस्तके वाचली. वाचन, चर्चा यांमुळे त्यांचा साधेपणा, काटकसर याकडे कल वाढू लागला होता, पण अजून पोशाखात बदल नव्हता. तो पूर्वीप्रमाणे पाश्चात्य धरतीचाच होता. आफ्रिकेत गेल्यावर अल्पावधितच ते सार्वजनिक कार्यात पडले. सत्याग्रही लढा उभारला. छानछोकी, श्रीमंती थाट, पाश्चात्यांचं अनुकरण हे विचार मागे पडले. सार्वजनिक काम करणाऱ्या माणसाचे कपडे साधे असावेत, अनुयायांना साजेसे असावेत, हा विचार प्रबळ ठरला आणि या विचाराला अनुसरून पोशाखात बदल झाला. आफ्रिकेतील लढ्यात अनेक करारबद्ध गरीब भारतीय मजूर सहभागी

झाले होते. त्या मजुरांना त्यांचा पुढ़ारी त्यांच्यापेक्षा वेगळा वाटू नये, त्यांच्यातीलच एक वाटावा. पुढारी व अनुयायी यांत जवळकीचं नातं निर्माण व्हावं, हे विचार प्रबळ झाले आणि त्याला अनुसरून गांधीजींनी आपल्या पोशाखात बदल केला. तेथील मजुरांप्रमाणेच त्यांनी लुंगी आणि कुर्ता वापरायला सुरुवात केली.

आफ्रिकेच्या सत्याग्रहाची यशस्वी सांगता झाली. आफ्रिकेत वकील म्हणून गेलेले गांधीजी सत्याग्रहाचे यशस्वी सेनानी बनून भारतात परत आले. आफ्रिकेत असताना त्यांच्यात वैचारिक क्रांतीच झाली. अहिंसक सत्याग्रहाचे तत्त्वज्ञान अनुभवातून सिद्ध झाले होते. आदर्श सत्याग्रहाचे गुण त्यांनी आत्मसात केले होते. पाश्चात्य सभ्यतेला पूर्ण नकार हा आचार-विचाराचा महत्त्वाचा भाग झाला होता. रस्किन, टॉलस्टॉय इत्यादींच्या ग्रंथांचे वाचन आणि त्याबरहुकूम जीवनात परिवर्तन घडून आले होते. त्यांच्या वैचारिक परिवर्तनाचं प्रतिबिंब, अनिवार्यता त्यांच्या पोशाखात पडलेलं दिसतं. संपूर्ण पाश्चात्य पोशाखात आफ्रिकेत गेलेले गांधीजी पूर्ण भारतीय पोशाखात तिथून परत आले. धोतर, पागोटं आणि अंगरखा हा काठेवाडी पोशाख त्यांच्या अंगावर चढला. त्यानंतर कधीच त्यांनी पाश्चात्य पोशाख वापरला नाही.

१९१८ च्या आसपास त्यांनी पूर्णपणे खादीचे कपडे वापरायला सुरुवात केली. भारताचे दारिद्र्य, बेरोजगारी, परावलंबन या सर्वांचं उत्तर खादीत आहे, हा विचार त्या वेळेपर्यंत दृढ झाला होता. त्याप्रमाणे त्यांचा पोशाख बदलला. भारतात आल्या आल्या अडगळीत पडलेला चरखा शोधून काढला आणि मोडकळीस आलेला भारताचा वस्त्रोद्योग पुनरुज्जीवित केला. स्वतः खादी वापरायला सुरुवात केली. इतरांनी वापरावी असा आग्रह धरला. कपड्यांची काटकसर सुरू झाली. पागोटे गेले आणि त्याची जागा गांधी टोपीने घेतली धोतर अंगरख्याची जागा पायजमा-शर्ट ने घेतली. गांधी टोपी स्वतः गांधीजींनी क्वचितच वापरली. १९२१ मध्ये खादीच्याच परंतु अंगभर पोशाखाचाही त्यांनी त्याग केला. फार मोठ्या वैचारिक मंथनानंतर गुडघ्यापर्यंतचा पंचा आणि उपरणे ही पोशाख त्यांच्या अंगावर चढला. हा पोशाख बदलाची कथा अशी आहे.

असहयोग आंदोलनाच्या प्रचारासाठी गांधीजींचा दक्षिणेत दौरा चालू होता. प्रत्येक सभेत गांधीजी खादी वापरणे, साधी राहणी आणि परदेशी कपड्यांच्या बहिष्काराविषयी बोलत. सभेच्या शेवटी विदेशी कपड्यांच्या होळीचा कार्यक्रम होई. मदुराईच्या सभेतही त्यांनी विदेशी कपड्यांच्या होळीचं आवाहन केलं. सभेतील एक युवक म्हणाला, ‘आता माझ्या अंगावर जेवढे कपडे आहेत, तेवढेच कपडे माझ्याजवळ आहेत. ते होळीत टाकले, तर मी उद्या काय घालू?’ हे ऐकून गांधीजी खूप व्यथित झाले. ते रात्रभर बेचैन होते. युवकाचे शब्द कानांत घुमत होते. माझ्या देशबांधवांना लज्जा रक्षणासाठी दोन जोड कपडेही नाहीत. मग मला एवढे अंगभर कपडे वापरण्याचा काय अधिकार आहे? देशातील करोडो गरीब जनतेशी एकरूप होण्यासाठी मला माझ्या कपडयाच्या श्रीमंतीचा त्यागच केला पाहिजे. त्यांच्या मनातील तळमळ एका कवितेतील पुढच्या ओळींतून व्यक्त होते.

**मुझको ऐसे वस्त्र पहनकर सीख देने का क्या अधिकार ?**
**मैंने चढ़ाये वस्त्र ऐसे ठाटबाट से पंचपसार।**
**मैंने तो जो पहने उतन से,**
**अंग ढकेंगे तीन या चार।**

रात्रभर विचारमंथन चालू होते. सकाळपर्यंत निर्णय झाला. गुडघ्यापर्यंतचा पंचा आणि उपरणे हा पोशाख ठरला. उपरणेसुद्धा गरज असेल तेव्हाच, अन्यथा केवळ पंचाच, व्यासपीठावरही ते उघड्या अंगाने बसत. शिवलेले कपडे न वापरण्याचा निर्णयही त्याच रात्री झाला. खादी आधीच अंगावर चढली होती, आता कमीत कमी वस्त्र वापरण्याचा निर्णय झाला. अशी होती दरिद्रनारायणाशी एकरूप होण्याची उत्कटता.

सायंकाळच्या सभेसाठी ते या बदललेल्या पोशाखातच आपल्या निवासस्थानातून बाहेर पडले. पाहणारे अचंबित झाले. तो. दिवस होता २०सप्टेंबर १९२१. देश-विदेशातील कडाक्याची थंडी त्यांनी हा पोशाख घालून सहन केली. लंडनच्या बंकिगहम पॅलेसमध्ये राजाला भेटायला ते

याच पोशाखात गेले. जीवनाच्या अंतापर्यंत ते कायम याच पोशाखात वावरले. मृत्यूच्या वेळीही हाच पोशाख त्यांच्या अंगावर होता.

गांधीजींचे बदलते पोशाख आणि त्यांचे विचार यांचं जवळचं नातं होतं. त्यांच्या पोशाखातून त्यांचे विचार आणि व्यक्तिमत्वाचे पैलूच उलगडतात.

# ३३. मोहन ते महात्मा

रात्रीचा अंधार कापित गाडी चालली होती. गाडीतील प्रथम श्रेणीच्या डब्यातून एक युवक प्रवास करीत होता. गाडी मारीटस्बर्ग स्टेशनवर थांबली. डब्यात एक माणूस चढला. युवकाकडे बघून त्यांच्या कपाळावर आठ्यांचे जाते उमटले. तो त्याच पावली खाली उतरला व आपल्या बरोबर रेलवे कर्मचाऱ्याला घेऊन परत आला. डब्यात बसलेल्या युवकाकडे एक तुच्छतेचा कटाक्ष टाकून कर्मचारी गरजला, “तिथून तिसऱ्या वर्गाच्या डब्यात जाऊन बस.” युवक म्हणाला, “माझ्याजवळ प्रथम वर्गाचे तिकिट आहे. मी का तिसऱ्या वर्गात जाऊन बसू ?”

कर्मचारी संतापला, त्याचा आवाज चढला. “तिकिट कुठलेही असू दे.” “काळ्या माणसाला इथे बसता येणार नाही. लगेच खाली उतर नाही तर धक्के मारून खाली फेकून देऊ.”

युवक चकित झाला, घाबरला तरीही धीर एकवटून म्हणाला, “मी उतरणार नाही. तुम्हाला जे करायचं ते करा.”

रेलवे कर्मचाऱ्याने खरोखरच त्याला प्लॅटफॉर्मवर ढकलून दिले आणि पाठोपाठ त्याचं सामानही खाली फेकून दिलं. गाडी धाडधाड करीत त्याच्या समोरून निघून गेली.

पडल्यामुळे शरीराला झालेल्या इजेपेक्षा मनाला झालेल्या अपमानाच्या जखमा तीव्र होत्या. त्या अनोळखी स्टेशनवर चहू बाजूला त्याने खिन्न दृष्टीने बघितलं. तो हळू हळू उठला. व वेटिंगरूममध्ये जाऊन बसला. प्लॅटफॉर्मवर पडलेले सामान रेलवे अधिकाऱ्यांनी ताब्यात घेतले.

रात्र चढत गेली तसा थंडीचा कडाका वाढत गेला. मनात संतापाच्या ज्वाला पेटल्या होत्या. अपमानाचा अग्नि भडकला होता. बाहेरच्या शरीर गोठवणाऱ्या थंडीला मनातील ज्वाला थोपवू शकल्या नाहीतं. भीतीमुळे सामानातून ओव्हरकोट मागण्याचे साहसही युवकाला झाले नाही. सारी रात्र तो तसाच कुडकुडत बसून राहिला.

युवक नुकताच बॅरिस्टर झाला होता. पोटापाण्याचा व्यवसाय करून पैसे मिळवण्याच्या अपेक्षेने दक्षिण आफ्रिकेत आला होता. त्या देशातील गोरे लोक (युरोपियन) भारतातून आलेल्या सर्वांनाच मजुरांना धनाढ्य व्यापाऱ्यांना, उच्च शिक्षितांना अतिशय तुच्छतेने वागवित. पदोपदी अपमान करीत. स्टेशनवर घडलेली घटना अपमानाची पहिली सलामी होती.

## अन्यायाविरुद्ध लढा

नुकताच बॅरिस्टर झालेला, जगाचा फारसा अनुभव नसलेला युवक, आपले घर, आप्त,स्वकीय व देश सोडून आलेला युवक हा पहिल्याच जीवघेण्या अनुभवाने पुरता भांबावून गेला होता. मनात विचारांचे काहूर उठले होते. दक्षिण आफ्रिकेत येऊन अद्याप आठवडाही झाला नव्हता. देश नवखा, माणसं नवखी, आणि इथल्या गोऱ्यांची मनं रंगभेदाच्या विषानं कलुषित झालेली, कसा निभाव लागायचा इथं? मायदेशी परत जावं या विचाराला फार काळ थारा दिला नाही. दुसरं मन म्हणालं, "ज्या कामासाठी मी इथे आलो आहे ते काम सोडून निघून जाणं योग्य नाही. आज माझ्या वाट्याला आलेला अपमान रंगभेदाच्या विषवल्लीचं एक छोटंसं फळ आहे. ही विषवल्ली उपटून काढणं माझं कर्तव्य आहे. त्यासाठी माझ्या देश-बांधवांना निर्भय बनवून संघटित करणं व अन्यायाविरुद्ध लढा देणं हे कर्तव्य मी केलंच पाहिजे. त्यासाठी अपमान व हालअपेष्टा सोसायला मी तयार असलं पाहिजे. नियोजित कार्य न करता निघून जाणं भित्रेपणा आहे व अन्यायाविरुद्ध उभं न राहणं ही कर्तव्यच्युती आहे. उलट-सुलट विचारात रात्र संपत आली. विचार मंथनही संपलं. अन्यायाविरुद्ध लढा देण्यासाठी आफ्रिकेतच राहण्याचा निर्णय त्या रात्री मोहनने घेतला."

## लाथा बुक्क्यांनी मारहाण

दुसऱ्या दिवशी प्रिटोरियाच्या दिशेने मोहनने आपला प्रवास पुन्हा सुरू केला. हा लांब पल्ल्याचा प्रवास रेलवे, घोडागाडी व पुन्हा अशाच स्वरूपाचा होता. घोडागाडीच्या प्रवासात

अपमानाचा दाहक अनुभव मोहनच्या वाट्याला आला. घोडागाडीच्या मालकाने त्याला गाडीवाल्याजवळ उघड्यावर बसायला सांगितले व स्वतः इतर उतारूंबरोबर आत बसला. हा अपमानाचा कडू घोट पिऊन मोहन गाडीवाल्याजवळ बसला. कारण त्याला प्रिटोरियाला लवकर पोहचणे आवश्यक होते. काही वेळाने मालकाला उघड्यावर बसून मोकळी हवा खाण्याची लहर आली. त्याने गाडीवाल्याच्या पायाशी एक कळकट पोत्याचा तुकडा टाकला व मोहनला त्यावर बसण्यास फर्मावले. हा अपमान असह्य होता. मोहनने साफ नकार दिला. इतर उतारुंबरोबर आत बसण्याचा आग्रह धरला. मालकाचा तिळपापड झाला. एका 'काळ्या' माणसाने मुकाटपणे न ऐकता प्रत्युत्तर देणे 'गोऱ्या' माणसाला सहन झाले नाही. त्याने शिव्यांची लाखोली वाहत मोहनला लाथाबुक्क्यांनी गाडीखाली ढकलण्यास सुरुवात केली. मोहनने गाडीचा पितळी गज पक्का धरून ठेवला होता. किरकोळ शरीरयष्टीच्या मोहनचा दणकट मालकासमोर निभाव लागणे कठिणच होते. बुक्क्या-लाथांनी मनगट मोडायची वेळ आली. तरीही मोहनने गजावरील पकड ढिली होऊ दिली नाही. गाडीच्या आत बसलेल्या उतारुंना ते सर्व गोरेच होते तरीही, मोहनची दया आली आणि त्यांच्या मध्यस्थीने त्याची सुटका झाली. कितीतरी वेळ त्याची छाती धडधडत होती. आपण हातीपायी धड राहून प्रिटोरियाला जिवंत पोहचू ना? हा प्रश्न त्याची पाठ सोडत नव्हता.

त्याला व पर्यायाने भारतीय लोकांना मिळणाऱ्या अपमानजनक वागणुकीला त्याने वाचा फोडली. रेलवे अधिकारी व घोडागाडीच्या एजंटांना त्याने झाला प्रकार कळवला. त्यांनी दिलेल्या आश्वासनांच्या भरवशावर त्याचा पुढचा प्रवास बराच निर्विघ्नपणे पार पडला व तो एकदाचा प्रिटोरियाला येऊन पोहचला.

**संतप्त लढा**

संपूर्ण प्रवासात वेगवेगळ्या मुक्कामांवर व प्रिटोरियाला पोहचल्यावर त्याला अनेक भारतीय भेटले. मोहनने आपल्या अपमानाची कथा सांगितल्यावर त्या सर्वांनी त्यांना आलेले

असलेच अनुभव ऐकवले. आफ्रिकेत रहायचं असेल तर असल्या अपमानांकडे दुर्लक्ष करण्याचा सल्लाही अनेकांनी त्याला दिला.

परंतु मारिट्सबर्ग स्टेशनवर अन्यायाविरुद्ध उभं राहण्याच्या निश्चयाची मनात पेटलेली ज्योत असल्या सल्ल्यांनी थरथरली नाही. ती शांतपणे तशीच तेवत राहिली त्यां ज्योतीच्या प्रकाशात त्याने कार्याला सुरुवात केली.

आठवड्याच्या आत त्याने सर्व भारतीयांची सभा घेतली. एकूण परिस्थितीची जाणीव देऊन अन्यायाच्या प्रतिकारासाठी संघटित होण्याचे आवाहन त्याने केले.

**सत्याग्रहाचे शस्त्र**

मोहन कोठीतील एका केसच्या कामासाठी आफ्रिकेत आला होता. परंतु आपल्या निश्चयाशी प्रामाणिक राहून काम संपल्यावरही तो तिथेच राहिला. १ वर्षासाठी आफ्रिकेत आलेला मोहन तब्बल २१ वर्ष आफ्रिकेत राहिला. अन्यायाचा प्रतिकार करण्यासठी सामान्य माणूसही हातात धरू शकेल. असे एक नवे आगळेवेगळे शस्त्र आफ्रिकेतील ह्या मुक्कामात त्याने जगाला दिले.

**अहिंसक सत्याग्रह**

आफ्रिकेतील अन्यायाचा प्रतिकार करण्यासाठी प्रत्यक्ष अहिंसक सत्याग्रह सुरू झाला. १९०८ मध्ये ज्या अन्याय कायद्याविरुद्ध हा सत्याग्रह होता तो कायदा रद्द करवून, सफलतेचा शिरपेच खोवूनच १९१४ मध्ये हा सत्याग्रह संपला. त्यानंतर मोहनदास करमचंद गांधीनी आफ्रिकेचा निरोप घेतला. भारतात येऊन भारतीय स्वातंत्र्य लढ्याचे नेतृत्व केले.

मारिटस्बर्ग स्टेशनवर घडलेली घटना मोहनच्या जीवनाला नवे वळण देणारी ठरली. त्या घटनेत बीज दडलं आहे. निशस्त्र माणसाला अन्यायाविरुद्ध उभं राहण्याचं बळ देणाऱ्या अहिंसक सत्याग्रहाचं. १८९३ साली घडलेली ही घटना मोहन ते महात्मा ह्या प्रवासाचा प्रारंभ बिंदु आहे.

## ३४. अध्यात्माला सामाजिक आशय देणारे वैष्णवजन

'वैष्णवजन तो तेने कहिये' हे महात्मा गांधींचे प्रिय भजन. त्या भजनातील वैष्णवजनाची वैशिष्ट्ये पूर्णत्वाला पोहोचलेली दिसतात. जसे 'पीडपराई' त्यांनी सततच जाणली. 'पर दुःखे उपकार करे' या ओवीप्रमाणे त्यांची जीवनकथा म्हणजे निरभिमानी वृत्तीने इतरांची दुःखे दूर करण्याच्या प्रयत्नची कथा आहे. हे इतरेजन आफ्रिकेतील असोत की भारतातील, हिंदू असोत, मुसलमान असोत किंवा ख्रिश्चन असोत सर्वच पीडितांना त्यांच्या हृदयात स्थान होते. सेवेला देशाचे, धर्माचे बंधन नव्हते ती स्थलातीत होती. धर्मातीत होती. भजनात सांगितलेली पुढची काही वैशिष्ट्ये अशी – 'निंदा न करे केणी रे' आपल्या शत्रूचीही त्या अहिंसेच्या पुजाऱ्याने कधी निंदा केली नाही. 'दृढ वैराग्य जे ना मनमा रे' जीवनभर गांधीजीनी दृढ वैराग्याचीच कास धरली. 'काम क्रोध निवार्या रे' त्यांनी जीवनभर केलेला उर्ध्वगामी प्रवास म्हणजे कामक्रोध जिंकण्याची पराकाष्ठाच.

असे हे 'वैष्णवजन' इतर ऋषिमुनींपेक्षा खचितच वेगळे होते. सर्वसंगपरित्याग करून आध्यात्मिक वृत्तीने जीवन जगणाऱ्या ऋषींचा वारसा भारताला लाभलेला आहे. गांधीजींनी हा वारसा निश्चित पुढे नेला आहे. तरीही, गांधीजी व इतर ऋषिमुनी यांच्यामध्ये खचितच एक वेगळेपण आहे. जिवाशिवाचे मीलन हे त्यांचे अंतिम उद्दिष्ट होते. त्यासाठी अध्यात्माची वाट धरून समाज-जीवनाचा त्याग त्यांनी केला, विजनवास पत्करला. मोक्ष हे जीवनाचे अंतिम ध्येय होते. सांसारिक दुःख, यातना या जंजाळातून बाहेर पडून त्यांनी मुक्तीच्या दिशेने वाटचाल केली. ती वाटचाल व्यक्ति एकेकटी करायची त्यात समष्टीचा विचार नव्हता. एखादा साधक दुःख व यातना यांच्या पलीकडे पोहचत होता. पण त्याच वेळी भोवतालची माणसे मात्र दुःख, कलेश, यातना यांच्या जंजाळात खितपत पडलेली असायची. गांधीजींनी मात्र सतत समष्टीचा विचार केला.

## सामाजिक भान

गांधीजींनी अध्यात्माला सामाजिक आशय दिला. आत्मसाक्षात्कार व मुक्ति हीच जीवनाची अंतिम ध्येये गांधीजींनीही मानली होती. पण ही ध्येये साध्य करण्यासाठी समाजविन्मुखता किंवा विजनवास त्यांना मान्य नव्हता. परमेश्वरापर्यंत जाण्याचा त्यांचा मार्ग होता, जनसेवा, त्यांच्या लिखाणात त्यांच्या या मान्यतेचे जागोजागी दर्शन घडते. त्यांचा ईश्वर दीनदुबळ्यांच्या हृदयात वास करीत होता. ते असं म्हणतात - “माझ्या लक्षावधी बांधवांच्या हृदयातील परमेश्वराखेरीज दुसरा कोणताही देव मी ओळखत नाही. या सत्यरूपी ईश्वराचे, ईश्वररूपी सत्याचे पूजन मी या लक्षावधी बांधवांच्या सेवेतून करतो.” त्यांची मोक्षाच्या दिशेने झालेली वाटचाल समष्टीला विसरून झालेली नाही. ते म्हणतात- “मी करीत असलेली देशसेवा म्हणजे शरीराच्या बांधिलकीतून आत्म्याला मुक्ति मिळवण्यासाठी मी घेत असलेले प्रशिक्षण होय. कारण मोक्षाकडे जाणारा मार्ग माझ्या देशाची व मानवतेची अखंड सेवा हाच आहे. एका ठिकाणी ते असंही म्हणतात की ईश्वराला त्याच्या निर्मितीत पाहणे आणि निर्मितीशी समरस होणे हा त्याला शोधण्याचा सर्वात उत्तम मार्ग आहे. आणि हे फक्त देशसेवेतूनच घडू शकते.”

जनसेवेतून ईश्वरसाक्षात्काराची कामना आणि समष्टीच्या दुःख निवारणाचा सतत विचार व्यक्त करणारी कितीतरी वाक्ये गांधीजींच्या लिखाणात जागोजाग विखुरली आहेत.

## व्रताचरण

आपल्या येथे आध्यात्मिक जीवन जगणाऱ्या मुमुक्षूंसाठी व्रतविचार सांगितलेला आहे. गांधीजींनी व्रताचरण केवळ अध्यात्मिक क्षेत्रापुरते सीमित मानले नाही. सांसारिक माणसासाठीही व्रताचरण आवश्यक मानले. सामाजिक, आर्थिक व राजकीय जीवनात ही गांधीजींनी व्रतपालनाला महत्त्व दिले. जुन्या व्रतांमध्ये नवीन व्रते जोडून अकरा व्रते सांगितली. नव्याने जोडलेल्या व्रतांमध्ये शरीरश्रम, भयवर्जन, सर्वधर्मी समानत्व, स्वदेशी आणि स्पर्शभावना

यासारख्या व्रतांमधून निश्चितपणे सामाजिक, आर्थिक व राजकीय आशय अभिव्यक्त होतो. येथे समष्टीचा विचार आहे. अहिंसा, सत्य, ब्रह्मचर्य, असंग्रह यासारख्या व्रतांमध्येही त्यांनी नवा आशय भरला. या सर्वच व्रतांमध्ये समष्टी व व्यक्ती या दोन्हींचा विचार आहे. व्यक्तीच्या उर्ध्वगामी प्रवासाला दिशा दिली आहे व समष्टीच्या सामंजस्याची दृष्टी आहे.

सर्वच संतमहात्म्यांनी, भक्तांनी ईश्वरी साक्षात्कार व मोक्षप्राप्तीच्या इच्छेने परमेश्वराला आळवण्यासाठी भक्तिगीते, प्रार्थनागीते रचली आहेत. गांधीजींनीही स्वतः एक प्रार्थना रचली आहे. त्या प्रार्थनेला 'सेवक की प्रार्थना' म्हणतात. या प्रार्थनेतूनही ईश्वरभक्तीला त्यांनी दिलेला सामाजिक आशय आणि सेवेला दिलेले महत्त्व प्रगट होते. त्यांनी रचलेली प्रार्थनाच पुढे देते. म्हणजे त्यांचे वेगळेपण लक्षात येईल.

**हे नम्रता के सम्राट!**
**दीन भंगी की हीन कुटिया के निवासी !**
**गंगा यमुना और ब्रह्मपुत्रा के जलों से**
**सिंचित इस सुंदर देश में**
**तुझे सब जगह खोजने में हमें मदद दे।**
**हमें ग्रहनशीलता और खुला दिल दे,**
**तेरी अपनी नम्रता दे,**
**हिन्दुस्तान की जनता से एकरूप होने की**
**शक्ति और उत्कंठा दे।**
**हे भगवन्**
**तू तभी मदद के लिए आता है**
**जब मनुष्य शून्य बनकर तेरी शरण लेता है**
**हमें वरदान दे की**

**सेवक और मित्र के नाते**

**जिस जनता की हम सेवा करना चाहते हैं**

**उससे कभी अलग न पड़ जायें।**

**हमें त्याग भक्ति और नम्रता की मूर्ति बना;**

**ताकि इस देश को हम ज्यादा समझे और ज्यादा चाहे।**

जसा भाव तसा देव असं म्हटलं जातं. आपल्या रचनांमध्ये भक्तांनी परमेश्वराला वेगवेगळ्या रूपात बघितलेलं आढळतं. वेगवेगळी संबोधन वापरलेली दिसतात. कोणी ईश्वराला सुखकर्ता, दुखहर्ता, दयावंत संबोधतात. तर कोणी पतित-पावन, मोक्षदाता, वरदाता म्हणतात. गांधीजींनी स्वतः रचलेल्या प्रार्थनेत ते ईश्वराला नम्रता के सम्राट म्हणतात. त्यांच्या दृष्टीने मानवतेची सेवा हा मोक्षाचा मार्ग आहे आणि सेवकाचं सर्वश्रेष्ठ लक्षण आहे नम्रता. घोड्याला खरारा करणाऱ्या, उष्ट्या पत्रावळी उचलणाऱ्या, जनीबरोबर दळणाऱ्या नम्र सेवकाच्या रूपातच गांधीजींनी ईश्वराला पाहिलं व त्याला नम्रता के सम्राट म्हटलं. ईश्वराच्या शोधार्थ गिरिकंदरात जाणे त्यांना आवश्यक वाटत नाही. सगळीकडे ईश्वराचे दर्शन करण्याची क्षमता मिळवण्यासाठी जनतेशी एकरूप होण्यासाठी ते परमेश्वराजवळ शक्ती मागतात. ‘ग्रहणशीलता’, ‘खुला दिल’, ‘त्याग’, ‘भक्ती’ आणि ‘नम्रता’ मागतात. हे सर्व गुण हवे आहेत जनसेवेसाठी. ज्यांची सेवा करायची आहे, त्यांच्यामध्येच राहण्याची, त्यांच्यात व स्वतःमध्ये कधीही दुरावा निर्माण होऊ नये, अशी त्यांची इच्छा आहे. तसा वर ते ईश्वराजवळ मागतात. ह्या संपूर्ण प्रार्थनेतून जनतेशी एकरूप होऊन त्यांची सेवा करण्याची उत्कटता प्रगट होते. भारताबद्दलचे निस्सीम प्रेम व्यक्त होते.

महात्मा गांधीजींचा आध्यात्मिक प्रवास समष्टीला बरोबर घेऊन केलेला प्रवास आहे. समष्टीपासून अलिप्त राहून केलेला प्रवास नाही. भारताचा आध्यात्मिक आशय देणारे ते एक आगळेवेगळे वैष्णवजन होते.

# ३५. हे व्यर्थ न हो बलिदान !

गांधीजी अनेक तऱ्हेच्या समज आणि अपसमजाच्या गुंत्यात गुरफटले आहेत. कुठेतरी धुक्यात हरवल्यासारखे भासतात. स्पष्ट आणि वास्तव स्वरूपात दिसतच नाहीत. त्यामुळे गांधी कळतही नाहीत. वास्तव स्वरूप न कळल्यामुळे त्यांच्यावर अनेक शिक्के मारले जातात. त्यापैकी पूर्वीपासून आजपर्यंत मारला जाणारा लोकप्रिय शिक्का आहे – 'मजबूरी का नाम महात्मा गांधी.' गांधीजींबद्दल फारसं काही माहित नसणारेही सहजगत्या हा शिक्का मारतात. कारण पूर्वापार चालत आलेला हा शिक्का त्यांनी बऱ्याचदा ऐकलेला असतो. त्याचा खरे-खोटेपणा तपासण्यासाठी गांधीजींविषयी काही वाचावं, जाणून घ्यावं असं त्यांना वाटतच नाही.

गांधीजींची जीवनकथा, त्यांचं कार्य डोळ्याखालून घातल्यास त्यांच्या जीवनात कुठेही मजबूरी किंवा लाचारी दिसत नाही. ते, ना बलाढ्य इंग्रजांपुढे लाचार झाले, ना धनाढ्यांपुढे, ना उच्चवर्णियांपुढे, ना सशस्त्र क्रांतीकारकांपुढे. हा शिक्का मारणाऱ्यांना त्यांच्या जीवनात कुठे मजबूरी दिसते ? हे कळतच नाही. खरे तर गांधीजींच्या जीवनात मजबूरी नव्हे तर मजबूतीचं दर्शन होतं. त्यांचं सर्वच मजबूत होतं. त्यांचा आत्मविश्वास मजबूत होता. त्यांची इच्छाशक्ती मजबूत होती. अन्यायाविरुद्ध उभं राहण्याचं त्यांचं शौर्य मजबूत होतं. आणि सत्याच्या शोधासाठी जीवनभर आपलेच विचार आणि विकार तपासणारा त्यांच्यामधील संशोधकही मजबूत होता. तरीही आपण 'मजबूरी का नाम गांधी' हा शिक्का मारतच राहणार का? 'मजबूरी का नहीं बल्कि मजबूती का नाम गांधी है।' हेच अधिक खरं.

गांधीजींविषयी अनेक अपसमज आहेत. त्यांच्या खाण्यापासून तर त्यांच्या विचारधारेपर्यंत. त्या समजांपैकी काही समज गांधीजी जीवंत असतानापासूनचे आहेत तर काही नंतरचे. त्यांची हत्या होऊन सात दशकांपेक्षा जास्त काळ लोटला आहे पण आजही त्यांच्या हत्येच्या कारणांसंबधी जुनेच, चुकीचे समज गोबेल्सचे प्रजातंत्र वापरून दृढमूल केले जातात.

वास्तव समोर मांडण्याचा फारसा प्रयत्न झालेला दिसत नाही. बहुसंख्य सर्वसामान्यांच्या दृष्टीने गांधी हत्येची खरी कारणे अजूनही धुक्यातच हरवलेली आहेत. त्यामुळे चुकीची कारणेच समाज खरी धरून चालतो. गांधी हत्येच्या कारणांसंबंधी सर्व सामान्यांच्या मनात ३ समज रूजवले जातात.

१) गांधीजींमुळे देशाची फाळणी झाली, धार्मिक दंगे झाले, हिंदूंचा छळ झाला, प्राण गमवावे लागले. त्यामुळे चिडून जाऊन नत्थूरामने गांधीजींची हत्या केली.

२) गांधीजींचा आग्रह व उपवास ह्यामुळे ५५ कोटी रुपये पाकिस्तानला दिले गेले. ह्याचा राग आल्याने हत्या झाली.

३) गांधीजींचा मुस्लिमधार्जिणेपणा हत्येस कारणीभूत ठरला.

पुन्हा पुन्हा प्रचार करून सांगितली जाणारी ही कारणे वास्तवाच्या कसोटीवर कितपत टिकतात ते क्रमशः बघू या.

१) गांधीजींमुळे फाळणी झाली म्हणून हत्या झाली हे कारण सामान्यपणे लगेच पटू शकते. कारण फालोणीचं दुःख सर्वांनाच होतं. त्यामुळे ज्या व्यक्तीमुळे फाळणी झाली तिची हत्या केली हे चांगलंच झालं, असा विचार सर्वसामान्यांच्या मनात तरळून जातो. मनोमनी हत्येचं समर्थन केलं जातं. पण उपलब्ध माहितीच्या कसोटीवर हे कारण टिकत नाही. हे कारण जर खरं मानलं तर फाळणीचा विचारही कुठे अस्तित्वात नसताना फाळणीचा प्रस्ताव येण्यापूर्वी झालेले गांधी हत्येचे प्रयत्न का झाले होते ह्याचा उलगडा होत नाही.

**गांधी हत्येचे विविध प्रयत्न**

३० जानेवारी १९४८ ला गांधी हत्येचा यशस्वी प्रयत्न झाला. त्यापूर्वी भारतात गांधी हत्येचे ७ प्रयत्न झाले आहेत. त्यापैकी ५ प्रयत्नांची कागदोपत्री नोंद झालेली आढळते.

## पहिला प्रयत्न

हा प्रयत्न २५ जून १९३४ ला पुण्यात झाला. गांधीजींचा हरिजन कार्यासाठी देशव्यापी दौरा चालू होता. त्यावेळी ते पुण्याला आले असताना ब्रिटिशसरकारचा विरोध डावलून पुणे म्युन्सिपाल्टीने त्यांना मानपत्र द्यायचं ठरवलं होतं. गांधीजी तिकडेच निघाले असताना त्यांच्या कारवर बॉम्ब फेकण्यात आला. तो वेगळ्याच कारवर पडला. गांधीजींना कुठलीही इजा झाली नाही. १९३४ मध्ये स्वातंत्र्यही दृष्टीपथात नव्हते. पाकिस्तान आणि फाळणी हे विचार आसमंतातही असण्याची शक्यता नव्हती, मग हत्येचा प्रयत्न का झाला ? वृत्तपत्रांमध्ये विशेषतः 'सकाळ' वृत्तपत्रात हा घटनेची विस्तृत नोंद आढळते. आचार्य जावडेकर गांधी चरित्रात म्हणतात की, "गांधीजींच्या हरिजनकार्यामुळे चिडलेल्या काही धर्मवेड्या हिंदूनी त्यांच्या मोटारीवर बॉम्ब फेकला." हिंदु धर्माच्या रक्षणासाठी गांधी हत्या आवश्यक आहे. असे काही कट्टर धर्माभिमानी लोकांना वाटत होते, असे यावरून दिसन येते. प्यारेलाल 'लास्ट फेज' मध्ये लिहितात की, त्यांची ह्या वेळची कृती पूर्ण नियोजनबद्ध होती. ह्या वाक्याचा अर्थ असा होतो की ह्यापूर्वीही गांधीहत्येचे प्रयत्न झाले आहेत. पण त्यात योग्य नियोजनाची उणीव होती. प्यारेलाल पुढे म्हणतात की, गांधीजींना संपवण्याचा हेतू असणाऱ्या लोकांच्या बुटांमध्ये गांधी, नेहरू आणि काँग्रेसच्या इतर पुढाऱ्यांचे फोटो ठेवलेले होते. गांधीजींच्या फोटोला टारगेट (लक्ष्य) करून त्यांना नेमबाजीचा सराव दिला गेला होता. पुढे ते स्पष्ट शब्दात नोंदवतात की हे तेच लोक होते ज्यांनी ३० जानेवारीला गांधीजींची हत्या केली.

जी. डी. तेंडुलकरांच्या 'महात्मा गांधी' खंड ३ मध्ये आणि श्रीपाद जोशींच्या 'महात्मा-माय बाप' ह्या पुस्तकांमध्येही ह्या घटनेची नोंद आढळते. बॉंब फेकणाऱ्यांचा शोध पोलिस घेऊ शकलेले नाहीत.

## दुसरा प्रयत्न

जुलै १९४४ ला पाचगणीला दुसरा प्रयत्न झाला. विश्रांतीसाठी गांधीजींचा मुक्काम पाचगणीला असताना पुण्याचा एक गट पाचगणीला आला. दिवसभर तो गट बंगल्यासमोर गांधीविरोधी घोषणा देत निदर्शनं करीत होता. गांधीजीनं गटाचा म्होरक्या नत्थूराम गोडसे याला चर्चेसाठी बोलावले. तो आला नाही. कुठल्याही कट्टरपंथी लोकांना चर्चेचं वावडंच असतं. बाहेर निदर्शनं चालू असतानाच गांधीजींची सायंप्रार्थना सुरू झाली. त्यावेळी हातात सुरा घेऊन नत्थूराम गोडसे गांधीजींच्या दिशेने धावला. पुण्याच्या सुरती हॉटेलचे मालक आणि भिल्लारे गुरुजी ह्या दोघांनी चपळाईने गोडसेला पकडलं. गटातील इतर सदस्य पळून गेले. गांधीजी शांत होते. प्रार्थना सुरू राहिली. नंतर ते गोडसेला म्हणाले की आपण दोघं ८ दिवस सोबत राहू. परस्परांचे विचार समजून घेऊ. गोडसेने नकार दिला. दिलदार आणि क्षमाशील गांधीजींनी त्याला सोडून दिलं. न. "Let's kill Gandhi" या पुस्तकाचे लेखक, गांधीजींचे पणतु तुषार गांधी १३ जानेवारी २००७ ला भिलारे गुरुजींना भेटले होते. भेटीचा वृत्तांत पुस्तकात दिलेला आहे. भिलारे गुरुजींनी त्या गटात सहभागी असलेल्यांची नावे पुढील प्रमाणे सांगितली - विष्णु करकरे, गोपाळ गोडसे, ल. ग. थत्ते आणि बडगे. ३० जानेवारी १९४८ ला गांधी हत्येच्या कटात हेच लोक सहभागी होते. हे काय दर्शवते ? यापेक्षा आणखी पुरावा काय द्यावा?

गांधी हत्येच्या कटाचा तपास करण्यासाठी १९६६ साली कपूर आयोग नेमला गेला. पाचगणीच्या प्रयत्नांसंबंधी आयोगापुढे पुढील गोष्टी आल्या. पाचगणीला जाण्यापूर्वी गोडसेने आपल्या वृत्तपत्रात काम करणाऱ्या श्री जोगळेकरांना सांगितलं होतं की, गांधीजी संबंधी खास बातमी तुम्हाला पाचगणीतून कळेल. पुना हेराल्डचे संपादक डेव्हिड ह्यांनीही वरील विधानाला पुष्टी दिली आहे. टाइम्स ऑफ इंडियाच्या बाबतीत असा उल्लेख होता की, पुण्याच्या एका संपादकाने पाचगणीला गांधी हत्येचा प्रयत्न केला.

## प्रयत्न तिसरा

सेवाग्राम येथे १९४४ ला गांधीहत्येचा तिसरा प्रयत्न झाला. गांधीजी जिन्हांशी बोलणी करण्याकरिता सेवाग्रामहून मुंबईला जाणार होते. त्यांनी जिन्हांना भेटू नये अशी हिंदुत्ववाद्यांची इच्छा होती. असं त्यांना का वाटत होतं? हे समजणं अवघड आहे. आपण अखंड हिंदुस्थानचं स्वप्न पूर्ण व्हावं, यासाठी कुठलेही प्रयत्न करायचे नाहीत. फाळणीचं खापर मात्र सतत गांधीजींच्या डोक्यावर फोडायचं असं आकलनापलिकडचं वागणं कट्टर हिंदुत्ववादी संघटनाचं होतं. गांधीजी जिन्हांना भेटायला कशाला जात होते हे काय त्यांना माहित नव्हतं? आणि माहीत नसेल तर त्यांच्या अज्ञानाची कीवच करायला हवी. त्यांना असं वाटत होतं का की गांधीजी जिन्हांना हे सांगायला निघाले आहेत की 'बा जिन्हा, तू पाकिस्तानची मागणी लावून धर; फाळणीचा विचार सोडू नकोस.' त्यामुळे गांधीजींनी जिन्हांना भेटू नये असे त्यांना वाटत होते का? खरे तर जिन्हांनी वेगळ्या मुस्लिम राष्ट्रीचा विचार सोडून द्यावा हे समजवायला ते जाणार होते. स्वतः नम्र होऊन ते जिन्हांच्या दारी जाणार होते. पण गांधीजींच्या प्रत्येक गोष्टीला विरोध करायचा हेच जर धोरण असेल तर जिन्हांना भेटायला गांधीजी का जात होते हे समजणार कसे ?

गांधी ९ सप्टेंबर १९४४ ला सेवाग्रामहून मुंबईला रवाना होणार होते. जिन्हा आणि गांधीजींची भेट होऊ देणार नाही असा निर्धार व्यक्त करून नथुराम गोडसे आणि ल. ग. थत्ते एक गट घेऊन आदल्या दिवशीच सेवाग्रामला आले होते. दिवसभर नारेबाजी चालू होती. वर्ध्याच्या पोलीस सुपरिटेंडने प्यारेलालांना धोक्याचा इशारा देऊन कळवले होते की हा गट कुठल्याही टोकाला जाऊ शकतो, सावध रहा. गांधीजी जाण्यासाठी निघाले असताना, त्यांच्या जवळ जाण्याचा प्रयत्न करणाऱ्या नत्थूरामला आश्रमवासियांनी पकडले. पोलिसांनी त्यांच्याकडून एक जंबिया जप्त केला. गांधीना मारून हुतात्मा बनायचं आहे का? ह्या पोलिस ऑफिसरच्या प्रश्नाला ल. ग. थत्तेंनी उत्तर दिले की, आमच्यापैकी जो गांधीना मारेल तो हुतात्मा होईलच. ऑफिसर पुन्हा म्हणाला, गांधींशी चर्चा करण्याचं काम ,तुम्ही सावरकरांसारख्या तुमच्या पुढाऱ्यांवर का सोपवत

नाही ? थत्तेंनी उत्तर दिलं. "सावरकर गांधीजींशी बोलले तर तो गांधीचा फार मोठा सन्मान ठरेल.' गोडसेकडे हात करून ते म्हणाले, 'त्या कामासाठी आमचा हा जमादारच पुरेसा आहे, सावरकरांची गरज नाही.'

सेवाग्रामच्या सर्व घटनेची वर्ध्याच्या पोलिस रेकॉर्डमध्ये नोंद आहे. डॉ. सुशीला नायर यांनी कपूर आयोगासमोरील साक्षीत वरील सर्व तपशील नोंदवला आहे. प्यारेलालनी दुसऱ्या दिवशी तेज बहादूर सप्रूंना पत्र लिहिलं. त्यात ते स्पष्ट लिहितात की, हिंदु महासभेच्या लोकांनी आश्रमात उग्र निदर्शनं केली.

गांधी हत्येचा हा तिसरा प्रयत्न. हा प्रयत्नातही नत्थूराम होता. सप्टेंबर १९४४ ला भारताचे स्वातंत्र्यही अजून अंधारात होते. फाळणी ५५ कोटी रुपये पाकिस्तानला देणे ह्या सर्व गोष्टींचा तर प्रश्नच नव्हता. तरीही गांधी हत्येचा प्रयत्न झाला. गांधी हत्येनंतर त्या हत्येला लोकांचं समर्थन मिळविण्यासाठी जी कारणे पुढे केली जातात ती किती फसवी आहेत, हे यावरून लक्षात येतं. काळणीच्या खूपच आधीपासून पुण्याचा हिंदुत्ववादी गट गांधीजींना संपविण्याच्या मागे लागला होता.

**चौथा प्रयत्न**

हा प्रयत्नही फाळणी आणि ५५ कोटी रुपये दिले गेल्याच्या आधीचा आहे. जिन्हा पाकिस्तानची मागणी सातत्याने करीत असले तरी काँग्रेसच्या फाळणीला विरोध होता. गांधीजी तर अखेरपर्यंत फाळणीच्या विरोधीच होते. कॅबिनेट मिशनचाही फाळणीला विरोध होता. असे असताना हा प्रयत्न झाला आहे.

२९ जून १९४६. गांधीजी स्पेशल ट्रेनने मुंबईहून पुण्याला निघाले होते. रात्री ट्रेन वेगाने मार्गक्रमण करीत होती. नेरळ आणि कर्जत स्टेशनच्या दरम्यान रूळावर मोठमोठ्या दरडी टाकून ठेवल्या होत्या. गाडीचा ड्रायव्हर परेरा यांच्या सतर्कतेमुळे अपघात टळला. त्याने इमर्जंसी ब्रेक

वापरले तरीही इंजिन दरडीवर आदळले आणि इंजिनचे खूपच नुकसान झाले. दुसरे इंजिन आल्यावर गाडीचा पुढचा प्रवास सुरू झाला. या घटनेसंबंधी प्यारेलालनी ७ जूनच्या हरिजनमध्ये एक लेख लिहिला आहे. जी. डी. तेंडुलकरांच्या महात्मा खंड सातमध्येही या घटनेचा उल्लेख आहे. तपासानंतर स्पष्ट होते की, त्या ट्रेनच्या आधी किंवा नंतर त्या मार्गावरून कुठलीच ट्रेन जाणार नव्हती. तेव्हा गांधीजींची ट्रेन उलथण्यासाठीच हा खटाटोप होता.

ह्या घटनेनंतर ३० जूनच्या प्रार्थना सभेत गांधीजी म्हणाले, “देवाच्या दयेने आतापर्यंत ७ वेळा मी मृत्यूच्या जबड्यातून सुटलो आहे. मी आजपर्यंत कोणालाही इजा पोहोचविली नाही. मी कोणालाही शत्रू मानत नाही. तरीही माझ्या हत्येचे इतके प्रयत्न का झाले समजत नाही. माझ्या हत्येचा कालचा प्रयत्न फसला. मला एवढ्यात मरायचे नाही. १२५ वर्षे जगायचे आहे.”

अग्रणी नावाचं एक नियतकालिक पुण्याहून निघत असे. नत्थूराम गोडसे त्याचा संपादक होता. गांधीजींच्या वरील व्याख्यानाची बातमी त्याने अग्रणीत दिली आहे. मला १२५ वर्ष जगायचे आहे हे गांधीजींचे वाक्य छापून त्यापुढे संपादकीय टिप्पणी आहे, ‘पण जगू कोण देतं?’ काय अर्थ घ्यायचा या वाक्याचा? गांधी हत्येचा निर्धारच या वाक्यातून व्यक्त होतोय.

**प्रयत्न पाचवा**

हा प्रयत्न फाळणी आणि ५५ कोटी रुपये देण्याच्या निर्णयानंतरचा आहे. २० जानेवारी १९४८ ला गांधीजींच्या प्रार्थनासभेत बाँब फेकण्यात आला. मदनलाल पहवा नावाच्या शरणार्थ्याने तो फेकला. गांधीजींपासून थोड्या अंतरावर तो फुटला. कोणालाही इजा झाली नाही. सभेत थोडा गोंधळ झाला. सर्वांना शांत करून गांधीजींनी आपले बोलणे चालू ठेवले. मदनलालला पोलिसांच्या हवाली करण्यात आले.

मदनलाल एक शरणार्थी होता. शरणार्थ्याने चिडून गांधीजींवर बाँब फेकला असा समज सकृत दर्शनी होऊ शकतो. परंतु मदनलालने पोलीसला जो कबुली जवाब दिला त्यावरून हे

स्पष्ट होते की, तो एक कट होता. कटात सहभागी व्यक्तींची नावे त्याने सांगितली. नत्थूराम गोडसे आणि नारायण आपटे हे कटाचे प्रमुख होते शिवाय विष्णु करकरे, किश्तय्या आणि बडगे कटात सहभागी होते. प्रार्थनेच्या वेळी कोणी उभं रहायचं. पिस्तुलने गोळी कोणी मारायची, बॉंब कोणी कसा फेकायचा, सारं नियोजन झालं होतं. खरं तर त्याच दिवशी गांधीजींची हत्या झाली असती. पण ह्या गँगचा बेस्ट शूटर बडगे याने ऐनवेळी कच खाल्ली आणि सगळीच योजना फिसकटली. मदनलालने नत्थूराम आणि नारायण आपटे कोणत्या हॉटेलमध्ये उतरले होते ते सांगितले. त्यांच्या भेटीची, नेमबाजीच्या सरावाची ठिकाणं सांगितली. दिल्लीच्या हिंदु महासभा सदनात त्यांचं येणं जाणं परस्परांना भेटणं सागितलं. मदनलालच्या कबुली जबाबातून बऱ्याच गोष्टी स्पष्ट झाल्या होत्या.

गांधीहत्या खटल्याचे न्यायाधीश आत्माचरण यांनी आपल्या जजमेंटमध्ये पोलीस विभागाच्या हलगर्जीपणाबद्दल कडक शब्दात ताशेरे झाडले आहेत. ते म्हणतात, ‘मी केंद्रसरकारच्या निदर्शनास आणू इच्छितो की, पोलीसांनी २० जानेवारी ते ३० जानेवारी दरम्यान तपासाचं काम अत्यंत निष्काळजीपणानं केलं. त्यांच्याकडे मदनलालचा कबुली जवाब होता. डॉ. जे. सी. जैननी दिलेली माहिती होती. या दोन्हींचा पोलीसांनी योग्य उपयोग करून घेतला नाही. पोलीसांनी २० ते ३० जानेवारी दरम्यान काळजीपूर्वक तपास केला असता तर ३० जानेवारीची दुर्दैवी घटना टळली असती. न्यायमूर्ती कपूरही स्पष्ट शब्दांत पोलीसांवर ठपका ठेवतात.

पोलीसांनी इतका हलगर्जीपणा का केला ? या प्रश्नाचं उत्तर शोधण्याचा प्रयत्न केला की, केंद्र सरकारकडे आलेल्या गोपनीय अहवालातील काही वाक्य आपलं लक्ष वेधून घेतात. अहवाल असे सांगतो की, पोलीस विभागात आणि नोकरशाहीत हिंदुत्ववादी संघटनांचे बरेच लोक घुसले आहेत. काही या संघटनांचे प्रत्यक्ष सदस्य आहेत आणि काही छुपे समर्थक, आपण पाहिलं की, गांधीहत्येच्या प्रयत्नात सातत्याने सहभागी असलेले सर्वच लोक या संघटनांशी जवळून संबंधीत आहेत. २० जानेवारीच्या कटात सहभागी असणारे सर्व लोक दिल्लीच्या हिंदू

महासभेच्या सदनात भेटत होते. हे सर्व वास्तव पाहिलं की, तुषार गांधींनी 'लेट्स किल गांधी' या पुस्तकात लिहिलेलं आपल्यालाही पटलं. ते लिहितात "पिस्तुलमधून गोळ्या घालणारा नत्थुराम जितका दोषी आहे तितकीच दोषी किंवा गुन्हेगार नोकरशाही आणि पोलीस डिपार्टमेंट आहेत." ह्या पाचव्या प्रयत्नाच्या कटाचा नत्थुराम प्रमुख होता.

**प्रयत्न सहावा**

३० जानेवारी १९४८ चा प्रयत्न सहीवा. हा हत्येचा यशस्वी प्रयत्न. २० जानेवारीचा कट फिसकटल्यानंतर गोडसे आणि आपटे दोघं दिल्लीहून निसटले. ट्रेनमध्ये गोडसे आपटेला म्हणाला की, "आता कट, गट सर्व सोडून इतर कोणाच्याही मदतीशिवाय मी गांधीहत्येचे कार्य पार पाडणार." तो तयारीला लागला. त्याने पिस्तुल मिळविले. तो आणि आपटे २९ जानेवारीला दिल्लीत येऊन पोहोचले. करकरेही पोहोचला होता. ठरवल्याप्रमाणे हत्येचे कार्य नत्थूरामने एकट्यानेच पार पाडले. इतर दोघांचा प्रत्यक्ष सहभाग नव्हता. प्रार्थनेसाठी येत असलेल्या गांधीजींवर गोडसेने तीन गोळ्या झाडल्या. गांधीजींचे पांढरे शुभ्र उपरणे रक्ताने माखले. ते खाली कोसळले, त्यांची प्राणज्योत मालवली.

## २. पंचावन्न कोटींचे वास्तव

५५ कोटी रुपये आपण पाकिस्तानला दिले पाहिजेत हा गांधीजींचा आग्रह आणि त्यासाठी केलेला उपवास यामुळे ते पैसे द्यावेच लागले, असा एक समज जनमानसात रुजवून त्यामुळे हत्या झाली असे सांगितले जाते. ५५ कोटी विषयी फारसं माहित नसणारे सामान्य जन तेच खरं मानून चालतात. हे पैसे देणं हा मुसलमानांचा लाड करण्याचाच प्रकार त्यांना वाटतो. त्यामागचं वास्तव समजून घेणं गरजेचं आहे.

* फाळणीच्या वेळी हिंदुस्थानच्या तिजोरीत ३७५ कोटी रुपये होते.

* कायदेशीर करारान्वये ३०० कोटी भारताचे आणि ७५ कोटी पाकिस्तानचे आशी वाटणी ठरली.

* पाकिस्तान नव्याने उभं राहणारं राष्ट्र असल्याने २० कोटी रु. पाकिस्तानच्या निर्मितीच्या वेळीच दिले गेले.

* राहिलेले ५५ कोटी रुपये एका निश्चित अवधीपूर्वी पाकिस्तानला देण्याचे लेखी आश्वासन भारताने पाकिस्तानला डिसेंबर १९४७ मध्ये दिले होते.

* स्वातंत्र्यानंतर पाकिस्तानने टोळीवाले घुसवून युद्धसदृश्य परिस्थिती निर्माण केली होती. त्यामुळे हे पैसे द्यायला पटेल आणि नेहरू खळखळ करू लागले.

* ५५ कोटीचे प्रकरण, त्याच्या कायदेशीर तरतूदी समजून घ्यायला गांधीजी ६ जानेवारी १९४८ ला माउंट बॅटनना भेटले. त्यांनी सांगितलं की दोन स्वतंत्र राष्ट्रामध्ये झालेला हा कायदेशीर करार आहे. त्याचं पालन न केल्यास करार न पाळणारा देश अशी भारताची प्रतिमा जगासमोर जाईल. स्वातंत्र्याच्या प्रभातीच अशी प्रतिमा तयार झाल्यास जगात भारताच्या शब्दाला किंमत राहणार नाही.

* माउंट बॅटन शिवाय त्या वेळचे रिझर्व बँकेचे गव्हर्नर सी. डी. देशमुख आणि राजगोपालाचारीही पैसे दिले पाहिजेत ह्याच मताचे होते.

* हे पैसे दिले पाहिजेत असं गांधीजींचंही मत होतं. ते कायदेशीर तर होतंच, कुटुंबातील एक वयोवृध्द व्यक्ती म्हणूनही ते योग्य होतं आणि ते नीतीला धरून होतं. राजकारणाला नैतिक अधिष्ठान देणाऱ्या गांधीजींनी हे पैसे देऊ नका असं म्हणायला हवं होतं? दोन भाऊ जेव्हा विभक्त होतात तेव्हा वडिलांची जी भूमिका असते तशीच गांधीजींची होती.

उपवास करून गांधीजींनी ५५ कोटी रुपये द्यायला लावले असा धादांत खोटा प्रचार केला जातो. खरं तर ५५ कोटी रुपये आणि उपवास ह्यांचा काहीही संबंध नाही. हिंदु-मुस्लिम-शिख यांच्यामधील दंगे पराकोटीला पोहचले होते. दिल्ली धार्मिक विद्वेषाच्या आगीत होरपळत होती. परिस्थितीच्या दर्शनाने गांधीजी व्याकूळ होते. चिंतीत होते. दंगे थांबून शांतता प्रस्थापित व्हावी यासाठी त्यांनी उपवास सुरू केला. आपले प्राण पणाला लावले.

उपवासाचा कालक्रम थोडा समजून घेऊ या म्हणजे उपवास ५५ कोटीसाठी नव्हता हे स्पष्ट होईल.

- १३ जानेवारी १९४८ ला उपवास सुरू झाला.
- १४ जानेवारीला पैसे न देण्याचा निर्णय बदलून ५५ कोटी रुपये देण्याचा निर्णय झाला. उपवास जर ५५ कोटीसाठी असता तर तो या निर्णयानंतर सुटायला हवा होता. पण तो चालूच राहिला कारण तो त्यासाठी नव्हताच.
- १५, १६ किंवा १७ तारखेलाही उपवास सुटला नाही.
- उपवास सुटला १८ तारखेला.

दिल्लीतील दंगे थांबून शांतता प्रस्थापित व्हावी यासाठी विविध धर्मांचे लोक शर्थीचे प्रयत्न करीत होते. हे प्रयत्न आणि गांधीजींचा उपवास यामुळे दिल्ली थोडी शांत होत होती. ते पाहून गांधीजींनी उपवास सोडावा अशी विनंती सर्व करत होते. पण गांधीजींनी उपवास सौडला नाही. ७ अटींची पूर्तता करणारं लेखी आश्वासन त्यांना हवं होतं. ह्या अटी पूर्णपणे शांतता प्रस्थापनेशी संबंधित होत्या. त्यात ५५ कोटी रुपये द्यावे अशी अट नव्हती. सर्व धर्माच्या प्रमुखांनी त्या अटी मान्य केल्याचं लेखी आश्वासन दिलं. त्यानंतरच उपवास सुटला. गांधीजींचे प्राण घेण्याचा प्रयत्न करणारा गट हा उपवासातच गांधीचं जीवन संपेल अशी आशा लावून बसला होता. त्यांच्या आशेवर पाणी पडलं ते अधिक सक्रिय झाले आणि दोनच दिवसांनी २० जानेवारीला त्यांच्या प्रार्थना सभेत बॉंब फेकण्यात आला.

### ३. मुस्लिम धार्जिणेपणा

तिसरं कारण सांगितलं जातं गांधीजींच्या मुस्लिम धार्जिणेपणाचं. त्यांनी मुसलमानांचे फाजील लाड केले. हिंदूंचं नुकसान करून मुसलमानांना झुकतं माप दिलं. कितपत खरे आहेत हे आक्षेप ? हिंदूंचं नुकसान करून मुसलमानांना काही दिल्याचे पुरावे सापडत नाहीत.

ह्या देशातील प्रत्येक पुढाऱ्याने मुसलमानांना मुख्य प्रवाहात आणण्याचा प्रयत्न केला. हिंदु-मुस्लिम ऐक्याचा पुरस्कार केला. ह्यापेक्षा वेगळं काही गांधीजींनी केलं नाही. काही पुढाऱ्याचं मत बघू.

**विवेकानंद** - खरे तर विवेकानंद राजकीय पुढारी नाहीत. पण भारताच्या प्रगतीचा त्यांना ध्यास लागला होता. त्यातूनच त्यांनी हिंदु-मुसलमान एकीचा पुरस्कार केला. ते म्हणतात, मुसलमानांनी हिंदुंवर मिळवलेला विजय हा गोरगरीब आणि दलितांच्या उन्नतीला कारणीभूत झाला आहे. आमच्यापैकी १/५ लोकं मुसलमान झाले. केवळ तलवारीच्या बळाने हे झाले असे म्हणणे वेडेपणा आहे. वेदांती आत्मा आणि इस्लामी देह धारण करूनच भारताची प्रगती होईल.

**महादेव गोविंद रानडे** - हिंदु मुस्लिम दोघंही एक झाल्याशिवाय या देशाची प्रगती होणार नाही. हा धडा आपण पूर्वीच्या इतिहासातून घेतला पाहिजे.

**वि. दा. सावरकर** - इंग्लंडमध्ये असताना १९०७ मध्ये हिंदु आणि मुसलमान वेगळे नाहीत. एकमेकात मिसळून गेले आहेत. हे स्पष्ट करताना मुसलमानांचा उल्लेख ते इंद्रधनुष्यातील एक रंग असा करतात. माफी मागून अंदमानातून सुटका करून घेतल्यानंतर सावरकरांचे विचार बदललेले दिसतात. त्यांचा ब्रिटिश विरोध मावळला. विरोधाची सुई मुसलमान, काँग्रेस आणि गांधीजींकडे वळली. ते आता हिंदूचे पुढारी झाले. हिंदुत्ववादाचा पुरस्कार करणारा हा त्यांचा नवा अवतार होता. **लोकमान्य टिळक** - गांधीजींचा भारतीय राजकारणात उदय होण्यापूर्वी १९१६ साली लखनऊ करार करण्यात आला. त्यांत टिळकांचा

पुढाकार होता. ह्या करारान्वये विधानसभेमध्ये मुस्लिमांना प्रतिनिधित्व देण्यात आले. या कराराचे समर्थन करताना टिळक म्हणतात. ‘आम्हाला परकीय सरकारशी भांडायचे आहे. त्यासाठी आपसातील भांडणे मिटवली पाहिजेत. सर्व जातीभेद, धर्मभेद, मतभेद मिटवून आपण स्वातंत्र्याची एकमुखी मागणी केली पाहिजे. मुसलमानांना किंवा हिंदुस्थानातील कोणत्याही जमातीला हक्क दिले तरी हरकत नाही. पण परकीय सत्ता जाऊ दे.’

गांधीजी राजकारणात आल्यावर मुसलमानांना झुकते माप देणारा कुठलाच करार त्यांनी केला नाही. तरी मुस्लिमधार्जिणेपणाचा आरोप गांधीजीवरच केला जातो. अखिल मानव जातीवर प्रेम करणे (ब्रिटिशांवर सुध्दा) हा गांधीजींचा धर्म होता. त्याप्रमाणे ते मुसलमानांवरही प्रेम करत होते. ह्याला मुस्लिमधार्जिणेपणा म्हणायचं ?

## गांधी हत्येची खरी कारणे

गांधी हत्येची जी कारणे लोकांपुढे पुन्हा पुन्हा मांडली जातात ती तर्कसंगत नाहीत. हे समजून घेण्याचा आपण प्रयत्न केला. मग हत्येमागची खरी कारणे कोणती? गांधीहत्येचा सातत्याने प्रयत्न का झाला ? या प्रश्नाचाही थोडक्यात उलगडा करून घेतला पाहिजे. गांधीहत्येचे महाराष्ट्राच सातत्याने प्रयत्न झालेले दिसतात. आणि ह्या प्रयत्नात पुण्याचा एक गट अधिक सक्रिय होता.

गांधीजी सर्व धर्मांमध्ये समन्वय साधून भारतात सर्वांनी एकत्र रहावं हा विचार मांडणारे, तर विरोधी संघटना धार्मिक राष्ट्र निर्माण करण्याची आकांक्षा बाळगणाऱ्या. जातीपातीचे सर्व भेदभाव विसरून सर्वांना समान पातळीवर आणण्याचा गांधीजींचा मानवतावादी ध्यास; तर ह्या विरोधी संघटनांना विशिष्ट व वरिष्ठ वर्चस्वाची आस. असा हा वैचारिक मतभेद गांधीहत्येस कारणीभूत ठरला.

## फाळणी आणि गांधीजी

वस्तुतः गांधीजींचा अखेरपर्यंत फाळणीला विरोधच होता. फाळणी टळावी म्हणून त्यांनी जिन्हांशी अनेकदा वाटाघाटी केल्या. माउंटबॅटनशी चर्चा केली. फाळणी टाळण्यासाठी ते जिन्हांना भारताचं प्रमुखपद द्यायलाही तयार झाले.

## फाळणीच्या विषारी फळाची बीजं

भारताची फाळणी झाली. एका राष्ट्रीची दोन राष्ट्र झाली. कोणी पेरली द्विराष्ट्रवादाची बीजं ? एका राष्ट्राची दोन राष्ट्र प्रथम मनात निर्माण होतात. त्यानंतर बोलण्या-वागण्यात 'आपण' किंवा 'ते' अशी परकेपणाची भावना अभिव्यक्त होते. अनेक कारणांनी ही परकेपणाची दरी वाढत जाते आणि मग एका राष्ट्राची दोन शकलं होतात.

द्विराष्ट्रची बीजं पेरली कोणी ? गांधीजींनी ? जिन्हांनी ? गांधीजी अखेरपर्यंत अखंड हिंदुस्थानवादीच होते. हे बी पेरलं लॉर्ड डफरिनने. १९०९ साली त्याने हिंदु व मुसलमानांसाठी धर्माधारित विभक्त मतदारसंघाची घोषणा करून हे बी पेरलं. पुढ़ील दुहीची बीजं लक्षात घऊन बऱ्याच विचारी मुसलमानांनी विभक्त मतदार संघाला विरोध केला. सर सुलतान अहमद, ए. एम. चुश्तरी, रेझा उल करीम ही त्यापैकी काही नावे.

१९१५ मध्ये हिंदमहासभेची स्थापना झाली. मुस्लिम लीग आणि हिंदु महासभेसारख्या धार्मिक संघटनांनी डफरिनने पेरलेल्या बीजाला अंकुरित केलं. १९३० मध्य इक्बालने मुस्लिमांसाठी वेगळे राष्ट्र हवे असा विचार मांडला. राष्ट्रवादी मुसलमानांनी त्याला विरोध केला. १९३७ साली अहमदाबाद येथे भरलेल्या हिंदु महासभेच्या अधिवेशनात अध्यक्षपदावरून बोलताना सावरकर म्हणाले होते, 'आज हिंदुस्थान एकात्म एकजीव राष्ट्र आहे. असं समजण्याची चूक आपण करू नये. उलट ह्या देशात हिंदु व मुस्लिम ही दोन राष्ट्रे आहेत. हे मान्यच करावयास हवे.' (समग्र सावरकर वाङमय, महाराष्ट्र हिंदु महासभेच्या कार्याचा इतिहास, लेखक - शंकर

रामचंद्र दाते) १९४३ साली सावरकर म्हणतात, 'माझा जिन्हांच्या दोन राष्ट्राच्या सिद्धांताला विरोध नाही. आम्ही हिंदु स्वतः एक राष्ट्र आहोतच. हे एक ऐतिहासिक सत्य आहे. हिंदु व मुसलमान दोन वेगळी राष्ट्रे आहेत. (इंडियन अॅन्युअल रजिस्टर १९४३ भाग दोन, पान सहा)' डफरिनने पेरलेल्या बीजाचे खतपाणी घालून कोणी वृक्षात रूपांतर केले? फाळणीच्या विषारी फळ धारणेस कोणी हातभार लावला?

काही कट्टरपंथी हिंदुत्ववादी एका तोंडाने अखंड हिंदुस्थानचा जप करीत राहिले आणि दुसऱ्या तोंडाने द्विराष्ट्रवाद मान्य करीत राहिले. मुसलमानांबद्दल सतत द्वेष पसरवत राहिले. फाळणी होऊ नये यासाठी कुठलाही प्रयत्न कट्टर हिंदुत्ववादी संघटनांनी केला नाही वा कुठलेही आंदोलन उभारले नाही. देश अखंड रहावा, हिंदु-मुस्लिम किंवा सर्वच जातीधर्माचे लोक ह्या देशात प्रेमाने एकत्र नांदावेत या भूमिकेतून गांधीजी सतत प्रयत्न करीत राहिले. त्यांनी फाळणी टाळण्याचा आटोकाट प्रयत्न केला. त्यांनाच कट्टर हिंदुत्ववादी फाळणीचे गुन्हेगार म्हणून सतत झोडपत असतात, हे कितपत न्यायसंगत आहे? याचा विचार केला पाहिजे आणि या कुप्रचाराचा प्रतिवाद करून समाचार घेण्यास सिद्ध असायला हवे.

*** या लेखनासाठी खालील पुस्तकांचा आधार घेतला गेला -**

**१) महात्म्याची अखेर (लेखक : जगन फडणीस)**

**२) Let's kill Gandhi (लेखक : तुषार गांधी)**

**३) लास्ट फेज (लेखक : प्यारेलाल नायर)**

* * * * *